म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 3926



एका चरित्राचे चरित्र

द.ना.गोखले

REFBK-0024734

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 DEC 1985

15 DEC 1985

18 DEC 1985

12 JAN 1986

9 MAR 1986

19 MAR 1986

1 JUN 1986

22 JUN 1986

22 OCT 1986

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ ग्रंथ
३१२६
२४०३४
३०।१०।८५

एका चरित्राचे चरित्र

'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन'
या चरित्राच्या निर्मितीचा
चरित्रकाराने सांगितलेला
वृत्तान्त

द० न० गोखले

REFBK-0024734

आज प्रकाशन

मौज प्रकाशन ३२८
पहिली आवृत्ती १९८५
© १९८५, द० न० गोखले

मुखपृष्ठ :
प्रमोद जोशी

प्रकाशक :
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटावबाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटावबाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत पंचावन्न रुपये

डॉ० वि० रा० करंदीकर
आणि करंदीकर–कुटुंबीय
श्री० ब० ल० वष्ट
आणि वष्ट--कुटुंबीय
यांच्या निरपेक्ष स्नेहास

प्र स्ता व ना

श्री० गं० दे० खानोलकरांच्या 'साहित्य-सिंह' या श्रीपाद कृष्णांच्या चरित्राची समीक्षा 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या जानेवारी–फेब्रुवारी–मार्च १९७३ च्या अंकात मी केली होती; आणि ती वाचून मराठीतील आघाडीचे नाटककार नि माझे मित्र प्रा० वसंत कानेटकर यांनी पत्रद्वारे मला अशी सूचना केली होती, की मी 'चरित्र' या वाङ्मयप्रकाराची चर्चा करणारे एखादे साहित्य-शास्त्रीय पुस्तक लिहावे! 'चरित्र' या वाङ्मय-प्रकाराबद्दल तोवर मी थोडाफार विचार केलेला होता. पण असे पुस्तक लिहावयाचे तर जुन्यानव्या मराठी चरित्रांचे व्यापक नि व्यासंगी वाचन हवे, इतर भाषांतील—निदान इंग्रजीतील—चरित्रवाङ्मयाची चांगली माहिती हवी, नि चरित्रविषयक औपपत्तिक विचारावरही भक्कम पकड हवी. पण मी वाचन, व्यासंग वगैरे बाबतींत फारच उणा होतो. आजही आहे. तेव्हा, कानेटकरांची सूचना म्हणजे चरित्राच्या समीक्षेत 'आगे बढो' म्हणून पाठीवर दिलेली उत्तेजनाची थाप, असे मी मानले, आणि मनातल्या मनात सुखावून गप्प बसलो. कानेटकरांनी गंमत म्हणून माझ्यासाठी हरभऱ्याचे झाड लावले असेल, असेही मला क्षणभर वाटून गेले. पण 'चरित्र' या वाङ्मयप्रकाराविषयी काही लिहावे या कल्पनेचे बीज, अस्पष्टपणे का होईना, तेव्हाच माझ्या मनात नकळत रुजले असावे. आज 'एका चरित्राचे चरित्र' हे पुस्तक वाचकांच्या हाती देत असताना, ते बीज बारा वर्षांपूर्वी रुजत घालणाऱ्या श्री० कानेटकरांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही.

'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' हे चरित्र लिहिण्याचा संकल्प सोडून चरित्रविषयक साधनसामग्री गोळा करण्याचे काम मी जेव्हा सुरू केले तेव्हा माझ्या मनात असा विचार आला की चरित्र या वाङ्मय-प्रकाराविषयी सर्वसामान्य विवेचन करणारे पुस्तक लिहिणे आपणाला कठीण असले तरी 'चरित्र कसकसे जन्माला येते' याविषयी स्वतःचा अनुभव सांगणारे आत्मनिवेदनात्मक लेखन आपण सहजतेने करू शकू. तोवर मी 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' (१९४७) आणि 'डॉ० केतकर' (१९५९) ही चरित्रे लिहिली होती आणि चरित्रलेखनाचा थोडासा अनुभव माझ्या गाठीशी जमा झालेला होता. त्यामुळे चरित्रविषयक काही दृष्टी बरोबर घेऊन मी नव्या चरित्राला हात घालीत होतो. एखाद्या वाङ्मयकृतीच्या निर्मितीचा इतिहास सांगावयाचा म्हणजे मुख्यतः लेखकाच्या डोक्यात झालेल्या वैचारिक, भावनिक अशा अमूर्त गोष्टींची हकीगत शब्दांकित करावयाची. त्यासाठी स्मृती समर्थ पाहिजे. विशेषतः मानसिक उलथापालथी अचूकपणे टिपून घेण्याची नि त्या जशाच्या तशा धारण करण्याची क्षमता त्या स्मृतीत असली पाहिजे. मी एकंदरीत स्मरणाचा दुर्बळ आहे आणि माझा तरी अनुभव असा आहे, की मनातील विचार-विकारांचे अंतिम रूप किंवा निष्कर्ष लक्षात राहिले तरी विचार–विकारांतील चढउतार, आंदोलने, वळणे–

वाकणे, द्वंद्वे, अनुकूल-प्रतिकूल युक्तिवाद वगैरे तपशील जाम लक्षात राहात नाही. त्यामुळे, पूर्वीच्या दोन चरित्रांच्या लेखनाचा वृत्तांत स्थूलपणे मला लिहिता आला असता तरी तपशील गळून गेल्यामुळे तो वृत्तांत तितकासा उपयुक्त झाला नसता. पण 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' हे चरित्र मी नव्यानेच हाती घेत असल्यामुळे विचार-विकारांचे तपशील त्या त्या वेळी टिपून ठेवणे मला शक्य होते आणि चरित्रविषयक माझ्या दृष्टीचे उपायोजन त्या चरित्रात पावलोपावली मी कसकसे केले ते सांगण्याची सोय होती. तेव्हा, 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' या चरित्राचेच चरित्र सांगावयाचे, असा बेत मी पक्का केला.

मात्र, विचार-विकारांची टिपणे ठेवणे, वाटले तेवढे सोपे गेले नाही. मानसिक चलनवलन ही गोष्ट एवढी अचपळ, गुंतागुंतीची नि सूक्ष्म आहे की तिला वेळच्या वेळी शब्दरूप देणे अशक्यप्राय आहे, असे माझ्या लक्षात आले. शिवाय, चरित्रनिर्मितीकडेच लक्ष केंद्रित झाल्याने त्या निर्मितीची नोंद ठेवण्याकडे साहजिकच दुर्लक्ष होत गेले. तरी पण काही टिपणे मी ठेवली, चरित्राच्या लेखनाच्या वेळी बाद झालेले कागद फेकून न देता त्यांचा संग्रह केला, सर्वत्र दिनांक घालून ठेवण्याची दक्षता घेतली, आणि त्या कच्च्या सामग्रीच्या आधारे, स्मृती थोडीफार ताजी असताना, हे 'एका चरित्राचे चरित्र' लिहून काढले. 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' मी दिनांक ११-२-१९७५ ला हातावेगळे केले आणि 'एका चरित्राचे चरित्र' नंतर ऑगस्ट १९७९ ते फेब्रुवारी १९८१ या काळात सुमारे अठरा महिन्यांत पूर्ण केले.

एखाद्या प्रदीर्घ वाङ्मयकृतीची जन्मकथा सांगणारे पुस्तक मला मराठीत आढळले नाही. इंग्रजीमध्ये अशी काही पुस्तके आढळली पण त्यांत कादंबरी वगैरे वाङ्मयप्रकारांचाच विचार असल्यामुळे कित्त्यासारखी ती मला उपयोगी पडली नाहीत. शिवाय, सामान्य वाचकांची वरवरची जिज्ञासा भागवावी, त्यांच्या रंजनाकडेच मुख्यतः लक्ष द्यावे, अशी त्या पुस्तकांची प्रवृत्ती असल्यामुळे माझ्या भूमिकेशी त्यांचे सूत जमले नाही. चरित्राच्या निर्मितीची शक्य तेवढी खोल, अनेकांगी, लेखकाच्या समस्या विचारात घेणारी, नि त्याच्या अंतरंगात वाचकांना तळापर्यंत नेणारी सुबोध सत्यकथा सांगावी, हा माझा प्रयत्न होता. तेव्हा, या पुस्तकाचे प्रारूप, किंवा ढाचा, किंवा रूपरेषा कशी असावी, ते माझे मीच ठरवले आणि त्याप्रमाणे लेखन केले. थोडीशी चरित्रनिर्मिती करणाऱ्या माझ्यासारख्या एका हौशी चरित्रकाराची निर्मिति-प्रक्रिया साहित्यसमीक्षकांना समजावी आणि त्यांना समीक्षेच्या क्षेत्रात अल्पस्वल्प मदत व्हावी, अशी या लेखनामागची अपेक्षा आहे. मानवाचे नव्हे, तर एका वाङ्मयकृतीचे हे चरित्र सामान्य वाचकांचे कुतूहलही अंशतः शमवू शकेल आणि त्यांना प्रिय होईल, अशी मला उमेद आहे. या लेखनाविषयी माझी ही जी भूमिका आहे, बहुधा तशीच भूमिका प्रा० श्री० पु० भागवतांचीही असावी. त्यामुळेच, लेखनाच्या कल्पनेपासून प्रसिद्धीपर्यंत त्यांनी आपुलकीने त्यात लक्ष घातले.

प्रा० श्री० पु० भागवत मला असेही सुचवीत होते, की मी माझ्या तीनही चरित्रांचा समावेश या पुस्तकात करावा आणि त्यांमागील निर्मितिप्रक्रिया विशद करावी. पण पहिली दोन चरित्रे लिहिल्याला सुमारे चाळीस नि तीस वर्षे उलटून गेली होती. त्यामुळे त्यांच्या निर्मितिप्रक्रियेतील अनेक अंगे मी विसरून गेलो होतो. शिवाय, मन ज्या मानाने विकसित असेल त्या मानानेच ते निर्मितिप्रक्रियेची अंगे समजू शकते नि नोंदवू शकते. त्यामुळे प्रत्येक चरित्राची निर्मितिप्रक्रिया

माझ्या स्वतःच्या विकासक्रमात मी सारखेपणाने बघितलेली नव्हती. मिळून, तीनही चरित्रांविषयी मी जर समावेशक पुस्तक लिहिले असते तर ते विषम उतरले असते. एका चरित्राची जी अंगे मी लक्षात घेतली असती ती इतर दोन चरित्रांच्या बाबतीत लक्षात घेतलीच असती, असे नाही; आणि तिहींना साधारण अशा एकाच अंगावर लिहिताना प्रत्येक चरित्राबाबत त्या अंगाची जाण नि आठवण मी सारख्याच क्षमतेने व्यक्तविली असती, असेही नाही. तेव्हा लेखन शक्यतो एकरूप व्हावे, परिपूर्ण व्हावे, म्हणून 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' या एकाच, अगदी अलीकडच्या, चरित्रावर पुस्तक केंद्रित करावयाचे, असे मी ठरवले.

मात्र, तीनही चरित्रांचा एकत्रित विचार केला तर निर्मितिप्रक्रियेवर अधिक प्रकाश पडू शकतो, निर्मितीचा लेखकाच्या विकासमान व्यक्तित्वाच्या संदर्भात विशेष विचार होऊ शकतो, हे श्री० पु० भागवतांच्या सूचनेमुळे माझ्या मनावर ठसले होते. तेव्हा, आठवणाऱ्या ठळक ठळक गोष्टींवर मन केंद्रित करून 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' आणि 'डॉ० केतकर' या चरित्रांचाही काही परामर्श येथे प्रस्तावनेत मी घेणार आहे. मी लिहिलेल्या तीनही चरित्रांत काही सारखेपणा असला तरी त्यांची घडण कुठेकुठे कशी वेगवेगळ्या रीतींनी होत गेली, माझी जाण जसजशी वाढली तसतशी त्यांची रूपे कशी बदलली, हे त्यामुळे स्पष्ट होऊ शकेल.

श्री० खानोलकरांनी लिहिलेले 'माधव जूलियन' हे चरित्र शिकवता शिकवता माझी जिज्ञासा कशी जागी झाली, माझ्या निर्माणशक्तीला कसे अंकुर फुटू लागले, आणि 'डॉ० पटवर्धन...' या चरित्राच्या लेखनाकडे मी कसा वळलो, ते या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात मी सांगितले आहे. पण 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' या पहिल्या चरित्राच्या लेखनाकडे मी कसा वळलो? बाबारावांच्या असामान्य जीवनक्रमाने, त्यांच्या त्या जन्मठेपीने नि मृत्यूच्या जबड्यात ठाण मांडून सदैव कार्यरत राहण्याच्या जिद्दीने मी आपादमस्तक थरारलो होतो. देशासाठी त्यांनी केलेले अपार साहस नि सोसलेले अपरिमित कष्ट उजेडात आणावे, त्यांतील दिव्यदाहक स्फूर्ती सामान्यांपर्यंत पोचवावी, म्हणून मी फार उत्सुक होतो. तेव्हा मुख्यतः गुणगौरवाच्या भावनेने मला प्रेरणा दिली, असे म्हणता येईल. 'डॉ० केतकर' या चरित्राच्या वेळी परिस्थिती अगदी भिन्न होती. पीएच० डी० च्या प्रबंधासाठी डॉ० केतकरांच्या चरित्राचा, व्यक्तित्वाचा नि वाङ्मयाचा मी कसून अभ्यास केलेला होता; हे विषय पिंजून पिंजून त्यांवर विश्लेषण-पद्धतीने मी सुमारे साडेसहाशे पृष्ठांचा प्रबंध लिहिलेला होता; आणि पीएच० डी० पदवीही माझ्या पदरात पडलेली होती. पण मला सारखी ऊर्मी येत होती, की प्रबंधात डॉ० केतकर विश्लेषण-पद्धतीने आपण वाचकांपुढे मांडले, ती पद्धती प्रबंधाला योग्य होती; पण डॉ० केतकर जर खरेखुरे वाचकांपर्यंत पोचवायचे असतील तर प्रबंधपद्धतीने युक्तिवाद करीत करीत, पुरावे देत देत, त्यांच्या जीवनाचे एकेक अंग भागशः सांगून उपयोगी नाही. त्यासाठी संश्लेषण-पद्धतीने समग्र डॉ० केतकरांचा आघात वाचकांच्या मनावर एकदम केला पाहिजे.—डॉ० केतकरांचे 'ललित चरित्र' त्यासाठी लिहिले पाहिजे. मुख्यतः या ऊर्मीमुळे मी डॉ० केतकर-चरित्राकडे वळलो आणि त्या चरित्रात 'समग्र' डॉ० केतकर 'एकदम' उभे करण्याचा प्रयत्न केला. मला वाटते, माझी ही ऊर्मी विशिष्ट प्रकारच्या ललित निर्मितीची होती. (ललित निर्मिती म्हणजे गोडगोड, लुसलुशीत भाषेत

लाडे लाडे केलेले गोंडस लेखन, हा अर्थ येथे मला अभिप्रेत नाही. ललित निर्मिती म्हणजे शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध यांनी गोचर होणारी, वाचकांना एकदम भिडणारी, समूर्त नि सजीव कलाकृती, हा अर्थ मला अभिप्रेत आहे.) 'डॉ० पटवर्धन...' या चरित्राप्रमाणे 'डॉ० केतकर' या चरित्राच्या वेळी माझी जिज्ञासा फारशी प्रदीप्त नव्हती. कारण, प्रबंधाच्या वेळी केलेल्या संशोधनात नि लेखनात तिचा उपशम आधीच झालेला होता.

चरित्र साधार लिहावे, वास्तव घटनांच्या आधारावरच त्याची उभारणी करावी, त्यासाठी शक्य ती ती सामग्री कष्टपूर्वक गोळा करावी, अशीच तीनही चरित्रांच्या वेळी माझी भूमिका होती. पण गोळा केलेल्या सामग्रीचा पुरेसा चिकित्सक अभ्यास 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' या पहिल्या चरित्राच्या वेळी माझ्या हातून झाला नाही, असे आता, सुमारे चाळीस वर्षांनंतर, म्हणावेसे वाटते. त्या चरित्रात मी सत्याचा कोठे हेतुतः विपर्यास केला आहे असे नाही. पण गोळा केलेल्या सामग्रीची सूक्ष्म पाहणी करण्यासाठी जी विवेचक बुद्धी नि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व लागते त्याची त्या चरित्राच्या वेळी पुरेशी वाढ झालेली नव्हती. समोरच्या कागदपत्रांची आणि आठवणींची छाननी मी काही प्रमाणात केली. पण स्वतः बाबाराव सावरकरांनी अत्यंत प्रांजळ भावाने आपल्या जीवनाची जी हकीगत मला सांगितली होती तिला पूरक अशी माहिती शोधण्याकडेच माझा मुख्य कल होता. तो तो प्रसंग उत्कट, उज्ज्वल नि स्फूर्तिदायक करणारा तपशील वेचण्याकडेच माझे लक्ष लागलेले होते. विरुद्ध किंवा वेगळा भाग वेचून त्याची सांगड मूळच्या हकीगतीशी घालता येते का, हे मी साक्षेपाने बघत नव्हतो. मानवी मनाचे अगदी तुटपुंजे ज्ञान तोवर गाठीशी असल्यामुळे त्या ज्ञानाला सर्वस्वी अपरिचित अशी सामग्री समोर आल्यास तिचा अर्थच माझ्या मनात प्रकाशत नव्हता. त्यामुळे, एका तरुण, प्रकाशपूजक, उत्कट, दिव्य-दाहकाशी सलगी करण्यासाठी उत्सुक असणाऱ्या, शब्दकुशल चरित्रकाराने लिहिलेली एका अलौकिक क्रांतिकारकाची गहिरी गौरवगाथा म्हणून ते चरित्र पुष्कळांना आवडले, अद्यापिही आवडते. पण चोखंदळ चिकित्सकांनी त्याला हात राखूनच शाबासकी दिली.

गेली सुमारे चाळीस वर्षे मी बाबारावांच्या चरित्रावरील अभिप्राय नि मते बघत आहे. अलीकडेच प्रा० य० दि० फडके यांनी स्वातंत्र्योत्तर मुक्त झालेली साधनसामग्री धुंडून नि विशेषतः सरकारी दप्तर बघून 'सावरकरांचा शोध' नामक विवेचक पुस्तक लिहिले आहे, तेही मी वाचले आहे. माझ्या पुस्तकाबद्दल प्रा० फडक्यांशी थोड्याफार गप्पा मारण्याची संधीही मला मिळाली आहे. पण या सर्वांतून बाबाराव चरित्रात माझ्या हातून इतिहासच नोंदवला गेला आहे, याविषयी माझी खात्री पटली आहे. बाबारावांनी नि त्यांच्या परिचितांनी मला खऱ्याखुऱ्या हकीगतीच प्रांजळपणे सांगितल्या, त्यांना तिखटमीठ लावले नाही किंवा आमूलाग्र कपोलकल्पित त्यात घुसडले नाही, म्हणूनच हे शक्य झाले. समोरच्या सामग्रीचा अधिक चिकित्सक परामर्श मी घेऊ शकलो नाही, माझा नवखेपणा त्यावेळी आड आला, ती गोष्ट वेगळी.

साधनसामग्रीकडे अधिक चिकित्सकपणे बघावे, सत्यामधल्या सुसंगतीबरोबर असंगतीकडे नि विसंगतीकडेही स्वागतशील दृष्टीने पहावे, चरित्रनायकाला त्याच्या गुणांसह दोषांबरोबरही स्वीकारावे, वास्तव बहुधा संमिश्र नि जटिल असणार अशी प्रारंभिक भूमिका घ्यावी, असा विकास

माझ्या मनोवृत्तीत कशामुळे झाला? नागडेउघडे सत्य परखडपणे सांगणाऱ्या डॉ० केतकरांच्या वाङ्मयाचा नि विशेषतः त्यांच्या कादंबऱ्यांचा मी जो पीएच० डी० साठी अभ्यास केला त्याचा तो अंशतः परिणाम असावा. बी० टी० च्या परीक्षेसाठी मानसशास्त्राचे जे अध्ययन माझ्या हातून घडले, त्याचे ते अंशतः फळ असावे. डॉ० केतकरांच्या नि डॉ० पटवर्धनांच्या चरित्रात माझ्या या विकसित भूमिकेचा आविष्कार झालेला आहे. साधनसामग्रीची व्यवस्थित टिपणे लिहून काढून, टिपणांचे संच करून, त्यांचा उपयोग लेखनाच्या वेळी करावा; किंवा माहितीचा संदर्भसुलभ संग्रह व्हावा म्हणून विषयसूचीची नि सूचिपत्रिकांची योजना करावी; किंवा आठवणी सांगणाऱ्या व्यक्तीकडून आठवणी तपासून घ्याव्या आणि आठवणींवर त्या व्यक्तीची स्वाक्षरी मिळवावी, वगैरे तंत्रेही पीएच० डी० च्या संशोधनाच्या वेळीच मी हस्तगत केली आणि शेवटच्या दोन चरित्रांत त्यांचा वापर केला.

चरित्रात फक्त वास्तव सत्याला किंवा प्रत्यक्ष घटितालाच स्थान असावे; कल्पिताला त्यात मुळीच वाव नसावा, असा माझा प्रारंभी फार आग्रह होता. चरित्र ही इतिहासाचीच शाखा असल्यामुळे तो आग्रह स्थूल मानाने योग्यही होता. त्यामुळे 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर'च्या प्रस्तावनेत मी "बुद्धिपूर्वक" असा उल्लेख केला, की "पुस्तकातील एकही अक्षर मी आधाराविना लिहिले नाही!" 'डॉ० केतकर'च्या प्रस्तावनेत मी म्हटले, की 'नामूलं लिख्यते किंचित्' हा दंडक मी यथाशक्ती पाळला आहे. 'डॉ० केतकर'च्या लेखनाच्या वेळी मी एवढा दक्ष होतो, की पृ० १६२ वर केतकरांच्या ज्ञानकोश-विक्रयाच्या खटाटोपाचे नि उन्हात तळपणाऱ्या त्यांच्या वाढत्या टकलाचे वर्णन करताना, त्या काळात केतकरांना खरोखरच टक्कल पडले होते ना, याविषयी मी खात्री करून घेतली होती! पण वास्तव सत्याविषयीचा मी "बुद्धिपूर्वक" धरलेला आग्रह असा कडक असला तरी या वास्तव सत्याच्या साम्राज्यात, माझ्या नकळत, कल्पिताने तुरळक छुपी वस्ती केलीच होती! 'संन्यास की संसार' हा बाबाराव सावरकरांच्या मनात झालेला वैचारिक संघर्ष (आ० २ री, पृ० २८), डेप्युटी सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस जे० ए० गायडर याच्याशी त्यांचे झालेले सवाल-जबाब नि विजेचे धक्के देऊन त्यांचा करण्यात आलेला छळ (पृ० १४८), विजापूरच्या एकलकोंडीत त्यांनी सोसलेला भयानक एकांतवास (पृ० २१५), वगैरे प्रसंग खुद्द चरित्रनायकाच्या तोंडूनच मला समजले होते; पण त्यांत कुठे संघर्ष, कुठे संवाद, तर कुठे वातावरण अधिक खुलविण्यासाठी माझ्या हातून कल्पित मिसळले गेले होते. 'डॉ० केतकर' चरित्रात झालेले कल्पिताचे ठळक मिश्रण मला आता आठवत नाही; पण ते चरित्र पुन्हा वाचले तर त्यात कोठे कोठे पुसट मिश्रण तरी आढळू शकेल. निदान, पुराव्यावरून समजलेल्या वास्तवाच्या कथनात किंवा निवेदनासाठी त्याच्या केलेल्या जुळणीत कल्पित शोधता येईल.

'डॉ० पटवर्धन' हाती घेण्यापूर्वी कल्पिताविषयी माझी भूमिका बदलली आणि चरित्रात ऐतिहासिक सत्याला जरी प्रधान स्थान असले तरी कल्पित सत्याला अगदीच वाव नाही असे नाही, असे मला वाटू लागले. चरित्र ही इतिहासाचीच शाखा असल्याने त्यात ऐतिहासिक सत्यालाच प्राधान्य मिळावे, हे योग्य आहे. पण चरित्रकाराच्या हाती जी साधनसामग्री लागते तीमध्ये 'संपूर्ण' नि 'सजीव' सत्य कधीच ग्रथित झालेले नसते. त्या सामग्रीत सत्याचे लहानमोठे अंशच गुंतलेले असतात आणि ते अंश सत्याची रूपरेषा किंवा सत्यामधील कट्टीच्या जागा चरित्रकाराला

दाखवू शकतात. चरित्रकाराला, नि विशेषतः 'ललित' चरित्रकाराला, 'संपूर्ण' नि 'सजीव' सत्य वाचकांना सादर करावयाचे असते. तेव्हा, साधनसामग्रीतून हाती लागलेल्या सत्याच्या रूपरेषेला, किंवा महत्त्वाच्या बिंदूंना, किंवा गौण बिंदूंनाही धक्का न लावता, त्यांत चरित्रकाराला कल्पित मिसळावे लागते आणि ते 'संपूर्ण', 'सजीव' करावे लागते. 'डॉ० पटवर्धन...' चरित्रात असे पूरक नि कल्पित सत्य, किंवा ऐतिहासिक सत्याला यत्किंचितही ढका न लावणारे कल्पित सत्य, किंवा आशयाला 'संपूर्ण' नि 'सजीव' करू पाहणारे कल्पित सत्य, मी 'बुद्धिपूर्वक' वापरले आहे. 'असावा', 'असेल', 'बहुधा' इत्यादी शब्दांनी ते बहुतेक ठिकाणी सुचवलेले आहे. (कल्पित सत्य = कल्पनेने जाणलेले सत्य. कल्पित सत्य म्हणजे कपोलकल्पित गोष्ट नव्हे.)

'मनोवैज्ञानिक कल्पकता' हा कल्पकतेचाच एक भाग आहे. या पुस्तकाच्या पन्नासाव्या पृष्ठावर 'मनोवैज्ञानिक कल्पकते'चा मला अभिप्रेत असलेला अर्थ मी संक्षेपाने सांगितला आहे. 'डॉ० पटवर्धन...'ला हात घालीपर्यंत मनोवैज्ञानिक कल्पकतेशी माझी स्पष्ट ओळख झालेली नव्हती. पण 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' यांचे संमिश्र, वेगवान, फार संवेदनाक्षम, नि फार अचपळ व्यक्तित्व जेव्हा माझ्यापुढे ठाकले, त्या व्यक्तित्वाची हालचाल केवळ जाणिवेतल्या मनानेच नियंत्रित होत नव्हती असे जेव्हा उमजू लागले, तेव्हा त्या व्यक्तित्वाच्या अंतरंगात शिरण्यासाठी मनोवैज्ञानिक कल्पकता हाच एकमेव मार्ग आहे, हे मला कळून चुकले. मनोवैज्ञानिक कल्पकतेला पुराव्याचा आधार असतोच, पण त्या आधाराच्या साह्याने, मानसशास्त्रीय मर्यादा न सोडता, मानसशास्त्रीय ज्ञानाच्या उजेडात, चरित्रकार पुढे जातो आणि संभाव्य अमूर्त मानसिक सत्य उलगडू बघतो. 'डॉ० पटवर्धन...' चरित्रात या मनोवैज्ञानिक कल्पकतेचा मी प्रथमच मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे.

बाबाराव सावरकरांनी सांगितलेल्या आत्मकथेवरच 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' या चरित्राची उभारणी झाली होती. त्यामुळे, चरित्रात आत्मकथनामुळे किती भरीवपणा येतो, त्याला चरित्र-नायकाच्या दृष्टीची डूब मिळून कसे वेगळेच परिमाण प्राप्त होते, वगैरे गोष्टी मला पहिल्या चरित्रलेखनाच्या वेळीच समजल्या होत्या. अर्थात, दुसऱ्या नि तिसऱ्या चरित्राच्या वेळीही मी शक्य तेवढे चरित्रनायकांचे आत्मकथन हुडकले आणि त्याचा उपयोग करून घेतला. सर्वच चरित्रनायकांनी स्वतःच्या जीवनक्रमाविषयी, आशा-आकांक्षांविषयी, विचार-विकारांविषयी नि मनातील गूढ-गहन खळबळीविषयी काही ना काही अभिव्यक्ती करून ठेवली होती, हे चरित्रकार म्हणून मला लाभलेले मोठे सौभाग्य होते. चरित्रकाराने चरित्रनायकाचा भाट किंवा स्तुतिपाठक बनू नये, त्याला आपादमस्तक, अंतर्बाह्य नीट न्याहाळावा; पण त्याच्या प्रत्येक कृतीत त्याची म्हणून काय दृष्टी होती, तो स्वतःशीच का होईना स्वतःचे समर्थन कसे करीत होता, हे सहानुभूतिपूर्वक समजून घ्यावे, अशी माझी भूमिका आहे. चरित्रनायकांच्या स्वतःविषयीच्या अभिव्यक्तीमुळे आणि या भूमिकेमुळे तीनही चरित्रांत चरित्रनायकांना त्यांच्या गुणदोषांसह बघण्याचा प्रयत्न मी करू शकलो—आणि तरीही त्यांच्याविषयी आदर, कौतुक, प्रेम, आत्मीयता बाळगू शकलो.

'कोणतीही कलाकृती एकात्म हवी', 'चरित्रातील एकात्मता मुख्यतः चरित्रनायकाच्या व्यक्ति-

त्यावर अवलंबून असते' याची जाण मला प्रारंभापासूनच कळत नकळत आलेली होती. बाबाराव सावरकरांचे आत्मकथन हाच पहिल्या चरित्राचा मुख्य आधार असल्यामुळे आणि ही जाण मनाच्या तळाशी वावरत असल्यामुळे त्या चरित्रात सर्व आशय बाबाराव सावरकरांच्यावरच केंद्रित झाला. कोठेही विषयांतर झाले नाही, किंवा तोल बिघडला नाही. म्हटल्यास, एकात्मतेचा थोडा अतिरेकच झाला आणि 'मौजे'ला आपल्या अभिप्रायात म्हणावे लागले, की "हे जीवनचित्र स्पष्ट असले, तरी पार्श्वभूमिहीन, चौकट नसलेले असे वाटते..." "चरित्रकाराला अत्यावश्यक अशी...समाजैतिहासिक दृष्टी...[चरित्रकाराजवळ] नसावी." (२६-४-१९४७). अर्थात, दुसऱ्या नि तिसऱ्या चरित्रात मी चरित्राची एकात्मता ढळू न देता 'पार्श्वभूमी'कडे आवर्जून लक्ष दिले. बाबारावांच्या चरित्रावरील अभिप्रायात प्रा० डॉ० माईणकरांनी असे उद्‌गार काढले होते, की "खरे, चितळे या (गौण) व्यक्ती अल्पकाळ जरी नजरेसमोर असल्या तरी त्या बराच वेळ मनामध्ये रेंगाळतात..." (विक्रम, १९-४-१९४७). त्या अभिप्रायामुळे चरित्रातील गौण व्यक्तींकडे माझे लक्ष वेधले आणि पुढील चरित्रांत अशा व्यक्तींच्या चित्रणावर मी जाणीवपूर्वक ध्यान दिले. त्यांचे चित्रण गौणच असले तरी वातावरण–निर्मितीसाठी, साम्यविरोधाने चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाला उठाव देण्यासाठी, चरित्रनायकाच्या क्रियाप्रतिक्रिया नीट कळून त्याचा स्वभाव स्पष्ट होण्यासाठी मी ते उपयोगात आणू लागलो. चरित्राला एकात्मता देणारे चरित्रनायकाचे व्यक्तित्व आणि चरित्राला अंगभूत असणाऱ्या पण चरित्रात गौण असणाऱ्या इतर गोष्टी यांची सांगड अशा रीतीने पडत गेली.

एकात्मतेप्रमाणे 'आकृती' हाही कोणत्याही कलावस्तूचा एक अपरिहार्य घटक असतो. 'डॉ० केतकर'मध्ये 'लेखकाच्या निवेदना'त मी म्हटले आहे, की "चरित्राचा जो आशय असेल त्यामधून आपल्या सौंदर्यकल्पनेशी जुळणारा एखादा आकृतिबंध तयार व्हावा, असे... कलापिपासू लेखकाला वाटते"..."पण एखादा आकृतिबंध कृत्रिमपणे बनवण्याचा मोह या पुस्तकात मी सत्यदर्शनासाठी शक्य तेवढा टाळला आहे." प्रस्तुत पुस्तकात पृष्ठ ७३ वर मी तशाच अर्थाचे उद्‌गार काढले आहेत. मग, माझ्या तीन्ही चरित्रपुस्तकांत आकृतिसौंदर्य मी साधले आहे का? मला वाटते, की चरित्रासाठी ज्या वेळी एखाद्या व्यक्तीची निवड ललित चरित्रकार नक्की करतो तेव्हा त्या व्यक्तीच्या जीवनाला योग्य आकृती आहे ना, तीमुळे चरित्रालाही चांगला घाट येईल ना, हे तो कळत नकळत पारखून घेत असतो. मी तीनही चरित्रांत 'कृत्रिमपणे' चरित्राच्या आशयाला काही आकृतिबंध दिलेला नाही, हे खरे. पण चरित्रनायकांच्या जीवनाला हवी तशी आकृती आहे, हे मी सहजी बघितले असावे. प्रत्येक चरित्रातील जीवनाला कोणती आकृती आहे ते भूमितीमधील किंवा चित्रकलेमधील परिभाषा वापरून मी सांगू शकणार नाही. त्या आकृतींना इतर काही नावेही मी देऊ शकणार नाही. (कारण प्रत्येक आकृतीचे भाषेत नामकरण झालेले असतेच असे नाही.) पण तीन्ही चरित्रनायकांच्या जीवनाला नि म्हणून चरित्राला काही कलात्मक आकार आहे, असे मला जाणवत आहे.

चरित्राच्या बाह्य आकृतीत ज्या अंतर्गत आकृती असू शकतात त्यांची स्पष्ट जाण मला 'डॉ० पटवर्धन...'च्या वेळीच झाली. तशा आकृतीसंबंधी विवेचन पृ० ७३,७४ वर केलेले आहे.

चरित्राच्या कलापूर्ण घडणीत लय आणि निवड यांना कोणते स्थान असते, त्याची चर्चा या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणात मी केली आहे. पैकी 'लय' पहिल्या दोन चरित्रांत जर आली असेल तर नकळत आली आणि तिसऱ्यात काहीशी जाणीवपूर्वक आली. 'निवडी'बद्दलही तसेच म्हणता येईल. पहिल्या दोन चरित्रांच्या वेळी साधनसामग्री नि चरित्राचा आशय यांची सांगड आपोआपच पडली. त्यामुळे निवडीचा प्रश्न फारसा उद्भवलाच नाही. तिसऱ्या चरित्रात मात्र साधनसामग्री विपुलतेने हाताशी असल्यामुळे तिची काळजीपूर्वक निवडानिवड करावी लागली.

चरित्राचा आशय नि चरित्राचा आकार यांचा सौंदर्य-संबंध जमला पाहिजे, असे पृ० १५० वर मी म्हटले आहे; आणि 'डॉ० पटवर्धन...'च्या बाबतीत असा संबंध जमलेला नसावा अशी रुखरुख व्यक्त केली आहे. या सौंदर्यसंबंधाची जाण पहिल्या दोन चरित्रांच्या वेळी मला नव्हती. पण ती जाण नसतानाही तेथे हा सौंदर्यसंबंध सहजगत्या जमून गेला आहे, असे मला वाटते.

'चरित्राचे शब्दांकन' या शेवटच्या प्रकरणात 'डॉ० पटवर्धन...' लिहिताना माझी मनःस्थिती कशी होती, ते शक्यतो तपशीलवार मी सांगितले आहे. बाबाराव सावरकर किंवा डॉ० केतकर यांची चरित्रे लिहिताना माझी मनःस्थिती कशी होती, हे आता नीट आठवत नाही. पण एक अर्थपूर्ण गोष्ट स्थूलपणे स्मरणात राहिली आहे. ती अशी की लिहिलेले कागद बाद करून ते पुन्हा लिहिण्याचे प्रमाण कमी न होता क्रमशः वाढतच गेले! आधी प्रबंध लिहिलेला असल्यामुळे 'डॉ० केतकर'चे लेखन 'डॉ० पटवर्धन...'पेक्षा काहीसे सहज झाले असेल, हे खरे. पण 'डॉ० पटवर्धन...'च्या वेळी आधी प्रबंधासारखे विश्लेषक लेखन झाले नव्हते, हे काही त्याच्या लेखनात फाडाफाडी वाढण्याचे मुख्य कारण असेल, असे वाटत नाही. कालगतीप्रमाणे भाषेबद्दल डोळसपणा वाढला, मनोगतही सूक्ष्म होत गेले, आणि भाषेने मनोगत नेमके व्यक्त व्हावे म्हणून आग्रह धरण्याची सवय लागली, हे फाडाफाडीच्या चढ्या प्रमाणाचे कारण असावे.

हे पुस्तक सिद्ध होण्यासाठी प्रा० वसंत कानेटकर नि प्रा० श्री० पु० भागवत यांची जी प्रेरणा मिळाली तीबद्दल त्यांच्याविषयी मी कृतज्ञ आहे. याशिवाय पुस्तकाचे हस्तलिखित वाचणे, त्याविषयी बरावाईट अभिप्राय देणे, काही सुचल्यास सुचविणे, लेखकाचे मनोबल वाढविणे, वगैरे साह्य मला अनेकांनी केले. अशा अनेकांत, फर्ग्युसन महाविद्यालयातील मराठी विभागाचे तत्कालीन प्रमुख प्रा० स० शि० भावे आणि माझे मित्र डॉ० वि० रा० करंदीकर, श्री० ब० ल० वष्ट, प्रा० म० द० हातकणंगलेकर अशी काही नावे सहज आठवतात, तर काही नावे विसरली असतील याची खंत वाटते. सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

द० न० गोखले

रमा-मंगल,
२९, सहवास सहनिवास,
कर्वे नगर, पुणे ४११ ०५२.

६ मे १९८५

अनुक्रमणिका

१. चरित्रलेखनाचा संकल्प पृष्ठे १ ते १३

आधीचे चरित्रपर वाङ्मय (१)...'माधवराव' या विषयाने वेधले, अनेक कोडी घातली. (१)...आई-वडिलांविषयी कोडे (२)...शांताबाई या प्रेयसीविषयी कोडे. नव्या कल्पनांचे स्फुरण (३)...वरदा–प्रकरणाचे कोडे (८)...निर्माणशक्तीचे आणखी चलनवलन (११) ...प्रदीप्त जिज्ञासेला नि निर्माणशक्तीला भरपूर वाव दिसू लागला. (१२).

२. साधनसामग्रीची जुळवाजुळव पृष्ठे १४ ते ३४

साधनसामग्रीचा अंदाज (१४)...साधनसामग्री भराभर भरपूर मिळत गेली. (१५)... गिरीशांकडील माधवरावांच्या कागदपत्रांची पेटी (१५)...मराठ्यांकडील पत्रे नि कविता (१७)...पति-पत्नींची पत्रे (१८)...खानोलकरांकडील पत्रे, लीलाबाईंची दैनंदिनी, शांता-बाईंची आत्मचरित्रपर लिखाणे, माधवरावांची कवितावही वगैरे (१८)...डे० ए० सोसायटीचे दप्तर (२१)...इतर अप्रकाशित साधनसामग्री (२१)...साधनसामग्रीचे व्यवस्थीकरण (२१)...साधनसामग्रीची टिपणे. ती काढताना 'संपूर्ण' नि 'सजीव' चरित्रासंबंधीच्या कल्पनेचा उपयोग (२२)...प्रकाशित सामग्रीचा अभ्यास (२५)...आठवणी मिळवल्या (२६)...आठवणी हे एक महत्त्वाचे साधन (२८)...आठवणी सांगणाऱ्यांच्या विस्मरणाचे नि स्मरणाचे काही नमुने (३०)...आठवणी मिळवताना गळालेल्या दोन महत्त्वाच्या व्यक्ती (३२)...साधनसामग्री मिळविण्यासाठी लागलेला वेळ नि पैसा (३३).

३. शोधाचे स्वरूप : इतिहासप्रधान पृष्ठे ३५ ते ५३

शोधासंबंधी धोरण (३५)...मूलतः 'एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास' म्हणजे चरित्र. त्यातील असण्या-घडण्याची रूपे (३५)...शोधाचे स्वरूप : असण्या-घडण्याचा संग्रह, त्यातील सत्यासत्याची पारख, त्यातील परस्परसापेक्षतेचा मागोवा (३६)...संग्रहासाठी अनेक सूची (३६)...माधवरावांच्या लेखनाच्या सूचिपत्रिका (३९)...असण्या-घडण्याच्या पूर्वसंग्रहात मी टाकलेली भर (४१)...सत्यासत्याची पारख कशी केली? (४१)...कवितांमधील सत्या-सत्याचा निर्णय (४४)...असण्या-घडण्यातील कालसंबंध (४७)...कालसंबंधाने घटनेच्या भावकोशावर पडलेला प्रकाश (४९)...असण्या-घडण्यामधील कार्यकारणभाव (४९)... चरित्र मूलतः इतिहास असले तरी उत्कृष्ट चरित्र साहित्याच्या पदवीलाही पोचते. (५३).

४. शोधाचे स्वरूप : साहित्यप्रधान पृष्ठे ५४ ते ७५

सर्व सत्य सुंदर नसले तरी काही सत्य सुंदर असते. (५४)...मानवी जीवन हा सत्याचा सौंदर्यमय भाग आहे. त्यातच चरित्र सामावते. (५४)...चरित्राची तीन अंगे : व्यक्तित्व, जीवनक्रम, परिस्थिती. साहित्यदृष्टया व्यक्तित्वाला महत्त्व (५५)...माधवरावांच्या व्यक्तित्वाच्या अंगोपांगांचा मागोवा (५६)...अंगोपांगांच्या परस्परसंबंधांचे निरीक्षण (६१)... व्यक्तित्वाचा शोध नि वाचकांच्या साहित्यानंदाची पायाभरणी (६१)...एकात्मतेच्या दृष्टीने व्यक्तित्व, जीवनक्रम, परिस्थिती यांची पाहणी (६२)...चरित्रात अपरिहार्य नि आवश्यक असणारी निवड आणि तीमुळे कलेला मिळणारा वाव (६४)...निवडीच्या दोन पद्धती (६५)...कलादृष्टीचा निवडीवर परिणाम (६६)...निवडीचे काही नमुने (६७)... जीवनातील स्वाभाविक सौंदर्याकृती टिकवण्यासाठी निवड (७३)...साहित्यदृष्टया जसे व्यक्तित्वाला तसेच निवडीलाही महत्त्व (७४).

५. शोध : आईवडिलांचा पृष्ठे ७६ ते ८८

आईवडील म्हणजे एक जुळे कोडे (७६)...उमाबाईंविषयी प्रवाद (७६)...प्रवाद कसा उद्‌भवला ? (७७)...प्रवादात तथ्य होते का ? (७८)...'स्वप्नभूमी' मधल्या उल्लेखाचा उलगडा (८२)...त्रिंबकरावांच्या वेडसरपणाचा मागोवा (८४)...उमाबाई मुलांविषयी कोरड्या का ? (८६)...माधवरावांवर आईवडिलांचा परिणाम (८६)...प्रवादाचा उल्लेख चरित्रात का नाही ? (८७).

६. शोध : शांताबाईंचा पृष्ठे ८९ ते १०६

खानोलकरांच्या पुस्तकावरून माधवराव-शांताबाई यांच्या प्रेमसंबंधाचे दिसू लागलेले वेगळे रूप (८८)...खानोलकरांकडील साधनसामग्रीत त्या रूपाचा पडताळा (९०)... प्रेमसंबंधातील नवा घटनाक्रम (९१)...खानोलकरांच्या लेखनातील आणखी काही त्रुटी (९२)...नव्या घटनाक्रमाशी माधवरावांच्या नि शांताबाईंच्या भावविश्वाची संगती (९३) ...प्रेमसंबंधाच्या रूपरेषेत पत्रांच्या, कवितांच्या नि शांताबाईंच्या आत्मवृत्ताच्या साह्याने तपशिलाचा भरणा (९४)...प्रेमसंबंधाविषयी माधवरावांची बदललेली वृत्ती नि तिचा उलगडा (९८)...प्रेमभंगानंतरही शांताबाई माधवरावांच्या कविमनात रेंगाळत होत्या. (१०२)...शांताबाईंना शोधताना सापडलेले माधवराव (१०३)...शांताबाईंचा शोध नि काव्यातील काही अर्थपूर्ण जागा (१०४).

७. शोध : वरदा-प्रकरणाचा पृष्ठे १०७ ते १२२

माधवरावांच्या नि वरदेच्या मनाचे कोडे (१०७)...मीच कल्पिलेली माधवरावांच्या विरोधकांची भूमिका (१०७)...डे० ए० सोसायटीच्या दप्तरातील धक्कादायक माहिती

(१०९)...त्या माहितीला पत्रांची जोड (१११)...स्नेहजीवन हुडकताना झालेली माझ्या मनाची आंदोलने (११२)...मनोवैज्ञानिक कल्पकतेमुळे उमजलेले 'प्लेटॉनिक लव्ह'—शरीरनिरपेक्ष प्रेम (११४)...वरदेच्या पत्रातील नव्या शोधज्योती (११५)...माधवरावांनी रानड्यांना दोष का द्यावा? (११७)...वरदेची नि फर्गुसन प्रकरणाची काव्यातील प्रतिबिंबे (११८)...शांताबाईंच्या प्रतिबिंबाहून वरदेचे प्रतिबिंब फिके का? (१२०)...वरदा-प्रकरणाच्या शोधातील एक फसगत (१२१).

८. शोध : वैवाहिक जीवनाचा पृष्ठे १२३ ते १३६

वैवाहिक जीवनाचा भाग कितपत आकर्षक होईल, याबद्दल साशंकता (१२३)...लीला-बाईंच्या दैनंदिनीने सत्यात खोल शिरण्याचे दार किलकिले केले. (१६३)...पतिपत्नींतील वासना-विषमता (१२४)...पतिपत्नींच्या प्रारंभिक संबंधातील लहान लहान नवी सत्ये (१३०)...वरदेसंबंधीच्या गफलतीने माधवराव-लीलाबाई यांचे भावजीवन पुरे समजण्यात अपयश (१३०)...१९२९ ते १९३७ या कालखंडातील दांपत्यसंबंध—पत्रांनी पडलेला प्रकाश (१३१)...दोघे वेगळी का राहिली, त्याची कारणमीमांसा : कल्पनेने केलेली नि अंशतः चरित्रात न नोंदवलेली (१३४).

९. चरित्राचे शब्दांकन पृष्ठे १३७ ते १५९

शोधाचे एकूण क्षेत्र (१३७)...शोध संपल्यावर चरित्र शब्दांकित करण्याचा प्रश्न. चरित्रा-तील वृत्तान्त कोणत्या क्रमाने सांगावा? (१३७)...कालक्रमानुसारी वृत्तान्त सांगताना कालखंड पाडणे तसे सोपे नव्हते. (१३९)...कालखंड शक्यतो स्वयंपूर्ण व्हावे म्हणून काही प्रकरणांची फेरमांडणी (१४३)...'हा! हन्त हन्त!' हे वेगळे प्रकरण का केले? (१४४)...कालक्रमानुसारी निवेदनाने लयीचा प्रश्न आपोआप सुटला. (१४४)...जीवनाचे चित्र किती तपशिलाने द्यावे?—सामग्री, जीवन-स्वरूप, रूढ गैरसमज वगैरेंचा विचार (१४५)...तपशील देताना पाळावयाची पथ्ये—तपशील नि भाष्य (१४७)...जास्त तप-शील देण्याच्या चुका (१४७)...तपशील किंवा भाष्य कुठे कमी झाले का? (१४९)... चरित्राचा 'आकार' साधल्याची दाद मिळत नाही. (१५०)...कापाकापीने आकार कमी करता येईल काय? (१५१) चरित्रनायकाच्या वाङ्मयावरील अभिप्रायांचे स्थान (१५१)... त्या वाङ्मयाचा परामर्श कसा घेतला? (१५२)...लेखनाच्या वेळची मनःस्थिती (१५४) ...तदात्मतेची नि स्वात्मतेची काही उदाहरणे (१५६)...मन तटस्थ, निर्विकार होते काय? (१५७)...लेखनाला लागलेला वेळ (१५७)...मधून मधून लेखनाकडे तटस्थपणेही बघत होतो. (१५८)...लेखनाच्या वेळी माधवरावांचे जीवन पुन्हा जगलो. (१५९)

१

चरित्रलेखनाचा संकल्प

डॉ० माधवराव पटवर्धन ऊर्फ कवी माधव जूलियन यांचे चरित्र मी लिहायला घेतले तेव्हा त्यांच्या चरित्रावर तीन पुस्तके आधीच प्रसिद्ध झालेली होती : (१) 'आमची अकरा वर्षे' (१९४५)–श्रीमती लीलाबाई पटवर्धन, (२) 'माधव जूलियन' (प्रथमावृत्ती १९५१, द्वितीयावृत्ती १९६८)–श्री० गं० दे० खानोलकर, आणि (३) 'स्वप्नभूमी' (१९६५)–प्रा० शं० के० कानेटकर ऊर्फ कवी गिरीश. शिवाय श्री० वि० द० घाट्यांनी 'दिवस असे होते' (१९६१) या आत्मचरित्रात माधवरावांच्या चरित्राचा विस्तृत परामर्श घेतला होता. 'माधवराव पटवर्धन : वाङ्मयदर्शन' हा डॉ० सु० रा० चुनेकरांचा प्रबंध तोवर प्रकाशित झाला नव्हता, पण त्या प्रबंधाची टंकलिखित प्रत मी बघितली होती आणि त्यात माधवरावांच्या चरित्राचा एक साक्षेपी आढावा घेतलेला मला ठाऊक होता. हे ठळक चरित्रवाङ्मय वगळता वेगवेगळ्या नियतकालिकांतून चरित्रात्मक लेख नि आठवणी, त्याचप्रमाणे वाङ्मयसमीक्षणे, इतकी प्रसिद्ध झाली होती की त्यांची संख्या पाऊणशेच्या पुढे सहज जावी. डॉ० चुनेकरांच्या आता प्रसिद्ध झालेल्या प्रबंधात या लिखाणाची एक सूची जिज्ञासूंना बघायला मिळेल. माधवरावांच्या चरित्रावर जर एवढे लिखाण आधीच झालेले होते तर असा प्रश्न उत्पन्न होतो की पुन्हा एक चरित्र लिहिण्यासाठी मी लेखणी का उचलली ?

या प्रश्नाचे एक उत्तर असे की एवढे लिखाण आधी झालेले होते म्हणूनच नवे चरित्र लिहायला मी प्रवृत्त झालो ! विशेषतः खानोलकरांच्या पुस्तकातील गुणांनी नि दोषांनी मला नवे चरित्र लिहायला जबरदस्त प्रेरणा दिली.

१९७०–७१ या शैक्षणिक वर्षी पुण्याला फर्ग्युसन महाविद्यालयात बी० ए०च्या विद्यार्थ्यांना 'चरित्र व आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार मी शिकवीत होतो. तेव्हा, विशेष अभ्यासाला नेमलेल्या पुस्तकांत खानोलकरांचेही पुस्तक असल्यामुळे ते मला पुन्हा बारकाईने वाचावे लागले. ते वाचता वाचता, त्यावर चिंतन करता करता, नि त्याच्या अध्यापनासाठी 'स्वप्नभूमी', 'आमची अकरा वर्षे' वगैरे संलग्न साहित्य फिरून चाळता चाळता, मला 'माधवराव' या विषयाची गोडी लागली. तत्पूर्वी माधवरावांचे काव्य मी आवडीने वाचले होते; 'विरहतरंगा'ची तर पारायणे केली होती; त्यामुळे कवी माधवराव मला प्रिय झालेले होते. एके काळी भाषाशुद्धीचा पुरस्कार करताना माधवरावांचा 'भाषाशुद्धिविवेक' मी मनःपूर्वक न्याहाळला होता; पद्यशास्त्राच्या अभ्यासात त्यांच्या 'छंदोरचने'चाही व्यासंग केला होता; त्यामुळे पंडित माधवराव-देखील मला आदरणीय झालेले होते. पण आता 'माधवराव : एक मनुष्य' हा समग्र विषयच मला गुंगवू लागला. मला त्यांचे गुणच दिसले आणि मी त्यांचा गुणगौरव करू लागलो, असे नाही. किंवा मी त्यांना अनुकरणीय समजू लागलो, अशातला भाग नाही. त्यांच्या गुणांबरोबर

त्यांचे दोषही मला जाणवले; त्यांच्या व्यावहारिक वर्तनाचे अनुकरण करावे असे तर मला कधीच वाटले नाही; तरी पण त्यांच्या एकूण व्यक्तित्वाने मला भुरळ घातली. त्यांची तलस्पर्शी प्रज्ञा, त्यांची उन्मेषशालिनी प्रतिभा, त्यांच्या स्वभावातली अपार उत्कटता, त्यांचा भाबडेपणा, त्यांची स्त्रीविवशता, त्यांची झालेली निर्घृण ससेहोलपट, त्यांचा अदम्य झुंझारपणा—आणि या सर्वांचे त्यांच्या ठिकाणचे मुलखावेगळे रसायन यांनी मला आकर्षून घेतले. त्यांच्याविषयी एक प्रकारची आपुलकी मला वाटू लागली आणि त्यांना अधिकाधिक जाणून घेण्यासाठी मी त्यांच्याशी मनाने समरस होऊ लागलो. पण मौज अशी की ज्या वाङ्मयाने त्यांच्याविषयी माझ्या मनात एवढी ओढ उत्पन्न केली तेच वाङ्मय त्यांचे सर्व जीवन, सर्व अंतरंग मला दिलखुलास उघड करून सांगे ना! जो जो त्यांना जाणून घेण्याचा मी प्रयत्न करू लागलो तो तो लीलाबाई, गिरीश नि विशेषतः खानोलकर यांच्या पुस्तकांनी माझ्यापुढे अनेक कोडी उभी केली; आणि 'सोडव ही कोडी!' असे मला आव्हान दिले. हे आव्हान जेव्हा मी स्वीकारले तेव्हाच नव्या चरित्र-लेखनाचे बीज नकळत माझ्या मनात टाकले गेले.

मला कोणते कोडे केव्हा पडले हे आता नेमके आठवत नाही, आणि एकूण किती कोडी पडली तेही पूर्णांशाने स्मरत नाही; पण काही ठळक कोडी त्या वेळच्या टिपणांवरून मी तपशीलवार सांगू शकेन. खानोलकरांच्या पुस्तकाच्या त्या वेळच्या टिपणांवर प्रारंभीची तारीख १०-११-७० अशी असून शेवटची तारीख २९-१-७१ अशी आहे. तेव्हा ही सर्व कोडी त्या सुमारे तीन महिन्यांच्या काळात पडली, हे मात्र उघड आहे.

मला पडलेल्या कोड्यांपैकी एक कोडे माधवरावांच्या आईवडिलांविषयी होते. खानोलकरांनी दिलेल्या माहितीवरून असे दिसत होते, की उमाबाईंनी म्हणजे माधवरावांच्या आईने त्यांच्यावर जिव्हाळ्याचे प्रेम कधी केलेच नाही. त्यांना तिने सदैव कोरडेपणाने नि तुटकपणाने वागवले. मोठेपणी त्यांनी घर बांधल्यावरही त्या घरात ती राहायला आली, पण तिने आपली चूल स्वतंत्र ठेवली. तिचे नि माधवरावांच्या वडिलांचे—त्रिंबकरावांचे—कधीही पटले नाही. दोघे एकाच गावात असली तरी केव्हा केव्हा वेगळ्या बिऱ्हाडांत राहत. तिच्या "तटस्थ व सहानुभूतिशून्य वृत्तीमुळे" त्रिंबकरावांचे जीवन 'भकास' झाले होते. माधवरावांनाही आईविषयी विशेष ओढ वाटत नसे. ते आईला आई म्हणत नसत, तर 'उमा' किंवा 'उमाबाई' असा नाव घेऊन तिचा उल्लेख करीत. केव्हा केव्हा 'केशवची आई', 'विनूची आई' (म्हणजेच आपल्या भावांची आई) असा तिचा निर्देश त्यांच्याकडून होत असे. त्यांनी आईवर लिहिलेल्या विख्यात कविता खऱ्या आईवर नसून काशीबाई हेर्लेकर या मानलेल्या आईवर आहेत. आईप्रमाणे वडिलांनीही माधवरावांना प्रेम दिले नाही. वडिलांनी त्यांच्या शिक्षणाची आबाळ केली आणि वडिलांकडून पैचीदेखील मदत न घेता आपले सर्व उच्च शिक्षण स्वावलंबनपूर्वक त्यांना पार पाडावे लागले. पुढे वडील वेडेच झाले आणि वेड्यांच्या रुग्णालयात मरण पावले! ही विलक्षण माहिती खानोलकरांनी एकत्र सलग दिलेली नसून थोडथोडी सर्व ग्रंथात विखरून टाकलेली आहे. (पृ० ८, १२, २२-२४, २७, ३०, ११४, २६५ वगैरे.) त्यामुळे प्रथमतः तिने प्रश्नांचे मोहोळ माझ्या मनात एकदम उठवले नाही; पण मी जेव्हा मनाशी तिची सलग जुळणी केली तेव्हा मात्र ते मोहोळ आवरणे मला अशक्य झाले.

मला वाटले, की उमाबाईंचे पोटच्या मुलावर प्रेम नव्हते म्हणजे काय? ही अनैसर्गिक घटना कोणत्या कारणांमुळे घडली? बरे, त्रिंबकरावांनीही मुलाची आबाळ का करावी? त्यांना वेड कशामुळे लागले? त्यांच्यात वेडसरपणा उपजत होता नि त्याचे रूपांतर पुढे वेडात झाले, की ते वेड म्हणजे वृद्धापकाळात आलेली मानसिक विकलता होती? उमाबाईंच्या "तटस्थ व सहानुभूतिशून्य वृत्तीमुळे" त्यांच्या जीवनाला 'भकासपणा' आला, असे खानोलकर म्हणतात. म्हणजे त्यांच्या वेडाला उमाबाईच कारणीभूत होत्या की काय? खानोलकरांच्या म्हणण्याला आधार कोणता? नवराबायकोंच्या बेबनावाला त्रिंबकरावांचा हातभार काहीच लागला नव्हता का? दोघांशी माधवरावांचे संबंध चांगले नव्हते; तर त्याचा दोष माधवरावांकडे अंशतः तरी होता की नाही? मुख्य म्हणजे, या जगावेगळ्या आईबापांचा माधवरावांच्या आंतरिक जीवनावर कोणता परिणाम झाला? माधवरावांच्या भावनाप्रवण वागण्यात नि 'वेताळ'नामक जे मानसिक झटके त्यांना येत त्या झटक्यांत आनुवांशिक भाग किती होता?—हे नि या प्रकारचे प्रश्न घोंगावत नि मधून मधून दंश करीत मला सतावू लागले. माझ्या जिज्ञासेला या प्रश्नांनी जी चेतावणी दिली ती चरित्राचा संकल्प सुटून नि बरेच संशोधन होऊन चरित्र प्रत्यक्ष लिहायला घेईपर्यंत तर थंड झालीच नव्हती, पण चरित्र लिहीत असतानाही तिचा उपशम झाला नाही. आजच्या प्रकाशित स्वरूपात जेव्हा आईवडिलांसंबंधीचा मजकूर मी नंतर मिळालेल्या माहितीच्या बळावर दुरुस्त करून लिहिला तेव्हाच चेतलेले माझे मन निवू शकले.

खानोलकरांच्या माहितीमुळे माधवरावांच्या आईवडिलांविषयीचे जे प्रश्न उत्पन्न झाले त्यांना कदाचित 'स्वप्नभूमी'मध्ये उत्तरे सापडतील म्हणून 'स्वप्नभूमी'चा शोधही मी घेतला होता. पण 'स्वप्नभूमी'ने त्या प्रश्नांची उत्तरे मिळण्याऐवजी त्या प्रश्नांत भरच घातली! 'स्वप्नभूमी'-वरून मला कळले, की त्रिंबकरावांनी—म्हणजे प्रत्यक्ष वडिलांनी—माधवरावांच्यावर एकदा फिर्याद लावली होती! पण रँग्लर र० पु० परांजप्यांच्या मध्यस्थीमुळे जिल्हा-न्यायाधीश श्री० बाळकराम यांनी ती काढून टाकली (पृ० ५०, २८०); म्हणजे, बापलेकांत एवढे वितुष्ट का आले? कशाने आले? वगैरे नवे प्रश्न उभे राहिले. 'स्वप्नभूमी'तच मला अशा अर्थाचा मजकूर वाचायला मिळाला, की यमू या धाकट्या बहिणीने थोरल्या भावाचे नाते आपणाकडे द्यावे हे माधवरावांना मान्य नव्हते; त्यांच्या आईविषयी काही वाईट प्रवाद उठलेले होते;—आणि या गोष्टींनी कुटुंबातील व्यक्तींत संशय नांदत होता. (पृ० १२०–१२१, २८१). म्हणजे, प्रवाद कसला? तो खरा की खोटा? यमू ही माधवरावांची सख्खी बहीण नव्हे का? असले आणखी भलभलते प्रश्न मनासमोर नाचू लागले!

माधवरावांच्या आईवडिलांविषयीच्या कोड्यामुळे अनेक प्रश्न असे निर्माण होऊन माझी जिज्ञासा फार चाळवली गेली. पण शांताबाई हेर्लेकर या माधवरावांच्या प्रेयसीविषयी जे दुसरे कोडे पडले त्यामुळे तर जिज्ञासा चाळवली जाऊन शिवाय माझी निर्माणक प्रवृत्तीही उसळ्या घेऊ लागली. शांताबाईंचे प्रेमप्रकरण खानोलकरांनी चरित्रलेखनाच्या आपल्या खास शैलीत सांगितलेले आहे. ती शैली अशी की मूळ साधनसामग्री भरपूर प्रमाणात वाचकांसमोर मांडून ठेवायची आणि त्या मानाने साधनसामग्रीचा अर्थ लावताना किंवा तीवर भाष्य करताना हात आखडता घ्यायचा. किंबहुना, साधनसामग्रीकडे खोलात जाऊन सूक्ष्मपणे फारसे बघायचेच नाही.

या शैलीत सांगितलेले शांताबाईंचे प्रेमप्रकरण मी अभ्यासले तेव्हा उद्धृत केलेली साधनसामग्री आणि तिच्या आधारे केलेले भाष्य किंवा निवेदन यांत मला बरीच तफावत दिसू लागली. त्या तफावतीमुळे मी सजग झालो, 'असे का?' ही पृच्छा स्वतःजवळ करू लागलो, आणि खानोलकरांच्या भाष्याचा किंवा निवेदनाचा हात सोडून उद्धृत साधनसामग्रीच्या आधारे मुळातली वस्तुस्थिती कल्पनेने मनासमोर उभी करण्याचा प्रयत्न करू लागलो.

साधनसामग्री दृष्टीआड करून खानोलकरांच्या भाष्याकडे व निवेदनाकडेच लक्ष दिले तर शांताबाईंच्या प्रेमप्रकरणाचा पुढील सारांश निघत होता : माधवरावांनी महाविद्यालयात जेव्हा प्रवेश केला तेव्हा त्यांचे संबंध स्वतःच्या घराशी दुरावलेले होते आणि मायेच्या ओलाव्यासाठी ते आसुसलेले होते. शांताबाईंशी व लक्ष्मीबाई चौधरींशी ओळख झाली तेव्हा तो ओलावा लाभून त्यांचे मन पालवू लागले. (पृ० ३४). शांताबाई बुद्धिमान आणि धीट होत्या. त्या बौद्धिक वादविवादात सहजतेने सहभागी होत आणि साहित्य, संगीत, कला इत्यादी विषयांत रसिकतेने रमत. समाजसुधारणा त्यांना प्रिय होती आणि विद्येच्या क्षेत्रात पुरुषांशीही स्पर्धा करून पुढे यावे अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. (पृ० ३६, ४१). माधवरावांचे मन साहजिकच त्यांच्याकडे ओढले गेले आणि ते मनातल्या मनात त्यांची निःशब्द पूजा करू लागले. त्या 'चंचल' नि 'आत्मकेंद्रित' आहेत हे पुढे त्यांच्या लक्षात आले; पण त्यांच्याबद्दलचा "गौरवयुक्त आपुलकीचा भाव" त्यांच्या मनातून गेला नाही. (पृ० ४१–४२). शांताबाईंनाही माधवरावांच्या विषयी "कौतुकयुक्त मैत्री" जाणवू लागली. एक बुद्धिमान, स्वप्नाळू, जिद्दी, नि प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारा तरुण म्हणून माधवराव त्यांना फार प्रिय झाले. त्यांच्या मनात प्रारंभी तरी प्रणयाची पुसटदेखील भावना नव्हती. पण माधवरावांच्या मनातले प्रेम लक्ष्मीबाईंच्या मार्फत जेव्हा त्यांना समजले तेव्हा त्यांना आनंद व अभिमान वाटला. त्यांच्या "स्नेहसरितेचा प्रवाह ...तेव्हापासून निर्भर वाहू लागला." (पृ० ४२). त्यामुळे काही काळ आपली सहधर्मिणी आपल्याला गवसली आहे अशी माधवरावांची समजूत झाली; पण त्याच वेळी शांताबाईंच्या आंतर-जीवनाला एक वेगळी कलाटणी मिळाली. त्यांना अध्यात्माची गोडी उत्पन्न झाली आणि त्या एका स्वामींच्या नादी लागल्या. जसजशी स्वामींची छाप वाढली तसतशा त्या माधवरावांपासून दूर गेल्या. (पृ० ४४, ५०). दोघांच्या दुराव्याला आणखीही एक कारण घडले. शांताबाईंवर लक्ष्मीबाईंचे "उत्कट आणि बेफाम" प्रेम होते. दासीप्रमाणे शांताबाईंच्या सेवेला लक्ष्मीबाई हरघडी हजर असायच्या. पण लक्ष्मीबाईंचा लघळपणा न आवडल्याने शांताबाई त्यांना झिडकारून टाकायच्या. अशा वेळी लक्ष्मीबाई माधवरावांकडे तक्रार करीत नि मग लक्ष्मीबाईंची कड घेऊन माधवराव शांताबाईंना जाब विचारीत. अशा जाब विचारण्याने शांताबाईंना राग येई. (पृ० ५१). पुढे, अध्यात्माच्या नादात शांताबाईंनी इंटरमीजिएटच्या परीक्षेत गोता खाल्ला; आणि माधवरावांनी अभ्यासात त्यांना मनःपूर्वक मदत केली. तेव्हा मात्र दोघांच्यामधील दुरावा नष्ट झाला आणि "खेळीमेळीचे वागणे" पुन्हा सुरू झाले.

त्या काळात शांताबाईंचे मन केव्हा स्वामींकडे झुके तर केव्हा माधवरावांकडे झुके. बडोद्यात स्वामी नसले की शांताबाईंना माधवरावांचा विशेष मोह पडे. अशाच एका मोहाच्या अवस्थेत त्यांनी एकदा माधवरावांना म्हटले, की "आपण परस्परांशी विवाहबद्ध व्हावयाला हवं."

विवाहाच्या कल्पनेला माधवरावांनी अर्थातच तत्काळ संमती दिली. मग दोघांच्या आणाभाका झाल्या आणि दोघेही अनिर्वचनीय आनंदात पोहू लागली. पण दोनतीन दिवस लोटतात न लोटतात तोच शांताबाईंचे मन पालटले. अध्यात्माची नि स्वामींची त्यांना पुन्हा उबळ आली आणि "मला तुमची पत्नी होणे शक्य नाही," असे माधवरावांना त्यांनी सांगितले. माधवरावांनी कारण विचारले तेव्हा दोघांच्या वयांतील विषमतेवर त्यांनी बोट ठेवले. आपण चार वर्षांनी मोठ्या असल्यामुळे माधवरावांना लग्न शारीरिक दृष्ट्या अपायकारक होईल, असे त्या म्हणाल्या. (पृ० ५२–५३). प्रणय या प्रकारे संपविल्यानंतर त्यांनी "काही दिवस मैत्रीण, तर काही दिवस भगिनी, तर काही दिवस माता अशा वेगवेगळ्या नात्यांनी वागण्याचे प्रयोग" केले आणि माधवरावांनी त्यांना ते करू दिले. त्या त्या नात्याशी सुसंगत अशी वागणूक माधवरावांनी ठेवली, पण शांताबाईंना एकही नाते नीट टिकवता आले नाही. (पृ० ५४). त्यामुळे माधवराव अखेर निराशेच्या गर्तेत लोटले गेले. (पृ० ५८).

पण खानोलकरांचे भाष्य नि निवेदन बाजूला सारून त्यांनी सादर केलेल्या साधनसामग्रीवर जेव्हा मी लक्ष केंद्रित केले तेव्हा शांताबाईंच्या या प्रेमप्रकरणाविषयी अनेक प्रश्नचिन्हे माझ्या मनात उभी राहिली. खानोलकर सांगतात तशी "कौतुकयुक्त मैत्री" किंवा हळूहळू वाढलेली 'प्रीती' शांताबाईंच्या मनात खरोखरच होती काय? अध्यात्म नि स्वामी यांच्या आकर्षणामुळेच त्यांनी विवाहाचा आपला बेत बदलला काय? खानोलकरांच्या मांडणीवरून असा ग्रह होतो, की बेत बदलायला काहीतरी कारण दाखवणे आवश्यक होते म्हणून वयांतील विषमता शांताबाईंनी पुढे केली. पण वयातील विषमतेला दाखवायच्या कारणापुरतेच महत्त्व होते काय? की तीमध्ये अधिक अर्थ होता?

खानोलकरांनीच सादर केलेली साधनसामग्री सांगत होती, की शांताबाई प्रारंभापासून एक लहान मुलगा म्हणूनच माधवरावांकडे बघत होत्या. शांताबाईंची ओळख करून घ्यावी अशी माधवरावांना इच्छा झाली आणि आपली इच्छा रघुनाथराव खऱ्यांच्या मार्फत त्यांनी शांताबाईंना कळवली. त्या वेळी शांताबाई उद्गारल्या होत्या, की "महादेव त्रिंबक पटवर्धन खरोखरच का आमच्या प्रीव्हिअसच्या क्लासचा विद्यार्थी आहे? मी तर असेच समजत होते की तो खालून मॅट्रिकच्या वर्गातून वर येऊन बसतो सहज!...मला तो मुलगा फार चुणचुणीत वाटतो." (पृ० ३८). पुढेही माधवरावांनी केलेल्या स्वतःच्या निःशब्द प्रेमपूजेबद्दल त्यांनी लिहिले, की "माधवरावांचे प्रेम होते माझ्यावर. पण बिचारा मुलगा त्याची वाच्यता करीत नसे." (पृ० ४२). या साधनसामग्रीवरून असेही दिसत होते, की माधवराव 'बिचारा मुलगा' असले तर स्वामी एक रुबाबदार नि भारदस्त पुरुष होते. स्त्रियांना आपल्या नादी लावण्याची विद्याही त्यांना चांगली अवगत होती. (पृ० ४६, ५०, ७९). तेव्हा मी साहजिकपणे असा तर्क केला, की स्त्रीपुरुषांमध्ये जे आदिम लैंगिक आकर्षण असते ते शांताबाईंना स्वामींविषयी वाटावे हे सरळ होते; पण तसले आकर्षण त्यांना माधवरावांबद्दल वाटण्याचा संभव फार कमी होता. तसल्या आकर्षणाच्या बाबतीत स्वामी नि माधवराव यांचे जे समानत्व खानोलकर सांगतात ते कल्पित असावे. खानोलकरांनी म्हटल्याप्रमाणे शांताबाईंच्या मनात माधवरावांविषयी प्रारंभी प्रणयाची पुसटदेखील छटा नसणार हे तर खरेच, पण पुढे नजिकच्या काळात जेव्हा

केव्हा त्यांच्या मनात माधवरावांविषयी प्रणयभावना उत्पन्न झाली असेल तेव्हाही ती फार पातळ नि सपक असली पाहिजे.

खानोलकरांनी उद्धृत केलेल्या साधनसामग्रीवरून मला शांताबाईंच्या मनोरचनेविषयी विलक्षण माहिती मिळू लागली. त्या 'चंचल' नि 'आत्मकेंद्रित' असल्याचे माधवरावांना जाणवले होते, हे खानोलकरांनी सांगितले आहे. पण त्यांचे स्त्रीत्व चारचौघींसारखे सामान्य (नॉर्मल) नव्हते, त्यांच्या स्त्रीत्वात पुरुषीपणाचा अंश बेमालूम मिसळून गेलेला होता, हे या साधनसामग्रीवरून माझ्या नव्याने लक्षात आले. इंटरमीजिएटच्या वर्गात गेल्यावर स्त्रियांची नरम वृत्ती त्यांना तिरस्करणीय वाटू लागली होती आणि आपल्या पुस्तकांवर शांता हेर्लेकर या नावाऐवजी शांताराम हेर्लेकर असे नाव त्या लिहू लागल्या होत्या. (पृ० ३८). पुढे श्री० कशाळकरांशी लग्नाचे बोलणे निघाले तेव्हा त्या म्हणाल्या होत्या की, "मी स्वतःला टॉमबॉय म्हणविते. मॅस्क्युलाइन—पुरुषी—वृत्ती तर माझ्या रंध्रारंध्रात मुरली आहे." (पृ० ८०). त्यांच्यावर लक्ष्मीबाईंसारखी दुसरी स्त्री कसे "उत्कट आणि बेफाम" प्रेम करीत असे त्याचा उल्लेख खानोलकरांनी केला आहे. तेव्हा, तसल्या विचित्र प्रेमाला त्यांच्यामधला पुरुषीपणाच उत्तेजित करीत असेल हे मला आपोआप जाणवले. त्या हुजूरपागेत शिकत असताना किंवा हिंगण्याच्या शाळेत शिकवीत असताना काही मुली त्यांच्यावर फिदा झालेल्या होत्या. (पृ० ५१). त्यांच्यासारख्या पुरुषी स्त्रियांना पुरुषांचे जे प्रेम काव्यात्म, मुलायम, नि बुजरे असते ते सहसा समजत नाही आणि समजले तरी भिडत नाही.—आणि माधवरावांचे प्रेम नेमके तसे होते. ते कवितांतून लपतछपत वावरे, प्रेयसीची निःशब्द पूजा करी, आणि मानीपणाने स्वतःशी कुढत बसे. तेव्हा, माधवराव वयाने लहान असल्यामुळेच केवळ नव्हे, तर स्वतःमधल्या पुरुषी वृत्तीमुळेही शांताबाईंची प्रणयभावना कधी तरारून बहरली नसावी, असे मला वाटू लागले. माधवरावांचे प्रेम लक्ष्मीबाईंच्या मार्फत समजल्यावर त्यांना "आनंद व अभिमान" वाटला, त्यांच्या "स्नेहसरितेचा प्रवाह...निर्भर वाहू लागला" या खानोलकरांच्या विधानावर विश्वास ठेवणे मला कठीण झाले.

'प्रेम' सोडले तरी शांताबाईंना माधवरावांचे विशेष 'कौतुक' होते असे जे खानोलकर सुचवतात त्याच्या मर्यादाही उद्धृत साधनसामग्रीवरून मला दिसू लागल्या. माधवरावांजवळ मुख्य गुण काव्यप्रतिभेचा होता. पण शांताबाईंना काव्याची तेवढी गोडी नव्हती. त्यांनी आत्मचरित्रात म्हटले आहे, की "मला स्वतःला कवितांचे...स्वारस्य...नव्हते. त्यामुळे पुढे पुढे मी पटवर्धनांची टिंगल करू लागले." माधवरावांना जूलियन ॲंडरले हे नाव त्यांनीच दिले; पण त्यात कौतुकापेक्षा "खोडकर वृत्ती" अधिक होती. (पृ० ३९, ४०). आपल्या कविता त्यांनी म्हणाव्या म्हणून माधवराव त्यांना वारंवार आग्रह करीत; पण गळा गोड असूनही त्यांनी माधवरावांच्या कविता कधी म्हटल्या नाहीत. माधवराव नाराज झाले, रागावले तरी त्याची पर्वा त्यांनी केली नाही. (पृ० ४२). तेव्हा माधवरावांविषयी त्यांना कौतुक असलेच तरी ते फार बेताचे होते, हे मला कळून चुकले.

शांताबाईंच्या भावनेविषयी अगदी वेगळे चित्र मनात तयार होत असताना तद्विरुद्ध काहीही शंका माझ्या मनात डोकावल्या नाहीत असे नाही. शांताबाईंचे माधवरावांवर जर प्रेम नव्हते तर आपल्या प्रेमाची आशा माधवरावांना त्यांनी अनेक वर्षे का लावून ठेवली? लक्ष्मीबाईंच्या

मार्फत माधवरावांनी स्वतःचे प्रेम व्यक्त केल्यावरही आपल्या मनात प्रेम नसल्याचा खुलासा त्यांनी का केला नाही? पुढे, आपण होऊन लग्नाची गोष्ट का काढली? लग्नाबाबत लागलीच माघार घेतली तरी मैत्रीण, भगिनी, माता वगैरे विचित्र नाती का जोडली? त्यांच्या मनात माधवरावांविषयी प्रेमाची ओढ असल्याशिवाय हे सगळे घडले का? — अशा काही शंका माझ्या मनात डोकावत होत्या; पण खानोलकरांनी उद्धृत केलेल्या साधनसामग्रीच्या साह्यानेच अगदी वेगळ्या रीतीने त्यांचे निरसनही होत होते. शांताबाईंनी माधवरावांशी घनिष्ठ संबंध ठेवले हे खरे; पण त्यामागे प्रेम नव्हे, तर पुरुषांना स्वतःभोवती झुलवत ठेवण्याची त्यांची हौस होती, असे ती साधनसामग्री सांगत होती. समाजात वावरण्याचे शिक्षण मिळावे म्हणून शांताबाईंना त्यांच्या आईने पुरुषांशी मैत्री करण्याची मुभा दिली होती आणि शांताबाईंनी त्या मुभेचा भरपूर लाभ घेतला होता. (पृ० ३८). "माझ्याभोवती तरुणांचा मंडळींचा तांडा होता," अशी नोंद खुद्द त्यांनीच करून ठेवलेली आहे. (पृ० ४९). त्यांनी विवाहाला जेव्हा नकार दिला तेव्हा माधवरावही त्यांना म्हणाले होते, की "तुम्हांला पुरुष-मित्रांच्या प्रेमाचे घुटके मिळतात, [तर] तुम्ही लग्न कशाला कराल?" (पृ० ५३).

माधवरावांना लग्नाविषयी नकार दिल्यानंतर त्यांच्याशी जी विचित्र नाती त्यांनी जोडली त्यांतील आईच्या नात्यात त्यांनीच माधवरावांचे चुंबन घेतले होते. (पृ० ५५). ज्या स्वामींना त्यांनी गुरू केले होते ते स्वामी "शिष्यिणींना गोंजारणे, कित्येकदा त्यांच्या मांड्यांवर डोके ठेवून लोळत पडणे" वगैरे प्रकार करीत, असे खानोलकर सांगतात. (पृ० ७९). या स्वामींवर "पराकोटीचा भरवसा ठेवून मी भरमसाट वागू लागले" आणि त्यामुळे माझ्या "चारित्र्यावर शिंतोडे" उडाले, असे शांताबाईंनी स्वतःबद्दल म्हटले आहे. पुढे, त्यांचा आणि स्वामींचा संबंध संपला आणि श्री० कशाळकर त्यांच्या प्रभावाखाली आले. तेव्हा, विवाहाची विनंती करणाऱ्या कशाळकरांना त्यांनी इतके घुलवले, इतके घुलवले की बोलता सोय नाही. प्रथम 'मला लग्नच करायचे नाही' असा हट्ट त्यांनी धरला; मग बौद्धिक सुख देणारा व जीवनाला आधार होणारा सहचर हवा म्हणून लग्नाच्या वचनात त्या बद्ध झाल्या; त्याच वेळी लग्नासंबंधी अनेक बेफाट शर्ती त्यांनी कशाळकरांवर लादल्या; त्या दिवशी रात्रीच लग्नवचनासंबंधी त्यांना पश्चात्ताप झाला; पण सकाळी मूळ पदावर येऊन त्यांनी आपले वचन कायम केले; आणि लग्न दहा वर्षांनी करण्याच त्यांचा बेत होता तरी ते दीड वर्षात उरकून त्या मोकळ्या झाल्या! (पृ० ७९ ते ८२). त्यांच्या या साऱ्या वागण्यात त्यांची आत्मकेंद्रित नि चंचल वृत्ती तर दिसत होतीच; पण स्वतःभोवती पुरुषांची प्रभावळ जमविण्याचा, ती फिरवीत ठेवण्याचा, नि पुरुषांनी केलेल्या कोडकौतुकात स्वतःची अहंता जोजवून घेण्याचा त्यांचा एक खास मनोधर्मही लक्षात येत होता. तेव्हा, खोल प्रेमापेक्षा या उथळ मनोधर्मामुळेच त्यांनी माधवरावांशी दीर्घ काळ नि घनिष्ठ संबंध ठेवला, असा निष्कर्ष माझ्या मनात स्थिर होत गेला.

उद्धृत सामग्रीतून जेव्हा शांताबाईंचे वेगळे चित्र उभे राहू लागले तेव्हा त्याच सामग्रीतून माधवरावांचे चित्र कसे उभे राहते ते बघण्याची जिज्ञासा माझ्या मनात जागृत झाली. आणि आश्चर्य असे की खानोलकरांनी रंगवलेल्या चित्रापेक्षा फार वेगळे नव्हे, पण थोडे वेगळे, नि अधिक स्पष्ट असे चित्र मला दिसू लागले. एक म्हणजे, माधवरावांचे शांताबाईंवरील प्रेम मल

अधिक उत्कट नि अधिक चिवट वाटले. कारण माधवरावांच्या प्रेमाला शांताबाईंच्या मैत्रीचा, कौतुकाचा, नि काही अंशी प्रेमाचाही आधार होता, असे खानोलकर सांगत होते. पण तसा आधार कसा नव्हता, शांताबाई माधवरावांना प्रतिसाद कशा देत नव्हत्या, लहरीप्रमाणे नि गरजेप्रमाणे माधवरावांना त्या कशा खेळवीत होत्या, इतर पुरुषांनाही प्रसंगपरत्वे कशा जवळ करीत होत्या, ते मी जाणले होते आणि प्रतिसादाशिवाय टिकणारे माधवरावांचे प्रेम मला साहजिकपणेच जास्त उत्कट नि जिवट वाटत होते. दुसरे म्हणजे, माधवरावांनी शांताबाईंशी मुलाचे जे नाते जोडले होते त्यात कृत्रिम पुत्रभावनेबरोबर अस्सल प्रणयभावनाही वावरत होती, याची जाण मला आली. 'आई व मूल' हे नाते मुलाच्या शुद्ध भावनेने आपण पाळले, असे माधवराव एका पत्रात नि एका कवितेत सूचित करतात आणि खानोलकर त्यावर विश्वास ठेवतात. (पृ० ५४). पण ज्या स्त्रीवर बरेच दिवस प्रियकराप्रमाणे प्रेम केले त्याच स्त्रीला माता मानून तिच्याशी पुत्राप्रमाणे व्यवहार करणे चमत्कारिक आहे, अनैसर्गिक आहे, असे प्रथमदर्शनीच माझे मत झाले.

मग मला असे आढळले, की 'आई'वर लिहिलेल्या एका कवितेत माधवरावांनी अशा अर्थाचे उद्‌गार काढले होते, की 'आई, तुझ्या कुशीत शिरल्याशिवाय रात्री मला झोप येत नाही....आई, माझे गोड मुके तू मटामट कधी घेशील? मी अधीर झालो आहे!' (पृ० ५५). 'आई'ने घेतलेल्या चुंबनाचे वर्णन रामभाऊ मराठ्यांच्या एका पत्रात करताना माधवराव चुंबनासाठी अस्वस्थ झालेले दिसतात आणि 'गडे आई, माझे चुंबन घे ना!' म्हणून 'आई'ला विनंती करताना आढळतात. (पृ० ५५-५६). तेव्हा, पुत्र झालेला हा प्रियकर नैसर्गिक प्रणयभावना किंवा कामभावना विसरला नव्हता, याविषयी संदेह उरला नाही. तिसरे म्हणजे, माधवरावांच्या प्रेमभावनेला क्रोधाचा किंवा मत्सराचा स्पर्श झाला होता, ती भावना चारचौघांच्या भावनेसारखीच राजस (किंवा तामस) होती, हे मला कळून आले. खानोलकरांनी आपल्या निवेदनात किंवा भाष्यांत तसे विधान कोठेही केलेले नाही; पण त्यांनी उद्‌धृत केलेल्या साधनसामग्रीत ते उघड झाले आहे. स्वामींवरील स्वतःच्या भक्तीचे वर्णन करताना शांताबाईंनी म्हटले आहे, की "थोडे दिवस माधवराव...स्वामींकडे लक्ष देत...[पण पुढे] माधवरावांना स्वामींचा तिरस्कार वाटू लागला." (पृ० ४९). विवाहाचे बोलणे फिसकटल्यानंतर माधवरावांची स्थिती काय झाली ते सांगताना शांताबाईंनी लिहिले आहे, की "...मत्सरही मधून मधून त्यांना चाटून जायचा. माझ्यावर ते तोंडसुख घेत. कधी कधी रुसून फार वेळ बसत....माझ्याशी मैत्री, चांगुलपणा ठेवून कोणी बोलू लागले तर त्यांना हेवा, द्वेष वाटे." (पृ० ५३). माधवरावांनी आपल्या आत्मलक्षी प्रेमकाव्यात निर्मत्सर प्रेमाची उज्ज्वल चित्रे वारंवार रंगविलेली आहेत. त्यामुळे, त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात प्रेमाला मत्सराची किंवा क्रोधाची ही जी जोड होती ती मला लक्षणीय वाटली.

आईवडील नि शांता-प्रेम-प्रकरण या दोन गोष्टींप्रमाणे मला कोड्यात टाकणारी तिसरी ठळक गोष्ट म्हणजे फर्ग्युसन महाविद्यालयातील वादंग किंवा वरदा-प्रकरण. खानोलकर, गिरीश नि घाटे या तिघांनीही वरदा-प्रकरणावर लिहिले होते; पण ते तिघेही माझे समाधान करू शकत नव्हते. तिघांपैकी कोणीही एकजण त्या प्रकरणाचा संपूर्ण उलगडा करायला मला असमर्थ दिसत होता. आणि तिघे एकत्र केले तरी त्यांच्यामध्ये परस्परविसंगती दिसत होती नि शिवाय अपुरेपणा

जाणवत होता. या अपुरेपणातून नि परस्परविसंगतीतून नानाविध शंकाकुशंका माझ्या मनात निर्माण होत होत्या आणि त्या मला संत्रस्त करीत होत्या. माधवरावांनी वरदा नायडू या विद्यार्थिनीशी मर्यादेबाहेर संपर्क ठेवला, त्यांचे वर्तन अविवेकीपणाचे (इनडिस्क्रीट) होते, असा आरोप ठेवून डेक्कन एज्युकेशन सोसायटीने त्यांना फर्ग्युसन महाविद्यालयातून प्रथम दोन वर्षांच्या सक्तीच्या रजेवर पाठवले आणि मग त्यांना आपल्या आजीव सदस्यत्वाचा राजिनामा द्यायला लावला. पण खानोलकर, गिरीश व घाटे हे त्यांचे तिघेही मित्र म्हणत होते, की वरदेच्या बाबतीत माधवराव पूर्ण निर्दोष होते. सोसायटीमधील त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी वरदा-प्रकरणाचे निमित्त करून त्यांच्यावर खोटेनाटे आरोप लादले आणि आपल्या मार्गातून त्यांचा काटा दूर केला.

अशा स्थितीत मला वाटे, की माधवराव पूर्ण समजून घ्यायचे असतील तर प्रथम त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांचे म्हणणे काय होते ते नीट समजावून घेतले पाहिजे. पण या तिघांनीही ती गोष्ट केलेली दिसत नव्हती. प्रतिस्पर्ध्यांचे म्हणणे समजावून घेण्यासाठी डे० ए० सोसायटीचे दप्तर अभ्यासणे आवश्यक होते आणि संबंधित हयात व्यक्तींच्या मुलाखती घेणे जरूर होते. पण तसा खास प्रयत्न तिघांनीही केलेला नव्हता. सोसायटीच्या दप्तराच्या वाटेला न जाता खानोलकरांनी घाट्यांवर बरीच भिस्त ठेवली होती (पृ० १२३ ते १२५); आणि घाट्यांची माहिती उघड उघड अपूर्ण होती, हे त्या माहितीची गिरीशांच्या 'स्वप्नभूमी'शी तुलना करता ध्यानात येत होते. 'स्वप्नभूमी'त अनेक अस्सल कागदपत्रे उद्धृत करून गिरीशांनी सोसायटीचे दप्तर नि खुद्द वरदेचे म्हणणे उजेडात आणण्याची कामगिरी आपल्या परीने बजावली होती, हे खरे. पण त्या कामगिरीतील उणिवाही मला खुपत होत्या. उदाहरणार्थ, माधवरावांच्या प्रतिस्पर्ध्यांचे नि कैवाऱ्यांचे एकेक महत्त्वाचे निवेदन आपण परिशिष्टात देऊ, असे गिरीशांनी म्हटले होते (पृ० ६८); पण ती निवेदने मला परिशिष्टांत आढळली नव्हती. शिवाय, जी कागदपत्रे प्रसंगपरत्वे हाती आली ती गिरीशांनी उद्धृत केली; पण सोसायटीचे दप्तर मुद्दाम जाऊन त्यांनी धुंडाळले नाही, हे मला समजत होते. तेव्हा मला वाटे, की या दुर्लक्षित साधनसामग्रीत काय बरे आढळेल? नेमके काय आढळेल किंवा ते कशा प्रकारचे असेल याची त्या वेळी मला मुळीच कल्पना नव्हती. पण त्यातील त्या गूढतेमुळेच त्याच्याविषयी मला अतीव उत्सुकता लागून राहिली.

खानोलकर, गिरीश, नि घाटे यांनी जी मर्यादित माहिती पुढे आणली होती त्या मर्यादित माहितीतही अनेक प्रश्नचिन्हे मला दिसत होती. पैकी काही प्रश्नचिन्हे, माधवरावांना जो व्यापक विरोध झाला त्याविषयी होती. माधवरावांच्या प्रतिस्पर्ध्यांनी त्यांना विरोध करावा, हे मला समजू शकत होते. पण डे० ए० सोसायटीत साधे बहुमतच नव्हे तर तीन चतुर्थांश बहुमत त्यांच्या-विरुद्ध का जावे, ते मला समजत नव्हते. सोसायटीच्या आजीव सदस्यांत माधवरावांचे प्रतिस्पर्धी होते तसे प्रा० वि० ब० नाइकांसारखे कैवारीही होते. रँग्लर र० पु० परांजप्यांसारखे समतोल समाजसुधारकही होते. माधवराव जर निरपराध होते तर या साऱ्या मंडळींनीही त्यांच्याविरुद्ध मतदान का केले, हा माझ्यापुढील प्रश्न होता. सोसायटीत त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी येनकेनप्रकारेण बहुमत आपल्याकडे वळवले असे म्हणून तो प्रश्न दृष्टीआड केला, तरी रविकिरणमंडळातही त्यांच्या वर्तनावर भयंकर वादंग का माजले, ह्या पुढच्या प्रश्नाचे उत्तर मला देता येत नव्हते. रविकिरणमंडळात सगळे सदस्य माधवरावांचे मित्र होते, त्यांच्यासारखाच रोमँटिक जीवनाचा

पुरस्कार नि आचार करणारे होते, सुधारणावादी होते. तरीही श्री० श्री० बा० रानडे नि श्री० द० ल० गोखले या सदस्यांनी त्यांचे वर्तन असंमत ठरवून त्यांच्याबरोबरची मैत्री तोडली, —ती का, हे कोडे होते. त्या कोड्यामुळे, माधवरावच अपराधी होते की काय, असा प्रश्नही माझ्या मनात डोकावू लागला होता!

माधवरावांना झालेला व्यापक विरोध नि त्यांचे अपराधित्व या गोष्टी सोडून दिल्या तरी कोडी संपत नव्हती. माधवरावांची वरदेविषयी नेमकी भावना कोणती होती, हे सर्व कोड्यांहून मोठे असे शेवटचे कोडे होते. खानोलकर नि गिरीश सांगत होते, की त्यांच्या मनात प्रेमबीम काही नव्हते. "फर्ग्युसन-कॉलेज-प्रकरण हे त्यांच्या धूर्त शत्रूंनी रचलेले शुद्ध कुभांड होते."... "माधवराव फार घम्य होते! ते कोणत्याही स्त्रीला अंतःकरणात एकदम स्थान देत नसत." (खानोलकर, पृ० १२९; गिरीश, पृ० ६९). दोघांच्या सांगण्यामागे थोडक्यात कारणपरंपरा अशी की माधवरावांनी पूर्वी एकदा शांताबाईंवर प्रेम केले होते नि स्वतःचे मन पोळून घेतले होते. तर आता पुन्हा ते वरदेवर प्रेम कसे करतील? शिवाय, आता लग्नाच्या दृष्टीने ते मुली वघू लागले होते, आयुष्यात स्थिर होण्याचा त्यांचा विचार होता. तर त्याच वेळी या प्रेमाच्या फंदात पडायचे त्यांना काय कारण? (खानोलकर, पृ० १२६; गिरीश, पृ० ६९-७०). पण ही कारणपरंपरा मला भावडी नि उथळ वाटत होती. ज्या गोष्टी या दोघांना विसंगत नि अशक्य वाटत होत्या त्या गोष्टी मानवी मनात सुखाने नांदू शकतात, हे मानसशास्त्राच्या नि साहित्याच्या वाचनाने मला पक्के माहीत झालेले होते.—आणि हे दोवे 'प्रेम नव्हते' म्हणून सांगत असताना घाटे तद्विरुद्ध साक्ष देत होते त्याचे काय? वरदेच्या अवखळ सहवासात इतर रविकिरणांपेक्षा "माधवराव विशेष प्रभावित झाले", त्यांची भावना प्रेमाची पाऊलवाट चालत होती, त्यांच्या वागणुकीमुळे वरदेच्या मनात लग्नाची अपेक्षा जागी झाली, परिस्थितीने त्यांची भावना खुंटवली नसती तर तिचे रूपांतर प्रणयात नि परिणयात होऊ शकले असते, वगैरे अर्थाचे घाट्यांचे लिखाण खानोलकर नि गिरीश यांच्याशी काही सुसंवादी नव्हते. ('दिवस०', पृ० ३५९ ते ३६१).

माधवरावांच्या भावनेविषयी खुद्द माधवरावांची साक्षही अशीच उलटसुलट होती. आपले वरदेवर प्रेम नाही, लग्नाविषयी कोणतेही प्रलोभन आपण तिला दाखविलेले नाही, अशी बाजू सोसायटीपुढे ते प्रारंभापासून मांडीत होते. पुढे वरदेने श्री० रानडे यांच्या घरी, मुंबईला, लग्नाची गोष्ट काढली तेव्हाही त्यांनी तिला स्पष्ट नकार दिला. पण वरदेवर त्यांचे जर प्रेम नव्हते तर पुनःपुन्हा इषारे मिळूनही त्यांनी तिच्याशी मैत्री का वाढवली? स्वतःच्याच निवेदनात म्हटल्याप्रमाणे ते वारंवार तिला का भेटले? तिच्याबरोबर सहलींना का गेले? वेगवेगळ्या क्रीडांगणांवर तिच्यासह टेनिस का खेळले? सोसायटीने तिच्याशी कोणताही संबंध न ठेवण्याची अर्ट घालून सक्तीच्या रजेवर पाठविल्यावरही त्यांनी तिच्याशी पत्रव्यवहार का ठेवला? मुंबईला श्री० रानड्यांच्या घरी ते तिला का भेटले आणि तिच्याबरोबर श्री० द० ल० गोखल्यांसह जुहूच्या पुलिनावर फिरायला का गेले? मुख्य म्हणजे सोसायटीत एवढा अटीतटीचा झगडा त्यांनी का केला आणि आपल्या साऱ्या लौकिक जीवनाचा बळी का दिला?—या नि अशा अनेक प्रश्नांना उत्तरे मिळत नव्हती. माधवरावांच्या भावनेचे हे प्रचंड कोडे म्हणजे भावी

चरित्रकाराला मिळालेले खरेखुरे आव्हान आहे, अशी त्या वेळीही माझी खात्री पटलेली होती.

माधवरावांचे आईवडील, त्यांचे शांताबाईंशी असलेले प्रेम, त्यांच्याविरुद्ध उठलेले फर्ग्युसन-मधील वादळ अथवा वरदा-प्रकरण या सर्व गोष्टींनी माझी जिज्ञासा अशी चौफेर चाळवली गेली होती. इतरही अनेक बारीकसारीक गोष्टींत माझे कुतूहल जागे झाले होते. उदाहरणार्थ, खानोलकरांनी एका टिपेत म्हटले होते, की कुमारी नझरबी शेख (ऊर्फ सोनुबाई तांबोळी) या स्त्रीच्या प्रेरणेमुळे माधवराव विद्यार्थिदशेत जुम्मादादा व्यायामशाळेत जाऊ लागले. (पृ० ४९). या शेखबाईंचा माधवरावांशी किती नि कोणत्या प्रकारचा परिचय होता, ते मला बघायचे होते. वाटयांनी लिहिले होते, की इरावतीबाई करमरकर (सौ० कर्वे) या आतेबहिणीचे डोळे माधवरावांच्या अनेक कवितांत डोकावतात. इरावती म्हणजे माधवरावांचा स्त्रीजातीचा आदर्श! (पृ० ३७०). तेव्हा, इरावतीबाईंची माधवरावांच्या मनावर कितपत छाप होती, ते मला जाणायचे होते. माधवरावांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत फार्शी-मराठी शब्दकोश एकहाती पुरा केला आणि 'विरहतरंग' नि 'सुधारक' ही खंडकाव्ये लिहिली. तर प्रतिकूल परिस्थितीत कोणत्या कारणांनी ही वाङ्मयनिर्मिती त्यांनी केली, त्या निर्मितीच्या वेळी त्यांच्या मनाचे कार्य कोणत्या रीतीने होत असे, हे हुडकायला मी उत्सुक होतो. माधवरावांनी फर्ग्युसनमधील कटू अनुभवानंतर स्वप्नाळू, काव्यात्म प्रेमजीवनाचा मार्ग सोडला आणि व्यावहारिक उत्कर्षाची पाऊलवाट पकडली. त्यांच्यामधील या परिवर्तनात, अपरिहार्य परिस्थितीपुढे स्वीकारलेली शरणागती किती होती आणि आपल्याच काही उच्छृंखल मनोवृत्तींवर आपणच मिळविलेला मनोविजय किती होता, त्याचा शोध मला घ्यायचा होता. त्यांच्या उत्तर आयुष्यात त्यांच्या रोमँटिक वृत्तीचा कोकिळ जेव्हा अवेळी कुहू कुहू करी तेव्हा ते आयुष्य कसे अस्वस्थ नि थक्क होई, ते मला बघायचे होते. त्यांनी एका सुनीतात म्हटले आहे, की

> **"कोणाच्याहि पुढे कधी न नमले गर्विष्ठ माझे शिर,**
> **केले मी न खुले कुणासहि कधी दुर्भेद्य हृन्मंदिर.**
> **माझ्या आन्तर जीवनास न शके काढू कुणी बाहिर,**
> **स्वातंत्र्यप्रिय आत्मनिष्ठच सदा मी अद्रिवत् सुस्थिर."** (तुटलेले दुवे, ४३)

पण त्यांचे 'दुर्भेद्य हृन्मंदिर' भेदावे, त्यांचे गूढ 'आन्तरजीवन' खोलावे, म्हणून माझ्या बुद्धीची धडपड सुरू झाली. लहानमोठ्या अनेक गोष्टींत माझ्या जिज्ञासेला ही जी अंगोपांगी जाग आली होती तीमुळेच चरित्रलेखनाच्या संकल्पाकडे मी नकळत लोटला गेलो.

मात्र नुसती जिज्ञासा जागी झाल्यामुळे मी चरित्रलेखनाचा संकल्प सोडला असे म्हणता येणार नाही. जिज्ञासेच्या जोडीला माझी निर्माणशक्तीही थोडेथोडे हातपाय हलवू लागली होती. शांताप्रेमप्रकरणात शांताबाईंच्या स्वभावाचे नि माधवरावांच्या प्रेमभावनेचे कसे वेगळेच चित्र मला दिसू लागले होते, ते यापूर्वी सांगितले आहे. त्याखेरीज मला वाटे, की खानोलकरांच्या पुस्तकाला 'स्वप्नभूमी'तील साधनसामग्रीची जोड दिली तर डे० ए० सोसायटीत माधवरावांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांशी दिलेली झुंज आणि वरदेशी विकसित होत गेलेला त्यांचा स्नेह यांचा अधिक सुसंगत वृत्तान्त रचता येईल.

खानोलकरांच्या पुस्तकाला 'आमची अकरा वर्षे' या पुस्तकाचाही सध्यापेक्षा विस्तृत आधार दिला पाहिजे, असे माझ्या मनात येई. कारण, माधवरावांच्या ज्या सांसारिक जीवनाला खानोलकरांनी फक्त ओझरता स्पर्श केला आहे ते सांसारिक जीवन 'आमची अकरा वर्षे' मध्ये अनेक घटना-प्रसंगांतून चांगले ठसठशीतपणे साकार झालेले आहे. त्या जीवनाला गौणत्व दिल्यास एकंदर चरित्राचा तोल बिघडतो, अशी माझी भावना होती. 'आमची अकरा वर्षे' या पुस्तकाचा आधार घेताना त्या पुस्तकात माधवरावांच्या सांसारिक जीवनाची जी काही प्रतिकूल प्रतिमा लीलाबाईंनी निर्माण केली होती ती मात्र मला थोडीशी दुरुस्त करायची होती. माझ्या मते, संसारात उडणारे खटके माणसाच्या नेहमीच अधिक लक्षात राहतात आणि त्यांत नाट्य असल्यामुळे व त्यांचे स्वरूप काहीसे स्थूल असल्यामुळे त्यांचे निवेदन आत्मचरित्रात सहजी होऊ शकते. पण पतिपत्नींत नांदणारे सौजन्य, दोघांनी एकमेकांसाठी सोसलेल्या बारीकसारीक अडचणी, दोघांतील खटक्यांच्या तळाशी वावरणारे नित्याचे समाधान वगैरे गोष्टी तशा लक्षात राहत नाहीत आणि त्या सौम्य नि सूक्ष्म असल्यामुळे त्यांचे निवेदन मुद्दाम चातुर्याने केल्याशिवाय नीट होत नाही. लीलाबाईंच्या पुस्तकात त्यांच्या अननुभवी नि ढोबळ लेखनशैलीमुळे असाच प्रकार झाल्याचे मला जाणवले होते; नि त्याचे निराकरण करण्याची माझी इच्छा होती.

खानोलकरांनी माधवरावांचा विचारविकास शोधण्याकडे फारसे लक्ष दिले नव्हते; पण डॉ० चुनेकरांनी माधवरावांच्या वाङ्मयाचा अभ्यास करताना ते काम चांगल्या रीतीने केले होते. तेव्हा, खानोलकरांच्या पुस्तकाला चुनेकरांच्या पुस्तकाची पुस्ती द्यायला हवी, अशीही माझी मनीषा होती. शिवाय, चुनेकरांच्या ज्या त्रुटी मला दिसत होत्या त्या मला काढून टाकायच्या होत्या. उदाहरणार्थ, उमर खय्यामच्या रुबायांमधील उपभोगवादी कलंदर तत्त्वज्ञानाने माधवरावांच्या मनाची काही काळ पकड घेतली होती, असे चुनेकर म्हणत होते. (पृ० २७४–७५). माधवरावांचे काव्येतर कर्तृत्व त्यांच्या काव्यकर्तृत्वाच्या संदर्भात "आनुषंगी" आहे, "तद्भव" आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. (पृ० ४१). पण त्यांच्याशी मी सहमत होऊ शकत नव्हतो. मला खानोलकरांच्या पुस्तकातील निवेदनक्रमाच्या किंवा मांडणीच्या अनेक त्रुटीही दिसत होत्या आणि त्या दूर करण्याच्या योजनाही माझ्या मनात बनत होत्या.—माझ्या निर्माणशक्तीत उठलेली ही सगळी स्फुरणे फार छोटी होती आणि त्यांचा आवाका नवी वाङ्मयकृती निर्माण करण्यापेक्षा जुन्या वाङ्मयकृतींत सुधारणा करण्याचाच होता, यात शंका नाही. पण त्या स्फुरणांतूनच मी जुने सोडून नव्याची वाटचाल करू लागलो.

खानोलकरांचे पुस्तक शिकवीत असताना माधवरावांच्या चरित्रसाहित्याची सामान्य माहिती मला झाली होती. या साहित्यात माधवरावांचे सर्व वाङ्मय आणि माधवरावांविषयीचे नि त्यांच्या वाङ्मयाविषयीचे सर्व वाङ्मय हे जसे प्रकाशित साहित्य होते तसेच पुष्कळसे अप्रकाशित साहित्यही होते. अप्रकाशित साहित्यात डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे दप्तर, माधवरावांना अनेक व्यक्तींकडून आलेल्या निवडक पत्रांची गिरीशांकडील पेटी, माधवरावांनी आपले बालमित्र श्री० रा० वि० मराठे यांना लिहिलेली नि मराठ्यांनी जपून ठेवलेली पत्रे, माधवराव नि त्यांच्या पत्नी लीलाबाई यांच्यात झालेला नि बहुधा त्यांच्या मुलाकडे असलेला पत्रव्यवहार, आणि काशीबाई हेर्लेकर नि शांताबाई कशाळकर यांची हस्तलिखित आत्मचरित्रे असे ठळक साहित्य होते. सर्व प्रकाशित

साहित्य सहज मिळण्यासारखे आहे, हे मला दिसत होते; आणि अप्रकाशित साहित्य सहज मिळेल अशी खात्री नसली तरी ते नष्ट झालेले नाही, प्रयत्नलभ्य आहे, असा मला विश्वास होता.

या सगळ्या साहित्यात माझ्या जिज्ञासेला नि निर्माणशक्तीला भरपूर खाद्य मिळण्याची शक्यता होती, हे उघड होते. तेव्हा, या साहित्याकडे बघता बघता माझी जिज्ञासा अधिकाधिक प्रदीप्त झाली नि माझी निर्माणशक्ती कर्तृत्व गाजविण्यासाठी उंच उंच झेपा घेऊ लागली. होता होता त्या दोन्ही मनोधर्मांनी अशी शीग गाठली, की नव्या, स्वतंत्र चरित्राचा संकल्प सोडण्यावाचून मला गत्यंतर उरले नाही. अखेर, १९७० च्या डिसेंबरमध्ये केव्हातरी मी हा संकल्प मनातल्या मनात सोडून टाकला! साहित्यशास्त्रज्ञ असे सांगतात की चरित्रलेखनामागे जिज्ञासातृप्ती नि कलात्मक निर्मिती या दोन मूलभूत मानवी प्रेरणांखेरीज स्मृतिरक्षण, गुणगौरव नि नीति-बोध या इतर तीन मूलभूत प्रेरणाही असू शकतात. पण माझ्या संकल्पामागे स्मृतिरक्षण, गुणगौरव, नि नीतिबोध यांचा लेशदेखील नव्हता. मला संपूर्ण माधवराव आरपार जाणायचे होते आणि संपूर्ण माधवराव शब्दांनी सजीव करून वाचकांपुढे मूर्तिमंत उभे करायचे होते. जिज्ञासा नि निर्मिती या दोनच प्रेरणांनी मी लेखनाचा संकल्प सोडला आणि या दोनच प्रेरणा लेखन पूर्ण होईपर्यंत, त्याचे परिष्करणही संपेपर्यंत, मला कार्यप्रवृत्त करीत राहिल्या.

२

□ □ □ □ □ □ □ □ □

साधनसामग्रीची जुळवाजुळव

चरित्रलेखनाचा संकल्प मी मनातल्या मनात सोडला खरा; पण पुरेशी साधनसामग्री मिळाली नाही तर तो संकल्प तडीला जाणार नाही, याची मला जाणीव होती. जेव्हा चरित्र पहिल्यांदाच लिहिले जाते तेव्हा साधनसामग्रीची जेवढी काळजी करावी लागते त्यापेक्षा अधिक काळजी चरित्र दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा, किंवा चवथ्यांदा लिहिले जाते तेव्हा करावी लागते. कारण पहिल्या लेखनाच्या वेळी जी काही साधनसामग्री उपलब्ध होते ती नवीनच ठरते आणि तिचा अन्वयार्थ लावून जे काही चित्र उभे केले जाते त्यावरही नवीनतेचाच शिक्का मारला जातो. पण पुढील लेखनाच्या वेळी नवीनता एवढी सुलभ राहिलेली नसते. जुन्याच्या पुढे गेल्याशिवाय नवीनतेचा मान मिळू शकत नाही. नवी साधनसामग्री फारशी मिळालेली नसताना चांगले नवे चरित्र लिहिता येतच नाही असे नाही. पण त्यासाठी जुन्या साधनसामग्रीच्या नव्या अन्वयार्थावर नि नव्या सुसंगत दर्शनावर भिस्त ठेवावी लागते. मला जुन्या साधनसामग्रीचा थोडा नवा अन्वयार्थ लागत होता, काही नवे मूलग्राही प्रश्न सुचत होते, नि विशिष्ट नवे सुसंगत दर्शन घडेल अशी मोठी उमेदही वाटत होती. पण माझ्या मूलग्राही प्रश्नांना उत्तरे मिळालेली नव्हती आणि ज्या नव्या सुसंगत दर्शनाची उमेद मला वाटत होती ते दर्शन प्रत्यक्षात मला घडलेले नव्हते. उत्तरे मिळावी नि तसे दर्शन घडावे म्हणूनच नव्या साधनसामग्रीची मला गरज होती. निदान जी साधनसामग्री आधीच्या चरित्रकारांनी हाताळलेली होती ती तरी अभ्यासासाठी मला पुन्हा मिळायला हवी होती. साहजिकच, नव्या चरित्राचा संकल्प मनात सुटल्याबरोबर, कोणकोणती साधनसामग्री आपल्याला मिळू शकेल याचा अंदाज मी घेऊ लागलो.

प्रकाशित सामग्री पन्नास-पाऊणशे वर्षांहून जुनी नसल्यामुळे ती मिळण्याबाबत विशेष अडचण नव्हती. अप्रकाशित सामग्रीपैकी डे० ए० सोसायटीचे दप्तर मला विनासायास बघता आले असते; कारण मी स्वतः त्या सोसायटीतच आजीव सदस्य म्हणून काम करीत होतो. पण बाकीची अप्रकाशित सामग्री उपलब्ध होईल किंवा नाही याविषयी फार शंका होती. त्या सामग्रीत, माधवरावांना आलेल्या पत्रांचा गिरीशांकडील संग्रह, माधवरावांनी मराठ्यांना लिहिलेल्या पत्रांचा मराठ्यांकडील संग्रह, आणि कोणाकडे तरी गुप्तपणे पडून असलेला माधवराव व लीलाबाई यांच्या पत्रांचा संग्रह, असे तीन महत्त्वाचे संग्रह समाविष्ट होते. हे तीनही संग्रह हाती आले नाहीत तर नव्या चरित्राचा प्रयत्न करण्यात अर्थ नाही, हे मला स्पष्ट दिसत होते. पण तीनपैकी एक किंवा दोन संग्रह हाती आल्यास काय करायचे, हा माझ्यापुढे प्रश्न होता. माझी निर्माणशक्ती नि अहंता या तर मला ढालगजपणे सांगत होत्या, की 'तुझ्या हातून एक चांगला चरित्रग्रंथ निर्माण झाला पाहिजे! जी साधनसामग्री मिळेल तीमधूनही काही नवे नि चांगले लेखन तू करू शकशील!'

तेव्हा, डोळ्यासमोर दिसणारी संभाव्य प्रतिकूल परिस्थिती आणि मनामधली उसळती ऊर्मी यांची सांगड मी घातली आणि या तीन संग्रहांपैकी दोन संग्रह हाती आले तरच संकल्पानुसार काम करायचे, नाहीतर सोडून द्यायचे, असा निर्णय घेतला.

सामग्रीसंबंधी असा निर्णय घेऊन, १९७० च्या डिसेंबरमध्येच मी हातपाय हलवू लागलो आणि माझा दैवयोग असा बलवत्तर की कल्पनेतल्या अडचणी प्रत्यक्षात माझ्याआड कधी फारशा आल्याच नाहीत. १९७१ च्या जानेवारीमध्ये गिरीशांकडील संग्रह मला मिळाला, एप्रिलमध्ये मराठ्यांकडील संग्रह मला लाभला, आणि माधवराव-लीलाबाई-पत्रसंग्रहाने जरी मला थोडेसे घुलवले तरी तो संग्रहही सप्टेंबरमध्ये माझ्या हातात पडला! हे तीन संग्रहच काय, पण इतर हेरलेली अप्रकाशित सामग्री नि न हेरलेली अप्रकाशित सामग्रीदेखील, फारसे कष्ट न होता, मला उपलब्ध झाली! खरोखर, सामग्रीबाबत लीलाबाई, खानोलकर नि गिरीश या तिघांपेक्षा मी अधिक भाग्यवान चरित्रकार ठरलो. या तिघांपैकी प्रत्येकाला दुसऱ्याने बघितलेली काही ना काही महत्त्वाची सामग्री बघता आलेली नव्हती. उदाहरणार्थ, शांताबाई कशाळकरांचे आत्मचरित्र नि डे० ए० सोसायटीच्या दप्तरातली कागदपत्रे लीलाबाईंनी पाहिलेली नव्हती; गिरीशांकडील माधवरावांचा पत्रसंग्रह खानोलकरांना मिळालेला नव्हता; आणि मराठ्यांकडील किंवा खानोलकरांकडील सामग्री गिरीशांना अभ्यासता आली नव्हती. पण या तीनही पूर्वचरित्रकारांनी वापरलेली सामग्री मी एकत्रितपणे वापरू शकलो;—आणि तिघांनीही न वापरलेली सामग्रीदेखील मला हाताळायला मिळाली! 'स्वप्नभूमी'त नसलेली कितीतरी कागदपत्रे नि माहिती मला डे० ए० सोसायटीच्या दप्तरात आढळली; माधवरावांच्या आठवणी विस्तृत प्रमाणावर प्रथमतः मीच गोळा केल्या; आणि स्वतःकडील जो संग्रह गिरीशांनी उपेक्षित ठेवला होता त्याचा उपयोग करण्याची पहिली संधी मलाच मिळाली. यांसारख्या गोष्टी घडत गेल्या आणि त्यामुळे तिघाही पूर्वचरित्रकारांच्या बेरजेपेक्षा माझ्या सामग्रीची बेरीज आपोआप पुढे गेली.

मात्र पूर्वचरित्रकारांपेक्षा एका बाबतीत माझी फार गैरसोय होती. ती बाब अशी, की मी लीलाबाईंप्रमाणे माधवरावांची पत्नी नव्हतो, आणि गिरीशांप्रमाणे किंवा खानोलकरांप्रमाणे त्यांचा मित्रही नव्हतो. मी या व्यक्तींप्रमाणे माधवरावांबरोबर कमीअधिक प्रमाणात जगलो तर नव्हतोच, पण माधवरावांना चर्मचक्षूंनी नुसते बघितलेही नव्हते! त्यामुळे, प्रत्यक्ष अनुभवाचा भरभक्कम आधार माझ्या लेखनाला मिळण्यासारखा नव्हता. माधवराव माझे केवळ स्वप्नातले हृदय-सुहृद होते. साधनसामग्रीतील वास्तवाचा जोम कल्पनेच्या पंखांत भरून मला त्यांच्या खऱ्याखुऱ्या दर्शनासाठी अंतराळात उड्डाण करायचे होते;—आणि गैरसोयीची दरी मागे टाकायची होती!

महाविद्यालयात गिरीशांचा मी एक आवडता विद्यार्थी होतो. माझ्या चरित्रलेखनाविषयी 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' या माझ्या पहिल्या पुस्तकापासून त्यांना पुष्कळ कौतुक होते. 'स्वप्नभूमी' प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांच्याजवळची माधवरावांची कागदपत्रे सहज जिज्ञासेने मी अनेकदा बघायला मागितलेली होती. तेव्हा, माधवरावांचे चरित्र स्वतः लिहायचे हे ठरल्यावर साधनसामग्री जमवण्याची मोहीम गिरीशांना वंदन करूनच मी सुरू केली.

१९७० च्या डिसेंबरमध्ये गिरीश पुण्याला आलेले असताना मी त्यांना दोनतीनदा जाऊन भेटलो आणि आर्जवपूर्वक माधवरावांच्या कागदपत्रांची त्यांच्याकडे नेटाने मागणी केली. पूर्वी

अशा मागणीकडे त्यांनी दुर्लक्ष केले होते; पण आता 'स्वप्नभूमी' प्रसिद्ध झाल्यामुळे असेल किंवा जीवनाच्या निरवानिरवीची छाया मनावर आल्यामुळे असेल, त्यांनी माझी मागणी सहजपणे मान्य केली. त्यांच्या विषयावर पुन्हा लिहून त्यांच्यापुढे जाण्याची माझी धडपड असल्यामुळे त्यांना वैषम्य वाटले असते तर ते स्वाभाविक होते. पण त्यांच्या मान्यतेत वैषम्याची छटासुद्धा मला दिसली नाही. त्यांच्या पत्नी तीर्थरूप माई यांनी सांगलीहून कागदपत्रांची पेटी आणली आणि त्यांनी ती पेटी ६ जानेवारी १९७१ या दिवशी माझ्या स्वाधीन केली. पेटी स्वाधीन करताना ते म्हणाले, 'गोखले, तुम्हांला या पेटीतल्या कागद-पत्रांचा खूप उपयोग होऊ दे. 'स्वप्नभूमी' लिहिताना माझे लक्ष मुख्यतः नायडू-प्रकरणावर केंद्रित झाले होते. कारण माधवरावांच्या चरित्रावर त्यांच्या शत्रूंनी जो शिंतोडा उडविला होता तो मला धुऊन काढायचा होता. त्यामुळे ही पेटी मी उघडू शकलो नाही. आता तुमच्या हातून ती पूर्णार्थाने उघडली गेली पाहिजे.' पेटी घरी आणून तीमधील पत्रे जेव्हा मी वाचली तेव्हा माझ्या ध्यानात आले, की गिरीशांचे म्हणणे अक्षरशः खरे होते.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारामधील माझ्या घरात त्या पेटीतील पत्रे काढून, ती वरखाली करून, पसरून, त्यांच्या वाचनात मी चारएक दिवस आकंठ बुडालो होतो. एकेक पुडके सोडताना माझे मन उत्कंठेने अक्षरशः फुटू पाहत होते! कारण मला जे जे आढळत होते ते ते अगदी नवे नि विलक्षण होते! माधवरावांनी ज्यांना आई मानले आणि "नाही तुझ्या मी पोटचा गोळा परी। 'आई' म्हणूनी हाक मारी वैखरी" असा हृदयस्पर्शी टाहो ज्यांच्यासाठी फोडला त्या काशीबाईंची पंचवीसएक पत्रे त्या पेटीत होती. माधवराव कोवळ्या तारुण्यात ज्यांच्यासाठी प्रेमाने वेडे झाले होते त्या शांताबाईंचीही काही पत्रे तेथे आढळत होती. तेथे सर्वश्री वि० द० घाटे, श्री० रा० शिंदे, नामदेवराव भाटे, रा० वि० मराठे वगैरे बालमित्रांनी हजेरी लावली होती आणि सर्वश्री शं० के० कानेटकर (गिरीश), श्री० श्री० बा० रानडे, गं० दे० खानोलकर वगैरे प्रौढावस्थेतील मित्रांनीही आपली उपस्थिती नोंदवलेली होती. माधवरावांचे घर नि नातेवाईक म्हणजे गुंतागुंतीचे एक कोडे; पण त्या कोड्यावर येथे त्यांचे थोरले मामा, दोघे बंधू नि भगिनी, आत्याबाई वगैरे मंडळी पत्रद्वारे काही प्रकाश टाकीत होती. मुख्य म्हणजे, त्यांच्यावर फिर्याद लावणाऱ्या त्यांच्या वडिलांची घरातील तंट्यासंबंधी पन्नासएक पत्रे नि कोर्टकचेरीचे काही कागद या संग्रहात दिसत होते. रविकिरणमंडळातला जो वाद आजवर बव्हंशी गुप्त राहिला नि ज्या वादामुळे श्री० ग० त्र्यं० माडखोलकरांशी टक्कर देता देता माधवराव घायाळ झाले तो वादही पत्रांच्या एका पुडक्यात येथे मुखर झाला होता. चंद्रशेखर, बाळकृष्ण अनंत भिडे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नरसिंह चिंतामण केळकर, काका कालेलकर, विनायकराव सावरकर वगैरे साहित्यश्रेष्ठांशी माधवरावांचा जो संबंध आला त्याची हकीगत सुमारे शंभर पत्रे सांगत होती.

—आणि हे ठळक, वळणदार अक्षरातील इंग्रजी पत्रांचे पुडके कुणाचे? छे! माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसे ना. ज्या वरदेविषयीची माधवरावांची भावना म्हणजे सर्व कोड्यांहून मोठे कोडे होते त्या वरदेची ती पत्रे होती! एक नव्हे, दोन नव्हे, सुमारे पंचवीस पत्रे होती! गिरीशांनी माधवरावांच्या चरित्रावर उडालेला शिंतोडा धुऊन काढण्याचा प्रयत्न 'स्वप्नभूमी'त

केला होता; पण या पत्रांना त्यांनी खरोखरच हात लावलेला नव्हता! वरदेची पत्रच नव्हेत, तर या पेटीतली सर्वच पत्रे त्यांनी अस्पृष्ट ठेवली होती. या पत्रांचे कोणतेही प्रतिबिंब—प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे—'स्वप्नभूमी'त पडलेले नव्हते. म्हणजे, जो पहिलाच संग्रह एका पूर्व-चरित्रकाराने हाताळलेला म्हणून मी हाती घेतला तोच पूर्णपणे नवा निघाला! या संग्रहामुळे सुमारे १२५ व्यक्तींची सुमारे ५४७ पत्रे आणि सुमारे ६८ कागद अशी भरघोस नि मूल्यवान सामग्री माझ्या पदरात पडली.

या संग्रहाखेरीज गिरीशांकडे आणखी काही सामग्री आहे याची कुणकुण 'स्वप्नभूमी'वरून आणि गिरीशांच्याच बोलण्यावरून मला लागली होती. तेव्हा ती सामग्रीही मला देण्याविषयी गिरीशांच्या मागे मी प्रेमाचा तगादा लावला आणि त्यांनी सांगलीहून आणवून ती १५ जून १९७१ या दिवशी माझ्या स्वाधीन केली. तीमध्ये गिरीश व वरदा नायडू यांचा पत्रव्यवहार, शांताबाईंच्या आत्मचरित्रातील काही उतारे आणि माधवरावांच्या हस्ताक्षरातील माधवरावांच्या कवितांच्या तीन वह्या असे फार उपयुक्त साहित्य होते. त्या तीन वह्यांपैकी एका वहीत आपल्या सुनीतलेखनाचे स्थलकाल नि एका वहीत आपल्या अन्य कवितांच्या लेखनाचे स्थलकाल माधवरावांनी नोंदवून ठेवलेले आढळले.

गिरीशांच्यानंतर साधनसामग्रीसाठी मी श्री० रा० वि० मराठे यांच्याकडे वळलो. प्रा० रा० श्री० जोग माझ्याबद्दल त्यांच्याशी आधी बोललेले होते आणि 'डॉ० केतकर' या माझ्या चरित्र-ग्रंथाची बरीवाईट कीर्ती त्यांच्यापर्यंत बहुधा पोचलेली होती. त्यामुळे १ एप्रिल १९७१ या दिवशी त्यांच्या दादरच्या घरात जेव्हा मी त्यांना भेटलो तेव्हा आपल्याकडील माधवरावांची पत्रे अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्याचे त्यांनी लगेच मान्य केले. त्यांच्या स्वभावात जसा सावध व्यवहारीपणा आहे तसाच चटकन एखाद्यावर विश्वास टाकणारा निखळ सरळपणाही आहे. पैकी निखळ सरळपणा माझ्या वाट्याला सुदैवाने आला असावा. १ एप्रिलपासूनच मी त्यांच्याकडून माधवरावांची पत्रे हप्त्याहप्त्याने आणू लागलो आणि टिपणे काढून परत करू लागलो. ते काम १३ मेला पूर्ण झाले. या वेळी पत्रांतील किंवा पत्रांबरोबरच्या माधवरावांच्या कविता मी पूर्णपणे उतरवून घेतलेल्या नव्हत्या. पण पुढे त्या तशा उतरवून घेणे सूक्ष्म अभ्यासासाठी मला आवश्यक वाटले आणि २ ते १० जुलै १९७२ या काळात मी त्या उतरवून घेतल्या.

मराठ्यांकडील या संग्रहामुळे माधवरावांची सुमारे ३५६ पत्रे नि सुमारे ५२ छोट्यामोठ्या कविता अशी भरपूर सामग्री पुन्हा माझ्या पदरात पडली. या सामग्रीचा उपयोग खानोलकरांनी किंवा चुनेकरांनी आपापल्या पुस्तकांत पूर्वी केलेला असल्यामुळे मला ती अगदी नवी नव्हती नि अनपेक्षितही नव्हती. पण जेव्हा तिचे पहिले वाचन मी उरकले तेव्हाच माझ्या लक्षात आले की तिचे अनेक अभिनव उपयोग करता येण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ, मला वाटले, की एकोणतीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडावर पसरलेल्या या पत्रांतून माधवरावांनी स्वतःच्या मनाचे जे हेलकावे, जे विचार नि जे विकार नोंदवलेले आहेत त्यांची सांगड त्या त्या वेळच्या घटनाप्रसंगांशी घालता येईल नि चरित्रात एकदम चैतन्य खेळवता येईल. या पत्रांतून निरनिराळ्या काल-खंडांतील माधवराव शोधता येतील नि त्यांच्या व्यक्तित्वविकासाचा आलेख काढता येईल. या पत्रांतील विपुल उल्लेखांवरून, त्यांच्या जीवनात वडिलांनी लावलेल्या फिर्यादीपूर्वी जो घरगुती

बखेडा उत्पन्न झाला होता, त्याचा सुसंगत नि प्रत्ययकारी वृत्तान्त तयार करता येईल.—आणि या पत्रांसोबतच्या अप्रकाशित कवितांवरून त्यांच्या नवतरुण हृदयातील प्रणयव्यथा अधिक सूक्ष्मतेने जाणून घेता येईल. ही पत्रे म्हणजे जणू माधवरावांची दैनंदिनी होती.—नव्हे, स्वतःच्या नकळत लिहिलेले आत्मचरित्र होते! चरित्रात आत्मचरित्राचा जिव्हाळा नि प्रत्यय बिंबवण्यासाठी या पत्रांचा अपार उपयोग होऊ शकेल, हे प्रथमदर्शनीच मला जाणवले.

स्वतःला आलेल्या माधवरावांच्या पत्रांप्रमाणे माधवराव व लीलाबाई यांनी एकमेकांना लिहिलेली सुमारे २११ पत्रे मराठ्यांनीच मला उपलब्ध करून दिली. या पत्रांचा उपयोग खानोलकरांनी केलेला असल्यामुळे ती खानोलकरांच्याकडे असतील अशी माझी समजूत होती. पण २४ एप्रिल १९७१ या दिवशी मुंबई-मराठी-ग्रंथसंग्रहालयात मी जेव्हा खानोलकरांची पहिली भेट घेतली तेव्हा त्यांनी मला इशारा दिला की, 'ही पत्रे न पाहता माधवरावांचे नवे चरित्र कोणी लिहिले तर विद्येच्या क्षेत्रात तो एक गुन्हा ठरेल!' म्हणजे, त्यांच्याकडे ही पत्रे नाहीत नि ती मिळवणे म्हणजे एक आव्हान आहे, ही गोष्ट सूचकपणे त्यांनी मला जाणवून दिली. पण पत्रे त्यांच्याकडे नसली तरी ती कोठे आहेत हे त्यांना किंवा श्री० मराठ्यांनाच ठाऊक असणार, याबद्दल मला खात्री होती. दोघांशीही माझा परिचय लगतच्या काळात वाढत गेला आणि मनात ही खात्री असल्यामुळे दोघांजवळ पत्रांची गोष्ट नाना प्रकारांनी मी काढीत राहिलो. पण महिनोन् महिने दोघे ढिम्म होते! ताकास तूर लागू देत नव्हते! नवराबायकोंची इतकी खाजगी पत्रे या त्रयस्थाच्या हाती दिली तर दिवंगत मित्राचा विश्वासभंग तर होणार नाही ना, पत्रांचा दुरुपयोग झाल्यास काय घ्या, असा विचार बहुधा मराठ्यांच्या मनात सुरू असावा.

अखेर कालगतीने मी त्रयस्थ राहिलो नाही, माझ्याविषयी मराठ्यांना विश्वास वाटू लागला, नि १२ सप्टेंबर १९७१ या दिवशी ती पत्रे 'मिळवून देण्याचे' त्यांनी कबूल केले. पुढे आपल्याच घराच्या माळ्यावरील एका पेटीतून ती पत्रे त्यांनी 'मिळवली' आणि २३ तारखेला माझ्या स्वाधीन केली! १७ ऑक्टोबरपर्यंत मी ती वाचली नि शब्दशः त्यांच्या नकला करून घेतल्या. खानोलकरांचा इशारा खरोखरीच योग्य होता. माधवराव नि लीलाबाई यांचे अकरा वर्षांचे वैवाहिक जीवन इतक्या तऱ्हांनी या पत्रांत स्पंदन पावत होते, की काय वधू नि काय नको असे बघणाऱ्याला होऊन जावे. अंतर्गृहात डोकावताना जिज्ञासेची जशी थरथर व्हावी तशी थरथर ही पत्रे वाचताना मी अखंड अनुभवीत होतो. लीलाबाईंच्या पुस्तकाने माधवरावांच्या वैवाहिक जीवनाचे जर 'ज्ञान' होत असेल तर या पत्रांनी त्याचा सहस्रमुख 'प्रत्यय' येत होता.

गिरीश नि मराठे यांनी साधनसामग्रीबाबत जसे सौजन्यपूर्ण सहकार्य मला दिले तसेच ते खानोलकरांनीही दिले. पण खानोलकरांनी आपल्या सौजन्याला सावधपणाचे कुंपण घालून घेतले आहे असे मला आढळून आले. त्यांची नि माझी पूर्वीची अजिबात ओळख नव्हती आणि मराठ्यांकडे मी जसा प्रा० जोगांच्या ओळखीने गेलो होतो तसा कोणाच्या ओळखीने त्यांच्याकडे गेलो नव्हतो; शिवाय, त्यांच्याकडे विविध ग्रंथांचा नि कागदपत्रांचा जो मोठा संग्रह आहे तो बघण्यासाठी कित्येक उथळ संशोधकांनी त्यांना माझ्यापूर्वी फुकट त्रास दिला असावा, त्यामुळे आमच्या पहिल्या भेटीत त्यांनी मला मदत करण्याची जरी तयारी दर्शवली, तरी माझे प्रश्न काय आहेत, अडचणी काय आहेत, त्यांचे लेखी टिपण आधी करून आणण्याविषयी मला परखडपणे

सुचवले! पुढे एकदोन भेटींत त्यांच्या लक्षात आले असावे, की माझे प्रश्न नि अडचणी मामुली टिपणांच्या पलिकडच्या आहेत, त्यांच्याकडे जाण्यापूर्वी बरीच साधनसामग्री मी हस्तगत केली आहे, आणि माझा संशोधनाचा निश्चय उथळ नसून पक्का आहे. तेव्हा टिपणाची गोष्ट त्यांनी सोडून दिली.

माधवरावांविषयी त्यांचे नि माझे बऱ्याच तपशिलाने बोलणे झाल्यावर १० मे १९७१ या दिवशी आपल्याकडील काही कागदपत्रांचा नामनिर्देश त्यांनी माझ्यापाशी केला; पण गिरीश नि मराठे यांच्याप्रमाणे आपल्याजवळची कागदपत्रे घराबाहेर न्यायला बहुधा कधीच अनुमती दिली नाही.

कागदपत्रे बघण्यासाठी, त्यांची टिपणे काढण्यासाठी, त्यांच्या प्रती करून घेण्यासाठी त्यांच्या घरी हेलपाटे मारण्याची दीर्घ तपश्चर्या मला करावी लागली. त्यांच्या घरी कधी मी एकटाच जात असे तर कधी माझ्याबरोबर एक किंवा दोन तरुण सहायक घेऊन जात असे. आमच्या कामाचा पहिला हप्ता सकाळी साधारणतः ८ ते १२ पर्यंत पुरा होई आणि दुसरा हप्ता दुपारी साधारणतः ४ ते ७ पर्यंत उरकला जाई. दुपारच्या जेवणाच्या वेळी खानोलकरमंडळींना त्रास नको म्हणून दोन हप्त्यांच्या मध्यंतरी आम्ही मोठी सुट्टी घेत असू. या सुट्टीत वेळ कसा काढायचा, कुठे तरंगत राहायचे, हा प्रश्न पडे. पण सहायकांना पहिल्या किंवा दुसऱ्या हप्त्याची रजा देऊन आणि स्वतः कोठे उपहारगृहात जेवून नि एखाद्या परिचिताकडे वामकुक्षी करून मी तो प्रश्न कसाबसा सोडवीत असे. माझी नि माझ्या सहायकांची बसण्याची व्यवस्था करण्यात नि आम्हांला दोन्ही वेळ चहापाणी देण्यात श्रीयुत व सौभाग्यवती खानोलकरांना बरीच तसदी पडे; पण ती दोघे ती आनंदाने सहन करीत. आपल्याकडील कागदपत्रांच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी तसदीची किंमत जाणूनबुजून मोजलेली असावी. काही कागदपत्रे घरी नेण्याची परवानगी अगदी अखेरी-अखेरीस खानोलकरांनी मला दिली; पण तोपर्यंत माझ्या तपश्चर्येची दोनअडीच वर्षे उलटली होती!

खानोलकरांनी आपल्याकडील कागदपत्रांची माहिती मला हलके हलके दिली आणि कागदपत्रे प्रत्यक्ष देतानाही गटागटाने दिली उदाहरणार्थ, माधवराव नि त्यांचे श्वशुर बाबासाहेब गरुड यांच्यामधला पत्रव्यवहार किंवा खुद्द खानोलकर नि लीलाबाई यांच्यामधला पत्रव्यवहार खानोलकरांकडे आहे याची बातमी खूप उशिरा मला समजली आणि ते दोन्ही पत्रव्यवहार १९७३ च्या जानेवारीत मला पाहायला मिळाले! खानोलकरांनी आपल्या सौजन्याला हे जे कुंपण घातले होते त्याचे प्रयोजन प्रारंभापासून मी ताडले होते. त्यामुळे त्याचा जाच मी केव्हाही मानून घेतला नाही. उलट, त्यांनीच हाताळलेल्या विषयावर मी पुन्हा लिहीत असता त्यांनी गिरीशांप्रमाणे जी उदार वृत्ती ठेवली, आणि सावधपणे का होईना पण कागदपत्रांचा जो प्रचंड संभार माझ्यापुढे खुला केला, त्याबद्दल त्यांच्याविषयी माझ्या मनात आदर नि कृतज्ञता या भावनाच जागृत असत.

खानोलकरांनी खुल्या केलेल्या कागदपत्रांच्या पहिल्या हप्त्यात, माधवरावांनी खानोलकरांना लिहिलेली सुमारे १०१ पत्रे, माधवरावांनी शांताबाई कशाळकरांना लिहिलेली ४ पत्रे, आणि लीलाबाईंची एक आत्मकथनपर दैनंदिनी वगैरे सामग्री समाविष्ट होती. ही सर्वच सामग्री उपयुक्त होती, हे निःसंशय; पण तीमधील लीलाबाईंची दैनंदिनी लाख मोलाची म्हटली पाहिजे.

औचित्याच्या काही कल्पनांमुळे खानोलकरांनी या दैनंदिनीचा उपयोग केलेला नव्हता. त्यामुळे ती अगदी नवी सामग्री ठरत होती. शिवाय, पतिपत्नीसंबंधातील 'गुह्यात् गुह्यतम' असा जो कामसंबंध त्याचे दार या दैनंदिनीमुळे किलकिले होत होते आणि आत पुरा प्रवेश न देता चरित्रकाराला जणू म्हणत होते, की 'ताकद असेल तर मला पुरतेपणी उघड आणि आत काय आहे ते हुडकून काढ!' कागदपत्रांच्या दुसऱ्या हप्त्यात माधवरावांनी तयार केलेले स्वतः-विषयीचे वृत्तपत्रीय कात्रणांचे सहा संच माझ्या हाती पडले. या संचांत प्रकाशित सामग्रीचाच संग्रह झालेला होता; पण तो एकत्रित मिळाल्याने माझे बरेच श्रम वाचले आणि माधवराव स्वतःच्या 'लेखक' या प्रतिमेविषयी किती जागरूक होते त्याची विशेष जाणीव झाली.

सामग्रीचे हे दोन हप्ते १६ ते ३० मे १९७१ या काळात अभ्यासून संपवल्यावर सामग्रीचा तिसरा हप्ता १४ ते १८ जुलै या काळात मला मिळाला. या हप्त्यात, 'माझे जीवन' या शांताबाई कशाळकरांच्या हस्तलिखित आत्मचरित्राचे नि त्या आत्मचरित्रासाठी शांताबाईंनी ठेवलेल्या 'स्मरण-वही'चे अत्यंत विस्तृत उतारे अंतर्भूत होते. शांताबाईंच्या स्वभावाविषयी आणि त्यांच्या नि माधवरावांच्या प्रेमसंबंधाविषयी जे आडाखे मी पूर्वी बांधलेले होते ते या उताऱ्यांमुळे उत्कृष्टपणे पडताळता आले आणि माझ्या मनातल्या अनेक प्रश्नांची उत्तरेही हुडकता आली. या उताऱ्यांनीच दोघांच्या प्रमविकासाचा एक वेगळा क्रम मला दिसू लागला आणि दोघांच्या प्रेमसंबंधाचे काही नवे, सुसंगत असे दर्शन मला घडू शकले. हे उतारे वाचताना एका मनस्वी स्त्रीच्या मनात मी सतत डोकावत होतो आणि काहीतरी रोमहर्षक दृश्य बघितल्याचा अनुभव मनसोक्त लुटीत होतो!

चौथ्या हप्त्यात, २१ ते २३ एप्रिल १९७२ या काळात, माधवरावांच्या कवितांची एक छोटी वही खानोलकरांनी मला दाखवली. या वहीवरून माधवरावांच्या अनेक प्रकाशित कवितांची पूर्वरूपे मी शोधू शकलो आणि अनेक कवितांच्या लेखनाचे स्थलकालही पडताळून पाहू शकलो. पाचव्या नि शेवटच्या हप्त्यात पत्रांचे विविध संग्रह नि सुटी पत्रे माझ्या पुढ्यात खानोलकरांनी टाकली. त्यांत माधवराव-लीलाबाई नि गरूड-पतिपत्नी (म्हणजे माधवरावांचे सासरे व सासूबाई) यांच्यामधली सुमारे ६७ पत्रे, खुद्द खानोलकर नि लीलाबाई यांच्यामधली सुमारे २४ पत्रे, माधवरावांनी डॉ० ना० ग० जोशांना छंदःशास्त्रासंबंधी लिहिलेल्या ११ पत्रांच्या नकला, नि श्री० ग० त्र्यं० माडखोलकर यांचे १ महत्त्वाचे पत्र अशी सामग्री मला लाभली. ५ ते ७ जानेवारी १९७३ या काळात जेव्हा ही सामग्री मी अभ्यासली तेव्हा पटवर्धन-गरूड पत्रव्यवहार माधवरावांच्या कौटुंबिक जीवनावर प्रकाश टाकणारा तर मला वाटलाच, पण वडीलधाऱ्यांचा आधार शोधून त्यांच्याशी लहान होऊन राहण्याचा माधवरावांचा जो स्वभाव होता तोही त्यावरून माझ्या मनावर बिंबला. माडखोलकरांचे पत्र इतके बोलके नि निर्णायक होते, की त्यांच्या पोटात माधवरावांविषयी जो मत्सर होता त्याबद्दल त्या पत्रानंतर मला कधीच शंका उरली नाही! ही सारी सामग्री बघण्यासाठी मी जेव्हा जेव्हा खानोलकरांच्या बिऱ्हाडी जात असे तेव्हा तेव्हा जादुगाराच्या एखाद्या रत्नांनी खचलेल्या, अद्‌भुत गुहेत आपण प्रवेश करीत आहोत, असा मला भास होई. कारण दर वेळी तेथे मला काहीतरी नवे सापडे नि ते अनपेक्षितपणाचा एक जबरदस्त पण सुखद धक्का देऊन जाई.

२६ एप्रिल ते ५ जून १९७१ या काळात डे० ए० सोसायटीचे दप्तर मी बव्हंशी धुंडाळले, त्याची टिपणे नि प्रती करून घेतल्या, आणि पुढील काळात त्याला एकदोन किरकोळ पुरवण्या जोडल्या. या दप्तरात अप्रकाशित नि संबद्ध कागदपत्रांची आणखी एक खाण माझ्या हाती लागली आणि माझ्या मनातल्या अनेक प्रश्नांना उत्तरे मिळाली. या दप्तरामुळेच फर्ग्युसनमधील वादंगात किंवा वरदा-प्रकरणात माधवरावांच्या प्रतिपक्षाची बाजू काय होती ते मला समजले; माधवरावांचा विशेष अपराध नसताना बहुसंख्य आजीव सदस्यांनी त्यांना कठोर शिक्षा का ठोठावली त्याचा उलगडा झाला; आणि लौकिक जीवनाचा बळी जाईपर्यंत माधवराव अटीतटीने कशासाठी झगडले, त्यावर प्रकाश पडला. वरदेविषयी माधवरावांचे सर्व मन हे दप्तर सांगू शकले नाही; पण गिरीशांच्या संग्रहातील वरदेच्या व माधवरावांच्या पत्रांशी या दप्तराची सांगड घातली तर ते मनही समजू शकेल, असा दिलासा हे दप्तर देत होते. किंबहुना, संस्थाचालक म्हणून, एका मोठ्या शिक्षणसंस्थेचा जबाबदार घटक म्हणून, माधवरावांनी जी भूमिका वठवली तिची ओळख या दप्तरावरून जशी होत होती तशी दुसऱ्या कशावरूनही होणे अशक्य होते.

गिरीश, मराठे, खानोलकर आणि डे० ए० सोसायटी ही माझ्या अप्रकाशित साधनसामग्रीची प्रमुख उगमस्थाने होती; पण इतर ठिकाणी अप्रकाशित साधनसामग्री मला अजिबात मिळाली नाही असे नाही. येरवड्याच्या 'सेंट्रल मेंटल हॉस्पिटल'मधील माधवरावांच्या वडिलांची 'केस फाइल' डॉ० वि० रा० देव व श्री० दा० वि० ओक यांच्या मदतीने मी बघू शकलो. मुख्याध्यापिका श्रीमती मालतीबाई साठे यांनी हुजूरपागा शाळेच्या दप्तरातून वरदेची जन्मतारीख, शाळाप्रवेशाची तारीख वगैरे माहिती मला काढून दिली. प्रा० श्री० बा० रानड्यांनी काशीबाई हेर्लेकरांचे हस्तलिखित आत्मचरित्र अभ्यासार्थ माझ्या स्वाधीन केले आणि स्वतःची व श्री० ग० त्र्यं० माडखोलकरांची एका प्रकरणातील पत्रापत्री मला दाखवली. श्रीमती आनंदीबाई शिर्के आणि श्री० मो० ज्ञा० शहाणे यांनी स्वतःजवळची माधवरावांची पाचसहा संकीर्ण पत्रे माझ्या निदर्शनास आणली.—आणि अगदी उशिरा, माझे चरित्रलेखन संपून गेल्यावर, डॉ० स० गं० मालशे यांच्या सौजन्यामुळे प्राचार्य गो० चि० भाटे यांचे अप्रकाशित आत्मचरित्र मला वाचायला मिळाले. शिवाय, 'तस्वीर आणि तकदीर' हे प्रा० क्षीरसागरांचे आत्मचरित्र आणि 'माधवराव पटवर्धन : वाङ्मयदर्शन' हा डॉ० चुनेकरांचा प्रबंध प्रकाशनापूर्वीच त्या दोघांच्या कृपेने मी बघू शकलो होतो.

ही सारी अप्रकाशित साधनसामग्री हातात आल्यानंतर तिचा अभ्यास कसा करावा असा प्रश्न मला कधीच पडला नाही. भावी उपयोग सुलभ व्हावा नि संदर्भ त्वरेने मिळावा म्हणून सर्व साधनसामग्री आधी सुव्यवस्थित लावावी लागते आणि तिच्या हरतऱ्हेच्या अनुक्रमणिका नि याद्या (तालिका) करून ठेवाव्या लागतात, हे पूर्वानुभवावरून मला माहीत होते. तेव्हा ती गोष्ट दर वेळी मी आळस न करता पार पाडली. उदाहरणार्थ, गिरीशांकडील कागदपत्रांची पेटी ताब्यात आल्यानंतर सर्व पत्रे मी व्यक्तीवार लावली—म्हणजे काशीताई हेर्लेकरांची पत्रे, शांताबाई हेर्लेकरांची पत्रे, विठ्ठलराव घाट्यांची पत्रे, नामदेवराव भाट्यांची पत्रे, असे त्यांचे गट केले—आणि मग प्रत्येक गटातील पत्रे कालक्रमाने जुळवली. या प्रत्येक गटाला मी ए, बी, सी वगैरे नावे दिली होती, त्या त्या गटातील पत्रांना ए १, ए २, ए ३ वगैरे

क्रमांक दिले होते, आणि प्रत्येक गट एकेका स्वतंत्र कागदी पिशवीत, त्या गटाची नोंद पिशवीवर करून, टाकला होता.

एवढे झाल्यावर या सर्व पत्रांची एक यादी मी तयार केली. या यादीत पत्राचा गट व क्रमांक, दिनांक, त्याचा लेखक, त्याचा ग्राहक एवढ्या नोंदी मी केल्या होत्या आणि त्याचे आणखी काही वैशिष्ट्य नोंदवावेसे वाटले तर त्यासाठी शेवटी एक स्तंभ मोकळा सोडला होता. मराठ्यांकडे माधवरावांची जी पत्रे मिळाली ती कालक्रमाने लावलेली होती नि एका व्यक्तीने एका व्यक्तीला लिहिलेली होती. म्हणून त्यांचे गट मला पाडावे लागले नाहीत आणि त्यांची असली तालिकाही करावी लागली नाही. फक्त त्यांची टिपणे घेताना, पत्रावरील दिनांक, स्वाक्षरी, नि पत्ता यांची संक्षिप्त नोंद मी घेत गेलो आणि टिपणांच्या अनुक्रमणिकेत वर्षवार पत्रसंख्या, टिपणांचे पृष्ठांक, नि पृष्ठसंख्या ही लिहून ठेवली. पत्रांबरोबर ज्या कविता मिळाल्या किंवा ज्या कवितांचे उल्लेख सापडले त्या कवितांची मात्र एक स्वतंत्र यादी मी बनवली होती आणि तीमध्ये कवितेचे संक्षिप्त वर्णन, तिच्या पत्राचा दिनांक, ती उपलब्ध की अनुपलब्ध याचा उल्लेख वगैरे नोंदी केल्या होत्या.

मराठ्यांनी पटवर्धन-पतिपत्नींचा जो पत्रव्यवहार मला दाखवला होता त्यात एका गठ्ठ्यात माधवरावांचे नि एकात लीलाबाईंची पत्रे ठेवलेली होती. त्या दोन्ही गठ्ठ्यांतील पत्रे कालक्रमानुसार लावलेली आहेत ना, याची खात्री मी प्रथमतः करून घेतली नि मग प्रत्येक गठ्ठ्याची एकेक स्वतंत्र यादी केली. पण एका यादीतील पत्रांना दुसऱ्या यादीतील पत्रांत उत्तरे होती आणि दोन्ही याद्यांतील पत्रांची परस्परसंबद्ध साखळी बनलेली होती. तेव्हा दोन्ही याद्या एक करून नि त्यांतील पत्रे क्रमशः लावून, त्यांची एक संकलित यादीही मी सिद्ध केली. तीमध्ये पत्रक्रमांक, दिनांक, कोणाचे, कोणास, कोठून, कोठे वगैरे नोंदी प्रत्येक पत्रावावत केलेल्या होत्या.

खानोलकरांकडे मला जे विविध पत्रसंग्रह मिळाले त्यांचीही जवळजवळ अशीच व्यवस्था मी लावली. म्हणजे, पत्रे कालक्रमाने लावून त्यांची टिपणे घेताना त्यांवरील दिनांक, त्यांचा लेखक, त्यांचा ग्राहक, उभयतांचे पत्ते वगैरे नोंदी मी संक्षेपाने करून घेतल्या; किंवा अशा नोंदी करून घेऊन शिवाय पत्रांच्या याद्याही तयार केल्या; किंवा जरूर तेथे त्या त्या पत्रसंग्रहाला पूर्वोक्त पद्धतीच्या वर्षवार अनुक्रमणिका जोडल्या. याद्या नि अनुक्रमणिका तयार करण्याचे हे काम कोरड्या कष्टांचे होते; पण ते वेळच्या वेळी केल्यामुळे एकदा अभ्यासलेली सामग्री केव्हाही समग्रतेने दृष्टीसमोर येई आणि तिचा उपयोग टिपणांच्या द्वारा किंवा प्रत्यक्षपणे करणे सुलभ होई.

उपलब्ध सामग्रीचा अभ्यास करताना याद्या नि अनुक्रमणिका जितक्या सहजतेने मी तयार केल्या तितक्याच सहजतेने टिपणेही मी काढून टाकली. टिपणे काढताना ती कशी काढावी, त्यांत कोणता भाग घ्यावा नि कोणता घेऊ नये, संपूर्ण उतारा कोठे करावा नि केवळ निर्देशावर कोठे भागवावे, अशी अडचण मला केव्हाही आली नाही. मला काय हवे आहे नि काय नको आहे, याची अबोध कल्पना आधीच आलेली होती; त्यामुळे त्या कल्पनेच्या प्रकाशात टिपणांची वाट मी निर्वेध काटली.

आज, टिपणे कशी काढली हे सांगण्याचा प्रसंग पुढे येऊन ठेपल्यावर मात्र मी काहीसा अडखळलो आहे. ज्या अबोध कल्पनेच्या प्रकाशात मी टिपणे काढली त्या कल्पनेचे विश्लेषण

जाणीवपूर्वक मला करावे लागत आहे आणि अरूपाला शब्दरूप द्यावे लागत आहे. माझी टिपणांची कल्पना ही माझ्या चरित्रकल्पनेशी संबद्ध होती आणि मला तर एक 'संपूर्ण', 'सजीव' चरित्र लिहायचे होते. तेव्हा, संपूर्ण नि सजीव चरित्राच्या उभारणीसाठी जे जे द्रव्य (मटीरियल) लागते ते ते टिपणांत मी वेचून घेत होतो. संपूर्ण चरित्रात जीवनाचे कोणतेही अर्थपूर्ण अंग टाळता येत नाही नि सर्व अंगांचा समावेशक परामर्श घ्यावा लागतो. म्हणून सर्व अंगे सामग्रीत धुंडून, टिपणांत मी ती बांधीत होतो. मी जीवनक्रमाकडे (करिअरकडे) लक्ष देत होतो आणि व्यक्तित्वावरही (कॅरॅक्टरवरही) दृष्टी ठेवीत होतो. जीवनक्रमातील महत्त्वाचे घटना-प्रसंग नि घटनाप्रसंगांच्या जुळणीतून उभी राहणारी 'प्रकरणे' मी शोधीत होतो आणि जीवनक्रमामधील विकास वा वळणे, जीवनक्रमाचा परिस्थितीशी संबंध, मनाशी संबंध वगैरेंचाही माग काढीत होतो. व्यक्तित्वामधील शरीर-वेषादिक बाह्यांग मला बघायचे होते आणि विचार-विकारादिक अंतरंगही हुडकायचे होते. विचारांचा विस्तार, परस्परसंबंध नि विकासक्रम यांत मला रस होता आणि विचारांची उंची ओळखून त्यांत विलसणाऱ्या प्रज्ञेची जात मला निश्चित करायची होती. विकारांत प्रबळ नि दुर्बळ विकार मला समजून घ्यायचे होते, निरनिराळ्या प्रसंगांतील भावस्थिती (मूड) जाणायची होती, आणि विकारांचे विकारांशी, विकार-विचारांचे एकमेकांशी, नि दोहोंचे परिस्थितीशी नाते काय, हा प्रश्न सोडवायचा होता. प्रज्ञेची जुळी बहीण जी प्रतिभा तिच्या विलासांचे दर्शन घेऊन तिचेही वैशिष्ट्य मी नक्की करणार होतो. सवयी, वागण्याच्या लकबी वगैरे मामुली वाटणाऱ्या पण व्यक्तित्वाला रूप देणाऱ्या बाबी मला अभ्यास-कक्षेतून गाळायच्या नव्हत्या. जीवनाचे एकेक अंग नि एकेक उपांग असे निवडून त्याचे स्वरूप विश्लेषणपद्धतीने निर्धारित केल्यावर, त्या सर्व अंगांच्या नि उपांगांच्या समवायातून सिद्ध होणारे समग्र, एकरस जीवनही संश्लेषणपद्धतीने मला अनुभवायचे होते.—साहजिकच, 'संपूर्णते'ची या प्रकारची कल्पना मनाशी बाळगून मी जी टिपणे काढली ती मला जरी मूल्यवान खजिन्या-सारखी वाटली तरी त्रयस्थाला ती अठरापगड, अनघड चिजांनी अस्ताव्यस्त भरलेली जादुगाराची पोतडी वाटली असती!

मराठ्यांकडील माधवरावांच्या पत्रांची जी टिपणे मी काढली त्यांचे काही विकीर्ण नमुने पुढील-प्रमाणे : "शिकवणी, शाळा व अभ्यास यातच माझा सारा वेळ जातो."..."काही प्रोफेसरांचे प्रेम कमी होत चालले आहे; पण त्याला मी करणार काय?"..."डंबेल्स कधी पाठवणार आहेस रे?"..."ॐ" [पत्रारंभी]..."तुझे माझ्यावर शेकडा किती टक्के प्रेम आहे? माझ्या हल्लीच्या वागणुकीत तुला कोणत्या उणिवा दिसतात? येत्या पत्री या प्रश्नांची तू खरी उत्तरे द्यावीस..."..."कॉलेजात शिकवायला लागून बरोबर एक आठवडा झाला. आणि आता माझी ऐट काय विचारावयाची? कंठपदान्त इंग्रजी पोषाख आणि शिरावर राष्ट्रीयत्व दाखविणारा साफा, अशा झोकात मी गाडीतून कॉलेजात जातो व येतो."..."साणग्याची पिशवी पावली."..."हल्ली स्वयंपचात स्वयंपाक करतो."..."माझी 'आकारान्त' कविता तुला समजली नाही यावरून माझी कविता दुर्बोध व अर्थशून्य समजावयाची की तुझी ग्रहणशक्ती मंद समजावयाची याचा निर्णय करणे दुर्घट आहे."..."आपल्या मनोहराविषयी [मुलाविषयी] लिही काहीतरी! 'चिमणा मनमोहक बालक हा! किति सुंदर गोंडस नाजुक हा!! हसुनी कशि लावितसे टक

हा!!! हृदयंगम चालवि नाटक हा!!!!' असे खुंटचिन्हांकित एखादे काव्य तरी लिही..." ..."ज्या मुलीसंबंधी तू लिहितोस तिच्यासंबंधाने सविस्तर हकीगत हवी...'सुस्वरूप' आहे असे शिफारसपत्र देतोस; परंतु त्या विशेषणावरून फारसा बोध होत नाही."..."जानेवारीपासून मीही अत्यंत मानसिक अस्वास्थ्यात २ महिने कंठिले...ईश्वरभक्ती करून काही गुण आल्यास पाहावा म्हणून मी प्रयोग करून पाहात आहे...प्रार्थनासमाजातल्या सामाजिक प्रार्थनेलाही नेमाने हजर असतो."...[माधवरावांच्या शब्दयोजनेचे नमुने:] "अडचणसंपन्न परिस्थिती", "अझोप", "गैरसमजू विभक्तता", "तीच तुझी गुर्वी [शिक्षिका] होईल", "पेपरवेट (कागददाब)", "लढाऊ, चढाऊ जोडा" [Military full boot], "पैसाहुकूम" [Money order].

माधवरावांच्या जीवनात 'इनसाइट्स' मिळाव्यात, गती प्राप्त व्हावी, म्हणून मी टिपणे काढीत होतो. जीवनाचे संश्लिष्ट दर्शन घडावे, हीही माझी इच्छा होती. त्यामुळे टिपणे काढताना केवळ सारांश उतरवून मी थांबत नव्हतो. विशेष कल्पना सुचली तर तीही जागच्या जागी मांडून ठेवीत होतो. या कल्पनेचे सूत्र केव्हा तसेच लोंबत राही तर केव्हा लांबत जाऊन फार उपयुक्त ठरे. उदाहरणार्थ, पुढील कल्पना माझ्या टिपणांत मी लिहून ठेवल्या होत्या : "भावना व विचार तीव्र असूनही त्यांना आपापल्या क्षेत्रात ठेवण्याचे हे बाळकडूच माधवरावांना मिळाले होते. एकेक भावना स्वयंभू, सुटी राही, परिपुष्ट होई, हा त्यांचा आगळा विशेष."..."येथे माधवरावांमधला पंडित जागा होत आहे."..."परीक्षेचा ताण त्यांना विलक्षण वाटे. मग त्याकडे ते त्रयस्थासारखे निर्विकार बघू शकत."..."अशी मंडळी करावी, ही अखंड वृत्ती.—बडोदे, पुणे—१० कि० मंडळ, अमळनेर, कोल्हापूर, सर्वत्र."..."पूर्वी शांताबाईंशी, (आता भावाशी), पुढे लीलाबाईंशी ते कडक पंतोजीसारखे वागले, हे स्मरणीय."..."मराठ्यांसारख्या जिवलग बालमित्राबरोबरचा हा पैशाचा व्यवहार अर्थपूर्ण—(१) पावतीच्या तिकिटाचे पैसे कापलेले. (२) एवढा काटेकोरपणा ठेवूनही ११०-५-० या बेरजेत १ आण्याची चूक झालेली. (३) हिशेब १३०-५-० निघूनही चेक फक्त १०० चा पाठविलेला. (४) पुन्हा, हिशेब तपासून चूक कळीव, ही सूचना...माधवराव अस्से होते!"

चरित्र 'संपूर्ण' व्हावे म्हणून मी टिपणे कशी काढली ते आतापर्यंत सांगून झाले. पण चरित्र 'जिवंत' व्हावे म्हणून टिपणे काढताना मी काय केले? जे संपूर्ण असते ते जिवंत असायलाच हवे; कारण संपूर्णतेत जीव अंतर्भूत असतो. पण परमेश्वर सर्वव्यापी असला तरी त्याची विभूती जशी विशिष्ट ठिकाणी सहजतेने जाणवते त्याप्रमाणे संपूर्णता सजीव असली तरी तिचा जिवंतपणा विशिष्ट ठिकाणी सहजतेने प्रत्ययाला येतो. तेव्हा अशी ठिकाणे हेरून जिवंतपणासाठी त्यांच्यावर मी हेतुपूर्वक अधिक भर दिला. थोर कादंबरीकाराचे जग जिवंत का वाटते, प्रत्ययकारी का होते, ते मला माहीत होते. तेव्हा कादंबरीप्रमाणे आपले लेखन चित्रदर्शी व्हावे, सर्व ज्ञानेंद्रियांना भिडणारे म्हणजे गोचर व्हावे, भावना छेडणारे नि विचार हलवणारे म्हणजे रसोत्कट व्हावे, असा माझा प्रयत्न होता. लेखनात हे गुण ओतण्यासाठी मी साधनसामग्रीच्या टिपणांपासून पूर्वतयारी चालवली होती. कादंबरीकार काल्पनिक तपशील भरून लेखनात जिवंतपणा आणू शकतो, पण चरित्रात इतिहासच सांगायचा असल्यामुळे आपल्याला तसे करता येणार नाही, क्षुल्लक तपशीलदेखील आपण वास्तवातूनच वेचला पाहिजे, याचे भान मी केव्हाही

सोडले नव्हते. पोशाख, शरीराची ठेवण, हालचाली नि हावभाव यांच्या वर्णनाने तो तो प्रसंग वाचकांना दिसू लागतो; तेव्हा तशा वर्णनाची मूलद्रव्ये टिपणांत मी निवडून घेतली. आताच उद्धृत केलेल्या उताऱ्यांत "कंठपदान्त इंग्रजी पोषाखा"चा वगैरे जो उल्लेख आहे तो अशा मूलद्रव्यांपैकी होय. चष्मा लागणे, केस पिकणे, रोगाने कांती काळवंडणे वगैरे परिवर्तने जीवनाची गती दर्शवतात तेव्हा, त्यांच्याकडेही मी मुद्दाम लक्ष पुरवले. पण खरा जिवंतपणा बहिरंगापेक्षा अंतरंगात असतो, असा अनुभव आहे. मी संपूर्णतेसाठी जेव्हा विचार-विकारांकडे वळलो तेव्हाच अंतरंगामधल्या या जिवंतपणाचा परामर्श घेऊ लागलो असे म्हणता येईल. हा परामर्श अधिक परिणामकारक व्हावा, म्हणून विचार-विकारांचे मनावर ठसणारे जे विशेष आविष्कार असतात ते मी शोधीत गेलो. संघर्ष-संबद्ध विचार-विकार मला नेहमीच सचेत वाटतात. कारण संघर्षात काही किंमत मोजण्याची माणसाची तयारी असते आणि त्या वेळी खराखुरा मनुष्य व्यक्त झालेला असतो. तेव्हा माधवरावांच्या जीवनातील संघर्षांची माहिती, अंतर्गत विचारविकारांसह, टिपणांमध्ये मी आस्थेने जमवीत गेलो. माधवरावांचा शांताबाईंशी, किंवा फर्ग्युसनमधील सत्ताधिष्ठित गटाशी, किंवा आर्थिक परिस्थितीशी, किंवा स्वतःच्या स्वप्नाळू रोमँटिकपणाशी जो जो संघर्ष झाला त्या त्या संघर्षावर या दृष्टीनेच माझे लक्ष खिळलेले असे.

संघर्षांप्रमाणेच भावनात्मक उत्कट घटनाप्रसंग ही जीवनामधली आणखी एक जिवंत जागा होय. ही जागाही टिपणे घेताना मी आवर्जून जोपासीत राहिलो. मित्रांच्या काव्यबैठकीतून माधवराव तटकन उठून गेले तो प्रसंग, किंवा अतृप्त प्रेमभावनेने सैरभैर होऊन ते कडक उन्हात भटकले ती घटना, किंवा स्वतःच्या मूर्खपणाचा राग येऊन त्यांनी माडखोलकरांसमोर स्वतःच्या मुस्कटात मारून घेतल्या ही हकीगत, त्यांतील भावनात्मकतेसाठी मी टिपणांत अंतर्भूत केली.

आशय जर निष्कर्षात्मक निवेदनातून व्यक्त झाला तर तो कोरडा उतरतो आणि कृतीतून, घटनेतून, हालचालीतून व्यक्त झाला तर तो चैतन्याने उजळतो, हे शैलीचे गमक मला ठाऊक होते. चरित्रनायकाचे किंवा चरित्रांतर्गत अन्य व्यक्तींचे त्या त्या वेळचे उद्गार आशयाला जिव्हाळा देतात, प्रत्ययकारी बनवतात, या गोष्टीचीही मला जाणीव होती. तेव्हा त्या धोरणाने माझी टिपणे तयार होत गेली. थोडक्यात सांगायचे तर चरित्र जिवंत करण्यासाठी एकीकडे जिवंत आशय मी निवडीत होतो आणि दुसरीकडे त्याची जिवंत मांडणी करता यावी म्हणूनही पूर्वसिद्धता करीत होतो.

चरित्राच्या अप्रकाशित सामग्रीचा अभ्यास सुरू करण्यापूर्वीच प्रकाशित सामग्रीचा अभ्यास मी सुरू केला होता आणि दोन्ही प्रकारचे अभ्यास जोडीने चालू ठेवले होते. माधवरावांच्या सर्व प्रकाशित वाङ्मयाची नि माधवरावांविषयीच्या सर्व प्रकाशित वाङ्मयाची एक साक्षेपी सूची डॉ० चुनेकरांनी आपल्या प्रबंधाला जोडलेली आहे. त्यांचा प्रबंध प्रकाशित होण्यापूर्वीच मी ती मिळवली होती आणि तिची प्रत करून घेतली होती. या सूचीच्या साह्याने प्रकाशित वाङ्मय जेवढे मिळवता येईल तेवढे मी मिळवले आणि कसोशीने अभ्यासले. या सूचीत माधवरावांच्या ४ कवितासंग्रहांचा, ३ खंडकाव्यांचा, नि २ अनुवादात्मक पद्यकृतींचा पद्यवाङ्मयात समावेश आहे; आणि ४ ग्रंथांचा नि २०५ स्फुट लेखनांचा (भाषणे, पत्रे वगैरे धरून) गद्यवाङ्मयात समावेश आहे. शिवाय, माधवरावांविषयीच्या वाङ्मयात ४ ग्रंथ, ५ विशेषांक नि ९० स्फुट लेखने

नोंदवलेली आहेत. अर्थात्, ही सगळी सामग्री मी अभ्यासली, असे समजायला हरकत नाही. 'माझ्या आयुष्याचा माझ्या लेखनावर परिणाम' (साप्ताहिक सकाळ, १५ मे १९३४), किंवा 'हिंदुधर्माची सद्यःकालीन स्थिती' (भाषण, ज्ञानप्रकाश, २२ सप्टेंबर १९२७) अशी काही स्फुट प्रकाशित सामग्री मर्यादित वेळेत मी मिळवू शकलो नाही; पण ती अपवादात्मक म्हणावी लागेल. प्रकाशित सामग्रीपैकी काही ग्रंथ आधीच माझ्या संग्रही होते, काही ग्रंथ नि विशेषांक मी नव्याने विकत घेतले, आणि बाकीचे लिखाण निरनिराळ्या ग्रंथसंग्रहालयांकडून अभ्यासापुरते मिळवले. या कामी फर्ग्युसन महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल (टिळक पथ), केसरी-मराठा संस्था, पुणे विद्यापीठ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय वगैरे ठिकाणची ग्रंथालये मला फार उपयोगी पडली.

अप्रकाशित सामग्रीची टिपणे मी ज्या धोरणाने काढली त्याच धोरणाने प्रकाशित सामग्रीचीही टिपणे मी काढली आणि ती प्रथमपासून व्यवस्थित लावून ठेवली. ग्रंथांची टिपणे एका संचात आणि स्फुट लेखनांची टिपणे तीन संचांत वेगवेगळी लावून स्फुट लेखांच्या संचांना मी अनुक्रमणिका जोडल्या होत्या. या अनुक्रमणिकांत लेखनाचे नाव, लेखक, नियतकालिक, अंकाचे वर्ष व महिना वगैरे माहिती समाविष्ट होती. माधवरावांच्या कात्रणांचे जे सहा संच खानोलकरांकडे मला मिळाले होते त्यांतील लेखनांची टिपणे पूर्वोक्त तीन संचांपैकी एका संचात मी घातली होती आणि त्या संचाला कात्रणांच्या मूळ संचांचे संक्षिप्त वर्णन देणाऱ्या कच्च्या याद्या जोडल्या होत्या. त्या याद्यांत कात्रण-संचांचे बाह्य वर्णन तर होतेच, पण त्यांच्यातील लेखांची तपशिलासह नावेही होती. या साऱ्या व्यवस्थेमुळे अप्रकाशित सामग्री-प्रमाणे प्रकाशित सामग्रीच्या बाबतीतही एकदा काढलेली टिपणे पुन्हा चटकन सापडण्याची सोय झाली आणि टिपणे केव्हा अपुरी किंवा सदोष वाटली तर मूळ सामग्रीकडे जाण्याचा मार्ग मोकळा राहिला.

आतापर्यंत वर्णिलेली अप्रकाशित नि प्रकाशित सामग्री म्हणजे 'विद्यमान' सामग्री म्हटली, तर मी मुद्दाम जमविलेल्या आठवणी म्हणजे 'नवनिर्मित' सामग्री म्हणावी लागेल. आठवणी हे चरित्राचे एक फार उपयुक्त साधन आहे, हे चरित्र-लेखनाच्या पूर्वानुभवावरून मला पटलेले होते; आणि माधवरावांना ज्यांनी फार जवळून बघितले आहे अशा अनेक व्यक्ती अद्यापि हयात आहेत हे मला दिसत होते. तेव्हा, निवडक व्यक्तींकडून आठवणी जमविण्याचा उद्योग मी नेटाने हाती घेतला आणि २२ एप्रिल १९७१ ते १२ जानेवारी १९७३ या काळात तो पूर्ण केला. आठवणींसाठी व्यक्ती निवडताना तिच्याकडून ठळक, अर्थपूर्ण नि नवीन माहिती मिळेल ना, याचा अंदाज मी घेत असे; चरित्राची जी अंगे अज्ञात किंवा अर्धज्ञात म्हणून जाणवली असतील त्यांवर ती व्यक्ती प्रकाश टाकू शकेल ना, याचा विचार मी करीत असे; आणि केव्हा केव्हा काही तपशील पुरा करण्यासाठी, काही माहितीचा पडताळा घेण्यासाठी, किंवा एखादा प्रसंग सजीव करण्यासाठी, ती व्यक्ती कितपत उपयोगी पडेल तेही मी बघत असे. मी जी अप्रकाशित किंवा प्रकाशित सामग्री तोवर अभ्यासली होती तीमधले उल्लेख अशा व्यक्तींची निवड करताना मला मार्गदर्शक ठरले. शिवाय, आठवणींसाठी घेतलेल्या भेटीगाठींत जी माहिती मिळाली तीही या निवडीला उपकारक झाली.

अशा रीतीने निवडलेल्या व्यक्तींपैकी एकूण सत्तावीस व्यक्तींच्या लेखी आठवणी जमविण्यात शेवटी मी यशस्वी झालो. या सत्तावीस व्यक्तींत रा० वि० मराठे, वि० द० घाटे नि र० स० भाटे हे माधवरावांचे बालमित्र होते; ह० गो० गोखले नि मो० ज्ञा० शहाणे हे आप्त होते; श्री० बा० रानडे, ग० त्र्यं० माडखोलकर नि य० दि० पेंढरकर (यशवंत) हे रविकिरणमंडळाचे सदस्य होते; प्रा० चिं० रा० देवधर, डॉ० प० ल० वैद्य, प्रा० रा० ना० जोशी नि एक अनामिक हे डे० ए० सोसायटीतले सहकारी होते; गं० दे० खानोलकर, श्री० के० क्षीरसागर, गोपीनाथ तळवलकर नि भय्यासाहेब उमराणी हे प्रौढपणीचे मित्र होते; मो० रा० वाळंबे, पी० सावळाराम नि यशवंती गुप्ते ही विद्यार्थीमंडळी होती, आणि गो० स० नणदीकर, अ० ज० करंदीकर, प्रा० रा० म० मराठे, आनंदीबाई शिर्के, शि० गं० देवरे नि पार्वतीबाई सहस्रबुद्धे ही अन्य माहितगार माणसे होती. शिवाय, ना० शं० कानिटकर नि बं० वा० कुलकर्णी यांसारख्या आपण होऊन पत्राने आठवणी पाठवणाऱ्या सज्जनांचाही त्यांत समावेश होता.

आठवणींसाठी या सत्तावीस व्यक्तींशिवाय आणखी दहापंधरा व्यक्ती मी निवडल्या होत्या; पण अनेक कारणांनी त्यांच्याकडून लेखी आठवणी जमवणे मला शक्य झाले नाही. तरी त्यांच्यापैकी काहींशी—म्हणजे प्रा० शं० के० कानेटकर (गिरीश), त्यांच्या पत्नी माई, वि० स० खांडेकर, द० ल० गोखले, शालिनीबाई रानडे, मुक्ताबाई दीक्षित वगैरेंशी—मी बोलो होतो नि त्यांच्या तोंडी आठवणी घेतल्या होत्या. लेखी किंवा तोंडी आठवणी ज्यांच्याकडून मी घेतल्या त्या बहुतेक सर्व व्यक्तींना पुण्यातल्या पुण्यात गाठणे मला सुदैवाने शक्य झाले आणि माझे काम सुकर झाले. फक्त दोन व्यक्तींना भेटण्यासाठी मुंबईच्या खेपा मला कराव्या लागल्या आणि चारपाच व्यक्तींसाठी सांगली-कोल्हापूरला एक हेलपाटा मारावा लागला. अंतिम स्वरूपात तयार झालेल्या लेखी आठवणी, माझ्या रीतीप्रमाणे, एका संचात मी साठवल्या होत्या आणि त्या संचाला संदर्भसौकर्यासाठी अनुक्रमणिका जोडली होती.

कोणाही व्यक्तीला आठवणींसाठी भेटण्यापूर्वी त्या व्यक्तीपुरती एक प्रश्नावली मी तयार करीत असे. त्या व्यक्तीचे माधवरावांशी जे ज्ञात संबंध असतील ते लक्षात घेऊन नि स्वतःला आलेल्या शंका, अडचणी वगैरे ध्यानात बाळगून नाना प्रकारचे प्रश्न या प्रश्नावलीत मी घातलेले असत. भेटीच्या वेळी या प्रश्नांचा सरधोपट मारा त्या व्यक्तीवर मी करीत नसे; पण संभाषणाच्या ओघात या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळावीत असा माझा प्रयत्न असे. जरूर तर स्वतःची ओळख प्रथम थोडक्यात करून द्यायची, भेटीचा उद्देश सांगायचा, नि मग इकडच्यातिकडच्या गोष्टी करीत करीत समोरच्या व्यक्तीला भरपूर बोलती करायची, ही माझी रीत होती. त्यासाठी कधी माधवरावांच्या जीवनाचे एखादे विवाद्य अंग मी चर्चेला घेत असे, कधी त्या व्यक्तीकडील माहिती चरित्रदृष्ट्या किती मोलाची आहे ते बोलून दाखवीत असे, कधी माधवरावांनी किंवा इतरांनी त्या व्यक्तीचे जे उल्लेख केले असतील ते तिच्यापुढे मांडीत असे, तर कधी सरळ प्रश्न विचारून मुद्द्याला हात घालीत असे. ती व्यक्ती बोलू लागली की तिला कोठेही न अडवता, छोट्या प्रश्नांनी तिच्या बोलण्याचा ओघ वाहता ठेवून, तिला दाद देऊन, मी संभाषण रंगते ठेवीत असे. क्वचित त्या व्यक्तीच्या विरुद्ध बाजू घेऊन नि तिला डिवचून तिचे मनोगत, प्रतिवादासाठी का होईना, पण जोमाने बाहेर पडावे अशी युक्ती मी योजीत असे. क्वचित ती

व्यक्ती भूतकाळातल्या आठवणींत रमली तर मीही कल्पनेने तिच्या आठवणींत शिरत असे आणि माझ्या सहवासाने तिला तेथे अधिक रमवीत असे. संभाषणाच्या वेळी मला टिपणे घ्यावी लागत, पण ती शक्य तेवढी कमी घेऊन त्यांनी संभाषण विसकटणार नाही याविषयी मी दक्षता ठेवीत असे.

आठवणी घेण्याचे हे काम काही व्यक्तींच्या बाबतीत एकेका बैठकीत संपे; तर काही व्यक्तींच्या बाबतीत चारचार, पाचपाच बैठकांत लांबे. प्रत्येक बैठकीनंतर टिपणांच्या साह्याने त्या त्या बैठकीतल्या आठवणी मी सलग नि सविस्तर लिहून काढीत असे आणि त्यांत शक्यतो त्या व्यक्तीचे शब्द जसेच्या तसे घालीत असे. शेवटी त्या व्यक्तीकडून आठवणी तपासून घ्यायच्या, तिचे समाधान होईपर्यंत त्या दुरुस्त करायच्या नि त्यांखाली तिची मान्यतादर्शक स्वाक्षरी घ्यायची, असा माझा रिवाज होता.

आठवणी हे चरित्राचे एक महत्त्वाचे साधन आहे असा विश्वास बाळगून मी आठवणी जमवल्या आणि तो विश्वास योग्य होता असाच मला प्रत्यय आला. जमवलेल्या आठवणींमधून अर्थपूर्ण, उपयुक्त माहितीचे मोठे भांडारच माझ्या हाती लागले. या माहितीचे काटेकोर वर्ग पाडणे कठीण आहे; पण काही माहिती इतर सामग्रीतील त्रुटी बुजवणारी, त्या सामग्रीला दुजोरा देणारी किंवा तिच्यातील संदिग्धता घालविणारी, म्हणजे 'पूरक' होती, असे म्हणता येईल; तर काही माहिती 'अजिबात नवी' होती, असे म्हणता येईल. पैकी पहिल्या वर्गातील माहिती दुसऱ्या वर्गातील माहितीपेक्षा पुष्कळच अधिक होती. पहिल्या वर्गातील पूरक माहितीची काही उदाहरणे येथे सांगण्यासारखी आहेत. माधवरावांनी मराठ्यांना लिहिलेल्या सुमारे ३५६ पत्रांतील किंवा खानोलकरांना लिहिलेल्या नुमारे १०१ पत्रांतील पन्नासपाऊणशे संदर्भ मला नीट लागत नव्हते. पण खुद्द मराठे नि खानोलकर यांच्या आठवणींत त्या संदर्भांचा खुलासा करून घेता आला.

वरदा–प्रकरणात खानोलकर नि गिरीश या दोन्ही चरित्रकारांची अशी साक्ष होती, की 'सक्तीच्या रजेच्या काळात माधवरावांनी वरदेला भेटता कामा नये किंवा तिच्याशी पत्रव्यवहार ठेवता कामा नये, अशी डे० ए० सोसायटीने त्यांच्यावर अट घातली होती' (अनुक्रमे पृ० १४६, ७३). पण सोसायटीच्या दप्तरात तशा अटीची नोंद मला कोठेही आढळली नाही. यामुळे मला जो संभ्रम उत्पन्न झाला तो प्रा० चिं० ग० देवधर यांच्या आठवणीमुळे सहज दूर होऊ शकला. त्यांच्या आठवणीचा भावार्थ असा होता, की 'औपचारिक रीतीने अट घातलेलीच नव्हती आणि आजीव सदस्यांच्या मंडळात अटीसंबंधी जरी बोलणे निघाले होते तरी माधवरावांनी अटीला केव्हाच मान्यता दिलेली नव्हती!'

आपली धाकटी बहीण यमू हिच्या लग्नाला उपस्थित राहण्यास माधवराव नाखूष होते, असे त्यांच्या पत्रव्यवहारावरून दिसत होते आणि त्यामुळे एका भलत्याच संशयाला दुजोरा मिळत होता. पण श्री० मो० ज्ञा० शहाण्यांनी (यमूच्या यजमानांनी) आपल्या जीवनातल्या काही खाजगी घटना सांगून तो संशय दूर केला. (या गोष्टीचा आणखी खुलासा पुढे होईल.) लीलाबाईंच्या दैनंदिनीतील पतिपत्नींसंबंधाचा गूढ उल्लेख शहाण्यांच्या आठवणीची मदत झाल्यामुळेच मी उलगडू शकलो.

'पूरक' माहिती सोडून आठवणींतील 'अजिबात नवी' माहिती सांगायची झाली तर श्री० ह० गो० गोखले आणि श्रीमती पार्वतीबाई सहस्रबुद्धे यांनी माधवरावांच्या मामांच्या घराविषयी किंवा आईवडिलांविषयी जी माहिती दिली तिचा उल्लेख करता येईल. ही सामग्री अन्य सामग्रीत मला कोठेही आढळली नव्हती; आणि चरित्रावर नवा प्रकाश पडावा इतकी ती महत्त्वाची होती. अजिबात नवे पण फुटकळ घटनाप्रसंग तर आठवणींमुळे मला खूपच मिळाले. उदाहरणार्थ, प्राचार्य र० दा० करमरकरांनी माधवरावांना डॉ० लिट्० मिळू नये म्हणून जी कारवाई केली ती डॉ० प० ल० वैद्यांनी मला प्रथम सांगितली; आणि एका रूपसुंदर, प्रौढ, वत्सल महिलेला रस्त्यात वघून माधवराव एकदम कसे रोमांचित झाले ते प्रा० क्षीरसागर नि श्री० गोपीनाथ तळवलकर यांच्याकडून मला नव्याने समजले.

माहितीत भर पडणे हा आठवणींपासून होणारा मोठा लाभ आहे; पण चरित्रनायकाला जवळून वघितलेल्या अनेक व्यक्तींकडून स्वतःची चरित्रविषयक एकत्रित जाण तपासून घेता येणे, ती दुरुस्त करता येणे, हा त्याहूनही मोठा लाभ होय. पूर्वप्रकाशित चरित्रांच्या नि अन्य सामग्रीच्या अभ्यासाने ही जाण माझ्या बाबतीत आधी पुष्कळ वाढलेली होती. पण ती परिपूर्ण किंवा स्थिर झालेली नव्हती. माधवरावांच्या जीवनक्रमाची किंवा व्यक्तिमत्त्वाची बहुतेक सर्व अंगे माझ्या लक्षात आली होती नि त्या त्या अंगांचे सुटे स्वरूप बहुतांशी मला समजले होते. पण सर्व अंगांचे तारतम्य किंवा परिप्रेक्ष्य (पर्स्पेक्टिव्ह) माझ्या लक्षात पूर्णतया आलेले नव्हते. ती अंगे एकजीव होऊन माधवराव नामक प्राण कसा हलतबोलत होता, क्रियाप्रतिक्रियांतून उत्स्फूर्तपणे कसा जगत होता, ते दर वेळी, दर प्रसंगी माझ्या मनासमोर निरपवाद उभे राहत नव्हते. जेथे उभे राहत होते तेथे ते क्वचित धूसर तर क्वचित अपुरे होते. तोवर मनातले माधवराव जणू द्रवरूप नि प्रवाही होते, पण घनीभूत झाले नव्हते. पण आठवणींसाठी जेव्हा अनेक व्यक्तींच्या गाटीभेटी मी घेतल्या तेव्हा हे सारे आपोआप घडून आले. आठवणी घेताना मनोगताची देवाणघेवाण करता येते, प्रश्न विचारता येतात, नि स्वतःला अंधुक वाटणाऱ्या जागांवर प्रकाशाचा झोत वळवून घेता येतो. मिळून आठवणी सांगणाऱ्याच्या मनात जी पूर्ण-प्रतिमा असेल ती कल्पनेच्या साह्याने पूर्ण रूपातच थोडी तरी बघणे शक्य होते. ती प्रतिमा स्वतःच्या मनातल्या प्रतिमेत मग मिसळते नि तिला बदलून टाकते. इतर सामग्रीत ही प्रक्रिया अशा रीतीने घडवून आणण्याचे तेवढे सामर्थ्य नसते. शिवाय, आठवणींचे माध्यम हे कागदपत्रांच्या माध्यमासारखे निर्जीव असण्याऐवजी सजीव असते. त्यामुळे हातवारे, डोळ्यांतली चमक, आवाजातले मार्दव वगैरे गोष्टी शब्दांच्या साह्याला धावून येतात नि आठवणी सांगणाऱ्याच्या मनामधली व्यक्तिप्रतिमा आठवणी ऐकणाऱ्याच्या मनात संक्रांत होते. मला असाच अनुभव येत गेला नि माझ्या मनातली माधवरावांची प्रतिमा बदलता बदलता परिपूर्ण नि स्थिर झाली —अनुप्राणित होऊन हलूडोलू लागली. उदाहरणार्थ, माधवरावांचा काटकसरी स्वभाव ठाऊक असूनही त्यांच्या एकूण व्यक्तिचित्रात त्या स्वभावाला मी वावच दिलेला नव्हता. पण कविवर्य यशवंतांच्या तोंडून त्यांच्या काटकसरीपणाच्या दोनतीन खास गोष्टी जेव्हा मी ऐकल्या तेव्हा तो काटकसरीपणा अगदी नगण्य नाही हे मला जाणवले आणि एकूण व्यक्तिचित्रात मी त्याला प्रमाणतः सामावून घेतले.

उत्तर आयुष्यातही माधवरावांचा रोमँटिकपणा बुझला नव्हता, याची थोडीशी चाहूल 'मधुसुंदरीस' किंवा 'अवेळी ओरडणाऱ्या कोकिळास' यांसारख्या कवितांवरून मला लागली होती. पण जेव्हा गोपीनाथ तळवलकरांनी मला सांगितले, की "स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजात एखादी सुंदर स्त्री दिसली तर ते जास्त 'वॉर्म' व्हायचे" आणि जेव्हा तळवलकरांनी त्यासंबंधी माझ्याशी गप्पा मारल्या, तेव्हा रोमँटिकपणाचे रक्ताभिसरण माझ्या मनातल्या माधवरावांच्या धमन्यांतून आपादमस्तक वेखटक होऊ लागले. माधवराव पुढे पुढे स्त्रियांना टाळीत असत, हे विठ्ठलराव घाट्यांचे निरीक्षणदेखील त्या रोमँटिकपणाशी मी जुळते करून घेतले. वरदेविषयी माधवरावांची वृत्ती नेमकी काय असेल, या हळव्या नि गूढ प्रश्नाची चर्चा विठ्ठलराव घाटे नि श्री० के० क्षीरसागर यांच्यापाशी मी अनेक वेळा केली. विठ्ठलराव सांगत होते, की ती वृत्ती म्हणजे अंकुरू लागलेला सामान्य प्रणयच होता, पण प्रतिकूल परिस्थितीमुळे नि माधवराव 'कृतिपरायण' नसल्यामुळे त्या प्रणयाची वाढ खुंटली होती. पण क्षीरसागर म्हणत होते, की ती वृत्ती म्हणजे स्त्रीपूजन होते, तिचा विवाहाशी काही संबंध नव्हता, तिची जात सामान्य प्रणयाहून वेगळी होती. दोघांच्या या दोन मतांनी नि माझ्यासमोरील नव्या कागदपत्रांनी माझे मन त्रिधा झाले आणि त्यातून त्या वृत्तीचे एक वेगळेच दर्शन उदय पावले!

माझे परिप्रेक्ष्य किंवा माझ्या मनातील प्रतिमा बदलण्याची माडखोलकरांची तन्हा सर्वांत वेगळी म्हणावी लागेल. ते एकीकडे माधवरावांच्या नि आपल्या मैत्रीच्या सात्त्विक हकीगती मला ऐकवीत होते आणि दुसरीकडे माझ्या मनात माधवरावांविषयी जेवढे जहर भरवता येईल तेवढे भरवीत होते. माझे लक्ष माधवरावांवर खिळलेले असल्यामुळे त्यांची चाल प्रथम माझ्या लक्षात आली नाही. पण पुढे माझे प्रश्न जसजसे अधिक शोधक होत गेले नि अडचणीचे ठरू लागले तसतसा आठवणी सांगण्यामधून त्यांनी काढता पाय घेतला; नि त्यांच्या चालीतला दुटप्पीपणा मला एकदम उमगला. त्यांच्या सारख्या दुटप्पी माणसाशी झालेला वेबनाव माधवरावांच्या सरळ नि नीतिप्रवण मनाला कसा भाजीत राहिला असेल ते यानंतर मला कोणी वेगळे सांगण्याची गरज उरली नाही. त्या वेबनावाचे एकूण चरित्रातील नेमके स्थान याच वेळी माझ्या मनात ठरून गेले. चरित्राचे परिप्रेक्ष्य नि त्यामधील माधवरावांची प्रतिमा यांना आठवणींमुळे अगदी अंतिम रूप मिळाले असे मी म्हणू शकणार नाही; पण तसे रूप मिळण्यास आठवणींनी वैशिष्ट्यपूर्ण हातभार लावला, हे नक्की.

चरित्रसाधन म्हणून आठवणींच्या ज्या मर्यादा असतात किंवा आठवणींत जे दोष असतात त्यांचे साहित्यशास्त्रात किंवा मानसशास्त्रात दिलेले वर्णन लक्षात बाळगूनच आठवणींचा उपयोग मी केला. पण आठवणींच्या स्वरूपाचे मला आलेले काही खास अनुभव येथे सांगण्यासारखे आहेत. श्री० मो० ज्ञा० शहाणे यांनी माधवरावांच्या व स्वतःच्या जीवनातल्या दोनएक अत्यंत खाजगी हकीगती फार प्रांजळपणाने माझ्यापुढे मांडल्या. पण एके ठिकाणी ते नि मी त्यांच्या प्रांजळपणानेच एका चकव्यात चांगलेच चक्रावलो. माधवराव व लीलाबाई यांच्यामधील काम-विषमता मनात ठेवून, पण त्या दोघांची नावे न घेता, आपण एक पत्र 'समाजस्वास्थ्या'त लिहिल्याचे शहाण्यांना पक्केपणी आठवत होते. तेव्हा प्रांजळपणे त्यांनी मला तसे सांगितले आणि ते पत्र हुडकण्यासाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या मी तीनएक वाऱ्या केल्या. तेथील

(मधली मधली पाने फाडलेले) 'समाजस्वास्थ'चे अनेक वर्षांचे अंक मी अनेक वेळा चाळले, पण ते पत्र मला सापडले नाही. मला पत्र सापडेना म्हणून शहाणे त्या उद्योगाला लागले आणि त्यांनीही श्रीमती शकुंतलाबाई परांजपे यांच्याकडील अंक स्वतः बघितले. पण त्यांनाही ते पत्र मिळाले नाही. एवढे सर्व झाल्यावर शहाण्यांच्या लक्षात आले, की त्यांनी ते पत्र लिहिलेच नसावे! एक पत्र पाठवून त्यांनी स्वतःची गफलत मला प्रांजळपणे कळवून टाकली. 'समाज-स्वास्थ्य'ला पत्र लिहिण्याचे त्यांच्या मनात आले होते, म्हणून ते लिहिलेच असा त्यांचा ग्रह झाला होता!—आणि पत्राने माधवराव रागावतील अशी त्यांना धास्ती होती, म्हणून माधवराव रागावलेच असे 'अजाणपणे' ते मला सांगत होते! स्मरणात विस्मरण कसे शिरते नि आठवणीला कल्पना कशी आकार देते, याचा हा एक अजब नमुना होता!

असाच आणखी एक नमुना सर्वश्री घाटे, रानडे, नि द० ल० गोखले या तिघा रविकिरणांच्या बाबतीत माझ्या अनुभवाला आला. ४ मार्च १९७५ या दिवशी या तिघांची खास बैठक मी वाड्यांच्या घरी पुण्याला घडवून आणली. बैठकीपूर्वी रविकिरणमंडळ नि माडखोलकर यांच्यातील तंट्यासंबंधी अनेक पत्रे मी बारकाईने अभ्यासलेली होती आणि पत्रांवरून माझे जे मत बनले होते ते पडताळून घ्यावे असा या बैठकीचा एक उद्देश होता. साहजिकच मंडळाने माडखोलकरांना १९२७ साली, काही काळ का होईना, पण अर्धचंद्र का दिला, अशा अर्थाचा प्रश्न मी चर्चेच्या ओघात विचारला आणि आश्चर्य असे की तिघेही रविकिरण 'अर्धचंद्र? कसला अर्धचंद्र?' अशा प्रश्नार्थक मुद्रेने माझ्याकडे बघू लागले. घाट्यांच्या मुद्रेत कदाचित कृतकनाट्य असेल, पण रानडे नि गोखले स्पष्टच म्हणाले, की माडखोलकरांना मंडळातून बाहेर काढल्याचे आम्हांला स्मरत नाही. मला ही प्रतिक्रिया मुळीच अपेक्षित नव्हती; कारण दीर्घकाळ वादावादी नि पत्रापत्री होऊन माडखोलकरांना मंडळातून एकमताने अर्धचंद्र देण्यात आला होता, हे मला पक्के ठाऊक होते. तेव्हा पिशवीतून एक पत्र मी बाहेर काढले नि तिघांच्या हातात दिले. त्या पत्रात "आज आम्ही सर्वजण एकमताने रविकिरण मंडळाच्या सभासदत्वाच्या जबाबदारीतून आपणांस मुक्त करीत आहो" असे सर्व रविकिरणांनी माडखोलकरांना कळवले होते नि त्याखाली सर्वांच्या म्हणजे सहा जणांच्या सह्या होत्या! अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वीचे ते पत्र बघून नि त्याखालच्या स्वतःच्या सह्या पाहून तिघे अवाक झाले, विचारमग्नही झाले!

मग मी अनेक घटनांचे उल्लेख केल्यावर हळूहळू त्यांची स्मृती जागी झाली आणि माडखोल-करांना अर्धचंद्र दिल्याची घटना त्यांनी मान्य केली! मला वाटते, की माडखोलकरांचे वर्तन तिघांना मान्य नसले तरी तिघांच्याही ते जिव्हारी झोंबलेले नसावे आणि माडखोलकरांसारख्या जबरदस्त माणसाशी सतत संघर्ष करण्याची जिद्द तिघांनीही मुळातच बाळगलेली नसावी. त्यामुळे रविकिरणमंडळाने माडखोलकरांना पुन्हा स्वीकृत केल्यावर त्यांनी माडखोलकरांशी जमवून घेतले आणि दिलजमाईचा व्यवहार वर्षानुवर्षे करता करता अर्धचंद्राची घटना विस्मृतीच्या मातीत नकळत गाडून टाकली! माझ्याजवळ अस्सल पत्रव्यवहार नसता तर त्यांची विस्मृतीच इतिहास ठरण्याचा संभव होता!

भलतेच विस्मरण होणे हा जसा आठवणींमधला एक चमत्कार तसा भलतेच स्मरण असणे हा दुसरा चमत्कार. त्याचा अनुभव श्री० अ० ज० करंदीकर यांनी मला दिला. १९३० साली,

नागपूरला, नीडहॅम पार्ककडे माधवराव, माडखोलकर, अ० ज० करंदीकर वगैरे मंडळी फिरायला गेलेली असताना त्यांच्यात काही वाद निघाला आणि त्यात मनःक्षोभ होऊन माधवरावांनी स्वतःच्या मुस्कटात मारून घेतल्या. हा प्रसंग माधवरावांच्या एका पत्रावरून मला समजला आणि त्याचा अधिक खुलासा करून घेण्यासाठी मी करंदीकरांना भेटायला गेलो. मी त्यांना त्या पत्रातील काही भाग वाचून दाखवला, तर 'थांबा, आठवले!' असे म्हणत तो सर्व प्रसंग बारीकसारीक तपशिलांसह आपल्या धाप लागल्यासारख्या शैलीत त्यांनी चक्क मला म्हणून दाखवला! प्रसंग एकेचाळीस वर्षांपूर्वी घडलेला होता नि त्यांच्या जीवनाशी तो साक्षात भिडलेला नव्हता, तरी तो डोळ्यासमोर उभा असावा अशा सहजतेने त्यांनी त्याचे वर्णन केले! ते वर्णन लिहून घेऊन पत्रव्यवहारातील अनेक नोंदींशी नंतर मी पडताळले तर त्यात कोठेही उणीव किंवा विकृती आढळली नाही! असल्या जबऱ्या स्मरणशक्तीपुढे माझ्यासारख्या स्मरणदुर्बळांना नत-मस्तक व्हावेसे वाटते.

अनेक निवडक व्यक्तींकडून मी आठवणी मिळवल्या; पण सर्वच निवडक व्यक्तींकडून आठवणी मिळवणे मला शक्य झाले नाही. यापूर्वी जी नावे दिली आहेत त्यांत निदान दोन महत्त्वाची नावे गळालेली आहेत हे मला सरळपणे कबूल करायला हवे. श्रीमती वरदाबाई नायडू नि श्रीमती येसूताई गोखले ही ती नावे होत. १९७१ सालीच विठ्ठलराव घाट्यांनी मला माहिती दिली होती की वरदाबाई हयात आहेत, सत्तरीला टेकल्या आहेत, आणि हैदराबादेत श्री० सेतु-माधवराव पगडी यांच्या घराजवळच्या घरात राहत आहेत. मग वरदाबाईंचे नाव कसे गळले? वरदा-प्रकरण ही माधवरावांच्या जीवनामधली एक गूढ नि गाभ्याची घटना असताना मी वरदाबाईंची गाठ का घेतली नाही? मला वाटते, की अनेक प्रतिकूल गोष्टी जुळत गेल्या आणि त्यांच्या संयुक्त परिणामामुळे माझी नि वरदाबाईंची गाठ पडू शकली नाही. गाठ व्हावी म्हणून श्री० पगडींना त्यांच्या मुलुंडच्या घरी जाऊन मी भेटलो. पण श्री० पगडींनी मला असा सल्ला दिला, की मी एकदम जाऊन वरदाबाईंना भेटू नये. त्यांची मुले मोठी होऊन मार्गी लागली आहेत, पतिनिधनानंतर त्या शांत, निवृत्त जीवन जगत आहेत, साईबाबांच्या भक्तीत रमलेल्या आहेत, तेव्हा त्यांच्या मनाची घडी विस्कटणे योग्य होणार नाही. स्वतः श्री० पगडी माधवरावांचे विद्यार्थी नि चहाते असल्यामुळे त्यांनी वरदाबाईंकडून जुन्या गोष्टी जाणून घेण्याचा थोडाफार प्रयत्न केला होता. पण वरदाबाईंनी भूतकाळ फार फार मागे टाकला आहे, जुन्या गोष्टींची उजळणी करायला त्या अनुत्सुक आहेत, असा त्यांना अनुभव आला होता. तेव्हा वरदाबाईंकडे आता मी थेट जाण्याऐवजी पुन्हा श्री० पगडींनीच त्यांच्या आठवणी मिळवण्याचा प्रयत्न करावा आणि वरदाबाई अनुकूल झाल्यास मी त्यांना मागाहून भेटावे, असे आमचे दोघांचे ठरले. पण पुढे त्यामधून निष्पत्ती काहीच झाली नाही. मी श्री० पगडींचा पिच्छा पुरवला नाही किंवा पगडींची मध्यस्थी सोडून थेट वरदाबाईंनाही जाऊन भेटलो नाही.

जसजशी दिवसगत होत गेली तसतशी नवी माहिती मिळवण्याची माझी पहिली उभारी काहीशी कमी झाली. शिवाय, वरदाबाईंची जी पत्रे मला मिळालेली होती ती त्यांच्या स्वतःच्या मनाबाबत मला फार प्रांजळ नि बोलकी वाटत होती. त्या पत्रांपेक्षा काही अधिक अर्थपूर्ण माहिती पन्नासबावन्न वर्षांनंतर त्या अचूकपणे सांगू शकतील असा भरवसा मला येत नव्हता. त्या

पत्रांची इतर सामग्रीबरोबर सांगड घालून वरदा-प्रकरण नि त्यामधील माधवरावांची भावना यांचे कोडे उकलण्यात मध्यंतरीच्या काळात मला यश आल्यासारखे भावत होते. तेव्हा भेटीत विशेष लभ्यांश दिसेना नि भेटीची ऊर्मी येईना. त्यातून 'वरदाबाईंच्या मनाची शांतता ढळेल' ह्या अर्थाची श्री० पगडींची सूचना माझ्या उरल्यासुरल्या उत्साहावर विरजण घाली. आपल्या संशोधनासाठी दुसऱ्याच्या सुखी जीवनाला फाटा फोडणे असंस्कृतपणाचे वाटे. अर्थात, मी एकदा जो निष्क्रिय बनलो तो कायमचाच तसा राहिलो.

आता सहासात वर्षांनी जेव्हा मी माझ्या निष्क्रियतेचा फिरून विचार करतो तेव्हा मात्र ही सर्व कारणे खरी असूनही आणखी एक महत्त्वाचे कारण भरीला भर म्हणून त्यांत असावे असे म्हणावेसे वाटते. सर्व कागदपत्रांचा नि आठवणींचा सूक्ष्म विचार करून, मनोवैज्ञानिक कल्पकता चालवून, वरदा-प्रकरण नि वरदेविषयी माधवरावांची भावना यांचा पूर्ण छडा माझ्या समजुती-प्रमाणे मी लावला होता आणि त्या गोष्टींचे एक परिपूर्ण, सजीव चित्र मनापुढे उभे केले होते. ते चित्र म्हणजे एका अर्थी 'पुनर्निर्मित वास्तव' असले तरी दुसऱ्या अर्थी ती माझीच 'नवनिर्मिती' होती. त्यामुळे त्या चित्राच्या प्रेमात बहुधा मी पडलो होतो. वरदाबाईंच्या भेटीने त्या चित्राला दुरून का होईना पण ढका लागण्याची पुसट तरी शक्यता होती. त्यामुळे माझे मन त्या भेटीपासून परावृत्त झाले असावे! चरित्रकार हा एकीकडे वस्तुसत्यसंशोधक इतिहास-कार असला तरी दुसरीकडे नवनिर्माणक कलाकारही असतो, आणि आपल्या निर्मितीबाबत कलावंताच्या ज्या मर्यादा असतात त्या मर्यादा चरित्रकारालाही क्वचित दुर्बळ बनवतात, असा या सर्व प्रकाराचा अर्थ होता!

येसूताई गोखले या माधवरावांच्या चुलत आत्या. लहानपणी त्यांच्याशी माधवरावांची फार गट्टी होती आणि प्रौढपणीही दोघांमधले प्रेम कधी कमी झाले नव्हते. १९७१ साली येसूताई ऐशीच्या पुढे गेल्या होत्या; पण त्यांची प्रकृती नि स्मृती निकोप असल्याविषयी त्यांचे दत्तक चिरंजीव (नि माधवरावांचे धाकटे बंधू) श्री० हरी गोविंद गोखले यांनी मला माहिती दिली होती. तेव्हा येसूताईंना भेटून त्यांच्या आठवणी मिळवणे हे माझे कर्तव्य होते. पण कुलाबा जिल्ह्यातल्या त्यांच्या गोरेगाव या ठिकाणी जाण्याचा बेत मी दोनतीनदा केला आणि काही काही कारणे निघून तो मला सोडून द्यावा लागला. पुढे साधनसामग्रीबाबत मला तुडुंब भरल्यागत वाटू लागले; येसूताईंकडून मूलभूत नवी माहिती मिळण्याचा संभव नाही, असे त्यांच्या चिरंजीवांच्या बोलण्यावरून जाणवू लागले; आणि सतत आठवणी गोळा करीत हिंडण्याचा थोडा कंटाळाही आला. त्यामुळे येसूताईंच्या आठवणी मिळवणे माझ्या हातून घडले नाही. मात्र स्वतःच्या निर्मितीविषयीचे माझे प्रेम जसे वरदाबाईंच्या बाबतीत आडवे आले असावे तसे त्यांच्या बाबतीत केव्हाही आले नव्हते.

शेवटी, साधनसामग्री जमविण्यासाठी जो वेळ नि पैसा लागतो त्याची तरतूद मी कशी केली, ते सांगितले पाहिजे. रोज अधिक तास काम करून, सर्व सुट्ट्यांचा उपयोग करून, नि नाइलाज झाला तेव्हा रजा घेऊन वेळाचा प्रश्न मी सोडवला. लागेल तो खर्च स्वतःच्या खिशातून करायची तयारी मी ठेवली होती. पण महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण-विभागाने दोन हजार रुपयांचे एक अनुदान देऊन खर्चाचा माझा भार खूप हलका केला. या अनुदानापैकी पाचशे

रुपये पुस्तकांवर नि बाकीचे पंधराशे रुपये प्रवासावर खर्च व्हावे अशी अट होती. त्या अटीप्रमाणे पाचशे रुपयांची पुस्तके घेऊन ती फर्ग्युसनच्या ग्रंथालयात मी जमा केली आणि साधनसामग्री, आठवणी वगैरेंसाठी जो प्रवास करावा लागला त्याकरता पंधराशे रुपये वापरले. वास्तविक पाहता, कागदपत्रांच्या नकला करून घेणे किंवा उतारे काढणे या कामासाठी मला इतरांचे साह्य अपरिहार्यपणे घ्यावे लागले आणि त्या कामी निदान पाचशे रुपये प्रत्यक्षाप्रत्यक्ष खर्चावे लागले. हे काम पुस्तकांच्या खरेदीपेक्षा निःसंशय अधिक महत्त्वाचे होते. पण अनुदानाची अडाणी अट पाळण्यासाठी या कामावर मला अनुदानातून खर्च करता आला नाही नि तेवढी तोशीस स्वतः सोसावी लागली! अनुदान देणारी सरकारी यंत्रणा अधिक सुजाण नि कल्पक होईल तो सुदिन! पण विनोदाने मी नेहमी म्हणत असतो, की चरित्रलेखन हा वाङ्मयक्षेत्रातला एक गुन्हा आहे. कमीत कमी तीन वर्षे सक्तमजुरी नि दोन हजार रुपये दंड अशी त्या गुन्ह्याला शिक्षा आहे! त्या शिक्षेपैकी दंड तरी सरकारी अनुदानामुळे कमी झाला—'हेही नसे थोडके'!

३

शोधाचे स्वरूप : इतिहासप्रधान

जी साधनसामग्री माझ्या हाती लागली तिचा शोध मी कसा घेतला ? साधनसामग्रीची टिपणे काढताना टिपणांसंबंधीचे धोरण माझ्या मनात अबोध अवस्थेतच विद्यमान होते, हे मागील प्रकरणात सांगितले. साधनसामग्रीचा शोध घेतानाही त्या शोधासंबंधीचे धोरण माझ्या मनात अबोध अवस्थेतच विद्यमान होते. कदाचित ते तेवढे अबोध अवस्थेत नसले तरी अंशतः अबोध अवस्थेत होते, यात शंका नाही. निदान त्या धोरणाची छाननी करकरून त्याला मी जसे स्पष्ट रूप आज देऊ बघत आहे तसे तरी मुळात त्याला नक्की दिलेले नव्हते. माझ्या मनाच्या तळाशी शोधाची काही कल्पना पूर्वानुभव नि वाचन-चिंतनाचे संस्कार यांमुळे नकळत स्थिर झालेली होती आणि तिच्या प्रेरणेनुसार मी शोधाचे काम करीत होतो. आज ती कल्पना मनाच्या तळातून वर काढून शब्दद्वारे प्रकट करीत असताना मला अशी शंका येत आहे, की तळातली ती कल्पना नि तिचे शब्दमय स्पष्टीकरण ही एकरूप असतीलच असे नाही. त्या दोन्हींत क्वचित नि किंचित फेर पडण्याचा संभव आहे !

चरित्र हे मूलतः एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास असते. हा इतिहास साहित्याच्या पदवीला पोहोचू शकतो, त्याचे रूपांतर कलाकृतीत होऊ शकते, हे खरे. पण चरित्राचे इतिहासत्व केव्हाही पुसले जाऊ शकत नाही. चरित्र जेव्हा इतिहास नसेल तेव्हा ते कदाचित कादंबरी होईल, कदाचित भाकडकथा होईल, पण ते चरित्र म्हणून शिल्लक उरणार नाही. चरित्र म्हणजे शेवटी इतिहासच असल्यामुळे, खरेखुरे 'असणे' नि खरेखुरे 'घडणे' हे त्याचे मूलद्रव्य होय. अर्थात् चरित्रकाराला या असण्या-घडण्याचा शोध घ्यावा लागतो. असणे म्हणजे स्थिती, नि घडणे म्हणजे गती किंवा त्या स्थितीमधील बदल, असे म्हणता येईल. पैकी, चरित्राच्या संदर्भात असण्याची जी मुख्य रूपे मला जाणवली ती अशी : (१) चरित्रनायकाच्या विचार-विकारादिक अंतरंगाची स्थिती, (२) त्याच्या शरीर-वेषादिक बहिरंगाची स्थिती, (३) त्याच्या भोवतालच्या व्यक्तींची स्थिती, (४) समाजाची स्थिती, नि (५) निसर्गाची स्थिती. चरित्राच्या संदर्भातच घडण्याची जी रूपे मला विशेषत्वाने जाणवली ती अशी : (१) घटना, (२) घटनांच्या मालिकेतून उभे राहणारे प्रसंग, आणि (३) घटनांच्या व प्रसंगांच्या मालिकेतून तयार होणारी प्रकरणे. घटना म्हणजे केवळ दृश्य घडणे नव्हे. मनात उसळलेली भावना किंवा स्फुरलेला विचार म्हणजे घटनाच होय. अर्थात, घटना जशा स्थूल किंवा बाह्य असू शकतील तशाच त्या सूक्ष्म किंवा आंतरिक असू शकतील. साहजिकच घटनांना पोटात घेणारे जे प्रसंग नि जी प्रकरणे तीही कमीजास्त प्रमाणात स्थूल किंवा बाह्य, नि सूक्ष्म किंवा आंतरिक असणार, हे उघड आहे. येथे असण्या-घडण्याचे शास्त्रीय वर्गीकरण देण्याचा माझा

हेतू नाही; पण असणे-घडणे कोणकोणत्या रूपांनी मला भावले, त्याचे कोणकोणते चेहरेमोहरे लक्षात बाळगून मी त्याच्याशी सलगी साधली, तेवढेच दिग्दर्शित करायचे आहे.

आताच सांगितलेली असण्या-घडण्याची रूपे बघत बघत मी त्या असण्या-घडण्याचा शोध घेतला. जे जे असणे-घडणे माधवरावांच्या जीवनाशी संबद्ध दिसेल त्याचा संग्रह करायचा, हे माझ्या शोधाचे पहिले अंग होते. त्या असण्या-घडण्यातील सत्यासत्य पारखून घ्यायचे, हे दुसरे अंग होते.—आणि एकंदर असण्या-घडण्याकडे विहंगमदृष्टीने बघितल्यास त्यात जी परस्पर-सापेक्षता दिसेल, जे परस्परसंबंध आढळतील त्यांचा मागोवा घ्यायचा, हे तिसरे अंग होते. मला वाटते, कोणाही इतिहासकाराचा शोध याच तीन अंगांनी गती घेत असावा नि गंतव्य स्थळी पोचत असावा.

असण्या-घडण्याचा संग्रह करण्याचे काम बौद्धिक दृष्ट्या तसे अवघड नसते. पण व्यवस्थित नि चिवट उद्योगाशिवाय ते तडीला जाणे अशक्यप्राय असते. केवळ याच कामाच्या बळावर अर्धे-अधिक चरित्र उभे राहते;—आणि म्हणूनच काही सरधोपट पण परिश्रमी संग्राहकही चरित्रकार म्हणून पुढे येऊ शकतात. हे काम बौद्धिक दृष्ट्या तसे अवघड नसले तरी त्याला बुद्धिगुण अजिबात लागत नाहीत असे मात्र नाही. सर्व प्रकारचे नि सगळे असणे-घडणे एकत्रित व्हावे म्हणून असण्या-घडण्याच्या एकेका बाबीसाठी साधनसामग्रीच्या यच्चयावत संभाराकडे साक्षेपाने बघणारा अष्टावधानीपणा चरित्रकाराच्या अंगी असावा लागतो. आणि सत्यासत्याच्या निर्णयाच्या वेळी किंवा परस्परसंगती लावून प्रातिनिधिक भाग निवडण्याच्या वेळी सर्व सबंद्ध असणे-घडणे दृष्टीसमोर उभी करणारी उत्तम स्मरणशक्तीही त्याला लाभावी लागते. माझ्याजवळ अष्टावधानीपणा नि स्मरणशक्ती या दोन्ही बुद्धिगुणांचे विशेष बळ आहे, असे म्हणता येणार नाही. तेव्हा स्वतःची दृष्टी प्रयत्नपूर्वक सर्व साधनसामग्रीवर वारंवार फिरवून अष्टावधानीपणाची भरपाई मला करावी लागली; आणि 'सूची' या परंपरागत साधनाचा सुबलक आधार घेऊन स्मरणशक्तीची उणीव दूर करणे मला भाग पडले.

असण्या-घडण्याच्या संग्रहासाठी एकच समावेशक सूची योजनापूर्वक तयार न करता मी गरजेप्रमाणे अनेक सूची तयार केल्या होत्या. पैकी जी सूची त्यातल्या त्यात अधिक समावेशक होती तिला 'विषयांची कालखंडशः मुख्य संदर्भसूची' किंवा संक्षेपाने 'मुख्य विषयसूची' असे नाव आपण देऊ या; आणि बाकीच्या सूचींना 'पूरक विषयसूची' म्हणू या. असण्या-घडण्याचा संक्षिप्त नि सुलभ संग्रह करणे हे या सूचींचे उद्दिष्ट असल्याने त्यांची रचना त्या दृष्टीने झाली होती.

पूर्वीच्या चरित्रांवरून माधवरावांच्या जीवनाचे स्थूल कालखंड मला दिसू शकत होते : (१) बाल्य–बडोद्यापर्यंत–१८९४ ते १९०३; (२) माध्यमिक शाळा–बडोदे–१९०४ ते १९०९; (३) महाविद्यालय–बी० ए० अखेर–१९१० ते १९१६; (४) महाविद्यालय–एम० ए० अखेर–१९१६ ते १९१८;—अशा रीतीचे त्या कालखंडांचे स्वरूप होते. तेव्हा एकेका कालखंडाला अंदाजाने काही पृष्ठे देऊन 'मुख्य विषयसूची'चे मी भाग पाडले आणि जे असणे-घडणे साधनसामग्रीत आढळेल त्याची नोंद योग्य त्या कालखंडात करू लागलो. असण्याला नि घडण्याला तत्त्वतः वेगवेगळे अस्तित्व कल्पिता येत असले तरी प्रत्यक्षात ती दोन्ही एकमेकांत

फार गुंतलेली असतात आणि ती भिन्नत्वाने बघणे कठीण होते. तेव्हा त्यांची स्वतंत्र स्वतंत्र नोंद करण्याचा आग्रह मी धरला नाही. असणे-घडणे ही एकच संयुक्त वस्तू कल्पून तिच्या लहान-लहान घटकांचा शोध मी घेत गेलो आणि 'विषय' म्हणून हे घटक सूचीमध्ये मी निर्देशिले. मला असण्या-घडण्याची कोणकोणती मुख्य रूपे जाणवलेली होती, त्याचा उल्लेख नुकताच केला आहे. तेव्हा त्या सर्व रूपांचा थांग लावण्याच्या दृष्टीने मी साधनसामग्रीचा धांडोळा घेत होतो, विषय वेचीत होतो, हे वेगळे सांगायला नको. उदाहरणार्थ, 'महाविद्यालय – बी० ए० अखेर – १९१० ते १९१६' या तिसऱ्या कालखंडात मी जे विषय नोंदलेले होते त्यांतील काही पुढील-प्रमाणे होते : (१) देवांच्या चाळीतील वास्तव्य, (२) सुधारकी आचारविचार, (३) काटकसरी स्वभाव, (४) अभ्यासाची तऱ्हा, (५) महाविद्यालयीन परीक्षा, (६) वाचन, (७) उपजीविका, (८) राजाभाऊ कर्वे, (९) शांता हेर्लेकर, (१०) 'देवा स्त्रीहृदयीं मनोरमपणा...' ही कविता, (११) पहिले महायुद्ध – पंजाबी शिपायाशी भेट, (१२) मामांच्या घराला रामराम, (१३) पोशाख; — वगैरे वगैरे. 'मुख्य विषयसूची'त प्रत्येक पृष्ठाचे दोन उभे भाग मी पाडलेले होते; आणि डाव्या भागात हे असे विषय लिहून उजव्या भागात त्या विषयांपुढे त्यांच्या माहितीचे संदर्भ टिपले होते. उदाहरणार्थ, 'देवांच्या चाळीतील वास्तव्य' या विषयासमोर 'आमची अकरा वर्षे, पृ० ५, १६, १८, १९', 'खानोलकरकृत चरित्र, पृ० १४, १६', आणि 'मराठ्यांना पत्रे, टिपणवही, पृ० १३, १८' अशा नोंदी संक्षेप वापरून केलेल्या होत्या.

मुख्य विषयसूचीत विषय नि संदर्भ नोंदण्याचे काम मी लीलाबाईंच्या, खानोलकरांच्या, नि घाट्यांच्या पुस्तकांवरून पूर्णतया हातावेगळे केले होते; आणि गिरीशांकडील कागदपत्रे, खानोलकरांकडील कागदपत्रे वगैरेंवरून अंशतः उरकले होते. पण पुढे ही मुख्य विषयसूची आटोक्याबाहेर फुगू लागली; कोठे कोठे गिचमीड होऊ लागली; आणि काही कागदपत्रांच्या स्वतंत्र सूची करणे सोयीचे होईल, असे माझ्या ध्यानात आले. तेव्हा माधवराव-लीलाबाई यांची परस्परांना पत्रे, पटवर्धन व गरुड पतिपत्नी यांची परस्परांना पत्रे, वगैरेंच्या स्वतंत्र 'पूरक विषयसूची' मी तयार केल्या. त्या सूचींची रचना मुख्य विषयसूचीप्रमाणेच होती. पण त्यांमधील कालखंड मात्र अधिक छोटे नि आधारभूत कागदपत्रांना अनुरूप असे ठेवलेले होते.

मला मिळालेली जवळजवळ सर्व साधनसामग्री या किंवा त्या सूचीच्या कक्षेत मी आणली होती; पण सूचीच्या कक्षेबाहेर कोणतीच साधनसामग्री राहिलेली नव्हती असे नाही. जेव्हा बऱ्याचशा सूची तयार झाल्या आणि अगदी थोडी साधनसामग्री सूचीबाहेर राहिली तेव्हा ती सामग्रीही सूचीच्या कक्षेत आणण्यासाठी धडपडणे मला व्यर्थ वाटू लागले. ती सामग्री मला करतलावरील आवळ्यासारखी तेव्हा स्पष्ट दिसत होती आणि तिचा उपयोग केव्हाही, कसाही करणे मला सहज शक्य होते. म्हणजे जे सूचीने साधायचे ते सूची न करताही साधण्यासारखे होते. तेव्हा केवळ पद्धतशीरपणा पुरा करण्यासाठी त्या सामग्रीची सूची करण्याच्या भरीस न पडता मी ती सामग्री सूचीशिवायच राहू दिली. परिचितांच्या मुद्दाम जमविलेल्या आठवणी आणि माधवरावांचे काही आत्मनिवेदनपर लेखन अशा सामग्रीत समाविष्ट होते.

चरित्रात असण्या-घडण्याच्या सुसंबद्ध वर्णनाला फार महत्त्व असते. किंबहुना असे वर्णन म्हणजेच चरित्र असेही म्हणता येईल. मी निरनिराळ्या सूचींमध्ये असण्या-घडण्याचे जे

संक्षिप्त नि सुलभ संकलन केले होते त्याचा अशा वर्णनाला पदोपदी उपयोग झाला. सूचींच्या डाव्या स्तंभात जे छोटे-छोटे विषय निर्देशिलेले होते ते एकमेकांशी अंतर्गत संबंधानुसार जोडून सुसंबद्ध वर्णनाचा आराखडा मी मनासमोर आखू शकत होतो आणि सूचींच्या उजव्या स्तंभात जे संदर्भ नोंदलेले होते त्यांवरून त्या आराखड्यात माहितीचा आशय भरू शकत होतो. सूचींचे साह्य मिळाल्यामुळे निरनिराळ्या ठिकाणची माहिती एकत्र येऊन माझे लेखन कसे आकार घेत गेले ते काही उदाहरणे घेऊन सांगण्यासारखे आहे :

१. चरित्राच्या पहिल्याच परिच्छेदात माधवरावांचा जन्म कुठे झाला, केव्हा झाला, त्या वेळी त्यांची बालमूर्ती कशी दिसत असेल वगैरे वर्णन आले आहे. हे वर्णन मी पार्वतीबाई सहस्रबुद्धयांच्या आठवणी, लीलाबाईंचे पुस्तक (पृ० २), गिरीशांकडील कागदपत्रांत सापडलेली माधवरावांची जन्मकुंडली, आणि घाट्यांचे पुस्तक (पृ० १३२–३३) एवढ्या ठिकाणी मिळालेल्या माहितीवरून सजवलेले आहे. मामांच्या ज्या घरात जन्म झाला ते बडोद्याचे घर "बैठे, कौलारू, दुपाखी, आणि जेमतेम तीन खण भरेल एवढे अरुंद होते" हे पार्वतीबाईंच्या आठवणींवरून मला समजले; जन्म बडोद्याला मामांच्या घरात झाला नि तो २१ जानेवारी १८८४ या दिवशी झाला, हे लीलाबाईंच्या पुस्तकावरून मला कळले; तो सूर्योदयानंतर सात वाजून तेरा मिनिटांनी झाला, हे कुंडलीवरून मला काढता आले; आणि जन्मतः माधवराव गोरे, गुलाबी, नि गुटगुटीत असावे, त्यांचा खालचा ओठ रडताना हळूच मुडपत असावा, हे घाट्यांच्या उत्तरकालीन वर्णनावरून नि अन्य आठवणींवरून मी कल्पनेने ताडले!

२. लो० टिळकांच्या मानपत्राला माधवरावांनी जो एकांडा विरोध केला त्याचे वर्णन चरित्रात पृ० ११२ ते ११५ या ठिकाणी आले आहे. त्यातील, मानपत्राला विरोध करण्याच्या मूळ प्रकाराकडे खानोलकरांच्या पुस्तकाने माझे लक्ष वेधले आणि त्या पुस्तकावरूनच, टिळकद्वेष्ट्या मंडळींनी हुलीवर घातल्यामुळे माधवराव विरोधास प्रवृत्त झाले अशी काही लोकांची (म्हणजे खुद्द खानोलकरांची नि घाट्यांची) समजूत होती, हे माझ्या ध्यानात आले. शिवाय, 'संदेश'सारख्या पत्रांनी विरोधावद्दल माधवरावांची टर उडवली वगैरे माहिती त्या पुस्तकावरूनच माझ्या पदरात पडली. मानपत्राच्या सभेच्या पार्श्वभूमीची नि प्रत्यक्ष त्या सभेची हकीगत मुख्यतः केळकरकृत टिळक-चरित्रावरून नि गौणतः ९–१२–१९ च्या माधवरावांच्या एका पत्रावरून माझ्या हाती लागली.—आणि माधवरावांच्या त्याच पत्रावरून त्यांचे मनोगत मला सविस्तर समजले.

३. माधवरावांच्या जीवनातील वडिलोपार्जित घराचे प्रकरण म्हणजे एक रामायणच होय! (पृ० १२५ ते १३८). या रामायणात चार कांडे आहेत : अनेक आप्तांची समजूत घालून माधवरावांनी घर विकले, ते पहिले कांड; घराच्या पैशांची सर्वसंमतीने वाटणी ठरवली, ते दुसरे कांड; पैसे शाहूराव कानिटकरांकडे अडकून शेवटी बुडाले नि त्यांची भरपाई करून द्यावी लागली, ते तिसरे कांड; आणि पैशांसाठी वडिलांनी मध्यंतरी माधवरावांवर फिर्याद लावली होती, ते चौथे कांड. या चतुष्कांडात्मक रामायणातील माहितीचा एकेक तपशील मी कोठून कोठून मिळवला ते सांगायचे तर महाभारत होईल! पण एकूण तपशिलासाठी कोणती साधनसामग्री मला उपयोगी पडली ते गोळाबेरजेने सांगणे सोपे आहे : (अ) माधवरावांनी मराठ्यांना लिहिलेली किमान २२ पत्रे; (ब) माधवराव व त्यांचे वडील त्रिंबकराव यांनी एकमेकांना लिहिलेली किमान १३ पत्रे;

(क) फिर्यादीचे व संबद्ध असे ४ दस्तऐवज; आणि (ड) 'अज्ञात नाथास' (गजलांजली, क्र० ८८) या गझलाचे पूर्वरूप;—एवढ्या सामग्रीचा उपयोग मला झाला होता.

असण्या-घडण्याचे सुसंबद्ध वर्णन सूचींमुळे सुलभ झाले, हे तर खरेच. पण सूचींची उपयुक्तता तेवढ्यावर संपली नाही. असण्या-घडण्यातील सत्यासत्याचा निर्णय करणे हे माझ्या शोधाचे दुसरे अंग होते, आणि असण्या-घडण्याची परस्परसंगती लावून त्यामधील महत्त्वाचा भाग निवडून काढणे हे माझ्या शोधाचे तिसरे अंग होते. त्यासाठी हाती घेतलेल्या कोणत्याही प्रश्नाची सर्व ठिकाणची उलटसुलट माहिती एकदम दृष्टीसमोर येणे फार आवश्यक होते. सूचींमुळे ते सहजतेने होऊ शकले आणि माझी चरित्ररचना आकार घेत गेली.

'संपूर्ण' नि 'सजीव' चरित्राची माझी कल्पना मागील प्रकरणात (पृ० २२ ते २३ वर) मी मांडली आहे. जेव्हा 'संपूर्ण' चरित्र लिहावयाचे असते तेव्हा चरित्रकाराला चरित्रनायकाच्या वाङ्मयाकडे दुर्लक्ष करता येत नाही. कारण वाङ्मय हे जीवनाचेच एक अविभाज्य अंग असते. निरनिराळी लेखने म्हणजे चरित्रनायकाच्या जीवनामधल्या लहानमोठ्या घटना असतात आणि त्या लेखनांत अन्य घटनांचीही प्रतिबिंबे पडलेली असतात. विशेषतः चरित्रनायकाच्या विचार-विकारांचा विलास त्याच्या लेखनात प्रामुख्याने दृष्टीस पडतो आणि त्याच्या प्रतिभेचा किंवा प्रज्ञेचा प्रत्यय झळझळीतपणे त्याच्या लेखनावरूनच येऊ शकतो. किंबहुना असेही म्हणता येईल, की जेव्हा चरित्रनायक हा मुख्यतः लेखक असतो तेव्हा त्याच्या व्यक्तित्वाचे स्फुरण जेवढे लेखनेतर गोष्टींत बघायला मिळते त्यापेक्षाही अधिक ते त्याच्या लेखनात पाहावयास सापडते. मला माधवरावांचे 'संपूर्ण' चरित्र लिहावयाचे असल्याने त्यांच्या लेखनाकडे मी अर्थातच आवर्जून लक्ष दिले. माधवरावांच्या विविध ग्रंथांमधला आशय तर मी लक्षात घेतलाच, पण माधवरावांचे स्फुट लेखनही अवलोकनकक्षेतून वगळले नाही.

स्फुट लेखनाच्या रूपाने किंवा स्फुट लेखनात जे असणे-घडणे उमटले असेल त्याचा सुलभ परामर्श घेता यावा म्हणून 'सूचिपत्रिका' हे साधन मी उपयोगात आणले. याआधी उल्लेखिलेल्या ज्या विविध 'सूची' त्यांचे सूचिपत्रिका हे भावंड म्हणता येईल. माधवरावांच्या प्रत्येक प्रकाशित स्फुट लेखनाची (म्हणजे लेखाची, कवितेची, भाषणाची, पत्राची, प्रस्तावनेची, अभिप्रायाची, वगैरे) एकेक चिठी अथवा सूचिपत्रिका मी तयार केली होती. प्रत्येक सूचिपत्रिकेवर लेखनाचे नाव, लेखनस्थळ, लेखनकाल, प्रकाशनस्थळ, प्रकाशनकाल, संग्रहात ते लेखन समाविष्ट असल्यास संग्रहाचे नाव, इत्यादी नोंदी घातल्या होत्या. या नोंदी भरण्यासाठी डॉ० चुनेकरांची सूची आणि गिरीशांनी 'स्वप्नभूमी'त शेवटी दिलेली 'लेखनांचे स्थलकाल' व 'सुनीत-लेखनाच्या मित्या' ही दोन परिशिष्टे मला फार उपयोगी पडली; आणि बहुतेक सर्व प्रकाशित लेखन प्रत्यक्ष चाळून व अप्रकाशित लेखनातील माहितीची त्याला जोड देऊन मी या नोंदी शक्य तेथे पुऱ्या केल्या किंवा पडताळून घेतल्या. माधवरावांनी आपल्या कवितांच्या वह्यांत, दोन ठिकाणी, आपल्या कवितांच्या लेखनाचे जे स्थलकाल यादीसारखे टिपून ठेवले होते ते या कामात मला विशेष मोलाचे वाटले. डॉ० चुनेकर किंवा गिरीश यांच्या नोंदी कुठे कुठे मला सुधाराव्या लागल्या किंवा त्यांत भर घालावी लागली; पण तसे प्रसंग एकंदरीने फार थोडे आले. या सुमारे सहाशे सूचिपत्रिका भरून त्या जेव्हा मी कालक्रमाने लावल्या तेव्हा त्या उपयोगाच्या

अवस्थेला येऊन पोचल्या. या सूचिपत्रिकांना पूरक म्हणून अप्रकाशित कवितांची एक नि अप्रकाशित ग्रंथांची एक अशा कालक्रमवार लावलेल्या दोन याद्याही मी तयार ठेवल्या होत्या. असण्या-घडण्याचा जो वाङ्मयसंबद्ध शोध मी घेतला त्या शोधात सूचिपत्रिकांचा नि या याद्यांचा मला खूपच उपयोग झाला.

सूचिपत्रिकांत लेखनाच्या स्थळाची व काळाची नोंद होती. त्या नोंदीवरून ते ते लेखन समकालीन व समस्थलीन अन्य असण्या-घडण्याशी मला जोडता आले. उदाहरणार्थ, शांताबाईंकडून विवाहाला नकार मिळाल्यावर व शांताबाई श्री० कशाळकरांशी विवाहबद्ध झाल्यावर माधवरावांनी प्रेमामधला संन्यासयोग मनात बाणवला होता, हे त्यांच्या पत्रांवरून मला कळले होते. पण 'निराशेतील समाधान' ही कविता नेमकी त्याच काळातली आहे हे लक्षात आल्यावर त्या कवितेमधील विचार-विकार त्या संन्यासयोगात मी मुरवून टाकले. (पृ० १०२). वरदा-प्रकरणामधले माधवरावांचे विवाहनिरपेक्ष, निर्विषय, उत्कट स्त्रीप्रेम आणि 'तेथे चल राणी' या त्यांच्या कवितेमधील विचार-विकार यांची स्थिती तशीच होती. कवितेखालच्या तारखेमुळे त्या दोहोंची सांगड मी प्रथम मनोमन घातली आणि पुढे प्रा० क्षीरसागरांच्या आठवणींवरून ती पक्की केली. (पृ० २००). डे० ए० सोसायटीमधून बाहेर पडल्यानंतर माधवरावांनी जेव्हा परंपरागत पद्धतीने विवाह केला अन् संसार थाटला तेव्हा त्यांच्या जीवनसरणीत मोठे परिवर्तन झाले होते. या परिवर्तनामागील विचार-विकार मला थोडेफार अंदाजता येत होते; पण कवितांखेरीज अन्य सामग्रीत त्यांचा आविष्कार झालेला मला कोठे सापडत नव्हता. अशा स्थितीत त्या परिवर्तनाशी समकालीन असलेल्या कविता मी सूचिपत्रिकांच्या साह्याने बाजूला काढल्या नि आश्चर्य असे की त्यांत त्या विचार-विकारांचे सर्व तपशील माझ्या हाती लागले! (पृ० २९१ ते २९५).

कवितांमधले विचार-विकार म्हणजे वास्तव विचार-विकार कशावरून, त्यांत कल्पनारंजन नसेल का, वगैरे प्रश्न येथे उपस्थित होऊ शकतील; पण त्यांचा विचार 'सत्यासत्याचा निर्णय' या शोधविषयक दुसऱ्या अंगावरोबर पुढे करता येईल. सूचिपत्रिकांच्या मदतीमुळे असण्या-घडण्याचे सुसंगत चित्र कसे वाढत नि पूर्ण होत गेले, ते येथे स्पष्ट झाले म्हणजे पुरे आहे. मुख्य चित्रात सूचिपत्रिकांमुळे (म्हणजे वाङ्मयामुळे) जी भर पडली ती प्राधान्याने विचार-विकारांची किंवा आंतरिक तपशिलांची होती. हा तपशील म्हणजे असण्या-घडण्याचे जणू प्राणतत्त्व असल्यामुळे चरित्र 'सजीव' होण्यास त्याचा खूपच हातभार लागला.

सूचिपत्रिकांमुळे इतर असण्या-घडण्याशी लेखनात प्रतिबिंबित झालेले असणे-घडणे एकीकडे जोडले गेले आणि दुसरीकडे माधवरावांचे जे लेखक म्हणून व्यक्तित्व होते त्यावरही काही प्रकाश पडू शकला. माधवरावांच्या वाङ्मयनिर्मितीचा वेग नि आवेग, त्यांच्या प्रतिभेची नि प्रज्ञेची हालचाल यांची खबर अनेकदा सूचिपत्रिकांनीच माझ्या कानात सांगितली. "१९२१, १९२२, १९२३ या तीन वर्षांत त्यांच्या काव्यप्रतिभेला असा काही बहर आला होता की त्याचे अनेकविध रंग बघून मन थक्क व्हावे....१९२१ च्या मेमध्ये सुट्टीनिमित्त बडोद्याला ते बापूराव शिंद्यांकडे जाऊन राहिले होते; त्या वेळी १६ दिवसांत ५ गझल नि १ भाषांतरित कविता त्यांनी लिहिली! २५ तारखेला एकाच दिवशी दोन गझल त्यांनी लिहिले: 'विस्मृतीची

समाधी' आणि 'भाविक हुरहूर'! पैकी पहिला गझल म्हणजे एका मद्यपी इसमाचे बेलगाम कलंदर गाणे आहे, तर दुसरा गझल म्हणजे एका अज्ञेयवादी, भावभुकेल्या माणसाची ईश्वराला मारलेली हाक आहे!" (पृ० १५४)—हे निरीक्षण सर्वस्वी सूचिपत्रिकांवर अवलंबून नसले तरी त्याचे एक मूळ सूचिपत्रिकांत नि त्यांमधील स्थलकालांच्या नोंदीतच रुजलेले आहे. सूचिपत्रिका नि ग्रंथादिकांच्या याद्या यांच्या आधारावरच पुढील निरीक्षणही उभे राहिले आहे : "माधवरावांची निर्माणशक्ती जशी अमळनेरला तशीच पुण्याला प्रतिकूल परिस्थितीतही चांगली जोमात होती. या दोन वर्षांत नोकरी सांभाळून, त्यांनी एक छंदःशास्त्रीय ग्रंथ लिहिला, दोन पुस्तकांना प्रारंभ करून ठेवला, सव्वापाचशे रुबायांचे भाषांतर केले, साठएक स्फुट कविता रचल्या आणि काही गद्य लेखही प्रकाशित केले!" (पृ० २७६). सूचिपत्रिकांमुळे लेखनाचा जो स्थलकालबद्ध आराखडा तयार होतो तो चरित्रनायकाच्या बौद्धिक नि भावनिक जीवनाचा मार्ग काढण्यासाठी अत्यंत उपयोगी पडतो, असा माझा अनुभव आहे.

माधवरावांच्या जीवनातील असण्या-घडण्याचा संग्रह माझ्यापूर्वी तीन चरित्रकारांनी केलेला होता. त्यांचा संग्रह मला उपयोगी पडलाच; पण मला मिळालेली विपुल साधनसामग्री नि माझी विशिष्ट अभ्यासपद्धती यांमुळे त्या संग्रहात काही लक्षणीय भरही मी घालू शकलो. बडोद्याच्या मामांकडील गृहस्थिती, शांता-प्रेमसंबंधातील घटनाक्रम, वडिलोपार्जित घराची विक्री, विक्रीच्या पैशांची वाटणी, संस्थात्मक पातळीवर डे० ए० सोसायटीमध्ये झालेला संघर्ष, वरदेबरोबरच्या स्नेहाचे स्वरूप, माडखोलकरांशी झालेला वाद, वडिलांच्या मृत्यूचा प्रसंग, पतिपत्नींमधील काम-विषमता, काही सांसारिक प्रसंग, वगैरेसंबंधी ठसठशीत नवी माहिती माझ्या पुस्तकात आली आहे. पूर्वचरित्रकारांच्या माहितीला संकीर्ण तपशिलाच्या छोट्या-छोट्या पुरवण्या तर मी इतक्या जोडल्या आहेत की त्यांची गणना करणे कठीण जाईल. मात्र या पुरवण्यांत, वाङ्मयाच्या आधाराने माधवरावांच्या मनाचा जो मागोवा मी घेतला आहे, तो मुद्दाम सांगायला हवा. शिवाय माझ्या प्रकाशित पुस्तकात असण्या-घडण्याचा जेवढा संग्रह आला आहे तेवढाच तो मुळात होता असे समजणे चूक ठरेल. मुळात सुमारे दुप्पट संग्रह मी केला होता; पण पुढे तो काटूनछाटून त्यातील प्रातिनिधिक भाग तेवढाच मी पुस्तकात ठेवला. मुळात माधवरावांचे जीवन असण्या-घडण्याच्या माहितीने अथपासून इतीपर्यंत जेव्हा तुडुंब भरल्यासारखे वाटले तेव्हाच संग्रहाचे काम मी थांबविले होते. साधनसामग्री अपुरी असली तर संग्रहात काही फटी नि भगदाडे अपरिहार्यपणे राहून गेल्याचा अनुभव चरित्रकाराला येतो. पण तसा अनुभव माझ्या वाट्याला सुदैवाने आला नाही.

असण्या-घडण्यातील सत्यासत्य पारखून घेणे हे माझ्या शोधाचे दुसरे अंग होते. असण्या-घडण्याचा संग्रह पुरा होईपर्यंत सत्यासत्याची पारख मी पुढे ढकलली नाही, तर एकेका बाबीसंबंधी पुरेशी माहिती हाती येताच तशी पारख करण्याचा उद्योग सुरू केला. संग्रहाच्या मानाने हा उद्योग बौद्धिक दृष्ट्या अवघड म्हणावा लागेल. सत्यासत्य पारखण्याचे काही नियम आधी ठरवून किंवा मनात बाळगून नंतर या उद्योगाकडे मी वळलो नाही. एकेक बाब जस-जशी समोर येत गेली तसतसा तिचा निर्णय संबद्ध पुरावा बघून मी करीत गेलो. एकदा घेतलेला निर्णय नवा पुरावा किंवा युक्तिवाद पुढे आल्यास पुन्हा तपासून बघायचा, जरूर

तर बदलायचा, असेही धोरण ठेवले. या वेळी पूर्वनिश्चित नियमांच्या ऐवजी सारासारविवेकावरच माझी भिस्त होती. प्रत्येकाच्या सारासारविवेकाचा दर्जा शेवटी प्रत्येकाच्या बहुश्रुतपणाशी, शिक्षणाशी, बुद्धीशी, नि व्यक्तित्वाशी निगडित असतो; तसाच तो माझ्याही बाबतीत असला पाहिजे.

सत्यासत्य पारखण्याचे जे प्रसंग माझ्यासमोर उभे राहिले ते मुख्यतः तीन प्रकारचे होते : (१) माझ्या समोरच्या माहितीत विसंगती होती; (२) माहितीत विसंगती नसली तरी तिच्या विश्वसनीयतेविषयी माझ्याच मनात शंका येत होत्या; किंवा (३) माहिती कवितेसारख्या कल्पनारंजित ललित वाङ्मयातून घेतलेली असल्यामुळे तिचा वास्तव सत्य म्हणून कितपत स्वीकार करावा, असा प्रश्न पडत होता. पैकी पहिल्या दोन प्रकारांतील प्रसंगांचा विचार प्रथम एकत्रित करणे सोयीचे पडेल. या दोन प्रकारांतील शेकडो लहानमोठे प्रसंग मला हाताळावे लागले; पण बहुतेक सर्व प्रसंगी काहीतरी स्पष्ट निर्णय मला घेता आला. अगदी अपवादात्मक प्रसंगीच स्पष्ट निर्णय मला घेता आला नाही किंवा स्पष्ट निर्णय घेण्याची निकड मला वाटली नाही. त्या वेळी जी विसंगती किंवा संदिग्धता राहिली ती तशीच उघडपणे स्वीकारून मी पुढे गेलो. पहिल्या दोन प्रकारांतील सत्यासत्याच्या निर्णयाचे काही नमुने पुढीलप्रमाणे :

१. माधवराव डे० ए० सोसायटीमधून बाहेर पडल्यावर, १९२६ साली, समाजाने त्यांची जी हेटाळणी केली तिचे वर्णन "हा रस्त्यात दिसे न तोंच सगळीं संभाषणें थांबती" (तुटलेले दुवे, क्र० १४ चे पूर्वरूप) या सुनीतात केले आहे, असे खानोलकर म्हणतात. (पृ० १५६–५७). पण माधवरावांनी २४ मार्च १९२४ असा त्या सुनीताचा लेखनकाल दिला आहे. आधीचे सुनीत नंतरच्या परिस्थितीचे वर्णन करू शकणार नाही, हे उघड होते. तेव्हा खानोलकरांचे म्हणणे मी ग्राह्य मानले नाही.

२. खानोलकरांनी पृ० ६४ वर माधवरावांची एक कविता उद्धृत केली आहे. आपल्या मैना नावाच्या प्रेयसीवर माधवरावांनी ती लिहिली असे सांगून कवितेच्या पहिल्या चरणात मैना हे नावही खानोलकरांनी छापले आहे. पण मराठ्यांच्या पत्रसंग्रहातून माधवरावांचे मूळ हस्तलिखित मी काढून बघितले तर कवितेत मैना हे नाव नव्हते! त्याऐवजी दोन फुल्या होत्या! पृ० ६५ वर माधवरावांच्या पत्रातील एक उतारा खानोलकरांनी पुढीलप्रमाणे दिला आहे : "माझ्या अनेक कविता व्यक्तिविषयक आहेत. पैकी...'कवीची भाऊबीज' ही एक...होय. माझ्या मैनेच्या आत्म्यास प्रेरणा कल्पून गेल्या वर्षी भाऊबीजेच्या दिवशी...मी ती कविता लिहिली!" (उताऱ्यातील काही भाग गाळून तो मी टिंबांनी दर्शविला आहे.) पुन्हा मराठ्यांच्या पत्रसंग्रहातून मूळ पत्र मी काढून बघितले तर त्यात 'मैने' ही अक्षरे नव्हती! त्याऐवजी फक्त खाडाखोड होती! फुल्यांच्या किंवा खाडाखोडीच्या जागेवरची व्यक्ती मैना होय, असे अनुमान खानोलकरांनी काढले असेल, नि त्या जागेवर निवेदनसौकर्यासाठी मैना हे नाव छापले असेल, हे मी समजू शकलो. पण खानोलकरांच्या अवतरणात नि मूळ कागदात तफावत पडल्यामुळे वरील दोन कविता मैनेवरच्याच कशावरून अशी शंका मला आली. मुळात पहिल्या कवितेवर 'To T. R.' असा मथळा असल्यामुळे तर ती शंका दृढ झाली. तेव्हा 'To T. R.' अशा मथळ्याच्या दोन कवितांतील अभिप्रेत प्रेयसी नि प्रत्यक्षातील मैना या व्यक्तींमधील साम्यभेद मी

शोधू लागलो. त्या शोधात मैनेबद्दल निश्चितपणे माहीत असलेल्या गोष्टींशी त्या अभिप्रेत प्रेयसीचे अथवा T. R.चे अनेक बाबतींत जमत नाही, असे आढळून आले. तेव्हा, T. R. वेगळी नि मैना वेगळी असा निष्कर्ष मी काढला आणि T. R. वरील कविता मैनेकडे लावायच्या नाहीत असे ठरवले.

३. डॉ० प० ल० वैद्यांनी मला अशी आठवण सांगितली, की स्वतःच्या बहिणीसाठी माधवरावांचे स्थळ बघण्याचा त्यांचा विचार होता. पण रँ० परांजप्यांनी प्रतिकूल सल्ला दिल्यामुळे तो विचार त्यांनी सोडून दिला. रँ० परांजप्यांखेरीज आपल्या विचाराबद्दल अन्य कोणाशी बोलल्याचे त्यांना स्मरत नव्हते आणि "माधवरावांशी तर नक्की बोलले नाही" असे ते म्हणत होते. पण १ ऑक्टोबर १९२३ च्या माधवरावांच्या पत्रात "डॉ० प० ल० वैद्य यांजकडून संधान आले होते" असा स्पष्ट उल्लेख मला आढळला. तेव्हा पुष्कळ वर्षांच्या आठवणींपेक्षा समकालीन पत्रातला निःसंदिग्ध उल्लेख अधिक विश्वसनीय असे मानून, डॉ० वैद्यांनी बहिणीबद्दल माधवरावांकडे विचारणा केली होती, असा निष्कर्ष मी काढला.

४. आपल्या एका लेखात माधवरावांनी म्हटले आहे, की "मी पहिली कविता मुखचंद्रावर नव्हे, तर आभाळातल्या खऱ्याखुऱ्या चंद्रावर केली." त्या इंग्रजी कवितेतल्या दोन ओळी त्यांनी उद्धृत केल्या आहेत आणि कवितेचे लेखन प्रवेश-परीक्षेच्या वर्गात जातेवेळी केव्हातरी (म्हणजे १९०९ च्या सुमारास) झाले, असे सांगितले आहे. (चुनेकर, पृ० ४९–५०). पण 'मराठीचे पहिले डी० लिट्०...' या लेखात (मनोहर, फेब्रु०, १९३९) श्री० वि० वा० पत्की यांनी एक वेगळी कविता माधवरावांची पहिली कविता म्हणून दिली आहे. ती मराठीत असून चंद्राऐवजी देवावर आहे नि तीमध्ये कवीने आपल्या अधूपणाबद्दल देवाची करुणा भाकली आहे. १९०६ साली कुस्तीत माधवरावांचा हात दुखावला तेव्हा कविता तयार झाली, असे श्री० पत्की सांगतात. आता, पहिल्या कवितेबद्दल खुद्द कवीची साक्ष खरी मानायची की एका परिचय-लेखकाची, असा मला पेच पडला. पण मी असा विचार केला की कवीची म्हणजे माधवरावांची साक्ष १९३४ सालची आहे नि श्री० पत्कींची साक्ष १९३९ सालची आहे. माधवरावांनाच मागाहून आपली आधीची कविता आठवली असेल नि त्यांनी ती श्री० पत्कींना सांगितली असेल. नाही तर प्रसंगाचा अचूक संदर्भ देऊन सगळी कविताच श्री० पत्की काय स्वतःच्या डोक्यातून निर्माण करतील? अर्थात्, कवीऐवजी परिचयलेखकाची साक्ष मी ग्राह्य ठरवली!

५. लीलाबाईंनी लिहिले आहे की इंग्रजी शाळेत असताना 'मामांनी' दिलेला एक 'खाकी' कोट माधवराव कॉलेजमध्येही वापरीत असत. (पृ० ६). आणि शांताबाई कशाळकरांनी लिहिले आहे की त्या वेळी ते 'वडिलांचा' 'मोठा, सैल' कोट घालीत असत. (खानोलकर, पृ० ४०–४१). मामांनी दिलेला कोट नि वडिलांचा कोट यांमध्ये म्हटल्यास विसंगती आहे आणि म्हटल्यास ती दूर करणेही आवश्यक आहे. पण बाब अगदी क्षुल्लक असल्यामुळे मी तिच्याकडे दुर्लक्ष केले.

६. रा० माडखोलकरांनी आपल्या तोंडी आठवणींत मला सांगितले, की 'अगोटींची भेट', 'मानससुंदरी', आणि 'जुगारी' (गज्जलांजली, क्र० ७१, २६, ९३) या कविता माधवरावांनी

इरावती करमरकर (सौ० कर्वे) यांना उद्देशून लिहिलेल्या आहेत. "गोरी सलील सुंदर तू भेटता कुमारी। वाटे भवीं अजूनहि आहे जरा खुमारी,"—ही इरावतींविषयी माधवरावांची भावना होती! पण स्वतःची नालस्ती केल्याचा आरोप माधवरावांनी माडखोलकरांवर पूर्वी केलेला होता. मलाही नालस्तीचा सूर माडखोलकरांच्या बोलण्यात जाणवला होता,—आणि 'इरावतींबद्दल माधवरावांना 'फॅसिनेशन' होते,' असे सांगणारे काही लोक जरी मला भेटले होते तरी या कविता इरावतींवर आहेत असे म्हणणारे माडखोलकरांखेरीज कोणी भेटले नव्हते. तेव्हा माडखोलकरांची आठवण निश्चित निर्णयाच्या पलीकडची आहे, असे मी मानले, आणि अनिर्णीत अवस्थेत मनात तशीच ठेवून दिली.

येथवर सत्यासत्याचे काही निर्णय (किंवा अनिर्णय) नमुना म्हणून मी सांगितले; पण ते सांगताना संक्षेपाचा आश्रय नाइलाजाने करावा लागला. तेव्हा निर्णयांमागची जी कारणे नोंदवली आहेत तेवढीच प्रत्यक्षात होती असे समजून चालणार नाही. मुख्य मुख्य कारणेच नोंदवलेली असून अनेक उपोद्बलक कारणे त्या त्या वेळी उपस्थित असली तरी संक्षेपामध्ये नोंदवलेली नाहीत, हे गृहीत धरणे आवश्यक आहे.

सत्यासत्याच्या निर्णयात कवितांसारख्या ललित वाङ्मयातील सत्याचा निर्णय काहीसा अवघड होता. अशा वाङ्मयात वास्तव सत्य किंवा ऐतिहासिक सत्य असते काय, असल्यास कलात्मक सत्यापासून ते वेगळे कसे काढावे, त्याचा चरित्राकडे उपयोग करताना कोणती पथ्ये पाळावी, वगैरे प्रश्न सोपे नव्हते. कविता प्रतिभानिर्मित असली तरी तीमधील संपूर्ण आशय सदैव अ-वास्तव किंवा अनैतिहासिक असतो, असे मला वाटत नव्हते. अनुभूत सत्य हाती घेऊन प्रतिभा त्याचे रूपांतर काव्यस्वप्नात करू शकते, हे मला माहीत होते. कवितेत वास्तव सत्याचे नि कल्पिताचे कधी 'रसायन' झालेले असते तर कधी 'मिश्रण' झालेले असते, हे मी जाणत होतो. कधी कधी कविता म्हणजे आरपार वास्तव सत्यच असते आणि प्रतिभेने भोवतालच्या एकूण वास्तवातून ते फक्त कोरून काढण्याचे काम केलेले असते, याबद्दलही मला शंका नव्हती. तेव्हा कवितांमधले वास्तव सत्य वेचून त्याचा उपयोग चरित्राकडे केला पाहिजे, ही प्रारंभापासून माझी प्रवृत्ती होती. वाङ्मयात सत्य मला विशेष महत्त्वाचे वाटत होते; कारण कृतीला प्रेरणा देणारे जे विचार-विकार तेच तेथे शब्दरूपाने सत्यात सापडण्याचा मोठा संभव होता. विचार-विकार क्वचित बाह्य कृतीला प्रेरक होत नसले तरी जीवनाचे सार विचार-विकारांतच साठलेले आहे, अशी माझी धारणा होती. विचार-विकार जाणणे म्हणजे जीवनाच्या स्पंदनकेंद्रालाच जाऊन भिडणे होय, याविषयी मला शंका नव्हती. तेव्हा कवितेमधील वास्तव विचार-विकार कृतिप्रेरक झालेले नसले तरीही मी त्यांच्याविषयी स्वागतशील होतो.

शिवाय माधवरावांच्या बाबतीत कवितांचा उपयोग चरित्राकडे करावासा वाटावा याला आणखी काही कारण होते. माधवराव मुख्यतः आत्मपर कवी तर होतेच; पण कित्येक स्थळी ते आत्मचरित्रपरही झालेले आहेत. विशिष्ट प्रसंगी आपल्या प्रतिक्रिया ते जशाच्या तशा कवितेतच नोंदवीत. पत्रांच्या ऐवजी काही वेळा त्यांनी कविता लिहिलेल्या आहेत. केव्हा केव्हा घटना घडताच ते त्या घटनेवर कविता करीत आणि तीमध्ये आपल्या प्रतिक्रियाच नव्हे, तर त्या घटनेचे वर्णनही देत. काही कवितांत विशिष्ट व्यक्तीविषयीच्या किंवा संस्थेविषयीच्या आपल्या भावना त्यांनी

सांगूनसवरून गुंफलेल्या आहेत. आपल्या कवितांचा चरित्रपर अर्थ कोणी लावू नये वगैरे अर्थाचे विचार ते केव्हा केव्हा व्यक्त करताना आढळतात, पण केव्हा केव्हा आपल्या कविता म्हणजे केवळ कल्पनाविलास नाही, त्यांत प्रत्यक्षानुभूतीचे पडसाद आहेत, प्रत्यक्षानुभूतीही आहे, वगैरे अर्थाचे विचारही ते प्रकट करताना आढळतात. लीलाबाईंनी आपल्या पुस्तकात त्यांच्या अनेक कवितांच्या जन्मकथा दिलेल्या आहेत आणि त्यांत त्या कविता वास्तवाला (म्हणजे इतिहासाला) किती धरून आहेत त्याचीच जणू साक्ष दिली आहे. तेव्हा काव्यात सामान्यतः वास्तव सत्य असू शकते, आणि माधवरावांच्या काव्यात ते विशेषत्वाने सापडण्याचा संभव होता, या कारणाने माधवरावांच्या चरित्रात त्यांच्या कवितांचा उपयोग करायचा हा माझा निर्णय ठाम झाला.

निर्णय ठाम झाला तरी काव्यातून वास्तव सत्य कसे वेचून काढायचे हा प्रश्न सुटलेला नव्हता. या प्रश्नाचे सविस्तर नि व्यवहारोपयोगी उत्तर माझ्या वाचनात कोठे आलेले नव्हते; आणि तसे उत्तर आगाऊ तयार करून मग वास्तव सत्याच्या निष्कर्षणाला प्रारंभ करायला पाहिजे, असेही मला वाटत नव्हते. तेव्हा, माझ्या रिवाजाप्रमाणे, ज्या त्या कवितेबाबत संबद्ध गोष्टी बघून सारासार-विचाराने निर्णय घ्यायचा असे मी योजले, नि कामाला प्रारंभ केला. मात्र वास्तव सत्याच्या निष्कर्षणाचे तपशीलवार नियम मी तयार केलेले नसले तरी त्याबाबत काही स्थूल धोरण माझ्या मनात वावरत होते. ते असे की प्रत्येक कवितेमधून चरित्र हुडकण्याचा प्रयत्न ऊठसूट करायचा नाही. कविता चरित्रपर असल्याविषयी कवितेबाहेरचा काही आधार असेल, किंवा अन्य सबळ कारण असेल, तरच वास्तव सत्याच्या निष्कर्षणासाठी कवितेकडे वळायचे. वास्तव सत्य म्हणून कवितेमधून आपण जे बाहेर काढू ते जर कविताबाह्य वास्तवाशी विसंगत असेल तर वास्तव सत्य म्हणून त्याचा स्वीकार शक्यतो करायचा नाही.—आणि अशा सत्यात कल्पिताचा अंश मिसळलेला असण्याची कायमची शक्यता ध्यानात घेऊन, ते सत्य कवितेच्या आधाराने सांगितले आहे याची सूचना वाचकाला देऊन ठेवायची. हे धोरण मनात बाळगून, कवितांविषयी जे अनेक निर्णय मी घेतले त्यांचे काही नमुने संक्षेपाने पुढीलप्रमाणे :

१. माधवरावांच्या बालपणाचे वास्तव वर्णन देणारी कविता म्हणून 'आमचें घर' ही कविता मी स्वीकारली आहे. (पृ०६). या कवितेत आवळसच्या घराचे माधवरावांनी खरेखुरे वर्णन केले आहे आणि तीमधील बाललीलांत ते स्वतः रमले होते, अशा अर्थाची लीलाबाईंची साक्ष मला उपलब्ध होती. ('...वर्षे', पृ० ५). लहानपणच्या आठवणी लीलाबाईंना सांगताना माधवरावांनी या कवितेचा उल्लेख केला होता, असे लीलाबाईंच्या साक्षीवरून दिसत होते. कवितेचा बहुतेक आशय कविताबाह्य माहितीशी कुठेही खटकत नसल्यामुळे आणि काही बाबतींत तिला पोषकच होत असल्यामुळे वास्तव सत्य म्हणून मी त्याचा स्वीकार केला. मात्र, कवितेमधील खाऊ देणारी आई नि लाड करणारे बाबा कविताबाह्य माहितीशी खटकत होते; म्हणून मी त्यांना बाजूला काढले. ते आईवडील म्हणजे कल्पनेच्या बळावर माधवरावांनी साधलेली स्वतःची इच्छापूर्ती असणार, असा कयास मी व्यक्त केला.

२. माधवरावांच्या १९१२-१३ सालच्या प्रेमनिराश मनःस्थितीचे वर्णन करण्यासाठी मी त्याच सालच्या त्यांच्या पाचसहा कवितांचा वापर केला आहे. (पृ० ५२ ते ५६). पैकी 'नैराश्यगीत' ही कविता आपल्याच मनाचे चित्र आहे, अशा अर्थाचे दोनतीन उल्लेख स्वतः

माधवरावांनी केलेले असून "नैराश्यगीत हे माधवरावांचे त्या काळातले जीवनगीत होते" असे त्या काळचे साक्षीदार श्री० घाटे यांनीही म्हटलेले आहे. बाकीच्या कविता वास्तववर्णनपर असल्याचे वेगवेगळे निर्देश नाहीत; पण "माझ्या अनेक कविता व्यक्तिविषयक आहेत" असे त्या कवितांच्या लेखनकालातच मित्राला लिहिलेल्या पत्रात माधवरावांचे निवेदन आहे. 'श्यामा-रजनी' ही कविता शांताबाईंना उद्देशून लिहिलेली असल्याचे माडखोलकरांनी मला सांगितले होते आणि त्या कवितेखाली 'शांताच्या खिडकीसमोर, रात्री दोन वाजता' अशा अर्थाची नोंद माधव-रावांच्या वहीत वाचल्याचे त्यांना स्मरत होते. सर्व कवितांचा आशय बव्हंशी कविताबाह्य माहितीशी सुसंगत नि तिला पोषक असाच आहे. प्रियकराची विशीर्ण स्थिती, सखीची बेमानी, तिचा सु-स्वर, श्यामल कांती वगैरे तपशील त्या दृष्टीने लक्षणीय आहे. तेव्हा या सर्व कवितांत माधव-रावांची वास्तव मनःस्थिती बघण्याचा मी साहजिकपणे प्रयत्न केला. मात्र 'नैराश्यगीत' हे निखळ वास्तववर्णनात्मक नि इतर कविता अंशतः कल्पनारंजित असा विवेक करण्यास मी चुकलो नाही. कारण इतर कवितांत कुठे अतिशयोक्ती होती, कुठे नाट्यात्मक परिस्थिती होती, कुठे 'रात्रि-कीटक' होता—आणि त्या सर्व गोष्टी परिणाम साधण्यासाठी आयात केलेल्या आहेत, ललित निर्मितीच्या द्योतक आहेत, असे जाणवत होते. मी केलेला विवेक सूचित करण्यासाठी, 'नैराश्यगीता'संबंधी लिहिताना 'माधवराव' अमुकतमुक म्हणतात, अशी भाषा मी वापरली; आणि इतर कवितांसंबंधी लिहिताना 'कवी' अमुकतमुक म्हणतो, अशी शब्दयोजना मी केली.

३. माधवरावांनी शांताबाईंशी मुलाचे जे विचित्र नाते काही काळ घेतले होते त्याच्या वर्णनासाठी मी त्यांच्या चार कवितांचा वापर केला आहे. (पृ० ६५ ते ६८). त्यांपैकी 'आठवणारें पहिलें चुंबन' या कवितेविषयी खानोलकरांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना माधवरावांनी लिहिले होते, की "[तो] दिवस १९१४ च्या आगस्तातील २६ व्या तारखेचा होता. त्या दिवशी 'आई, हें पहिलेंच चुंबन...' ही कविता लिहिली गेली. ...त्या काळी आम्ही 'आई व मूल' हे नाते घेतलेले होते....ता० २३ ला म्हणजे तीन दिवस आधी 'जरि तुझ्यावर फार रुसून मी' ही कविता लिहिल्याची नोंद माझ्याजवळ आहे....[तिचा] पहिला श्लोक असा आहे : 'जरि तुझ्यावर फार रुसून मी। लपुन दूर कुठे बसलों तमीं। परि कुशींत तुझ्या शिरल्याविना। जननि झोप निशीं मज येईना।' त्या वेळी माझ्या मनात तोच भाव प्रबलतम होता." (खानोलकर, पृ० ५४–५५). स्वतः माधवरावांची दोन कवितांबद्दल एवढी स्पष्ट साक्ष असताना त्या दोन कवितांचा उपयोग वास्तव वर्णनाकडे करायला मला कोणतीच आडकाठी नव्हती. मात्र दुसऱ्या कवितेचा मूळ पाठ त्यांच्याच २३ ऑगस्टच्या पत्रात मिळाला तो मी घेतला. उरलेल्या दोन कविता 'आई'ने घेतलेल्या २६ ऑगस्टच्या पूर्वोक्त चुंबनापूर्वी दीडएक महिना म्हणजे १३ नि १५ जुलैला लिहिलेल्या होत्या. त्यांचा विषयही 'आई' हाच होता आणि त्यांचा आशय छुपेपणाने भावी चुंबनाकडे झुकत होता. तेव्हा त्यांची सांगड पुढील कवितांशी मी घातली नि त्यांचाही वास्तव-वर्णनाकडे उपयोग करून घेतला, हे रास्त ठरावे. एकदा या चार कविता (निदान प्रथम उल्लेखिलेल्या दोन कविता) वास्तव-वर्णनात्मक ठरल्यावर त्यांचा अन्वयार्थ माधवरावांना विचारूनच लावला पाहिजे असा निर्बंध मी मानला नाही. माधव-राव म्हणत होते की या कवितांत पुत्राच्या भावना व्यक्त झालेल्या आहेत. "त्या वेळी माझ्या

मनात तोच भाव प्रबलतम होता." पण या कवितांत पुत्राच्याच नव्हे, तर प्रणयी पुरुषाच्या भावनाही व्यक्त झालेल्या आहेत, हे मी दाखवून दिले. कवितेत दिसणारा कवी चरित्रकाराने केवळ कवीच्या डोळ्यांनी नव्हे, तर स्वतःच्या डोळ्यांनीही बघायचा असतो, अशी माझी भूमिका होती.

४. सूचिपत्रिकांसंबंधी लिहिताना याच प्रकरणात, यापूर्वी, 'निराशेंतील समाधान' नि 'तेथे चल राणी' या दोन कवितांचा उल्लेख झाला आहे. या कविता वास्तव भावनांचे वर्णन करणाऱ्या आहेत, या समजुतीला असणारे कवितावाह्य आधार माझ्या पुस्तकात मी निर्देशिलेले आहेत (पृ० १०२, २००). दोन्ही कवितांत ज्या भावना येतात त्या भावनांशी सुसंगत असे वागणे-बोलणे माधवरावांकडून झाल्याचे त्या कवितांच्या लेखनकालात आगेमागे मी दाखविले आहे. तेव्हा त्या कवितांत वास्तव भावनांचीच पण काव्यरूप अभिव्यक्ती झाली आहे, असे म्हणणे सयुक्तिक होते.

५. सूचिपत्रिकांसंबंधी लिहितानाच, यापूर्वी, माधवरावांच्या लग्नाच्या सुमारास त्यांच्या जीवन-सरणीत जे परिवर्तन झाले त्या परिवर्तनाशी समांतर असणाऱ्या कवितांचा उल्लेख झाला आहे. या कविता संख्येने १९ असून चरित्रग्रंथात पृ० २९१ ते २९५ वर त्यांचा विचार केला आहे. पूर्वी म्हटल्याप्रमाणे या कविता वास्तवदर्शी आहेत असा कवितावाह्य निर्वाळा मला कोणाकडून मिळाला नव्हता आणि परिवर्तनाच्या त्या काळात माधवरावांच्या मनात उठलेले विचार-विकार जिच्यातून प्रत्यक्ष समजू शकतील अशी काव्येतर सामग्रीही मला लाभली नव्हती. अशा स्थितीत निर्वाणीचा मार्ग म्हणूनच या कवितांत वास्तव सत्य हुडकण्यास मी प्रवृत्त झालो. या कवितांचा सर्वच्या सर्व आशय वास्तव आहे, असा माझा शोध नाही. पण त्यांचा मथितार्थ वास्तव आहे, असा माझा निष्कर्ष आहे. या कवितांत ज्या भावना पुनःपुन्हा तीव्रतेने छेडलेल्या आहेत त्या म्हणजे कीर्तिलालसा (किंवा प्रतिष्ठाप्रेम), एकाकीपणा, नि वात्सल्य या होत.—आणि मागच्यापुढच्या काळात याच भावनांनी कवीच्या व्यावहारिक जीवनात आपल्या अस्तित्वाचा प्रत्यय ठळकपणे दिला आहे. शिवाय, या कवितांच्या लेखनानंतर कवी लगोलग विवाहबद्ध होताना दिसतो आणि विवाहात या भावनांचे समाराधन किंवा उपशम होण्याचा स्पष्ट संभव असतो. तेव्हा या कवितांमधील भावना गोळाबेरजेने खऱ्या असाव्यात आणि कवितालेखनाच्या काळात कविमनामध्ये त्यांना खरोखरच भरती आली असावी, असा निष्कर्ष काढणे मला योग्य वाटले.

असण्या-घडण्याचा संग्रह करीत असताना आणि यामधील सत्यासत्य पारखून घेत असताना एकंदर असण्या-घडण्याकडे मी विहंगमदृष्टीने बघत होतो नि त्यामधील परस्परसापेक्षता किंवा त्याचा परस्परसंबंध हुडकून काढीत होतो. सुटे असणे-घडणे जसे चरित्रात प्रतिबिंबित झाले पाहिजे तसेच परस्परनिबद्ध, 'सु-बंध' असणे-घडणे किंवा त्याचा आकृतिबंधही प्रतिबिंबित झाला पाहिजे, अशी माझी भूमिका होती. असण्या-घडण्यातील सर्वांत मूलभूत किंवा प्राथमिक संबंध म्हणजे कालसंबंध होय. कोणतेही असणे-घडणे दुसऱ्या असण्या-घडण्याशी समकालीन असते किंवा त्याच्या मानाने पूर्वकालीन अथवा उत्तरकालीन असते; आणि त्यामुळे हा कालसंबंध उत्पन्न होतो. सर्व जीवनच कालासह विकास पावत असल्याने हा कालसंबंध कोणत्याच असण्या-

घडण्याला टळत नाही. तेव्हा माधवरावांच्या जीवनातील प्रत्येक असणे-घडणे कालदृष्ट्या इतर असण्या-घडण्यात कोठे बसते ते मी बघत गेलो आणि साऱ्या असण्या-घडण्याचा कालसंबंध लावण्याचा प्रयत्न केला. हा संबंध वास्तवता साधणारा तर होताच, पण त्यामुळे असण्या-घडण्याच्या विस्कळीत संभाराला एक ठाम व्यवस्थाही लाभत होती. शिवाय असण्या-घडण्यात कार्यकारणभावासारखे जे संबंध असतात त्यांचा शोध कालसंबंधाच्या आधारामुळे सुलभ होऊ शकतो. तेव्हा कार्यकारणभावाचा वगैरे शोध घेण्यासाठी कालसंबंध पायासारखा उपयोगी पडला.

असण्या-घडण्यामधील कालसंबंध लावताना, 'मुख्य विषयसूची', 'सूचिपत्रिका', 'याद्या' वगैरे पूर्वनिर्दिष्ट साधने मला फार उपयोगी पडली. असण्या-घडण्याचा संग्रह करताना या सर्वांमधील 'विषय'—म्हणजे असण्या-घडण्याचे लहान-लहान घटक—एकमेकांशी जोडले गेले होते आणि त्यामधून स्थिती, घटना, प्रसंग, प्रकरण इत्यादींची चित्रे माझ्या मनात तयार झाली होती. ही चित्रे तयार होताना समकालीन घटक एकत्र येऊन कालसंबंध तेवढ्यापुरता सहजपणे लागला होता. पण आता ह्या चित्रांतील परस्पर-कालसंबंध लावताना या साधनांचा अधिक उपयोग झाला. माझ्याजवळील सूचिपत्रिका नि याद्या कालक्रमानेच लावलेल्या होत्या; पण मुख्य नि पूरक विषयसूची कालखंडशः लावलेल्या असल्या तरी त्या त्या कालखंडाच्या पोटात कालक्रमाने लावलेल्या नव्हत्या. तेव्हा, मी त्या कालक्रमाने लावल्या आणि असण्या-घडण्याच्या चित्रांची परस्पर-कालसंगती शोधली. माझ्या मनासमोर मी जणू एक काल्पनिक कालपट पसरला होता. त्या पटाच्या आडव्या घरांत समकालीन चित्रे मी मांडली आणि उभ्या घरांत अनुकालीन (म्हणजे एकमेकाला पूर्वकालीन किंवा उत्तरकालीन असणारी) चित्रे मांडली. हा कालपट त्या त्या कालखंडापुरता मी मनात तयार करीत असे; कारण माधवरावांच्या सर्व जीवनाला व्यापील असा विस्तृत कालपट माझ्या लहान मनात एका वेळी मावू शकत नव्हता. सूची तयार करताना सर्व जीवनातले असणे-घडणे निरनिराळ्या कालखंडांत आधीच वाटले गेले होते. त्यामुळे एकेका खंडाची अंतर्गत व्यवस्था लावणारे असले कालपट मी जेव्हा एकापुढे एक लावीत गेलो तेव्हा त्यांमधून एक सर्वसमावेशक कालपट आपोआपच तयार झाला!

कालसंगती लावताना कालनिर्णयाचे अनेक प्रश्न साहजिकच उत्पन्न झाले; आणि सत्यासत्य-निर्णयाची माझी जी पद्धती यापूर्वी सांगितली तीप्रमाणे मी ते सोडवीत गेलो. त्याविषयी येथे विशेषत्वाने काही सांगायला पाहिजे असे नाही. पण कालसंगती लावल्यामुळे असण्या-घडण्याचे आधीचे रूप केव्हा केव्हा आश्चर्यकारक रीतीने कसे पालटले, केव्हा केव्हा कालसंगतीमुळेच नवे सत्यदर्शन मला कसे झाले, मी वास्तवाच्या अधिक जवळ कसा गेलो, ते सांगितले पाहिजे. माधवरावांचे मन तारुण्याच्या नव्हाळीत अनेक स्त्रियांकडे आकृष्ट झाले होते, हे खानोलकरांनी पुरेशा स्पष्टपणे सांगितलेले नसले तरी त्यांच्या पुस्तकावरून त्या गोष्टीची चाहूल मला लागलेली होती. पण ज्या १९१४ साली माधवराव शांताबाईंवरील असफल प्रेमाने विलक्षण विद्ध झालेले होते, त्याच १९१४ सालच्या घरात कालपटावर जेव्हा मला लक्ष्मीबाई, मैना, ताई, टी० आर० वगैरे अन्य प्रियकरणींची नावे दिसू लागली तेव्हा मी थक्क झालो. त्या समकालीन असण्या-घडण्याने माधवरावांच्या अगाध स्त्रीप्रेमाचा वेगळाच साक्षात्कार मला घडून आला!

१९२४ ते २६ या कालखंडाबाबत जवळजवळ तसाच प्रकार सांगता येईल. त्या काल-

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३१२६
दि. ३०३३
निषेध

खंडातील सगळे असणे-घडणे एकत्र करून त्याकडे जेव्हा मी साकल्याने वधू लागलो, तेव्हा माधवराव एकीकडे अमळनेरचा विजनवास, वरदेची कार्यमची ताटातूट, सचिकरण-मंडळातील मित्रांचे टीकाप्रहार, डे० ए० सोसायटीतून बाहेर पडण्याचा प्रसंग वगैरे जीवघेणे ताण मनावर वागवीत होते असे आढळले,—आणि दुसरीकडे ते फार्सी-मराठी-कोश, विरहतरंग, सुधारक वगैरे गंभीर नि ललित वाङ्मयही झपाट्याने निर्माण करीत होते असे दिसून आले. त्यामुळे अनेक पातळ्यांवर एकाच वेळी धडपडणाऱ्या त्यांच्या बहुमुखी व्यक्तित्वाचा प्रत्यय मला फार उत्कटपणे आला; आणि रखरखलेल्या तप्त जीवनात वाङ्मयनिर्मितीच्या रूपाने त्यांनी एक शांतिकुंज स्वतः-साठी तयार केला होता, असेही वाटून गेले!

एका प्रसंगी तर एका लेखनाची नि एका प्रसंगाची तारीख एकच पडत असल्याचे माझ्या ध्यानी आले आणि त्या तारखेचे माधवरावांच्या मनःस्थितीचे चित्र मला साफ बदलून घ्यावे लागले! हा प्रसंग म्हणजे माधवरावांचे वडील त्रिंबकराव यांच्या मृत्यूचा प्रसंग. कित्येक वर्षे वेड्यांच्या रुग्णालयात काढल्यावर, तेथेच एकाकी अवस्थेत, २३ जानेवारी १९३७ या दिवशी, त्रिंबकराव मृत्युमुखी पडले. त्यांची 'केस फाइल' चाळताना, मृत्यूच्या वेळच्या नोंदी वधून मी हेलावलो होतो आणि माधवरावही तसेच हेलावले असतील असे गृहीत धरून चाललो होतो. अर्थात् माझ्या कारुण्याच्या भावना माधवरावांना दत्तक देऊन मी तो प्रसंग मनापुढे उभा केला आणि तसाच करुणरसात भिजवून लिहून काढला. पण समकालीन लिखाण वघण्यासाठी जेव्हा मी सूचिपत्रिका नि याद्या चाळल्या तेव्हा २३ जानेवारी १९३७ या दिवशीच माधवरावांनी छंदोरचनेच्या दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना लिहिल्याचे आढळले! नाना प्रकारांनी डोके चालवून त्या दिवसाची हकीगत मी जुळवली, तर वडिलांचा अंत्यसंस्कार आटोपून घरी परतल्यावर माधवरावांनी प्रस्तावना लिहिल्याचा निष्कर्ष निघू लागला! मग वडिलांच्या मृत्यूने माधवराव हेलावले होते का? त्यांची वडिलांविषयी एकंदर वृत्ती कशी होती? —असे मूलगामी प्रश्न उपस्थित झाले. हे प्रश्न सोडवता सोडवता सगळे पारडे फिरले आणि आधी लिहिलेले वडिलांच्या मृत्यूच्या प्रसंगाचे वर्णन फाडून मला ते नव्याने लिहावे लागले! नवे वर्णन करुणरसात भिजलेले नव्हते. उलट, त्या वर्णनात अशी पृष्ठभूमी अध्याहृत होती, की माधवराव वडिलांविषयी कर्तव्यदक्ष होते; पण त्यांच्या कर्तव्यदक्षतेत जिव्हाळा राहिलेला नव्हता. लहानपणापासून वडिलांचे जे अनेक कडवट अनुभव त्यांना आले होते त्या अनुभवांनी त्यांची भावना वटून गेली होती. तेव्हा अलिप्त मनाने त्यांनी वडिलांचा अंत्यसंस्कार उरकला आणि घरी जाऊन शांतपणे 'छंदोरचने'ची प्रस्तावना लिहिली! ही पृष्ठभूमी आधीच्या अनेक घटनांशी नि माधवरावांच्या उद्गारांशी सुसंगत होती, याची खात्री मी अर्थातच करून घेतली होती. पण दोन घटनांची तारीख एकच आल्यामुळे वर्ण्य विषयाचा भावकोशही बदलला, हा अनुभव विसरण्यासारखा नव्हता.

असण्या-घडण्यामधील कालसंगती शोधली की त्यामधील परस्परसापेक्षता एका प्रकाराने स्पष्ट होते; पण परस्परसापेक्षता अधिक घनिष्ट रीतीने स्पष्ट व्हावी म्हणून असण्या-घडण्यामधील कार्यकारणभाव बघावा लागतो. सर्व असण्या-घडण्यामागे कार्यकारणभाव असतोच; पण कोणते असणे-घडणे कोणत्या असण्या-घडण्याशी कार्यकारणभावाने बांधलेले आहे ते चरित्रकाराला शोधावे

लागते. प्रयोगशाळेमधला कार्यकारणभाव नि जीवनामधला कार्यकारणभाव यांचे स्वरूप सारखे असत नाही. प्रयोगशाळेत नियंत्रित नि मर्यादित परिस्थितीमध्ये कार्यकारणभाव दृग्गोचर होतो, तर जीवनात तो अनियंत्रित, अमर्याद परिस्थितीमध्ये वघायला सापडतो. त्यामुळे पहिल्या ठिकाणी तो बहुधा सरळ नि एकेरी असतो, तर दुसऱ्या ठिकाणी तो बहुधा वाकडातिकडा नि अनेकपदरी असतो. यांपैकी जीवनामधल्या कार्यकारणभावाचाच शोध चरित्रात घ्यायचा असल्यामुळे चरित्रकाराला विशेष दक्ष नि विचक्षण झाल्याशिवाय चालत नाही.

पुष्कळदा कार्यकारणभाव नुसता अनेकपदरीच नव्हे तर धूसर नि गूढदेखील असतो. एका घटनेभोवती असण्या-घडण्याचे एवढे प्रचंड जंजाळ वर्तमानकाळात नि भूतकाळात पसरलेले दिसते, की त्यामधील नेमक्या कोणत्या गोष्टींमुळे ती घटना घडली ते सांगता येत नाही. ज्या गोष्टींमुळे ती घटना घडली त्या गोष्टी यदाकदाचित नेमक्या सांगता आल्या तरी ती घटना घडवण्यात त्यांपैकी कोणत्या गोष्टीचा किती वाटा होता, ते ठरवता येत नाही. अशा वेळी विशिष्ट घटनेला जे असणे-घडणे कारण झाल्याचा संभव असेल ते त्या घटनेभोवती मांडून चरित्रकाराला त्यात कार्यकारणभाव अनुस्यूत नि ध्वनित ठेवावा लागतो. असणे-घडणे जेव्हा कालपटावर मांडले जाते नि कालसंगत होते, तेव्हा त्यामधील कार्यकारणभाव हुडकणे सोयीचे असते. कारण वर्तमानकाळातील असण्या-घडण्याची कारणे निकटच्या भूतकाळातच पुष्कळदा सापडतात. पण काही वेळा तसे न होता, त्या कारणांची मुळे दूरच्या भूतकाळालाही जाऊन भिडलेली असतात. अशा परिस्थितीत, काळ रापीत रापीत चरित्रकारालाही तेथपर्यंत पोचावे लागते आणि त्या मुळांचा माग काढावा लागतो.

सरतेशेवटी, चरित्रामधील असणे-घडणे म्हणजे सामाजिक नि मानसिक शास्त्रांच्या कक्षेमधील असणे-घडणे असते. त्यामुळे त्यामध्ये प्रयोगशाळेतील सरळ नि एकेरी कार्यकारणभाव तर बहुधा नसतोच, पण भौतिक शास्त्रांच्या कक्षेतील निश्चित कार्यकारणभावही बहुधा नसतो. त्यामधील कार्यकारणभाव मानवी मनाशी बव्हंशी निगडित असल्यामुळे त्याचे स्वरूप अनिश्चित नि अचपळ असते. तेव्हा तो चिमटीत पकडण्यासाठी ढोबळ नि ठाम नियमांऐवजी चरित्रकाराला 'मनोवैज्ञानिक कल्पकता' (सायकॉलॉजिकल इमॅजिनेशन) या अत्यंत सूक्ष्म नि लवचिक साधनाचा उपयोग करावा लागतो. मनोवैज्ञानिक कल्पकता म्हणजे मानसशास्त्रातील विशिष्ट पंथाला अनुसरणारी कल्पकता नव्हे, किंवा मानसशास्त्रातील शब्दबद्ध नियमांनी व्यवहाराचा स्थूल उलगडा करणारी कल्पकताही नव्हे; तर मानवी मनासंबंधी जे एकूण संपादित ज्ञान आहे त्याच्याशी शक्यतोवर सुसंगत राहून सत्यावर प्रकाश टाकणारी कल्पकता होय. ही कल्पकता चरित्रकाराच्या ज्ञानार्जनावर अवलंबून असणार हे उघड आहे. पण तिचा संबंध, यापूर्वी वर्णिलेल्या सारासारविवेकाप्रमाणे, चरित्रकाराच्या बौद्धिक शक्तींशी नि बाकीच्या व्यक्तित्वाशीही जडलेला असतो. तेव्हा चरित्रकाराचे व्यक्तित्व जेवढे समृद्ध नि खोल तेवढा त्याला चरित्रात दिसणारा कार्यकारणभावही व्यापक, सूक्ष्म नि विश्वसनीय, हे क्रमप्राप्त ठरते.

मला माधवरावांच्या चरित्रात जो कार्यकारणभाव दिसला तो चरित्राच्या निवेदनात मी गुंफून टाकला आहे. पण त्याचे काही नमुने येथे उलगडून दाखविता येतील. आणि त्याच्या साह्याने मी चरित्राला एकरूपता देण्याचा कसा प्रयत्न केला ते स्पष्ट करता येईल.

१. बी० ए० च्या वर्गात गेल्यावर, १९१२ साली, माधवरावांनी मामांचे घर सोडले आणि ते देवांच्या चाळीत राहायला गेले, ही एक साधी घटना आहे. मामांचे घर सोडणे हा या घटनेचा प्रथमार्ध; आणि चाळीत राहायला जाणे हा द्वितीयार्ध. मामांच्या घरातील सनातनी नि कोंदट वातावरण माधवरावांच्या सुधारक नि स्वतंत्र बाण्याला सहन होईना, म्हणून त्यांनी मामांचे घर सोडले, ही या घटनेच्या प्रथमार्धाची उघड मीमांसा.—आणि महाविद्यालयाच्या वसतिगृहातून घरी जेवायला जाण्यात फार वेळ जाऊ लागला, म्हणून ते देवांच्या चाळीत राहायला गेले,—ही या घटनेच्या द्वितीयार्धाची उघड मीमांसा. पूर्वचरित्रकारांनी ही उघड मीमांसा दिलेली आहे. पण घटनेच्या भोवतालचे असणे-घडणे बघताना ही मीमांसा खरी असली तरी पुरी आहे असे मला वाटेना. तेव्हा माधवरावांना जे मातृप्रेम हवे होते ते मामांच्या घरात आईकडून मिळत नव्हते म्हणूनही घराबाहेर त्यांचे पाऊल सुलभतेने पडले असावे, अशी कल्पना प्रथमार्धात मी केली—आणि माधवरावांचे मन शांताबाईंवर आधीच जडलेले असल्यामुळे त्यांच्या मनाने देवांच्या चाळीकडे त्यांची पावले वळविली असावी, अशी कल्पना द्वितीयार्धात मी लढवली. या दोन कल्पनांमुळे, माधवरावांचे व्यक्तित्व नि विचारार्थ घेतलेली घटना यांचे धागे एकमेकांत गुंफले गेलेच; पण मातृप्रेमाला आचवलेले माधवरावांचे सारे बाल्य नि स्त्रीच्या प्रेमाने रोमांचित झालेले त्यांचे सारे नवतारुण्य यांचा सांधाही त्या घटनेशी जोडला गेला.

२. पस्तिसाव्या वर्षी म्हणजे फार उशिरा झालेला विवाह ही माधवरावांच्या जीवनामधली एक महत्त्वाची घटना होती. त्या घटनेचा मागोवा घेताना पूर्वचरित्रकारांना पुसत काही वाटचाल मी केली नि काही वाट स्वतःच्या मनानेही हुडकून काढली. विशेषतः विवाहापूर्वी माधवरावांच्या मनात जे मोठे परिवर्तन झाले होते त्याच्याशी त्यांच्या विवाहाचा अन्वय मी जोडून दिला. या परिवर्तनाचा उल्लेख प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी दोन वेळा झाला आहे आणि या परिवर्तनामुळे ज्या भावना माधवरावांच्या मनात प्रबळ झाल्या होत्या त्यांचाही नामनिर्देश केला गेला आहे. पैकी एकाकीपणा फार जाणवू लागल्यामुळे माधवराव विवाहाकडे वळले असावे, हा तर्क त्यांच्या कवितांवरून खानोलकरांनी केलेला होता. पण त्यांच्या मनात वात्सल्य उचंबळून येत होते, त्यांना सामाजिक प्रतिष्ठा हवी होती, म्हणूनही विवाहाचे विचार त्यांना सुचू लागले असावेत, हा अंदाज मी बांधला. अर्थातच विवाहाची घटना माझ्या अंदाजामुळे त्यांच्या व्यक्तित्वाशी, त्या व्यक्तित्वामधील परिवर्तनाशी, दृढतेने बांधली गेली. व्यक्तित्वामधील 'प्रतिष्ठेची इच्छा' माधवरावांच्या बालपणापासून मी नोंदवीत आलो होतो आणि 'वात्सल्य' त्यांच्या नवयौवनापासून मी टिपून ठेवले होते. त्यामुळे त्या दोन भावनांच्या मार्फत विवाहाची घटना थेट त्यांच्या बालपणापर्यंत किंवा नवयौवनापर्यंत आपोआप जाऊन भिडली. या दोन भावना नि एकाकीपणाची भावना यांचा शोध विवाहपूर्व काळात मी कवितांवरून घेतला होता. त्यामुळे विवाहाची घटना नि काव्य यांचाही एकजीव होऊन गेला. शिवाय, माधवरावांच्या मनात विवाहासंबंधी काही अबोध भय एकविसाव्या वर्षापासून वावरत होते आणि त्या भयामुळे विवाहाच्या कृतीपासून, स्वतःलाही नकळत, ते पुनःपुन्हा माघारी मुरडत होते, हे खास माझेच निरीक्षण होते. त्या निरीक्षणाशीही विवाहाच्या घटनेचा अन्वय मी लावून दाखवला. हा अन्वय किती वेड्यावाकड्या नि छुप्या वाटांनी लागला होता ते माझ्या पुस्तकातील पृ० २९९ व पृ०

३०० वरील मजकुरावरून लक्षात येईल. अर्थात्, अबोध विवाहभय नि विवाहाची प्रत्यक्ष कृती यांचा अन्वय लागल्यामुळे विवाहाचा धागा त्या मार्गाने विवाहभयाच्या उगमापर्यंत, म्हणजे वयाच्या एकविसाव्या वर्षापर्यंत, जाऊन पोहोचला!

३. माधवरावांनी कविवर्य तांब्यांच्या समग्र कवितेचे जे संपादन केले त्याची हकीगत सुटी न स्वीकारता तिची पार्श्वभूमी हुडकण्याचा मी प्रयत्न केला. ती हकीगत मी सुटीच स्वीकारली असती तर माधवरावांच्या अनेक उद्योगांपैकी एका उद्योगाची हकीगत म्हणून चरित्रात ती सहज खपून गेली असती, आणि तिच्या सुटेपणात काही उणेपणा आहे हे कदाचित कोणाला जाणवलेही नसते. पण तिची पार्श्वभूमी हुडकण्याचा जेव्हा मी प्रयत्न केला तेव्हा माधवराव नि तांबे हे व्यक्ती म्हणून नि कवी म्हणून परस्परांना किती चाहत असत, किती जपत असत, ते मला दिसन आले आणि माधवरावांच्या व्यक्तित्वाशी मी नकळत जाऊन भिडलो. मला वाटले, की माधवराव पितृसुखाला आचवले होते, त्यांना पित्यासारख्या वडीलधाऱ्या व्यक्तीच्या मायेची भूक होती नि कौतुकाची मानसिक गरज होती. त्यामुळे नवयौवनात त्यांनी कविवर्य चंद्रशेखरांचा आधार घेतला नि आता प्रौढपणी कविवर्य तांब्यांचे छत्र स्वीकारले. तांब्यांनी त्यांची ही वैयक्तिक गरजच भागवली नाही तर त्यांची वाङ्मयीन गरजही पुरवली. त्यांची स्वतःची कविता जन्मभर अस्वस्थ नि अतृप्त होती. त्यांच्या 'रोमँटिसिझम'ला तृप्तीचे वरदान लाभलेले नव्हते. पण तांब्यांची कविता 'रोमँटिक' असूनही स्वस्थ नि तृप्त होती. प्रसन्न होती. तेव्हा तांब्यांच्या कवितेत त्यांची अपूर्णता त्यांना पूर्ण झाल्यासारखी वाटत असेल, त्यांचे ईप्सित साध्य झाल्याचा त्यांना अनुभव येत असेल. म्हणजे, तांब्यांच्या समग्र कवितेच्या संपादनाची पार्श्वभूमी जेव्हा मी शोधली तेव्हा त्या संपादनाचे माधवरावांच्या व्यक्तित्वाशी आपोआप नाते जडले, नि त्या संपादनाची मुळे त्यांच्या कवितेतच नव्हे तर त्यांच्या जीवनाच्या नवयौवनातही पोचलेली आढळली.

४. माधवरावांनी भाषाशुद्धीची जी जोमदार चळवळ केली तिची पार्श्वभूमीही मी आवर्जून शोधली आहे. त्यामुळे चळवळीच्या वेळचे त्यांचे भाषाशुद्धिविषयक विचार आधीच्या विचारांशी, म्हणजे सातआठ वर्षांपूर्वीच्या व चौदापंधरा वर्षांपूर्वीच्या विचारांशी जोडले गेलेच; पण त्यांचा उद्योग त्यांच्या व्यक्तित्वाच्या एका मूलस्रोताशीही संबद्ध झाला. विचार काहीही असले, तरी त्यांच्यासारखा आत्मनिष्ठ कवी चळवळीच्या धकाधकीच्या मामल्यात का शिरला, कसा शिरला, असा प्रश्न मला पडला होता; नि त्याची उकल करता करता तो मूलस्रोत मला दिसला होता. 'धर्मभावना' हा तो मूलस्रोत होय. भाषाशुद्धी हे आपले "धर्म्य कार्य" आहे, "हे धर्म्य कार्य करण्याची मला यत्किंचित लाज वाटत नाही" असे प्रतिपादन माधवराव जाहीरपणे करीत होते. तेव्हा त्यांच्या त्या प्रतिपादनाचे सूत्र त्यांची जी धर्मभावना मला पुसट पुसट जाणवली होती तिच्याशी मी जोडून बघितले. आणि मौज अशी की अगदी चपखलपणाने ते त्या भावनेशी जोडले गेले. किंबहुना, पूर्वी पुसटपणे जाणवलेली त्यांची धर्मभावना मला आता ठळकपणे दिसू लागली आणि तिचा सलग मागोवा घेण्याचा प्रयत्न मी केला. पूर्वी उल्लेखिलेली (प्र० २, पृ० २६) नि तत्सम साधनसामग्री न मिळाल्यामुळे त्या प्रयत्नात संपूर्ण यश मी मिळवू शकलो नाही; पण तो प्रयत्न अगदी वायाही गेला नाही.

असण्या-घडण्यामधील परस्परसापेक्षता किंवा संगती कार्यकारणभावाच्या आधारे मी कशी शोधली

त्याचे काही नमुने वर दिले आहेत; आणि ते देताना, अमुक असणे-घडणे तमुक प्रकाराने मी उलगडले, या असण्या-घडण्याची कारणे मला त्या असण्या-घडण्यात सापडली, वगैरे तऱ्हेची भाषा वापरली आहे. पण त्या भाषेमुळे काही गैरसमज होण्याचा संभव आहे. दर वेळी मला कार्य आधी कळले नि नंतर शोध घेतल्यामुळे त्यामागचे कारण समजले, असा त्या भाषेचा अर्थ होऊ शकेल. पण पुष्कळ वेळा तसा प्रकार झालेला नाही. असण्या-घडण्याचा सगळा प्रकार मी सारखा डोक्यात वागविण्याचा प्रयत्न करीत होतो आणि त्यावरून संबंध-शोधक दृष्टी फिरवीत होतो. त्यामुळे कुठलेतरी असणे-घडणे कुठल्यातरी असण्या-घडण्याशी कार्यकारणभावाने जोडलेले आहे हे मला जाणवत असे आणि ती असणी-घडणी मी जवळ जवळ आणीत असे. तेव्हा कार्यरूप असणे-घडणे मला आधी ठाऊक असे नि त्याची मीमांसा करताना कारणरूप असणे-घडणे मला नंतर समजत असे, असा क्रम नेहमीच मानणे योग्य होणार नाही. त्याऐवजी, कार्यरूप नि कारणरूप अशी दोन्ही असणी-घडणी मला आधी ठाऊक असत नि त्यांमधला कार्यकारणभाव मला नंतर सापडत असे, असा क्रम सर्वसाधारणपणे मानणे योग्य होईल.

चरित्र मूलतः इतिहास असल्यामुळे चरित्रकाराला वास्तव असण्या-घडण्याचा शोध घेणे प्राप्त होते. ह्या शोधात मग त्याला असण्या-घडण्याचा संग्रह करावा लागतो, त्यातील सत्यासत्य पारखून घ्यावे लागते, नि कालसंबंध, कार्यकारणभाव वगैरेंनी त्याची संगती लावावी लागते. पण चरित्र मूलतः इतिहास असले तरी अद्यापि ते केवळ इतिहासच राहिले आहे का? जगाच्या वाङ्मयात उत्कृष्ट उत्कृष्ट म्हणून जी चरित्रे गाजली आहेत ती इतिहास तर आहेतच, पण शिवाय कलाकृती किंवा साहित्यकृतीही आहेत. चरित्राने आपले इतिहासस्वरूप टिकवून साहित्याचे स्वरूप धारण केल्याला फार काळ लोटला आहे. साहजिकच, केवळ इतिहासकाराप्रमाणे असण्या-घडण्याचा शोध करून चरित्रकाराचे भागत नाही. त्याला साहित्यिकाप्रमाणे, कलाकाराप्रमाणे त्या असण्या-घडण्याकडे पुन्हा बघावे लागते. किंबहुना त्याचा एक डोळा इतिहासकाराचा असला तर दुसरा डोळा कलाकाराचा असतो. मी कलाकाराच्या या दुसऱ्या डोळ्याने असण्या-घडण्याचा शोध कसा घेतला, ते यापुढे बघायचे आहे.

४

□ □ □ □ □ □ □ □ □

शोधाचे स्वरूप : साहित्यप्रधान

कला सौंदर्यस्वरूप असते; आणि साहित्य हा एक कलाप्रकार असल्यामुळे साहित्यही सौंदर्यस्वरूप असते. मग, सत्याची कास धरणारे नि ऐतिहासिक अथवा वास्तव सत्यासाठी पदोपदी हट्टून बसणारे चरित्र साहित्याच्या पदवीला कसे पोचू शकते? त्यात सौंदर्य कोठून भरते? सत्य नि सौंदर्य ही भिन्न तत्त्वे असतील तर ती दोन्ही एकाच वेळी साधणे चरित्राला कसे शक्य आहे? चरित्राने एकीकडे इतिहासाचा अधिकार सांगायचा नि दुसरीकडे साहित्य म्हणून मिरवायचे, यात दुटप्पीपणा नाही काय? सत्याची कास सोडून चरित्र जर सौंदर्याच्या मागे लागले तर त्याचे चरित्रपणच हरवणार नाही काय?—सत्य, सौंदर्य, नि चरित्र यांच्या मूलस्वरूपाला भिडणारे हे प्रश्न सच्च्या चरित्रकाराला केव्हातरी हटकून सामोरे येतात आणि त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे स्वतःशीच दिल्याशिवाय त्याला आपला मार्ग पुढे काटता येत नाही. माधवरावांचे चरित्र हाती घेण्यापूर्वी मलाही हे प्रश्न पडले होते आणि त्यांची समाधानकारक उत्तरे स्वतःपुरती शोधलेली असल्यामुळेच त्या चरित्राचे संशोधन निःशंकपणे चालवणे मला शक्य झाले होते.

माझ्या उत्तरांचा निष्कर्ष असा होता, की "ब्यूटी इज ट्रूथ, ट्रूथ ब्यूटी..." असे कीट्सने म्हटले असले तरी सौंदर्य म्हणजे सत्य नव्हे नि सत्य म्हणजे सौंदर्य नव्हे. ती भिन्न तत्त्वे आहेत, त्या स्वतंत्र संकल्पना आहेत; आणि त्यांचा एकंकार करण्यापेक्षा त्यांचे परस्परसंबंध तपासल्याने चरित्रवाङ्मयाचे पाऊल पुढे पडण्याची शक्यता आहे. सत्य नि सौंदर्य यांना स्वतंत्र अस्तित्व असले, तरी जे सत्य आहे ते सुंदर नसतेच असे नाही, आणि जे सुंदर आहे ते सत्य नसतेच असेही नाही. सत्य नि सौंदर्य यांच्या कक्षा एकच नसल्या तरी त्या एकमेकींना छेदू शकतात आणि दोन्ही कक्षांनी समव्यात असा प्रदेश असू शकतो. जे सत्य आहे ते सुंदर असू शकते आणि जे सुंदर आहे ते सत्य असू शकते. सत्याचा अर्थ 'वास्तव' किंवा 'ऐतिहासिक' किंवा 'घटित' सत्य असा मर्यादित घेतला तरी सत्य सुंदर असणे नि सौंदर्य सत्य असणे अगदी शक्य आहे. उकिरडा सत्य असला तरी सुंदर नसतो नि कल्पवृक्ष सुंदर असला तरी सत्य नसतो, हे खरे; पण ताजमहाल किंवा तारांकित आकाश यांसारख्या गोष्टी सत्यही असतात नि सुंदरही असतात. तेव्हा चरित्र सत्याशी शपथबद्ध असले, ऐतिहासिक वास्तवातूनच आकार घेत असले तरी त्याला सौंदर्याचा लाभ व्हायला प्रत्यवाय नाही.

सर्व सत्य सुंदर नसले तरी काही सत्य सुंदर असते, आणि त्या सत्याच्या प्रदेशात चरित्राचा वावर घडतो. एका मनुष्याचे वास्तव जीवन हा तो प्रदेश होय. सत्याचा हा प्रदेश सुंदर आहे किंवा नाही, ते ललित वाङ्मयाकडे दृष्टी टाकली की सहज स्पष्ट होते. माणसे, त्यांच्या

उक्ती नि कृती, त्यांचे मन, त्यांचे जीवन हा ललित वाङ्मयाचा प्रदेश आहे. कथा नि कादंबऱ्या यांचा संसार तर खास याच प्रदेशात चालू असतो. हा प्रदेश व्यापणारे ललित वाङ्मय सुंदर असते याविषयी कोणाला शंका येत नाही. हा प्रदेश जसाच्या तसा कथाकादंबऱ्यांत रेखाटला जात नाही, हे खरे. तेथे वास्तवात कल्पित मिसळले जाते, हेही खरे. पण हा प्रदेश मुळात रमणीय आहे, सुंदर आहे, म्हणूनच कथा-कादंबऱ्या सुंदर होऊ शकतात, हे खरे नाही का? माणसांना सोडून कथा-कादंबऱ्या जर पशुपक्ष्यांकडे वळल्या, त्याहीपेक्षा दगडा-धोंड्यांच्या भौतिक सृष्टीकडे वळल्या, तर त्यांच्यातील सौंदर्य उणावणार नाही का? कदाचित नष्टच होणार नाही का? कथा-कादंबऱ्या माणसाच्या जीवनातील किंवा मनातील खोल सत्याला जेव्हा हात घालतात तेव्हा त्यांचे सौंदर्य वाढल्याचा प्रत्यय रसिकांना येतो ना? कल्पनारंजन सोडून कथाकादंबऱ्या जसजसे वास्तवाचे रोकडे दर्शन घडवू लागतात तसतशा त्या प्रगत होतात, असे समीक्षक मानतात ना? तेव्हा कथा-कादंबऱ्या त्यांच्यातील कल्पितामुळे काही प्रमाणात सुंदर वाटत असल्या तरी सत्याच्या ज्या प्रदेशात त्यांचा संचार घडतो तो प्रदेशच मुळात सुंदर असल्यामुळे त्यांचे सौंदर्य मुख्यतः खुलते, असे म्हटले पाहिजे. हा प्रदेश नि चरित्राने व्यापलेला प्रदेश यांत खूपच समानता आहे. माणसे, माणसांच्या उक्ती नि कृती, त्यांचे मन, त्यांचे जीवन हाच चरित्राचाही प्रदेश आहे. फरक एवढाच की एकाच व्यक्तीच्या जीवनापुरता चरित्रात तो प्रदेश मर्यादित झालेला असतो. 'गुड अर्थ'सारखी चरित्ररूप कादंबरी घेतली किंवा 'स्वामी'सारखी चरित्रात्मक कादंबरी घेतली तर कादंबरी नि चरित्र यांत तेवढाही फरक उरत नाही. तेव्हा ललितवाङ्मय (विशेषतः कादंबरी) नि चरित्र यांना आधारभूत होणारे सत्य समान असल्यामुळे, चरित्र ज्या सत्याला हात घालते ते सत्य सुंदर असते, हे ओघानेच येते. हे सुंदर सत्य चरित्राने जर नीट हाताळले तर चरित्रही सुंदर झाले पाहिजे आणि सौंदर्याच्या बळावर साहित्याच्या पदवीला पोचले पाहिजे.

चरित्रातील सत्य मुळातच सुंदर असते, हे युक्तिवादाने मी स्वतःशीच सिद्ध करू बघत होतो; पण जे सिद्ध करायचे त्याविषयी मनोमन माझी खात्री आधीच पटलेली होती. वयाच्या नवव्या-दहाव्या वर्षी गॅरिबाल्डी, प्रिन्स बिस्मार्क, मॅझिनी वगैरेंची चरित्रे मी वाचलेली होती आणि ती वाचताना त्यांत तल्लीन झालो होतो. पुढे वि० ल० भाव्यांचे किंवा एमिल लुडविगचे नेपोलियन वाचताना, किंवा खरेशास्त्र्यांचे नाना फडणवीस अथवा पांगारकरबुवांचे मोरोपंत वाचताना मी स्वतःला विसरलो होतो.—आणि लिटन स्ट्रॅचीची 'क्वीन व्हिक्टोरिया' किंवा 'एमिनंट व्हिक्टोरियन्स' यांच्या सहवासात मी अमाप आनंद लुटला होता. अनेक उत्तमोत्तम चरित्र-कृतींमधील सत्याचा अनुभव घेताना मला जो मनःप्रसाद लाभला होता तो उत्तमोत्तम ललित कृतींमुळे मला मिळालेल्या मनःप्रसादाशी अत्यंत मिळताजुळता होता. तेव्हा चरित्रातील सत्याच्या सौंदर्याविषयी मी जो युक्तिवाद स्वतःशी करीत होतो त्या युक्तिवादाला, आधीच अंतरंगात पटलेली खूण बावदूक बुद्धीला पुन्हा पटविण्यापलीकडे, फारसा अर्थ नव्हता.

चरित्रात मानवी जीवनाचे जे दर्शन घडते ते मुख्यतः एकाच व्यक्तीच्या जीवनामधून घडते. हे व्यक्तिजीवन सर्वसाधारणपणे तीन अंगांनी बनलेले आढळते. पैकी पहिले अंग म्हणजे त्या व्यक्तीचे व्यक्तित्व (कॅरेक्टर), दुसरे अंग म्हणजे त्या व्यक्तीचा जीवनक्रम (करिअर), आणि

तिसरे अंग म्हणजे व्यक्तित्व नि जीवनक्रम यांना संदर्भ देणारी परिस्थिती (एनव्हायरॉनमेंट). या तीन अंगांपैकी कोणतेही अंग चरित्रात टाळता येणार नाही, हे मला स्पष्ट दिसत होते. कारण ही तीन अंगे एकमेकांत गुंतलेली तर आहेतच; पण त्या तिन्हींचे एकत्रीकरण झाले तरच त्याला चरित्र म्हणावे असाही संकेत आहे. (व्यक्तिचित्र या वाङ्मयप्रकारात जीवनक्रम नि परिस्थिती ही अंगे जवळजवळ लुप्तप्राय झालेली असतात.) शिवाय, ही तीन अंगे मिळूनच जर मानवी जीवन बनलेले असते, तर मानवी जीवनाचे दर्शन घडवू बघणारे चरित्र त्यांपैकी एखादे अंग कसे टाळू शकेल? पण तीनही अंगे मला अपरिहार्य वाटत असली तरी त्यांपैकी महत्त्वाचे अंग कोणते, यासंबंधी माझ्या मनात काही निर्णय झालेला होता. निरनिराळ्या दृष्टींनी निरनिराळी अंगे महत्त्वाची वाटतील, हे मला समजत होते. पण चरित्राला साहित्यात स्थान आहे, असे मी मानीत होतो; नि साहित्याच्या किंवा कलेच्या दृष्टीने मी विचार करीत होतो. त्यामुळे परिस्थिती-पेक्षा जीवनक्रम नि जीवनक्रमापेक्षा व्यक्तित्व महत्त्वाचे होय, असा माझा निर्णय होता. इतिहासा-तून मानवी जीवनाचे दर्शन घडते नि साहित्यातूनही घडते. पण इतिहासाचा अंतर्भाव सहसा कलेत होत नाही नि साहित्याचा हमखास होतो, असे का? याची अनेक कारणे असू शकतील; पण माझ्या मते एक कारण असे आहे, की इतिहास परिस्थितीवर नि जीवनक्रमावर विशेष भर देतो, तर साहित्य व्यक्तित्वावर विशेष भर देते, त्यामुळे त्यांच्या कलामूल्यांत फरक पडतो. एकंदर मानवी जीवनच रमणीय असल्यामुळे त्या जीवनाची अंगे म्हणून वावरणारी परिस्थिती नि जीवनक्रम हीही रमणीय असतात. पण त्यांना व्यक्तित्वाची सर येत नाही. व्यक्तित्व एवढे रमणीय असते की ते जरी कोणत्याही वाङ्मयात सजीव होऊन स्पंदन पावले तरी त्या वाङ्मयाला ते साहित्य करून सोडते. साहित्य किंवा कला ज्या सौंदर्याचा शोध घेत असतात ते सौंदर्य जेवढे व्यक्तित्वात असते तेवढे बहुधा दुसऱ्या कशातच नसते. मी जर व्यक्तित्वाला महत्त्व दिले नसते तर माझ्या चरित्रपुस्तकाचे कलामूल्य उणावले तर असतेच, पण कदाचित ते कलात्मक, साहित्यरूप चरित्र म्हणून उरलेच नसते. ते बहुधा ऐतिहासिक चरित्र झाले असते.—आणि माझी प्रवृत्ती तर प्रबलपणे कलेकडे धावणारी होती. तेव्हा व्यक्तित्वाला महत्त्व देऊन व्यक्तित्वाभोवती चरित्राची गुंफण करायची असा विचार मनात बाळगूनच मी माधवरावांच्या चरित्राकडे वळलो.

व्यक्तित्वाच्या सजीव दर्शनावर आपल्या चरित्राची कलात्मकता प्राधान्याने अवलंबून आहे, ही जाण असल्यामुळे, माधवरावांच्या व्यक्तित्वाचा मी शक्य तेवढ्या कसोशीने शोध घेतला. जीवनातील असण्या-घडण्यात व्यक्तित्वही येऊन जाते; पण असण्या-घडण्याच्या साधारण शोधात जे व्यक्तित्व सहजी हाती लागेल त्यावर मी समाधान मानले नाही. साधनसामग्री अभ्यासताना माझी संवेदना-क्षमता अगदी जागी ठेवून, व्यक्तित्वाचे जे जे अंग जाणवेल ते ते टिपून, त्याचा मागोवा सर्व साधनसामग्रीत मी घेतला आणि त्या अंगाचे बलाबल किती आहे, त्याचे स्वरूप कसे आहे, त्याचा इतर अंगांशी संबंध कोणता आहे, ते धुंडून काढले. हे करीत असता, पूर्वचरित्रकारांचे निष्कर्ष अनेक ठिकाणी अधोरेखित झाले; पण अनेक ठिकाणी ते खोडले गेले, बदलले किंवा त्यांत भरही पडली. अशा वेळी जे घडले ते उघड्या, स्वागतशील मनाने मी घडू दिले आणि त्यातून समग्र व्यक्तित्वाचे जे संकलित चित्र तयार झाले ते स्वीकारले. व्यक्तित्वाच्या शोधात दर वेळी घटकांकडून पूर्णाकडे मी जात होतो असे नाही. मधूनमधून, ज्याला प्रातिभ ज्ञान म्हणतात,

स्फूर्ती म्हणतात, तिची स्फुरणे मी अनुभवीत होतो. वीज लकाकली की रात्रीच्या वेळी सगळे भूमंडळ क्षणार्ध प्रकाशून जावे तसे होत होते, आणि पूर्ण आधी बघून मग त्याचे घटक शोधण्याचा अत्यंत आनंदाचा प्रसंगही मी अनुभवीत होतो. जाण किंवा स्फुरणे नेहमीच खरी असतात असे नाही; म्हणून साधनसामग्रीतील पुराव्याशी मी ती पडताळून बघत होतो आणि केव्हा ती टाकून देत होतो तर केव्हा उचलून धरीत होतो. शोधाची ही सारी प्रक्रिया कधी माझ्या जाग्रत मनात तर कधी सुप्त मनात पण अखंड चालू होती. या प्रक्रियेमुळे माधवराव माझ्या कल्पनेपुढे जेव्हा साकार नि सजीव झाले, पूर्ण नि स्थिर झाले, मला अंतर्बाह्य जाणता येऊ लागले, तेव्हाच मी त्यांना मनातून उचलले नि कागदावर जसेच्या तसे ठेवले. माधवरावांच्या व्यक्तित्वाचे एकेक अंग टिपून ते मी मागेपुढे कसे शोधले त्याचे काही नमुने पुढीलप्रमाणे :

१. माधवरावांनी सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्यासाठी चारचौघांसारखे लग्न केले नि आपल्या रोमँटिक ऊर्मी दडपून टाकल्या, हे चरित्रलेखनाचा संकल्प सोडण्यापूर्वीच पूर्वचरित्रकारांच्या लिहिण्यावरून माझ्या ध्यानी आले होते. त्यांनी ज्या अर्थी रूढ लग्नाचा मार्ग पत्करला त्या अर्थी त्यांची रोमँटिक वृत्ती 'कम-अस्सल' होती, असे एक गृहस्थ मला म्हणाले होते. पण मला वाटले, की सामाजिक प्रतिष्ठेची भावना जर त्यांच्यात मूळची असेल तर त्या भावनेपायी त्यांनी आपल्या रोमँटिकपणाला विवेकपूर्वक लगाम घातला, असे म्हणता येणार नाही काय? त्यामुळे संशोधनाला प्रारंभ होताच त्यांच्या त्या भावनेचा मी छडा लावू लागलो; आणि असा छडा लावता लावता त्यांची ती एक स्थायी, बलवत्तर भावना होती, अशा निष्कर्षाला मी येऊन पोचलो. विद्यार्थिदशेतच 'नॉट अँबिशन बट लो एम ईज क्राइम' असे सूचक, मुळापेक्षा बदललेले, वचन त्यांनी अभ्यासाच्या जागी लावलेले होते; 'आय एम ॲट रिस्पेक्टॅबिलिटी' अशा अर्थाचे उद्‌गार काढले होते; आणि स्वतःला मित्रांनी 'माधव'ऐवजी 'माधवराव' म्हणावे, अशी इच्छा प्रकट केली होती. (पृ० ७९, ८०, ८१). फर्ग्युसनमध्ये नोकरी लागल्यावर "आता माझी ऐट काय विचारावी?" यासारखे जे परिहासपर उद्‌गार त्यांनी काढले होते त्यांत प्रतिष्ठाप्राप्तीचा तृप्त हुंकार नक्कीच होता. (पृ० १०९). सामाजिक अप्रतिष्ठा त्यांच्या मनाला फार लागत असे, हे त्यांच्या बडोद्याच्या नि वरदा-प्रकरणापूर्वीच्या पुण्याच्या पत्रांवरून स्पष्ट होते. (पृ० ६३, १९७). त्यांच्या मनामधले 'प्रीती की कीर्ती' हे द्वंद्व लग्नापूर्वी कवितांत कसे प्रतिबिंबित झाले होते, ते मागच्याच प्रकरणात उल्लेखिलेले आहे. (प्र०३, पृ० ४०, ४७, ५१). उत्तर आयुष्यात त्यांना मानसन्मान मिळाले नि त्यांचे अस्वास्थ्य संपले, 'वेताळ' गेला, ही गोष्ट बोलकी होती. शिवाय, आपली कविता परिष्कृत करून त्यांनी तिचे सुव्यवस्थित संग्रह प्रकाशित केले, ही घटनाही ते शाश्वत प्रतिष्ठेला कसे जपत होते, त्याची निदर्शक मानता येईल. (पृ० ३३५). या प्रकारे सामाजिक प्रतिष्ठेच्या त्यांच्या भावनेचा छडा लागत गेला आणि त्या भावनेला त्यांच्या व्यक्तित्वाच्या उभारणीत मी ठळक स्थान देऊन टाकले.

२. त्यांच्या मनात लग्नाविषयी एक प्रकारचे अबोध भय घर करून बसलेले होते. हे लग्नभय मला फार गमतीदार पद्धतीने अचानक समजले. शांताबाईंनी लग्नाला नि पर्यायाने प्रेमालाही नकार दिल्यापासून, तेराचौदा वर्षे, ते लग्नासाठी मुली बघत होते, हे त्यांच्या रामभाऊ मराठ्यांकडे गेलेल्या पत्रांवरून मला दिसले; आणि मुली बघण्याच्या त्यांच्या प्रदीर्घ कार्यक्रमाचा मी

मागोवा घेत गेलो. मुली नाकारताना दर वेळी ते काही ना काही कारणे देत होते आणि ती कारणे वर वर तरी युक्तिसंगत (प्लॉझिबल) वाटत असल्यामुळे मी ती जशीच्या तशी स्वीकारीत होतो. "बी० ए० होईपर्यंत लग्नाचा विचार न करणे हेच उत्तम" असे बी० ए० होण्यापूर्वी त्यांनी लिहिले नि ते मला पटले. पुढे एम० ए० होऊन ते नोकरीला लागले नि एक जवळ-जवळ पसंत पडलेली मुलगी नाकारताना म्हणाले, की "लग्न कर्ज काढल्याशिवाय [आणि] स्वतःच्या पैशावर करावयाचे, स्वतःची आर्थिक परिस्थिती मजबूत झाल्याशिवाय करावयाचे नाही."—आणि त्यांचे ते म्हणणे मला रास्त वाटले. एक मुलगी "शिक्षणाऽभाव" म्हणून त्यांनी नाकारली, एका विधवेचे स्थळ "केवळ आत्याबाईंचे मन न मोडण्यासाठी" त्यांनी बाजूला टाकले, आणि तीनचार मुली जादा चोखंदळपणा करून दूर सारल्या. पण त्यात मला फारसे वाकडे काही दिसले नाही. पुढे शाहूराव कानिटकरांकडे त्यांचे पैसे बुडाले नि विधवेचे एक पसंत स्थळ त्यांनी "द्रव्याची अडचण" पुढे करून नको म्हटले, तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते. त्याच वेळी दुसऱ्या एका रूपसुंदर मुलीवर त्यांचे मन गेलेले असल्यामुळे त्यांचे ते नको म्हणणे मला स्वाभाविकही वाटले. अशा रीतीने त्यांची कारणे मी खरी धरली आणि त्यांच्या लग्नाची लांबड पहिल्या आठ प्रकरणांत लिहून ती प्रकरणे पुरी केली. तोवर त्यांच्या मनातल्या अबोध लग्नभयाचा मला संशयदेखील आलेला नव्हता. पण ती प्रकरणे बघितल्यावर प्रा० श्री० पु० भागवतांनी आपली त्रोटक अवलोकने मला लिहून कळवली नि त्यांत एक अवलोकन पुढीलप्रमाणे नोंदवले : "शांताबाईंच्या अनुभवाचे पर्यवसान : माधवराव इनहिबिटेड झाले? थंड झाले?..." या अवलोकनातील 'इनहिबिटेड' हा शब्द मी वाचला आणि माझ्या डोक्यातली ट्यूब लक लक करीत पेटली! तिच्या प्रकाशात मला 'लग्नभय' दिसले.

'इनहिबिशन' म्हणजे माणसाच्या वर्तनात उत्पन्न झालेला मानसिक अडसर. हा अबोध मनातही उत्पन्न होतो आणि मनुष्य स्वतःला नकळत वेडावाकडा वागतो. आपल्या वागण्याची वरवर पटतीलशी स्पष्टीकरणे तो स्वतःला देतो नि दुसऱ्यांनाही देतो; पण ती स्पष्टीकरणे तत्त्वतः खरी नसतात. माधवरावांनी तेराचौदा वर्षे मुली बघण्याचा जो घोळ घातला त्यामागे असले काही 'इनहिबिशन' तर नसेल? मी विचार करू लागलो आणि 'इनहिबिशन'च मला संभाव्य, नव्हे साक्षात दिसू लागले! मुली नाकारण्याची माधवरावांनी दिलेली जी कारणे पूर्वी मी स्वीकारली होती ती आता मला बुजबी, अपुरी, नि पोकळ वाटू लागली. ती सर्व कारणे उपस्थित असली तरी तेवढ्याने माधवरावांसारखा स्त्रीविवश नि कृतिपरायण पुरुष तेराचौदा वर्षे अविवाहित राहील, हे पटेनासे झाले. ते आपले निवडीचे स्वातंत्र्य कायम ठेवू बघत होते, अधिक चांगली मुलगी मिळेल या आशेमागे धावत होते, वगैरे कारणेही उपलब्ध पुराव्याच्या संदर्भात टिकत नाहीत, असे दिसून आले. दर वेळी ते नवे कारण पुढे करीत, पण दर वेळी लग्न बिनचूक टाळीत; दर वेळी लग्नाला ते उत्सुकतेने सामोरे जात, पण दर वेळी आतून काही कळ दाबल्या-प्रमाणे माघारे मुरडत, हे स्पष्ट झाले.—आणि 'इनहिबिशन' गृहीत धरल्याशिवाय निर्वाह होत नाही, म्हणून 'इनहिबिशन'चा मी स्वीकार केला.

'इनहिबिशन' प्रस्थापित झाल्यावर लग्नाची ती मुळात लिहिलेली लांबड मी साहजिकच बाद केली आणि 'इनहिबिशन'च्या प्रकाशात ती पुन्हा लिहून काढली. मात्र, तत्पूर्वी 'इनहिबिशन'

कशामुळे उत्पन्न झाले ते शोधणे आवश्यक होते. येथे मी माझी मानसशास्त्रीय कल्पकता (सायकॉलॉजिकल इमॅजिनेशन) जागी केली आणि 'इनहिबिशन'चे जन्मस्थान नक्की केले. शांताबाईंनी माधवरावांना भरपूर खेळवून त्यांच्या मनातली लग्नकल्पना जोपासली नव्हती का? मग त्यांनी लग्नाची मागणी केल्यावर नकाराचा लगुडप्रहार निष्ठुरपणे त्यांच्या मनावर केला नव्हता का? त्या प्रहाराने ते विलक्षण कळवळले नव्हते का? तेव्हा त्याच वेळी, लग्नाची धास्ती त्यांनी नकळत घेतली, 'इनहिबिशन' निर्माण झाले, हे मानसशास्त्रीय कल्पनेच्या आधारावर मी ठरवून टाकले.

३. माधवरावांना येणारे मानसिक झटके किंवा त्यांचा 'वेताळ' पूर्वचरित्रकारांनी वर्णिलेला होता, पण त्याचा माग कोणी काढला नव्हता. तो मी काढीत बसलो नि माधवरावांच्या मनात खूप खोलवर पोचलो. हा वेताळ मुख्यतः लीलाबाईंनी वर्णिलेला होता; तेव्हा तो लग्नानंतरच सुरू झाला का? की तत्पूर्वीही तो माधवरावांच्या मानगुटीला बसत होता?—असा प्रश्न माग काढताना माझ्या मनात होता. माग काढता काढता, घाट्यांच्या 'दिवस असे होते'मधील पृ० १४३-वर माझे लक्ष गेले आणि बडोद्याच्या विद्यार्थिदशेतही माधवरावांना मानसिक झटके येत आणि ते मित्रांच्या भरल्या बैठकीतून अकस्मात ताड्ताड निघून जात हा शोध लागला. वेताळ असा सतरा-अठरा वर्षे मागे नेता आल्याने मी खरोखरच उत्तेजित झालो आणि सतरा-अठरा वर्षांची मधली दरी भरता येते का, ती मागेपुढे पसरलेली आढळते का, ते बघू लागलो. मग वेताळ टप्प्याटप्प्यावर सलग हाती लागला. राजाभाऊ कर्व्यांनी त्याचे प्रारंभकाळातले वर्णन करून ठेवले होते; खुद्द माधवरावांनी वेताळाच्या वेळची आपली मनःस्थिती रामभाऊ मराठ्यांना सूक्ष्मपणे एका पत्रात कळवली होती; शांताबाईंनी केलेल्या हृदयभंगाच्या वेळी, नि १९२० साली ते पुण्यात नवे नि एकटे होते तेव्हा, त्याची लक्षणे दिसली होती; वरदा-प्रकरणात चोहींकडून काहूर उठले तेव्हाही त्याचा उद्भव झाला होता; आणि लग्नानंतर तो अनेकदा जागा होई हे तर लीलाबाईच बोलून गेल्या होत्या. माधवरावांना हे मानसिक झटके का यावे? तो त्यांच्या अत्यंत उत्कट वृत्तीचा सामान्य स्फोट होता की विकृती? मला त्या झटक्यांचे वेळोवेळचे स्वरूप बघून ती विकृती वाटली. मग या विकृतीची मुळे त्यांच्या वडिलांच्या वेडसरपणात आहेत का, ते मी हुडकू लागलो.

४. माधवरावांच्या व्यक्तित्वाच्या जशा मोठ्या तशा छोट्या 'कळा'ही मी तपासून बघत होतो. छोट्या कळांपैकी काही पुढीलप्रमाणे :

(अ) शांताबाईंच्या प्रेमप्रकरणात भलतीकडे भरकटून, तीन वेळा पदवीपरीक्षेत गोते खाल्ल्यानंतर, आपल्या मनाला निग्रहपूर्वक ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न माधवराव करीत होते. त्या वेळी ठरल्याप्रमाणे अभ्यास झाला नाही, वर्तन घडले नाही, की एका वेताच्या छडीने ते स्वतःलाच मारीत असत. खानोलकरांनी दिलेली ही माहिती मला असाधारण (युनिक) वाटली आणि आत्मदंड करून घेण्याची प्रवृत्ती माधवरावांत कायम होती की काय, ते मी तपासू लागलो. तपासात ती कायम असल्याचे आढळले! लीलाबाईंचा अभ्यास घेताना एकदा पतिपत्नींची काही बोलाचाली झाली, त्यांच्या तोंडून नको ते शब्द गेले, लीलाबाईंनी ते त्यांच्या पदरात घातले, आणि त्या वेळी "चुकलो" असे ओरडून त्यांनी फाड फाड आपल्या श्रीमुखात मारून घेतल्या!

पुढे माडखोलकरांशी वाद घालता घालता एकदा त्यांचा तोल गेला, माडखोलकरांकडून खोटे बोलण्याचा आरोप त्यांना ऐकून घ्यावा लागला, आणि नागपूरला, नीडहॅम पार्कजवळ, त्यांनी स्वतःला असाच कडक देहदंड ठोठावला!

(ब) शांताबाई ह्या त्यांच्या प्रेयसी, त्यांच्याहून वयाने मोठ्या; पण त्यांना इंटरमीजिएटची त्रिकोणमिती शिकवताना माधवराव रागावत नि कडक पंतोजीसारखे वागत. ही हकीगत खानोलकरांच्या पुस्तकात मी वाचली नि मला तीही असाधारण वाटली. त्यांच्यातला कडक पंतोजी मी मग सलग शोधू लागलो नि मला तो सलग सापडला. पुण्याला त्यांचा धाकटा भाऊ विनायक त्यांच्यापाशी काही दिवस राहत होता. त्या वेळी त्यांनी रामभाऊ मराठ्यांना लिहिले, "चि० विनूशी...मला कठोर केव्हा केव्हा व्हावे लागते....त्याला कोणत्याही तऱ्हेचे वळण...नाही. ते थोडेसे तरी लावावे म्हणून त्याच्या हितार्थ कठोरपणाचा अवलंब करावा लागत आहे." ते विनूला संध्याकाळी खेळायला मोकळा सोडीत, पण बाकी वेळ त्याला अभ्यासात किंवा कामात सक्त गुंतवीत. तो नीट वागला नाही तर भडकत! लीलाबाईंना लग्नानंतर ते शेक्सपियरचे 'सिंबेलाइन' शिकवीत असत. त्या वेळी, एकदा लीलाबाईंनी शब्दकोशातून शब्द काढून आणले नव्हते. तर ते इतके रागावले की रागाच्या भरात त्यांनी लीलाबाईंचा चक्क कान पिरगाळला! दोन्ही मुले त्यांची फार लाडकी होती; पण शिस्तीच्या वेळी ते त्यांची गय करीत नसत. सुधाला आईच्या अंगावरून तोडायची होती, तेव्हा ते विचारपूर्वक पण कठोरपणे कसे वागले, त्याचे वर्णन घाट्यांनी करून ठेवले आहे.

(क) त्यांना परीक्षेचे फार भय वाटे. मनःस्थिती ठीक नसल्यामुळे त्यांची बी० ए० ची परीक्षा तीन वेळा हुकली आणि चौथ्यांदा ते परीक्षेला गेले ते फाशीच्या फळीकडे जाणाऱ्या अपराध्यासारखे गेले! त्या वेळचे त्यांनीच केलेले स्वतःचे वर्णन वाचून मी हेरले की हा बुद्धिमान मनुष्य परीक्षेला कच्चा आहे आणि ते कच्चेपण मी रापीत गेलो. रापणीत असे लक्षात आले, की एम० ए०च्या वेळीही ते खचले होते आणि एकांतात ढसाढसा रडले होते. पुढे, परीक्षेचे प्रसंगच संपले; पण शेवटीशेवटी डी० लिट० पदवीसाठी त्यांनी प्रबंध सादर केला आणि त्याच्या निर्णयाला जेव्हा उशीर झाला तेव्हा त्यांच्या जिवाची कोण घालमेल झाली! आशा-निराशेवर हिंदकळणाऱ्या त्या वेळच्या त्यांच्या मनःस्थितीची अनेक प्रतिबिंबे त्यांनी लीलाबाईंना लिहिलेल्या पत्रांत उमटली होती.

व्यक्तित्वाची छोटी-मोठी अंगे निवडून त्यांचा छडा मागच्यापुढच्या काळात लावताना, त्यांच्यातील बदल किंवा चढउतार मी लक्षपूर्वक बघत होतो. व्यक्तित्व ही वस्तू प्रवाही नि विकसनक्षम असल्यामुळे तसे करणे आवश्यकच होते. या उद्योगात, 'वेताळ' केव्हा चढला नि केव्हा उतरला, ते मी नोंदवले होते. त्यांचे स्त्रीप्रेम शांताबाईच्या संबंधात कसे विषयमिश्रित होते, वरदेच्या संबंधात कसे निर्विषय होते नि लीलाबाईंच्या संबंधात प्रारंभी प्रारंभी तरी सौजन्यावरच कसे तगले होते, ते मी न्याहाळले होते. त्यांची सामाजिक प्रतिष्ठेची आकांक्षा वयाबरोबर कशी वाढत गेली, त्याचा आलेख मी काढला होता. शांताबाईंवरील प्रेमाबाबत उत्तरकाळात त्यांचा भ्रमनिरास झाला होता, हे माझ्या लक्षात आले होते. काव्य, भाषा, छंद वगैरेंसंबंधी त्यांच्या विचारांत जी परिवर्तने झाली होती ती माझ्या दृष्टीतून निसटली नव्हती. ते केव्हा समाजाभिमुख

होऊन लोकांत मिसळत नि केव्हा आत्मनिष्ठ बनून स्वतःच्या कवचात जाऊन बसत, ते मी बघितले होते. त्यांच्या वात्सल्याची गंगा गंगोत्रीपासून सागरसंगमापर्यंत वाढता वाढता मी पाहिली होती. त्यांच्या वक्तृत्वाचा प्रारंभीचा बेंगरूळ ढंग नि नंतरचा ठाशीव, रेखीव डौल मी पाहिला होता. त्यांच्या अंतरंगातील बदल तर मी टिपीत होतोच, पण त्यांच्या बहिरंगातील बदलही मी दृष्टीआड करीत नव्हतो. म्हणूनच, बालपणापासून अखेरच्या आजारापर्यंत त्यांच्या रूपांची, पोशाखांची, हावभावांची मिळतील तेवढी शब्दचित्रे नि छायाचित्रे मी जमवली होती.

एकेका अंगाकडे लक्ष देताना सर्व अंगांच्या परस्परसंबंधांकडेही मी लक्ष पुरवीत होतो. असण्या-घडण्यामधले परस्परसंबंध मी कसे शोधले त्याचे सोदाहरण वर्णन मागच्या प्रकरणात केले आहे. व्यक्तित्व असण्या-घडण्याच्या पलीकडे नसल्यामुळे त्या वर्णनात व्यक्तित्वाच्या विविध अंगांच्या परस्परसंबंधाला काही स्पर्श झाला आहे. पण व्यक्तित्वाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन येथे त्या संबंधावर थोडा अधिक प्रकाश टाकला पाहिजे. सगळ्या अंगांची ग्रंथात बांधली गेलेली मोळी म्हणजे व्यक्तित्व नव्हे. त्या अंगांच्या परस्परसापेक्ष सहनिवासाला, मिश्रणाला, नि रसायनाला व्यक्तित्व म्हणतात. तेव्हा त्या दृष्टीने अंगांचा परस्परसंबंध मी शोधीत होतो. एखाद्या मोठ्या घराण्यातील गुंतागुंतीची नातीगोती जशी स्पष्ट व्हावी तशी या अंगांतील नातीगोती मग मला स्पष्ट झाली. माधवरावांच्या सर्वच भावना एकंदरीने तीव्र नि आत्मनिष्ठ होत्या; पण त्या भावनांत रोमँटिक स्त्रीप्रेम नि सामाजिक प्रतिष्ठेची आकांक्षा या भावनांना माझ्या दृष्टीने सर्वोच्च महत्त्व होते. त्यांतही त्यांचे रोमँटिक स्त्रीप्रेम त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेच्या आकांक्षेपेक्षा अधिक बलवान नि दुर्दम्य होते. परिस्थितीच्या संदर्भामुळेच पूर्वकाळात पहिली भावना तर उत्तरकाळात दुसरी भावना प्रबळ दिसली. ते जन्मभर एका आध्यात्मिक अंधुक प्रकाश-शिखराकडे प्रवास करीत होते आणि नीतिमय आचरण किंवा सौजन्य हे त्या प्रवासातले त्यांचे पाथेय होते. पण सामान्य स्वार्थ, आत्मप्रस्थापना (सेल्फ-ॲसर्शन) वगैरेंचा लोप त्यांनी पुरतेपणी केला होता असे नाही. त्यामुळे बालपणी देवापुढचे पैसे पळवणारा हा प्रकाशयात्री मोठेपणीही एखादे पाऊल वाकड्या वाटेला टाकी; त्यांचे रोमँटिक स्त्रीप्रेम त्यांचा संसार विसकटू बघत होते; पण त्यांच्या सौजन्याने, नैतिक आग्रहाने त्यांचा संसार शेवटी वाचवला. त्यांना जशी स्त्रीच्या प्रेमाची ओढ होती तशीच आईच्या वात्सल्याची भूक होती. विशिष्ट परिस्थितीत या दोन भावना एकमेकांत मिसळल्या नि शांताबाईंचे एकीकडे ते प्रियकर झाले नि दुसरीकडे पुत्रही झाले! वरदा नि लीलाबाई यांच्याकडून मातेच्या प्रेमाची मागणी त्यांनी केली होती! त्यांच्या काव्यनिर्मितीमागे त्यांची निर्माणक्षम प्रतिभा तर होतीच, पण त्यांच्या साऱ्या उत्कट भावना नि विशेषतः त्यांचे मुलखावेगळे उत्कट स्त्रीप्रेमही होते. त्यांच्या विद्याव्यासंगामागेही केवळ ज्ञानोपासना नव्हती; तिच्या जोडीला आत्मप्रस्थापनाही होती. त्यांनी डे० ए० सोसायटीमधील वादात स्त्रीपुरुषांच्या स्नेहस्वातंत्र्याची तत्त्वनिष्ठ भूमिका घेऊन तिच्यासाठी आपल्या लौकिक जीवनाचा बळी दिला. पण त्या भूमिकेमागे तत्त्वनिष्ठेप्रमाणे स्त्रीप्रेमाची प्रेरणाही असली पाहिजे. याप्रमाणे, व्यक्तित्वाच्या विविध अंगांचा परस्परसापेक्ष शोध जेव्हा मी पुरा केला तेव्हाच एकूण व्यक्तित्वाचा शोध पुरा झाला असा विश्वास मला वाटू लागला.

व्यक्तित्वाचा हा शोध म्हणजे वाचकांच्या साहित्यानंदाची पायाभरणी होय, अशी माझी

समजूत होती. या शोधामुळे माधवरावांच्या व्यक्तित्वाचे दर्शन घडवणे मला शक्य होणार होते आणि व्यक्तिदर्शनाचा म्हणून जो साधारण आनंद असतो तो वाचकांना अनुभवता येणार होता. हा साधारण आनंद साहित्यानंदात किती उच्च कोटीला पोचलेला असतो त्याचा निर्देश यापूर्वी मी केलेला आहे. पण ह्या साधारण आनंदात, माझ्या शोधाच्या विशिष्ट स्वरूपामुळे, काही विशेष लहरी उमटाव्या अशीही माझी अपेक्षा होती. मी व्यक्तित्वाचे नुसते स्थिर स्वरूप शोधले नव्हते, तर त्यामधील परिवर्तनेही ग्रथितली होती. अर्थात, व्यक्तित्वाची एखादी नवी छटा वाचकांना मधूनमधून दिसावी, टप्प्याटप्प्याला नवे माधवराव त्यांना भेटावे, नि नावीन्याचा चटका त्यांना बसावा, अशी माझी अटकळ होती. व्यक्तित्वाच्या अंगांचा परस्परसंबंध शोधून संकलित व्यक्तित्व जाणण्याचा प्रयत्न मी केला होता. तेव्हा एकात्मतेचा आनंदही वाचकांना चाखता येईल, हे मी गृहीत धरले होते. शिवाय, व्यक्तित्वाच्या एकेका अंगाचा पाठपुरावा करून एकेक अंग चरित्रभर पुनःपुन्हा दृग्गोचर व्हावे, अशी योजना मी केली नव्हती का? तीमुळे मला वाटे, की 'सगळ्या चरित्रात एक संमिश्र, समृद्ध लय सतत झंकारत राहील! लय म्हणजे नावीन्यात लपेटलेली आवर्तने. एकेक अंग पुनःपुन्हा दृग्गोचर झाल्याने आवर्तने साधतील आणि त्या अंगाचा बदलत्या परिस्थितीत वेगवेगळा आविष्कार झाल्याने नावीन्य निर्माण होईल. अनेक अंगांच्या अनेक लयी असतील नि त्या एकाच व्यक्तित्वाशी सुसंवादी असल्यामुळे त्या सर्वांची मिळून एक संमिश्र, समृद्ध लय बनेल! वास्तव जीवनात अशी लय असतेच; कारण ते जीवनही एकाच व्यक्तित्वाचे स्फुरण असते. पण वास्तव जीवनात ती लय बघण्याची संधी नसते; तिचे ठोके कालदृष्ट्या फार अंतराअंतराने पडल्यामुळे ती जाणणे सोपेही नसते. उलट, चरित्रात जीवनाचा जणू अर्क काढला जातो, लयीचे ठोके जवळ जवळ येतात, लय स्वतः जाणून ती नाजुकपणे वाचकाला जाणवून देण्याची चरित्रकाराला संधी असते; त्यामुळे ती दाणेदार बनते नि वाचकाशी लडिवाळ क्रीडा करू लागते. चरित्रात सत्याचे सौंदर्याशी जे जागोजाग मिलन घडते त्या मिलनाची एक भरवशाची जागा म्हणजे ही लय होय. या लयीची बौद्धिक जाण आपण सर्वच वाचकांमध्ये उत्पन्न करू असे नाही. पण चरित्रात ही संमिश्र, समृद्ध लय जर सारखी झंकारत राहिली तर वाचकांच्या नकळतही वाचकांना ती सुखवून जाईल!'

कोणतीही कलाकृती एकजीव किंवा एकात्म असली पाहिजे. एकात्मता हा कलाकृतीचा प्राथमिक नि अपरिहार्य गुणधर्म आहे. पण चरित्रात व्यक्तित्व, जीवनक्रम, नि परिस्थिती ही तीन अंगे एकत्र येत असल्यामुळे एकात्मता साधणे सोपे नसते. 'अमुक तमुक नि त्यांचा काळ' अशा नावाची चरित्रे, किंवा राजकीय चरित्रे, किंवा ऐतिहासिक चरित्रे पाहिली तर चरित्र पुष्कळदा एकात्मतेला कसे पारखे होते त्याची हवी तेवढी उदाहरणे मिळू शकतील. अशा उदाहरणांत, अनेकदा व्यक्तित्व लुप्तप्राय असते आणि जीवनक्रमाचा नि परिस्थितीचा तपशील असा अस्ताव्यस्त पसरलेला असतो की चरित्र म्हणजे शुद्ध अडगळ-घर वाटावे! तर अनेकदा व्यक्तित्व प्रारंभी हरवलेले असते आणि शेवटी शेवटी 'घरगुती', 'व्यक्तिदर्शन' वगैरे प्रकरणे घालून ते अशा रीतीने पुढे आणलेले असते की चरित्र म्हणजे कशाचा कशास मेळ नसलेली भेळ वाटावी! तेव्हा व्यक्तित्व, जीवनक्रम नि परिस्थिती या तीनही बाजू सांभाळून चरित्र एकात्म कसे करायचे, हा प्रश्न कलादृष्टीच्या चरित्रकाराला सोडवावाच लागतो. हा प्रश्न

सोडवण्यासाठी एकात्मतेच्या दृष्टीने प्रथम चरित्राच्या तीनही अंगांची पाहणी मी केली होती आणि त्या पाहणीतून एकात्मतेचा मार्ग शोधला होता.

पाहणीत मला असे आढळले होते, की व्यक्तित्व ही वस्तू स्वभावतः एकात्म असते. व्यक्तित्वाचा आधार जी व्यक्ती तीच मुळात एक असल्यामुळे ही एकात्मता उत्पन्न होते. व्यक्तीच्या सहजप्रवृत्ती, अभिवृत्ती, भावना, भावावस्था, प्रतिभा-प्रज्ञा-आदिक शक्ती, सवयी, लकबी वगैरे गोष्टी विश्लेषण करून आपण वेगवेगळ्या काढतो, पण मुळात त्या एक असतात. त्यांच्या परस्पर-मिलनातून एकजीव व्यक्तित्व तयार झालेले असते. व्यक्तित्वाचे घटक म्हणूनच त्यांना स्थान असते. किंबहुना, आधी व्यक्ती असते आणि ती उमलू लागली की तिच्या विविध आविष्कारांना अमुक प्रवृत्ती, तमुक सवय वगैरे नावे आपण देतो. भंगलेले व्यक्तित्व (स्प्लिट पर्सनॅलिटी) वगैरे पारिभाषिक शब्द मानसशास्त्रात वापरले जातात, पण त्या भंगलेल्या व्यक्तित्वाच्या वरवरच्या भंगलेपणामागे एकात्मताच अस्तित्वात असते. नाहीतर भंगलेल्या व्यक्तींना बरे करून अभंग बनवण्याचा प्रयत्न मनोवैद्यांना करताच आला नसता. भंगलेल्या व्यक्तित्वाची जर ही स्थिती तर आंतरिक संघर्ष असलेले व्यक्तित्व, बहुमिती व्यक्तित्व, जटिल व्यक्तित्व वगैरे व्यक्तित्वप्रकारांतही वरचा देखावा दूर केल्यास तळाशी एकात्मता असते, हे वेगळे सांगायला नको. विविध आविष्कारांमुळे किंवा नानाविध पैलूंमुळे व्यक्तित्वाची एकात्मता जशी ढळत नाही, तशीच ती विकसनामुळेही ढळत नाही. बाल्यामधला बाभरेपणा, तारुण्यामधली धडाडी, किंवा वार्धक्यामधली क्षीणता वगैरे बदल वेगवेगळे दिसले तरी मुळात एकातून दुसरा नि दुसऱ्यातून तिसरा उगवलेला असतो. झाडाला पाने, फुले, मुळे वगैरे अंगे असली किंवा वाढीमुळे इवल्याशा रोपाचा मोठा वृक्ष झालेला असला तरी झाड जसे एकच असते तसा व्यक्तित्वाचा प्रकार असतो.

मला व्यक्तित्व जसे स्वभावतः एकात्म आढळले तसा जीवनक्रम आढळला नाही. चरित्रनायकाच्या लहानपणातली गृहस्थिती, त्याचे शिक्षण, त्याने केलेल्या नोकऱ्या, त्यांची स्थलांतरे, त्याचे सामाजिक किंवा राजकीय उद्योग, त्याचा संसार, त्याच्या जीवनात उद्भवलेली प्रकरणे, त्याच्यावर ओढवलेले सुखदुःखाचे प्रसंग वगैरे असंख्य गोष्टींच्या समुच्चयाला जीवनक्रम हे नाव मिळते. पण हा समुच्चय म्हणजे एकच एकरस वस्तू नसते. या समुच्चयातील निरनिराळ्या गोष्टी चरित्रनायकाच्या जीवनात घडतात किंवा असतात म्हणूनच केवळ एकत्र येतात. चरित्रनायक हाच त्यांच्यामध्ये समान घटक असतो. चरित्रनायकाच्या एकात्म व्यक्तित्वाशी निगडित झाल्यामुळे त्या गोष्टीही एकात्म वाटू शकतात. पण त्याव्यतिरिक्त त्यांच्यामध्ये साक्षात परस्परसंबंध फारसा असत नाही. खेड्यातली शाळा, शहरातले महाविद्यालय, एक इथली नोकरी, एक तिथली नोकरी, कधी कुणाशी संघर्ष, कधी कसली तोहमत, केव्हा एखाद्या चळवळीत सहभाग, केव्हा एखादा सार्वजनिक सन्मान वगैरे गोष्टी शेवटी सुट्या नि त्रुटितच असतात. क्वचित एका गोष्टीचा लागाबांधा दुसऱ्या गोष्टीशी जुळतो; पण एकंदरीने तसला योग दुर्मिळच. कादंबरीच्या बंदिस्त कथानकाशी जीवनक्रमाची तुलना केली, की जीवनक्रमाचा तुटकपणा मनावर चांगला बिंबतो. बंदिस्त कथानकात आधी पेरलेली बीजे पुढे उगवतात, घटनांचे खटके जमतात, नि जे काही घडते त्याला एक दिशा असते. पण जीवनक्रमाची घडण अशी योजनापूर्वक झालेली नसते. जीवनक्रम म्हणजे घट्ट विणीचे वस्त्र किंवा एकजीव वस्तू असण्यापेक्षा अनेकविध वस्तूंची जणू एक रास असते.

'जीवनक्रमा'चे एवढे वर्णन केल्यावर 'परिस्थिती'संबंधी मला काय आढळले त्याचे वेगळे वर्णन करण्याची आवश्कता नाही. जीवनक्रमाला कायमची दिशा नसली तरी त्या त्या वेळी तात्पुरती दिशा असते आणि वेळोवेळी त्यातील घटनांना काही क्रमही असतो. पण परिस्थितीत कुठलाच सलगपणा असत नाही. बाह्य जगाला व्यक्तिजीवन जिथे जिथे स्पर्श करते त्या त्या स्पर्शस्थानांना आपण परिस्थिती म्हणतो. तेव्हा ती तुटक असावी, एकात्म नसावी, हे क्रमप्राप्त ठरते. जीवनक्रम एकपट तुटक असला तर परिस्थिती दसपट तुटक असते, असे म्हणावे लागेल.

व्यक्तित्व, जीवनक्रम, नि परिस्थिती या तीन अंगांपैकी फक्त व्यक्तित्वच एकात्म आढळल्यामुळे चरित्राच्या एकात्मतेसाठी मी व्यक्तित्वाकडेच वळलो. व्यक्तित्वात जी कलात्मक रमणीयता आहे तीमुळे व्यक्तित्वावर भर देऊन चरित्रलेखन करायचे असा निर्णय मी एकीकडे घेतला होता. त्याच वेळी, चरित्राच्या एकात्मतेसाठीही व्यक्तित्वावरच भर द्यायचा, तोच कणा किंवा केंद्रबिंदू कल्पून चरित्राची घडण करायची, असा निर्णय दुसरीकडे मला घ्यावा लागला. व्यक्तित्वाला प्रामुख्य दिल्यावर त्याच्याशी जीवनक्रमाची नि परिस्थितीची सांगड कशी घालायची, हा एकात्मतेच्या दृष्टीने पुढचा प्रश्न होता. त्याच्या उत्तरासाठी व्यक्तित्वाशी जीवनक्रमाचे नि परिस्थितीचे संबंध कोणत्या प्रकारचे असतात ते मला बघावे लागले. माझ्या दृष्टीने हे संबंध तीन प्रकारांनी जडलेले असतात : एक म्हणजे, व्यक्तित्वाचा आविष्कार निर्वात पोकळीत होऊ शकत नाही, त्याला काही संदर्भ लागतो, नि तो संदर्भ जीवनक्रमाच्या किंवा परिस्थितीच्या रूपाने त्याला मिळतो. दुसरे म्हणजे, व्यक्तित्वामुळे जीवनक्रमावर किंवा परिस्थितीवर काही परिणाम होतो, त्यांना वळण लागते, दिशा मिळते. आणि तिसरे म्हणजे, उलट प्रकार होतो : जीवनक्रमामुळे किंवा परिस्थितीमुळे व्यक्तित्वावर परिणाम होतो, त्याला आकार मिळतो, त्याचे घटक कमी-अधिक सौम्य किंवा तीव्र बनतात. यांपैकी पहिला संदर्भ-संबंध हा जवळजवळ सार्वत्रिक असतो, आणि दुसरा नि तिसरा परिणाम-संबंध हा मधूनमधून उद्भवतो. अनेक शिथिल चरित्रांच्या निरीक्षणावरून मला असे जाणवले होते, की हा त्रिविध संबंध लक्षात न घेता जीवनक्रम नि परिस्थिती यांची व्यक्तित्वनिरपेक्ष माहिती चरित्रकार चरित्रात हवी तशी भरतात नि त्यामुळे चरित्र एकात्मता गमावून बसते. तेव्हा एकात्मतेच्या दृष्टीने माझ्यापुढे असलेल्या प्रश्नाला मी असे उत्तर दिले, की या त्रिविध संबंधाची स्पष्टता होईल इतपतच जीवनक्रम नि परिस्थिती यांना चरित्रात वाव द्यायचा नि स्पष्टता झाली रे झाली की त्यांना कात्री लावायची. असे केल्यास त्यांचा व्यक्तित्वाशी बेमालूम सांधा जोडला जाईल. नव्हे, एकमेकावर क्रियाप्रतिक्रिया करणाऱ्या किंवा एकमेकाला उठाव देणाऱ्या घटकांचे स्वरूप व्यक्तित्व, जीवनक्रम, नि परिस्थिती या तिघांनाही येईल नि त्यांच्या संयोगातून चरित्र नावाची एकात्म वस्तू उभी राहील.—या उत्तराप्रमाणे मी जीवनक्रम नि परिस्थिती यांना प्रत्यक्षात कात्री कशी लावली नि त्यांच्यातील प्रस्तुत भागाची निवड कशी केली, त्याची उदाहरणे येथेच द्यावयास हवी. पण लेखनाच्या ओघात 'चरित्रातील निवड' या विषयापाशी आपण येऊन ठेपलो आहोत. तेव्हा तो विषय पुरा करून त्याची उदाहरणे देता देता त्यांत ही उदाहरणे समाविष्ट करणे सोयीचे होईल.

चरित्र ज्या सत्याचा शोध घेते ते मानवसंबद्ध सत्य सामान्यतः सुंदर असते, हे स्पष्ट झाल्यामुळे माझ्या कलात्मक प्रेरणेला मोठा आधार मिळालेला होता. पण तेवढ्याच आधाराने त्या प्रेरणेची

परिपूर्ण गुजराण होत नव्हती. त्यासाठी चरित्राचे आणखी एक वैशिष्ट्य मला जाणवून घ्यावे लागले. ते वैशिष्ट्य म्हणजे चरित्रात अपरिहार्य नि आवश्यक असलेली सत्याची निवड. चरित्राची निष्ठा वास्तव सत्याला वाहिलेली असते, यात शंका नाही. पण सर्वच्या सर्व वास्तव सत्य सांगण्याचा पतकर चरित्र केव्हाही घेत नाही. सत्यातही निवड करून चरित्र फक्त निवडक सत्यच वाचकांपुढे ठेवते. 'खरे सांगेन, खोटे सांगणार नाही' असे चरित्रकार आपल्या प्रतिज्ञेत म्हणतो; पण 'सर्वच्या सर्व खरे सांगेन' असे शब्द तो कधीच उच्चारीत नाही. चरित्राला सत्याची ही जी निवड करावी लागते त्याला मुख्यतः दोन कारणे दिसतात : एक म्हणजे, सर्वच्या सर्व सत्य सांगणे हे चरित्रकाराला व्यवहारतः अशक्य असते. चरित्रनायकाच्या जीवनात जेवढे म्हणून असणे-घडणे समाविष्ट झाले असेल ते सर्वच्या सर्व चरित्रात नोंदवायचे तर ग्रंथविस्तार आकटोविकटो होऊन ग्रंथ कोणी वाचणार नाही. या असण्या-घडण्यातील जेवढे असणे-घडणे साधन-सामग्रीत प्रतिबिंबित झाले असेल तेवढेच चरित्रकाराला दिसते. ते मर्यादित असणे-घडणेच तो नोंदवू शकेल हे गृहीत धरले तरीही ग्रंथविस्तार बहुतेक प्रसंगी आहाराबाहेर जाईल. तेव्हा असण्या-घडण्याची निवड करून निवडक सत्याची नोंद घेण्याचा मार्गच व्यवहारासाठी स्वीकारावा लागतो. दुसरे असे, की चरित्र या वाङ्मयप्रकारातच निवड गृहीत धरलेली आहे. निवड नसेल तर तो साधन-संग्रह होईल, चरित्र होणार नाही. या वाङ्मयप्रकाराचे पुढे जे पोटप्रकार पाडले जातात त्यांमध्येही निवड अध्याहृत असते. राजकीय चरित्र, घरगुती चरित्र, वाङ्मयीन चरित्र वगैरे नावे त्या त्या पोटप्रकारात सत्य कोणत्या दृष्टीने निवडले जाते, ते दर्शवितात. पोटप्रकार दृष्टीआड केले तरी सर्व प्रकारांना साधारण अशी निवडीची दृष्टी असतेच. तीमध्ये, चरित्रनायकाच्या जीवनातील 'सत्त्वांश' नि 'पृथगात्मता' ज्यामुळे 'सुसंगत' प्रकट होईल अशा सत्याची निवड गृहीत धरली जाते. सत्त्वांश नि पृथगात्मता म्हणजे काय, किंवा सुसंगती कशास म्हणावे, त्याच्या वस्तुनिष्ठ व्याख्या केलेल्या नसतात आणि तत्संबंधी ज्या स्थूल संकल्पना असतात त्यांच्या आधारावर सर्व व्यवहार चालतो. अर्थात्, स्थूल संकल्पनांचा तपशील ज्या त्या चरित्रकारावर सोपविला जातो; आणि चरित्रकाराला तेथे जे स्वातंत्र्य मिळते त्यातच कलेचा उदय होतो. चरित्रकार जर कलावंत असेल तर मुळातले जे मानवसंबद्ध स्वभावसुंदर सत्य त्यातील सत्त्वांश नि पृथगात्मता तो आपल्या कलादृष्टीने निवडतो. निवडीच्या या प्रक्रियेत, निवडलेल्या भागांची मूळ रचना साहजिकच लोपते नि तिच्या जागी नवी रचना करणे प्राप्त होते. ही नवी रचना मुळातील रचनेचे—तीमधील संगतीचे नि एकात्मतेचे—प्रतिनिधित्व करणारी किंवा वास्तवदर्शी असली पाहिजे. पण प्रतिनिधित्व किंवा वास्तवदर्शित्व म्हणजे काय तेही वस्तुनिष्ठ नियमांनी ठरलेले नसल्यामुळे त्या नव्या रचनेतदेखील चरित्रकाराच्या कलादृष्टीचा प्रभाव पडतो. म्हणजे, चरित्र ही एका अर्थी वास्तवदर्शी पुनर्निर्मिती असली तरी दुसऱ्या अर्थी ती कलात्मक नवनिर्मितीही होते! या निर्मितीत माझ्या कलात्मक प्रेरणेची गुजराण झाली नसती तरच आश्चर्य.

चरित्रलेखनाला प्रारंभ करण्यापूर्वी लगतच्या काळात, नि लेखन चालू असताना, निवडीची प्रक्रिया माझ्या मनात चालू होती. विश्लेषणाच्या नि तुलनेच्या तर्कशास्त्रीय पद्धतीने मला सत्त्वांश नि पृथगात्मता यांची निवड कदाचित करता आली असती नि तीमधील संगतीही कदाचित

शोधता आली असती. पण मला ती पद्धती फार यांत्रिक नि बोजड वाटली. तेव्हा त्या पद्धतीऐवजी माझ्या (नि सर्वच कलाप्रवण लेखकांच्या) स्वभावधर्माशी सुसंगत अशी एक वेगळी, सुलभ पद्धती मी स्वीकारली. सर्व साधनसामग्रीचा सांगोपांग अभ्यास केल्यावर माधवरावांच्या जीवनाचा—म्हणजे त्यांच्या व्यक्तित्वाचा, जीवनक्रमाचा नि संबद्ध परिस्थितीचा—काही संकलित ठसा माझ्या मनावर उमटला होता. तो ठसा जसाच्या तसा वाचकांच्या मनावर उमटविण्याविषयी मी उत्सुक होतो. तेव्हा त्या धोरणाने मी प्रयत्नाला लागलो आणि त्या प्रयत्नात जी निवड करावी लागली तीच मी प्रमाण मानली. साधनसामग्रीचा माझा सर्व अभ्यास मी जर वाचकांसमोर मांडला असता तर माझ्या मनावरचा ठसा त्यांच्या मनावर बहुधा उमटला नसता. त्याऐवजी, अभ्यासाच्या विस्तीर्ण जंजाळात ते गोंधळले असते, 'मिसिंग द वुड फॉर द ट्रीज' अशी त्यांची स्थिती झाली असती, आणि 'अंश'रूपे बघता बघता 'पूर्ण'रूप त्यांना दिसलेच नसते. शिवाय साधनसामग्रीच्या प्रत्येक तपशिलाबाबत त्यांच्या प्रतिक्रिया माझ्यासारख्याच झाल्या असत्या असे नाही, माझे चिंतन त्यांनीही केले असते असे नाही, नि त्यामुळे यदाकदाचित समग्र माधवराव त्यांना दिसले असते तरी ते माझ्या मनातील माधवरावांपेक्षा फार फार वेगळे झाले असते. तेव्हा सापडलेल्या सत्याची निवडक मांडणी करूनच माझ्या मनातील ठसा त्यांच्या मनावर उमटवणे भाग होते. माझ्या मनातील ठसा जेव्हा मी प्रमाण मानला तेव्हा तो ठसा सत्त्वमय नि पृथगात्म सत्यानेच बनलेला आहे, त्यात मुळामधल्या एकात्मतेचे प्रतिबिंब उमटलेले आहे, हे मी गृहीत धरलेले होते—आणि त्यात काही गैरही नव्हते. कारण कोणत्याही गोष्टीचा प्रदीर्घ अभ्यास केल्यावर, तीवर चिंतन केल्यावर, तिचा जो स्थायी संस्कार आपल्या मनावर राहतो तो कळत-नकळत केलेल्या सत्त्वमय नि पृथगात्म अंशांच्या निवडीनेच तयार झालेला असतो आणि त्यात मुळामधली घटकसंगतीही संक्रांत झालेली असते.

पूर्वी, चरित्र 'संपूर्ण' नि 'सजीव' व्हावे ही दृष्टी स्वीकारून मी जेव्हा साधनसामग्रीची टिपणे काढली तेव्हा त्या टिपणांत माझी कलादृष्टी आपोआप प्रतिबिंबित झाली होती. (पाहा, प्र० २, पृ० २२ ते २५). आता माधवरावांच्या जीवनाचा जो ठसा माझ्या मनात तयार झाला त्याबाबतही तसाच प्रकार घडलेला होता. हा ठसा एकीकडे सत्त्वमय नि पृथगात्म अंशांनी तयार होत असता, दुसरीकडे माझ्या कलादृष्टीनेही त्याची घडण होत होती. आज त्या ठशाचे विश्लेषण करताना मला असे जाणवत आहे, की माझ्या कलादृष्टीमुळेच त्यात खळबळलेल्या, किंवा ताण-लेल्या, किंवा मुलायम भावनांना सहज वाव मिळाला; बाह्य किंवा आंतरिक संघर्षांचे त्यात स्वागत झाले; नाट्याला स्थान त्यात लाभले; सर्व प्रकारची गती त्यात सुलभपणे मिसळली; व्यक्ती नि घटनाप्रसंग यांची चित्रमय किंवा गोचर अंगे त्यात आपोआप उमटली; आणि असण्या-घडण्याला ज्या सुंदर आकृती स्वाभाविकपणे आलेल्या असतात त्या त्यात सुखाने टिपल्या गेल्या. किंबहुना असेही म्हणता येईल, की सत्त्वमय काय नि पृथगात्म काय ते ठरतानाही इतर विचाराबरोबर माझी कलादृष्टी कार्यप्रवण होती. तत्त्वतः, जे सत्त्वमय किंवा पृथगात्म असेल ते सुंदर असेलच असे नाही. पण एकंदर मानवी जीवन मला मुळात सुंदर वाटत होते आणि विशेष आकर्षक वाटलेल्या एका विशिष्ट व्यक्तिजीवनाची चरित्रासाठी मी निवड केलेली होती. त्यामुळे मनावरील ठशाच्या घडणीत सत्त्वमय किंवा पृथगात्म यांचा सुंदराशी संघर्ष होण्याचा प्रसंग उद्भवला नाही.

'चरित्रातील निवड' या विषयापाशी मी दोन मार्गांनी येऊन पोचलो होतो. 'व्यक्तित्वा'शी बेमालूम मिलाफ व्हावा म्हणून 'जीवनक्रमा'त नि 'परिस्थिती'त निवड करावी लागते, हे माझ्या ध्यानी आले होते; आणि चरित्रात मुळच्या सत्याचा सत्त्वांश नि पृथगात्मता सुसंगतपणे प्रकट व्हावी, म्हणूनही मुळचे सत्य निवडावे लागते, हे माझ्या लक्षात भरले होते. वास्तविक पाहता हे दोन मार्ग अगदी भिन्न नाहीत. सत्त्वांश नि पृथगात्मता सुसंगत प्रकट होण्यासाठी जी निवडानिवड होते तिच्या पोटात व्यक्तित्वाशी बेमालूम मिलाफ व्हावा म्हणून जीवनक्रमाची नि व्यक्तित्वाची जी निवडानिवड करावी लागते ती आपोआप समाविष्ट होते. म्हणजे दुसऱ्या मार्गाने गेले की पहिल्या मार्गाच्या गंतव्य स्थानी आपोआप पोचता येते. पण असे असले तरी निवडीच्या विषयाकडे मी दोन मार्गांनी पोचत होतो, हे खरे आहे. आतापर्यंत निवडीचे सर्वसाधारण धोरण नि स्वरूप मी स्पष्ट केले आहे. पण माझ्यापुढील सामग्रीतून मी काय वेत होतो नि विशेषतः काय बाजूला टाकीत होतो, किंवा कशाला संक्षेप देत होतो, ते अधिक स्पष्ट व्हावे म्हणून निवडीचे काही नमुने सांगणे आवश्यक आहे. ते नमुने पुढीलप्रमाणे :

१. माधवराव तारुण्याच्या ऐन उंबरठ्यावर उभे होते तेव्हाच, १९१४ साली, युरोपात पहिले महायुद्ध पेटले आणि त्याच्या झळा हिंदुस्थानालाही लागल्या. महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरच माधवरावांचे काही महाविद्यालयीन शिक्षण पार पडले. पण महायुद्धाचा कोणताही परिणाम माधवरावांच्या जीवनावर झालेला मला आढळला नाही. तेव्हा चार वर्षे चाललेल्या त्या महायुद्धाला दूरस्थ नि अप्रस्तुत परिस्थिती म्हणून मी पूर्णतः दृष्टीआड ठेवले. महायुद्ध कुठेतरी चालू होते याची नुसती जाण असावी म्हणून त्याचा ओझरता उल्लेख फक्त दोन ठिकाणी मी केला. (पृ० ७१, ७३) आणि तोही अशा रीतीने केला की तो आनुषंगिक वाटावा. माधवरावांचे इंग्रज सत्तेविषयीचे विचार नि त्यांच्या वक्तृत्वाचा विकास यांच्या वर्णनाच्या ओघात हा उल्लेख आला आहे. जी गोष्ट महायुद्धाची तीच म० गांधींच्या अनेक चळवळींची. माधवराव फर्ग्युसनमध्ये काम करायला लागल्यानंतर या चळवळी सुरू झाल्या आणि त्यांनी वर्षानुवर्ष देशाचे नि महाराष्ट्राचे जीवन ढवळून काढले. परिस्थितीच्या नावाखाली या चळवळींचे थोडेफार वर्णन मला चरित्रात घालता आले असते. पण या चळवळींशी माधवरावांचा कोणताही संबंध आलेला नव्हता; म्हणून त्यांच्या वर्णनाकडे मी वळलोच नाही. मात्र म० गांधींच्या उदात्त आध्यात्मिक जीवनाने माधवराव काही काळ प्रभावित झालेले होते. त्यामुळे त्याचा तेवढा उल्लेख मी आवर्जून केला. (पृ० ११६). पुढे माधवराव भाषाशुद्धीच्या प्रचारात हिरिरीने पडले आणि काही कवितांतून किंवा पत्रांतून आपला हिंदुत्वाभिमान त्यांनी प्रकट केला. या आधारावर तत्कालीन हिंदुत्वनिष्ठ विचारप्रवाहांचे काही वर्णन परिस्थिती म्हणून मला देता आले असते. पण माधवरावांची भाषाशुद्धी हिंदुत्वाभिमानापेक्षा मराठीच्या अभिमानातून स्फुरलेली होती आणि हिंदुत्वाचे प्रेम त्यांना असले तरी हिंदुत्वाच्या चळवळीला त्यांच्या जीवनात अत्यल्प स्थान होते. तेव्हा तशा वर्णनाचा अवलंब मी केला नाही. मी फक्त त्यांच्या भाषाशुद्धिविषयक भूमिकेची सावरकरांच्या भूमिकेशी तुलना केली आणि त्यांचे विचार हिंदुत्ववादाकडे कसे झुकत होते ते दिग्दर्शित केले. (पृ० ३७८ ते ८०, ३६१-६२).

२. माधवराव बडोद्यात, पुण्यात, नि कोल्हापुरात दीर्घकाळ राहिले आणि तेथील परिस्थि-

तीशी त्या मानाने त्यांचा अधिक संबंध आला. त्यातल्या त्यात बडोद्यापेक्षा पुण्याला नि पुण्यापेक्षा कोल्हापूरला हा संबंध जास्त आला. तेव्हा या तीन नगरांतील परिस्थिती हाताळताना बडोद्याकडे मी जवळजवळ दुर्लक्ष केले; माधवरावांवर जी टीका झाली, त्यांच्याविषयी जे प्रवाद उठले, तेवढ्यापुरती पुण्याची दखल घेतली; आणि माधवरावांना नावडणारे संस्थानी वातावरण, साहित्य-स्नेह-मंडळ, राजाराम महाविद्यालय वगैरेंना अनुलक्षून कोल्हापूरचा परामर्श घेतला. या तीन नगरांपेक्षा माधवरावांचे जीवन नि व्यक्तित्व जे घडले, वाढले, मोडले, नि प्रकटले ते मामांच्या घरात, शांताबाईंच्या दरबारात, रविकिरण-मंडळात, किंवा डे० ए० सोसायटीत. तेव्हा तेथील परिस्थितीकडे मी तपशीलवार लक्ष दिले आणि त्या परिस्थितीचा माधवरावांच्या जीवनाशी नि विशेषतः व्यक्तित्वाशी, केवळ संदर्भ-संबंधच नव्हे तर जो परिणाम-संबंध होता तो दर्शवून, दोन्हींचा सांधा शाबूत राखला.

३. भोवतालच्या निसर्गापेक्षा समाजाला, नि समाजापेक्षा व्यक्तींना परिस्थितिवर्णनात मी अधिक महत्त्व दिले. चरित्रातील वातावरण निसर्ग किंवा समाज यांहून व्यक्तींनी एकदम जिवंत होते हे त्याचे एक कारण होय.—आणि दुसरे कारण असे की भोवतालच्या व्यक्तींच्या चित्रणाखेरीज चरित्रनायकाचे व्यक्तित्व अनेकदा नीट उलगडत नाही किंवा उठाव घेत नाही. कलादृष्टीने ही दोन्ही कारणे महत्त्वाची आहेत; पण त्यांतल्या त्यात दुसरे कारण अधिक महत्त्वाचे आहे. मनुष्याला भोवतालच्या व्यक्तींकडून जो प्रतिसाद मिळतो किंवा मनुष्य भोवतालच्या व्यक्तींना जो प्रतिसाद देतो त्या प्रतिसादात त्याचे व्यक्तित्व जाणवते, प्रकट होते. पण या उभयविध प्रतिसादाचे स्वरूप केवळ त्या मनुष्यावर अवलंबून नसते, तर भोवतालच्या व्यक्तींवरही अवलंबून असते. म्हणून अशा व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना चरित्रात उभ्या कराव्या लागतात; तरच चरित्रनायकाचे व्यक्तित्व खऱ्या अर्थाने स्पष्ट होते. शिवाय या व्यक्तींशी जो साम्यविरोध असतो त्यामुळे चरित्र-नायकाचे व्यक्तित्व आपोआपच उठून दिसते. तेव्हा माधवरावांच्या भोवताली असणाऱ्या व्यक्तींचे माधवरावांच्या जीवनातले कमीअधिक महत्त्व ध्यानात घेऊन मी त्यांचा त्या त्या प्रमाणात शोध घेतला. उदाहरणार्थ, उमाबाई (आई), त्रिंबकराव (वडील), शांताबाई (प्रेयसी), वरदा (प्रेयसी), लीलाबाई (पत्नी) वगैरेंचा शोध मी कसून घेतला आणि त्या मानाने घाटे, मराठे, रानडे, माडखोलकर वगैरे मित्र नि चंद्रशेखर, काशीताई, गरूड, तांबे वगैरे वडील मंडळी यांचा शोध मी कमी कसून घेतला. केशवराव कानिटकर, द० सी० पंगू वगैरे विरोधकांकडे तर मी फारसे लक्ष दिले नाही. पैकी उमाबाई वगैरेंचे अनेक स्वभावविशेष कसून शोधल्यामुळे माधवरावांच्या व्यक्तित्वावर कसा प्रकाश पडत गेला, ते चरित्रग्रंथावरून किंवा यापुढील काही प्रकरणांवरून स्पष्ट होईल. शिवाय भोवतालच्या व्यक्तींच्या चित्रणामुळे माधवरावांच्या चित्राला कसा उठाव आला, तेही तेथेच दिसून येईल. चरित्रात शांताबाईंची लग्नकथा मी उगाच थोडी लांबवली आहे व तीमध्ये श्री० नीलकंठराव कशाळकरांना आणून विषयांतर केले आहे, असे सकृद्दर्शनी कोणाला वाटू शकेल. पण कशाळकरांच्या जोमदार, पुरुषी व्यक्तित्वावर माधवरावांचे संकोची, भावकोमल व्यक्तित्व उठून दिसावे, असा त्यामागे माझा हेतू होता.

४. घराण्याचा पूर्वेतिहास, जन्मकुंडली, अंत्ययात्रा, मुलामाणसांची नंतरची हालहवाल वगैरे गोष्टी परिस्थिती नि जीवनक्रम यांच्या सीमारेषेवर वावरतात, असे म्हणता येईल. पैकी घराण्याचा

पूर्वेतिहास किंवा पूर्वजांची थोडी माहिती मी चरित्रासाठी निवडली; कारण त्या माहितीत माधवरावांच्या लहरी, लोकविलक्षण स्वभावाचा एक उगम शोधता येत होता. (पृ० २–३). पण जन्मकुंडली, अंत्ययात्रा नि मुलामाणसांची नंतरची हालहवाल यांना मी पूर्ण फाटा दिला; कारण त्या गोष्टींत माधवरावांचे माधवरावपण ज्यामुळे उलगडेल असे काहीही मला आढळले नाही. खरे म्हणजे, माधवरावांच्या अंत्ययात्रेची सविस्तर माहिती समकालीन वृत्तपत्रांवरून मी गोळा केली होती नि त्यांच्या अस्थिविसर्जनाचा वृत्तान्त लीलाबाईंच्या पुस्तकावरून मी मिळवला होता. माधवरावांच्या जीवनात शत्रू किंवा मित्र म्हणून त्यांच्याशी बद्ध झालेल्या अनेक व्यक्ती नि संस्था अंत्ययात्रेत सामील झाल्या होत्या नि स्मशानभूमीत जी भाषणे झाली त्यांत त्यांच्या जीवनाचे नेमके सिंहावलोकन होत होते. विशेष म्हणजे माधवरावांच्या जीवनात आलेल्या अनेक स्त्रियांचे दृश्य प्रतीक शोभावी अशी एक तरुण स्त्रीही केस मोकळे सोडून अंत्ययात्रेत सैरभैर चालताना दिसत होती. अंत्ययात्रेचा हा सारा प्रकार चरित्रामधले अनेक मोकळे धागे एकत्र आणून त्याला कलात्मक पूर्णता देण्यासाठी मला फार उपयोगी पडला असता. किंबहुना तसा उपयोग करून अंत्ययात्रेचे वर्णन मी लिहूनही काढले होते! पण नंतर माझ्या असे लक्षात आले, की त्या वर्णनाने पूर्वकथित चरित्रात अर्थपूर्ण नवी भर पडत नव्हती, पुनरुक्ती होत होती, आणि त्यामुळे जी कलात्मक अखेरी साधल्यासारखी वाटत होती ती आधीच्या मृत्युशय्येवरील आजाराच्या वर्णनात आधीच साधली जाऊ शकत होती. तेव्हा अंत्ययात्रेच्या वर्णनाची पाने मी फाडून टाकली नि सध्या मृत्यूपाशी चरित्राला जसा पूर्णविराम दिला आहे तसा पूर्णविराम दिला.

५. परिस्थितीऐवजी जीवनक्रमात ज्यांचा समावेश करावा लागेल असे अनेक घटनाप्रसंग निवडीच्या प्रक्रियेत मी गाळून टाकले. लीलाबाईंच्या पुस्तकाशी माझ्या चरित्र-पुस्तकाची तुलना केली तर असे घटनाप्रसंग वाटेल तेवढे सापडू शकतील. लीलाबाईंनी वटपौर्णिमेच्या उपवासाला माधवरावांनी घेतलेल्या आक्षेपाची हकीगत दिली आहे (पृ० ३५); त्यांच्याबरोबर माधवराव बोलपट बघायला गेले होते तरी ते एका नर्सबरोबर गेले होते, अशी बातमी कशी पिकली, त्याचा किस्सा सांगितला आहे (पृ० ६४); आणि एके रात्री गाण्याच्या बैठकीतून माधवराव लवकर घरी परतले तेव्हा भुताच्या कल्पनेने आपण बेशुद्ध कशा पडलो, त्याची गंमत ऐकवली आहे (पृ० ६७). एकदा मस्त रेडा मागे लागला तेव्हा तारेच्या कुंपणावरून उडी मारून माधवरावांनी स्वतःचा बचाव कसा केला (पृ० ९६); किंवा त्यांनी पन्हाळ्याची, भुयेवाडीची, किंवा मुंबईदर्शनाची सफर कशी पार पाडली (पृ० ८६,९०) वगैरेसंबंधी वृत्तान्तही लीलाबाईंनी नमूद केला आहे. पण हे घटनाप्रसंग किंवा इतर असले पाचपंचवीस घटनाप्रसंग माझ्या पुस्तकात आढळणार नाहीत. लीलाबाईंनी ज्या तीसपस्तीस कवितांच्या जन्मकथा दिल्या आहेत त्यांपैकी 'सर्वा खल्विदं माया', 'अर्थोऽहि कन्या परकीय एव', 'प्रेमाची दक्षिणा', 'प्रश्नोत्तर', 'दुःखान्ती दुःख', 'सिंहाचा पाडाव', 'भ्रष्टा' वगैरे कित्येक कवितांच्या जन्मकथा मी गाळल्या आहेत. आणि घाट्यांनी 'दिवस असे होते'मध्ये 'कंचनी' या सुप्रसिद्ध कवितेच्या निर्मितीची जी विस्तृत नि वेधक माहिती दिली आहे तीही मी वगळली आहे. ('वर्षे०', पृ० १२९ ते १४७; 'दिवस०', पृ० २५५ ते २५८). खानोलकर किंवा गिरीश यांची पुस्तके घेतली तरी त्यांमधील काही घटना-प्रसंगही मी माझ्या लेखनकक्षेत समाविष्ट केलेले नाहीत, असे लक्षात येईल.

जीवनक्रमातील हे सर्व घटनाप्रसंग व्यक्तित्वाशी संबद्ध नव्हते म्हणून मी वगळले असे म्हणता येणार नाही. यांतील प्रत्येक घटनाप्रसंगात माधवरावांचे व्यक्तित्व हलले होते नि प्रकट झाले होते. पण चरित्रासाठी सत्त्वांशाची नि पृथगात्मतेची निवड करायची, हे जे माझे धोरण होते, त्या धोरणात हे घटनाप्रसंग सामावले नाहीत. यांपैकी एकेक घटनाप्रसंग घेतला तर त्यात काही सत्त्वांश, काही पृथगात्मता दिसू शकत होती. पण माझ्या धोरणात केवळ एकेका घटनाप्रसंगाचा सुटा विचार अभिप्रेत नव्हता. निवडलेल्या सर्व घटनाप्रसंगांचा—नव्हे, घडण्याप्रमाणे असण्याचाही—जो संकलित परिणाम होईल तो माधवरावांच्या जीवनातील सत्त्वांशाचे नि पृथगात्मतेचे एकरूप दर्शन घडवणारा असावा, असा माझा हेतू होता. तेव्हा जे घटनाप्रसंग सुटे सुटे घेतल्यास सत्त्वांशयुक्त नि पृथगात्मतादर्शक वाटतील त्यांनाही मी पुन्हा चाळणी लावीत होतो आणि एकरूप दर्शनाच्या दृष्टीने त्यांचा स्वीकार किंवा त्याग करीत होतो. विचाराधीन घटनाप्रसंग बाजूला पडले ते निवडीच्या या शेवटच्या टप्प्यावरच बाजूला पडले.

लीलाबाई नि माधवराव यांच्या मतभेदाचे अनेक प्रसंग चरित्र-पुस्तकात मी दिले आहेत; त्यामुळे वटपौर्णिमेच्या उपवासाचा तसलाच प्रसंग बाजूला पडला. माधवरावांसंबंधी अनेक गैरसमज कसे पिकले ते चरित्र-पुस्तकात मी सांगितले आहे; त्यामुळे माधवराव एका नर्सबरोबर बोलपट बघायला गेले ही बातमी कशी पिकली, ते सांगण्याची आवश्यकता उरली नाही. विचाराधीन बाकीच्या घटनाप्रसंगांचा प्रकार जवळजवळ तसाच आहे. जे काही इतर घटनाप्रसंगांत येऊन गेले त्यात नवी अर्थपूर्ण भर या घटनाप्रसंगांनी पडत नव्हती; म्हणून सत्त्वांश नि पृथगात्मता यांचे एकरूप दर्शन घडवताना त्यांना मागे टाकावे लागले.

'कंचनी'ची जन्मकथा गळली किंवा गाळली त्याला मात्र थोडे वेगळे कारण आहे. मी अनेक इतर कवितांच्या जन्मकथा दिल्या आहेत (पाहा, पृ० ६७, ९०, १९९, २००, ३१४, ३५३, ३६४ इत्यादी), त्यामुळे 'कंचनी'ची जन्मकथा देण्यात स्वारस्य उरले नाही असे म्हटले तर ते अर्धसत्य ठरेल. दृष्टीसमोरचे वास्तव सत्य माधवरावांची प्रतिभा (किंवा वृत्ती) कसे नकळत बदलून टाकी ते 'कंचनी'च्या जन्मकथेत घाट्यांनी फार मार्मिकपणे दाखवले आहे. माधवरावांच्या निर्मितिप्रक्रियेचा तो विशेष तितक्या ठळकपणे इतर कवितांच्या जन्मकथेत आलेला नाही. तेव्हा त्यासाठी 'कंचनी'ची निवड झाली असती तर ती समर्थनीय ठरली असती. पण 'निवडी'च्या प्रस्तुत विचाराखेरीज 'निवेदनाच्या ओघा'चा विचारही प्रत्यक्ष लेखनाच्या वेळी मला करावा लागला. त्यामुळे 'कंचनी' गळली किंवा गाळली. 'कंचनी' १९२४ च्या ९ एप्रिलला लिहिली गेली आणि तो दिवस 'स्त्रीस्नेहाचे वादळ' या प्रकरणाच्या कालखंडात शेवटी शेवटी पडत होता. हे प्रकरण अटीतटीच्या प्रसंगांनी भरलेले नि एकाच वेळी अनेक अंगांनी पुढे जाणारे असे मोठे बिकट प्रकरण आहे. तेव्हा त्याची सर्व व्यवधाने सांभाळून नि रंगत कायम ठेवून त्यात मध्येच 'कंचनी'ची जन्मकथा सांगणे माझ्या शक्तीबाहेरचे काम होते. मी जर ती जन्मकथा मध्येच सांगितली असती तर निवेदनाचा ओघ नि ताण यांत ढिलाई आली असती नि प्रकरणाची भट्टीच बिघडली असती. तेव्हा 'कंचनी'खेरीज प्रकरण जसे पुढे गेले तसे मी जाऊ दिले आणि मागाहून तिला त्या प्रकरणात घुसवण्याचा अट्टाहास केला नाही.

६. लीलाबाई, घाटे वगैरेंच्या प्रकाशित ग्रंथांतील काही घटनाप्रसंग निवडीच्या प्रक्रियेत जसे

मला गाळावे लागले तसेच अप्रकाशित साधनसामग्रीमधीलही काही घटनाप्रसंग गाळावे लागले. उदाहरणार्थ, रामभाऊ मराठ्यांकडील पत्रांत पुण्याला माधवरावांविरुद्ध कुटाळ मंडळींनी जे रान उठवले होते त्याचा एक नमुना बघायला मिळाला : तेव्हा माधवराव आपल्या खोलीत लक्ष्मीबाई चौधरी या आपल्या दिवंगत तरुण मैत्रिणीचे छायाचित्र लावीत असत आणि त्या छायाचित्रावर लिहिलेले "ऑन द स्टेपिंग स्टोन ऑफ लव्ह" हे वाक्य लपवण्याची काळजी घेत नसत. वरदा-प्रकरण सुरू होण्यापूर्वी, म्हणजे १९२२ साली, माधवरावांच्या खोलीतून हे छायाचित्र चोरीस गेले आणि चोराच्या कृपेने इरावती करमरकरांच्या हातात पडले. चोराची अशी कल्पना असावी, की माधवरावांचा नि इरावतींचा प्रेमसंबंध आहे, पण इरावतींशी एकनिष्ठ न राहता माधवरावांनी छायाचित्रातल्या तरुणीशीही सूत जमवले आहे! तेव्हा इरावतींना खरा प्रकार कळवण्यासाठी नि दोघांच्या प्रेमात बिब्बा घालून माधवरावांना धडा शिकविण्यासाठी त्याने सारा उपद्व्याप केला होता. पण माधवरावांना इरावतींच्या विषयी खूप कौतुक असले तरी चोराच्या कल्पनेत होते तसले प्रेम नव्हते;—आणि इरावतींनी ते छायाचित्र सरळ मनाने माधवरावांकडेच पोचते केले. त्यामुळे ते एका दिवंगत मैत्रिणीचे आहे हे उघड झाले आणि चोराच्या उपद्व्यापाचा बुडबुडा फुटला! कुटाळ मंडळींनी उठवलेल्या रानाचा हा नमुना नक्कीच रंजक होता पण केवळ रंजकतेसाठी त्याचा स्वीकार करायला मी तयार नव्हतो. तसले छायाचित्र लावण्यात माधवरावांची जी रोमँटिक वृत्ती होती ती तशीच उठून दिसेल असा प्रसंग माझ्या पुस्तकात पुढे यायचा होता आणि कुटाळांनी उठवलेल्या रानाचे वर्णनही मला इतर उदाहरणांच्या साह्याने करायचे होते (पृ० ३१५, १९६). तेव्हा या कुटाळ नमुन्याला, तो रंजक असला तरी, मी रजा दिली.

माधवरावांची गिरीशांकडे जी पत्रपेटी होती तीमध्ये माधवरावांवर झालेल्या एका सौम्य वशीकरण-प्रयोगाची हकीगत मला सापडली. हा प्रयोग शांताबाईंच्या धाकट्या भगिनी गीताबाई यांनी १९२७ साली भीतभीत करून बघितला होता. त्या वेळी त्यांनी माधवरावांशी प्रथम निनावी नि मागाहून नावानिशी पत्रव्यवहार केला आणि त्यात माधवरावांना म्हटले, की "'बघशि का जरी राहशी दुरी' या तुमच्या कवितेवरून बडोद्यात माझी थट्टा होत होती. तर ती कविता तुम्ही खरोखर माझ्यावरूनच लिहिलीत का?" वास्तविक पाहता, कविता १९१७ साली प्रथम बडोद्यात प्रसिद्ध झाली होती नि थट्टेचा प्रकार झालाच असला तर त्या वेळी त्याला सुमारे दहा वर्षे उलटलेली होती. त्यामुळे आता त्याविषयी चौकशी करण्याचे कारण नव्हते. पण आता माधवराव समाजामध्ये प्रतिष्ठा पावले होते, फर्ग्युसनसारख्या विख्यात महाविद्यालयात प्राध्यापक झाले होते, नि तरीही अविवाहित राहिले होते. शिवाय गीताबाईंचे लग्न त्यांच्या तोळामासा तब्बेतीमुळे लांबले होते. तेव्हा कवितेचे निमित्त करून गीताबाईंनी संभाव्य स्थळी खडा टाकून बघितला होता! माधवरावांच्या मनात गीताबाईंशी लग्न करण्याची कल्पना अजिबात न आल्यामुळे खडा अर्थातच लागला नाही. कुटाळकीच्या पूर्वोक्त नमुन्याप्रमाणे वशीकरण-प्रयोगाची ही हकीगतही रंजक होती. पण माधवरावांनी लग्नासाठी बघितलेल्या नि नाकारलेल्या अनेक मुलींच्या हकीगतींत ती जमा होत असल्यामुळे मी ती मुद्दाम वेचून घेतली नाही.

अशा हकीगती नि घटनाप्रसंग अप्रकाशित साधनसामग्रीत माझ्या हाती खूपच लागले होते.

शिवाय संकीर्ण माहिती इतकी जमा झाली होती की सांगता पुरवणार नाही. पत्रसंग्रह, आठवणी, डे० ए० सोसायटीकडील कागद वगैरे ठिकाणी या संकीर्ण माहितीचा नुसता खच पडला होता. पण निवडीच्या धोरणानुसार ती माहितीही मी पाखडली आणि तीमधील ग्राह्यांश तेवढाच स्वीकारला.

७. आतापर्यंत चरित्राच्या तीन अंगांपैकी परिस्थिती नि जीवनक्रम या अंगांत निवड कशी केली त्याची उदाहरणे दिली. त्या उदाहरणांत व्यक्तित्व या तिसऱ्या अंगातील निवडीची उदाहरणे कुठे कुठे लपेटली गेली आहेत. पण व्यक्तित्वामधील निवडीचा थोडा स्वतंत्र परामर्शही घ्यायला हवा. कोणत्याही व्यक्तिविशेषाचे सापडतील तेवढे आविष्कार मी स्वीकारीत नव्हतो; तर एकीकडे त्या व्यक्तिविशेषाच्या सर्व छटा व्यक्त होतील एवढेच आविष्कार स्वीकारीत होतो आणि दुसरीकडे त्या व्यक्तिविशेषाला व्यक्तित्वात जेवढे महत्त्व असेल त्या मानाने त्याची आवर्तने होऊ देत होतो. उदाहरणार्थ, काटकसरीपणा (किंवा कंजूषपणा) हा माधवरावांचा एक स्वभावविशेष होता. त्या स्वभावविशेषाच्या छटा पुरेशा व्यक्त होण्यासाठी त्याच्या दोनचार आविष्कारांचे वर्णन मी केले (पृ० ३८, ११३, ३५४ इत्यादी); पण त्याहून त्यावर भर दिला नाही. वास्तविक पाहता श्री० मोहनराव शहाणे किंवा कविवर्य यशवंत यांनी माधवरावांच्या काटकसरीपणाच्या (किंवा कंजूषपणाच्या) आणखी काही गमतीदार आठवणी मला सांगितल्या होत्या. पण त्या आठवणी समाविष्ट केल्यास एकूण व्यक्तिचित्रणात त्या स्वभावविशेषाला प्रमाणाबाहेर महत्त्व येईल म्हणून मी हात आखडता घेतला. प्रवासाची हौस हाही माधवरावांचा आणखी एक गौण स्वभावविशेष होता; तेव्हा त्याची हाताळणी मी तशाच पद्धतीने केली. लीलाबाईंच्या पुस्तकात माधवरावांच्या सौजन्याच्या नि वादप्रवणतेच्या अनेक आठवणी आल्या आहेत आणि त्या संख्येने नि बलाने अशा आल्या आहेत की वादप्रवणतेचा ठसाच वाचकांच्या मनावर अधिक उमटावा. माधवराव जेवढे वादप्रवण होते त्यापेक्षा अधिक सौजन्यशील होते, किंबहुना सौजन्य हाच त्यांचा स्थायिभाव होता, असेच लीलाबाईंचे अंतिम मत दिसते. पण आठवणींचे प्रमाण आपल्या मतानुसार ठेवणे त्यांना जमले नाही आणि त्यांना अभिप्रेत नसलेला ठसा वाचकांच्या मनावर उमटणे शक्य झाले. असे आपल्या बाबतीत घडू नये म्हणून माधवरावांच्या सौजन्याचे आविष्कार वादप्रवणतेच्या आविष्कारांपेक्षा संख्येने किंवा प्रभावाने वरचढ ठरावे, अशी दक्षता मी घेतली. माधवरावांच्या व्यक्तित्वात रोमँटिक स्त्रीप्रेम नि सामाजिक प्रतिष्ठेची आकांक्षा या दोन भावनांना माझ्या मते सर्वोच्च महत्त्व होते. तेव्हा त्या भावनांचे सर्व ठळक आविष्कार चरित्रात मी समाविष्ट केले आणि त्यांचे सापेक्ष महत्त्व कायम राखले. चरित्रनायकाच्या विविध व्यक्तिविशेषांचे आविष्कार चरित्रात टप्प्याटप्प्याने आवृत्त झाले तर त्यातून एक सुंदर समृद्ध लय निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन याच प्रकरणात यापूर्वी मी केले आहे. (पृ० ६२). त्या सुंदर, समृद्ध लयीचे भान निवडीच्या प्रक्रियेत मी सोडले नव्हते. प्रत्येक व्यक्तिविशेषाचे सर्व ठळक नवे आविष्कार मी स्वीकारीत होतो, आणि त्या त्या व्यक्तिविशेषाच्या महत्त्वाएवढे त्याचे आविष्कार चरित्रात यावेत, अशी दक्षता घेत होतो. त्यामुळे व्यक्तिविशेषांची नावीन्यात लपेटलेली आवर्तने आपोआप साधत होती आणि लयीची व्यवस्था होत होती. क्वचित हे आपोआप न घडले तर थोड्या प्रयत्नाने मी ते घडवीत होतो.

८. परिस्थिती, जीवनक्रम, नि व्यक्तित्व या तीन अंगांपैकी एकेक अंग दृष्टीसमोर ठेवून निवड कशी केली ते आतापर्यंत सांगितले. पण समग्र जीवन दृष्टीपुढे ठेवूनही निवडीची प्रक्रिया होतच होती. विशेषतः समग्र जीवनात ज्या सौंदर्याकृती स्वाभाविकपणे साधलेल्या मला दिसत होत्या त्या टिकाव्या नि उठावदार रीतीने पुढे याव्या म्हणून निवडीच्या वेळी मी जपत होतो. डॉ० केतकर-चरित्राच्या प्रस्तावनेत मी म्हटले होते, की 'चरित्राच्या आशयाला सौंदर्यकल्पनेच्या आहारी जाऊन एखाद्या सुंदर आकृतिबंधात कृत्रिमपणे बसवावे, असा मोह कलापिपासू चरित्रकाराला काही वेळा होत असतो. पण सत्यदर्शनाच्या आग्रहापायी तो मोह मी शक्य तेवढा टाळला आहे.' माधवरावांचे चरित्र लिहिताना माझी ती भूमिका बदलली नव्हती. चरित्राच्या आशयाला एखाद्या सुंदर पण कृत्रिम आकृतिबंधात मी बसवले नाही, हे खरे; पण चरित्राच्या आशयात ज्या सौंदर्याकृती स्वाभाविकपणे दिसल्या त्या मी डोळे उघडे ठेवून बघितल्या. ज्या अनेक आकृती मला आढळल्या त्यांची काही संकलित गुंफण किंवा मेळ ही मला जाणवली नाहीत; पण एकेका आकृतीची मूळ बांधणी नि सर्व आकृतींच्या संमेलनातील चित्रविचित्रता मला आकर्षक वाटली.

बडोद्यातील जलसे-मंडळ, पुण्यातील रविकिरण-मंडळ, अमळनेरातील सहज-मंडळ, पुण्याच्या दुसऱ्या वास्तव्यातील तुकाराम-आश्रम-मंडळ, नि कोल्हापुरातील साहित्य-स्नेह-मंडळ ही मंडळे तारकापुंजांसारखी सरळ रेषेत टप्प्याटप्प्याने रेखलेली मला दिसत होती. माधवरावांनी महत्त्वाकांक्षेच्या विमानात बसून बडोद्याला एकदा घर सोडले, पदवीपूर्व शिक्षण स्वावलंबनाने पुरे केले, खूप उंची गाठली, नि त्या उंचीवर असतानाच प्रेमभंग होऊन ते खाली कोसळले. दुसऱ्यांदा पुण्याला त्यांचे विमान पुन्हा वर गेले, विद्वत्तेच्या नि कवित्वाच्या क्षेत्रात त्यांनी झपाट्याने नाव मिळवले, एका मान्यवर संस्थेचे ते आजीव सदस्य झाले, नि तेथूनही वरदा-प्रकरणामुळे ते भुईवर भेलकांडले. दोन धूमकेतू काही तासांच्या अंतराने सरसरत वर चढावे नि पलट खाऊन पाताळात परतावे, तसा हा देखावा मला विलक्षण वाटला. जन्मल्यावर माधवराव आईच्या मांडीवर रडणारे लेकरू होते; पण तेथून मायलेकरांत दुरावा वाढतच गेला. माधवरावांच्या प्रौढपणी तो कमी होत होत, अखेरच्या आजारात संपला; नि आईवर अभंग लिहून जणू आईच्या मांडीवर माधवरावांनी प्राण सोडला. या घटनाक्रमामुळे संयोग, वियोग, संयोग यांचा एक समांतरभुज चौकोन माझ्या डोळ्यांसमोर उभा राहत होता. माधवरावांच्या तारुण्यात त्यांना वडिलकीचा आधार देणारे चंद्रशेखर भेटले; आणि त्या घटनेचे प्रतिबिंब उमटावे तसे प्रौढपणी तांबे भेटले. त्या बिंबात नि प्रतिबिंबात माधवरावांची बदललेली नि तरीही आत तशीच राहिलेली छबी बघणे म्हणजे समांगतेचा (सिमेट्रीचा) फार रमणीय अनुभव होता. नवतारुण्यात शांताबाई-नामक सावलीमागे माधवराव वेड्यासारखे धावले; पण प्रौढपणी उलट दिशेला ते चालू लागल्यावर ती सावली वेड्यासारखी त्यांची पाठ शिवू लागली. यातील उलटापालट थक्क करणारी होती. अखेरच्या काळात माधवरावांचे काव्यसंग्रह एकामागून एक प्रसिद्ध झाले, 'छंदोरचने'ची दुसरी परिष्कृत आवृत्ती निघाली, 'भाषाशुद्धिविवेक' बाहेर पडला, आणि गोफाच्या पदरांना शेवटी गाठ बसावी तशी छान गाठ बसून त्यांच्या वाङ्मयजीवनाचा जणू समारोप झाला. त्यांच्या मृत्यूपूर्वी, आजारात, जी मंडळी त्यांना भेटून गेली त्यांनी त्यांच्या

भावजीवनाचाही असाच समारोप घडवून आणला. या मंडळींनी त्यांचे मागे पडलेले भावजीवन जणू पुन्हा उभे केले, त्याची नकळत उजळणी केली, नि त्यांच्या प्रयाणाची पूर्वसिद्धता केली. त्यांच्या जीवनात मोठी उलथापालथ करणाऱ्या शांताबाई नि शाहूराव कानिटकर यांसारख्या व्यक्तीही या मंडळींत होत्या, हे विशेष. या व्यक्तींच्या भेटींनी सर्व कथानके नि उपकथानके पर्यवसान-बिंदूशी जणू एकत्र येत होती. या वेळी फक्त वरदा नव्हती; नि सौंदर्यानुभूतीमधील हुरहूर लावणारी ती उणीव म्हणजे नियतीच्या कलेची परमावधीच होती!

माधवरावांच्या समग्र जीवनाकडे बघताना अशा ज्या ज्या सौंदर्याकृती मला दिसल्या त्या त्या सौंदर्याकृती निवडीच्या वेळी मी आवर्जून टिपल्या नि चरित्रात समाविष्ट केल्या. चरित्रात प्रत्येक ठिकाणी मी शब्दांनी त्या मुद्दाम सांगितल्या असे नाही. पण त्या मनात ठेवून मी लिखाण केले, क्वचित एखादी आकृती सूचित केली, नि आकृती बघणे किंवा न बघणे वाचकांवर सोडून दिले. वाचकांनी आकृती बुद्धिपूर्वक जाणल्या नाहीत तरी त्यांचा सौंदर्यसंस्कार त्यांच्या मनावर उमटेल नि तोच परिणामकारक ठरेल, अशी मला आशा होती. चरित्राचा आशयविस्तार व्यक्तित्वाच्या सूत्रात गुंफल्यामुळे एकत्र येत होताच; पण या सौंदर्याकृतींनी त्याला आणखी काही व्यवस्था लाभत होती, काही रूप येत होते, अशी माझी भावना होती. अथांग नि अनंत आकाशाच्या शून्य पोकळीत चांदण्या लुकलुकू लागल्या की 'हे मृगनक्षत्र', 'हे सप्तर्षी', 'हा ध्रुव', 'ही आकाशगंगा' असा त्या आकाशाला आपल्या मनात काही अर्थ प्राप्त होतो, काही नामरूप मिळते, तसेच या आकृतींनी चरित्राबाबत होत असावे, असे वाटते.

साहित्यदृष्टीने चरित्राचा विचार करीत असताना व्यक्तित्वाचे महत्त्व ओळखणे जेवढे अगत्याचे असते तेवढेच 'निवडी'चे महत्त्व ओळखणेही अगत्याचे असते. मुख्यतः व्यक्तित्वामुळेच चरित्र साहित्याच्या पदवीला कसे पोचू शकते, ते यापूर्वी आपण पाहिले आहे. व्यक्तित्वामुळे चरित्रात चैतन्य नि तदंतर्गत सौंदर्य खेळू लागते, आणि व्यक्तित्वाचा आधार पकडून ठेवला तरच चरित्र एकात्म होण्याची शक्यता निर्माण होते. पण केवळ व्यक्तित्वाच्या बळावर चरित्र पूर्णतया साहित्य होऊ शकत नाही. व्यक्तित्वासह चरित्राचा जो एकूण आशय असतो त्याला त्यासाठी चांगला आकार यावा लागतो. चरित्राचा आशय प्राथमिक अवस्थेमध्ये चरित्राच्या साधनसामग्रीत इतस्ततः विखुरलेला असतो. चरित्राच्या इतिहासप्रधान शोधात जरी त्या आशयाचा नीट संग्रह केला, त्यातील सत्यासत्य पारखले, नि त्यातील अंतर्गत संबंध ओळखून तो जुळवला, तरी तो प्रायः आकृतिशून्यच राहिलेला असतो. त्या अवस्थेत त्याला यदाकदाचित इतिहास म्हणता आले तरी साहित्य म्हणता येत नाही. साहित्यात जीवनाचे सुंदर चित्र दिसले पाहिजे. पण चरित्रनायकाच्या प्रत्यक्ष जीवनाची अंगोपांगे नि सामग्रीतून दिसणाऱ्या या आशयाची अंगोपांगे यांतील प्रमाणसंबंध तुटलेला असतो. जीवनाच्या मोठ्या अंगासाठी छोटा आशय नि छोट्या अंगासाठी मोठा आशय असे व्यस्त प्रमाण जागोजाग आढळते. क्वचित जीवनाची काही अंगे आशयात अनुपस्थित असलेली जाणवतात.—आणि जीवनाची एकूण आकृती आशयाच्या आकृतीत फार विसकटलेली दिसते. तेव्हा प्राथमिक आशयाला योग्य आकृती देण्याचे काम निवडीतून साधावे लागले. प्रदीर्घ अभ्यास नि चिंतन यांतून स्वतःला चरित्रनायकाच्या जीवनाचे जे संकलित दर्शन घडलेले असेल ते प्रमाण मानून कलावंत चरित्रकार

आशयाची निवड करतो. त्यामुळे निवडीच्या प्रक्रियेत गौण भाग गळतात आणि महत्त्वाचे भाग वर येतात. वर आलेले भाग पुन्हा आपापल्या सापेक्ष महत्त्वानुसार कमजास्त जागा व्यापतात आणि जीवनाच्या मूळ रचनेच्या अनुरोधाने एकमेकाशी सांधले जातात. मिळून, साधनसामग्रीतील आकृतिशून्य आशयाला एक नवे रूप लाभते! या रूपाच्या घडणीत चरित्रकाराची सौंदर्य-दृष्टी अपरिहार्यपणे मिसळलेली असते. त्यामुळे हे रूप म्हणजे प्रत्यक्ष जीवनाचे केवळ यांत्रिक छायाचित्र असत नाही, तर वास्तव शैलीत रंगविलेलेच पण देखणे, जिवंत चित्र असते! मानवी जीवनाचे संकलित नि सुसंबद्ध दर्शन घडावे अशी आपणा सर्वांची एक स्वाभाविक ओढ असते. पण जीवन फार विस्तृत नि विकीर्ण असल्यामुळे व्यवहारात ही ओढ बहुधा तृप्त होत नाही. पण निवडीनंतर जीवनाचे जे रूप चरित्रात उमटते, जे चित्र उभे राहते, त्यात मात्र ही ओढ तृप्त होऊ शकते. या तृप्तीचा आनंद कोणत्याही चांगल्या साहित्यकृतीपासून मिळणाऱ्या आनंदापेक्षा कमी नसतो, वेगळाही नसतो!

जुन्या साहित्यशास्त्रात काव्याचा 'आत्मा' नि काव्याचे 'शरीर' अशी परिभाषा वापरीत असत. तशीच परिभाषा चरित्राच्या बाबतीत वापरली तर असे म्हणता येईल, की व्यक्तित्वावर भर दिल्यास चरित्रात आत्मतत्त्व खेळू लागते, आणि निवडीकडे लक्ष दिल्यास चरित्राला योग्य शरीर लाभते. जेव्हा आत्मा आणि शरीर यांचा 'समसमा संयोग' होतो तेव्हाच खरे कलात्मक चरित्र जन्माला येते.

५

□ □ □ □ □ □ □ □ □ □

शोध : आईवडिलांचा

माधवरावांचे आईवडील म्हणजे एक जुळे कोडे होते! आईने लहानपणी माधवरावांना कोरडेपणाने का वागवले? वडिलांनी त्यांचे पालनपोषण नीट का केले नाही? आई नि वडील यांचा वेबनाव का होता? आईवडिलांनी दाखविलेल्या दुराव्यामुळे माधवरावांच्या जीवनावर कोणता परिणाम झाला? वडिलांच्या वेडसरपणाची छाया आनुवंशिक होऊन माधवरावांच्या मनाला ग्रासत होती की काय?—वगैरे प्रश्न खानोलकरांच्या पुस्तकामुळे माझ्या दृष्टीसमोर कसे नाचायला लागले, ते पहिल्या प्रकरणात मी सांगितले आहे. मी गिरीशांच्या पुस्तकाकडे त्या प्रश्नांची उत्तरे शोधायला म्हणून कसा वळलो आणि त्या पुस्तकाने माधवरावांच्या आईविषयी असलेल्या एका वाईट प्रवादाचा नवा प्रश्न माझ्यापुढे कसा उभा राहिला, तेही त्या प्रकरणात मी स्पष्ट केले आहे. खरे म्हणजे, ज्या अनेक प्रश्नांनी माझी जिज्ञासा चाळवली गेली नि मी चरित्र-संशोधनाकडे वळलो त्या प्रश्नांत आईवडिलांसंबंधी हे प्रश्न महत्त्वाचे होते. या प्रश्नांच्या गुंत्यातून तयार झालेले आईवडिलांचे जुळे कोडे संशोधनाच्या प्रक्रियेत हळूहळू सुटत गेले.

या जुळ्या कोड्यापैकी आईची बाजू उलगडण्याचा प्रयत्न मी प्रथम केला. गिरीश सांगत होते, की माधवरावांच्या आत्याबाई आऊताई यांनी माधवरावांच्या आई उमाबाई यांच्याविषयी गैरसमज पिकवले. त्यांतून लोकप्रवादाचा जन्म झाला. त्या लोकप्रवादाने माधवरावांचे मनही बिघडले होते. त्यामुळे धाकटी वहीण यमू हिने 'तात्या' म्हणून हाक मारली तर त्यांना ते आवडत नसे. एकदा गिरीशांच्या देखत यमूला त्यांनी बजावले, की "तू मला 'तात्या' म्हणू नकोस! मी तुझा कुणी नाही!" (पृ० १२०–२१, २८१). पण गिरीश सांगत होते त्याप्रमाणे लोकप्रवाद खरोखर होता का, नि असल्यास तो नेमका काय होता, ते मी तपासू लागलो. माधवरावांचे चरित्रकार म्हणून खानोलकर, नि जुने माहितगार मित्र म्हणून रामभाऊ मराठे, यांची १९७१ च्या मेमध्ये मी गाठ घेतली आणि इतर आठवणी विचारण्याच्या ओघात त्यांच्यापाशी लोकप्रवादाचा विषय काढला. मी खोदून खोदून विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी जी उत्तरे दिली त्यांतून त्या वेळी हे निष्पन्न झाले, की उमाबाईविषयी लोकप्रवाद होता, तो बडोद्याला उठला होता, नि त्यात भावाबहिणीचा अनैतिक संबंध सूचित केला जात होता! शिवाय असेही दिसून आले, की माधवरावांनी मामांचे घर सोडले त्यामागे हा लोकप्रवाद हेही एक कारण होते! गिरीशांनी सांगितलेला लोकप्रवाद आणि माधवरावांचा गृहत्याग यांचा काही संबंध असेल का, अशी अंधुक शंका खानोलकरांना नि मराठ्यांना भेटण्यापूर्वी माझ्या मनात डोकावली होती. पण दोघांनी तो संबंध स्पष्ट बोलून दाखविल्यावर त्याबद्दल आता शंका उरली नाही. शिवाय माधवरावांच्या एका गूढ पत्राचा अर्थ तो संबंध समजल्याने मला एकदम उलगडला. हे पत्र १९१३

सालचे असून ते खानोलकरांच्या पुस्तकात (पृ० १८-१९) मी प्रथम वाचिले होते. पत्राच्या वेळी माधवरावांनी घर सोडल्याला दीडएक वर्ष झाले होते आणि त्यांनी घरी परतावे म्हणून उमाबाईंनी त्यांना आग्रह चालवला होता. त्यासंबंधी त्यांनी मराठ्यांना लिहिले: "... my mother asked me today to return again to the family. I stoutly refused to do so. I truly consider it the house of an orthodox devil. I have been watching the course of events there for the last eight or nine years and the house has become obnoxious to me. या पत्रातील 'डेव्हिल' (समंध), 'ऑब्नॉक्शस' (वृणास्पद) वगैरे शब्दांवर खानोलकरांनी काही भाष्य केलेले नव्हते आणि ते शब्द तिथे का यावेत याचे मला गूढ पडलेले होते. मामांच्या घरातील कडक सनातनीपणाला विटून माधवरावांनी ते घर सोडले, असे खानोलकरांच्या निवेदनाला अनुसरून मी समजत होतो; आणि ते बव्हंशी खरेही होते. पण घरातील वातावरण सनातनी असले तरी घरमालकाला माधवरावांनी 'समंध' का म्हणावे? घराची 'घृणा' आली असे उद्गार का काढावे? 'कोर्स ऑफ इव्हेंट्स'चा उल्लेख का करावा? खानोलकर नि मराठे यांनी माधवरावांच्या गृहत्यागाचा लोकप्रवादाशी जोडलेला संबंध मी ऐकला नि हे प्रश्न वितळूनच गेले. त्या प्रवादामुळेच मामा त्यांना 'समंध' वाटले असावेत, घर 'घृणास्पद' दिसले असावे, नि 'घरातला घटनाक्रम' असह्य झाला असावा. प्रवाद समजल्यामुळे माधवरावांच्या पत्रातले गूढ शब्द तर मला असे उलगडलेच; पण पत्र नि प्रवाद यांची सांगड बसल्यामुळे प्रवादाच्या अस्तित्वाविषयी माझी मनोमन खात्रीही पटली.

प्रवाद होता हे ठरल्यावर, तो कोणत्या परिस्थितीत उद्भवला असेल त्याची मी कल्पना करू लागलो. उमाबाई मुलांच्या शिक्षणासाठी बडोद्याला भावाकडे जाऊन राहिल्या होत्या. त्रिंबकरावांना कायम नोकरी नव्हती आणि पोटाच्या पाठीस लागून ते देशभर नि देशाबाहेरही भटकत होते. ते केव्हातरी बडोद्याला येत नि चारदोन दिवस पायधूळ झाडून निघून जात. अशा अवस्थेत उमाबाईंनी १९०६ साली विनूला नि १९१२ साली यमूला जन्म दिला. तेव्हा ही विशिष्ट परिस्थिती प्रवाद पिकायला साह्यभूत झाली असेल, हे माझ्या ध्यानात यायला वेळ लागला नाही. मात्र प्रवाद नेमका कसा पिकला असेल, ते अधिक स्पष्टतेने समजायला बराच काळ जावा लागला. माधवरावांसंबंधी २८ नोव्हेंबर, ५ डिसेंबर, नि १९ डिसेंबर १९७१ च्या 'केसरी'त मी तीन लेख लिहिले अणि त्यात माधवरावांच्या जीवनासंबंधी काही 'प्रव्होकेटिव्ह' (उत्क्षोभक) विधाने हेतुपूर्वक केली. हेतू हा की त्या विधानांचा प्रतिवाद करण्यासाठी कोणी पुढे यावे आणि त्याच्याकडून मला नवी माहिती मिळावी. अपेक्षेप्रमाणे डॉ० सौ० कमल गोखले यांनी 'माधवरावांच्या मातुःश्री उमाबाई' हा लेख ९ जुलै १९७२ च्या 'केसरी'त लिहिला आणि त्या लेखामुळे उमाबाईंच्या बडोद्यातील शेजारीण नि मैत्रीण श्रीमती पार्वतीबाई सहस्रबुद्धे या वयोवृद्ध बाईंचा मला पत्ता लागला. डॉ० कमल गोखले यांच्या मध्यस्थीने मी जेव्हा सहस्रबुद्धे आजींना भेटलो तेव्हा प्रवाद नेमका कसा पिकला असेल ते अधिक स्पष्टपणे मी ओळखू शकलो. गोखले किंवा सहस्रबुद्धे या दोघींनाही प्रवाद अज्ञात होता, किंबहुना अमान्य होता. पण त्यांच्याकडून कळले की उमाबाईंच्या थोरल्या भावजयीचे सासवेशी बिनसलेले होते, आणि त्यावरून तिला

नवऱ्याने (म्हणजे उमाबाईंच्या थोरल्या भावाने, महादेवरावांनी) जवळजवळ टाकले होते. तेव्हा आपल्या मोडलेल्या संसाराबद्दल तिने उमाबाईंवर ठपका ठेवला आणि नवऱ्याचे घर सोडले! या हकीगतीवरून प्रवादाच्या उगमाची मला झटकन कल्पना आली. भावजयीचा आरोप लोकांनी खरा मानला; आणि यमूचा जन्म झाला तेव्हा भावाबहिणीच्या अनैतिक संबंधापर्यंत तो ताणीत नेला! खानोलकर मला सांगत होते की या प्रवादात माधवरावांचे थोरले मामा महादेवराव गुंतले नव्हते, तर दुसरे धाकटे मामा गुंतले होते. पण सहस्रबुद्धे आजींच्या आठवणींवरून हे स्पष्ट झाले, की प्रवादात थोरले मामा महादेवरावच गुंतलेले असणार.

प्रवादाचे अस्तित्व नक्की ठरले, तो कसा पिकला असेल त्याची कल्पना करता आली, तरी तो मुळात खरा होता की खोटा होता, याचा निर्णय करणे सोपे नव्हते. तो निर्णय करण्यासाठी खानोलकर नि मराठे यांच्या मुलाखतीपासून मी धडपडत होतो; पण प्रारंभी प्रारंभी तरी मला काहीच निर्णय करता येत नव्हता. एकदा वाटे, प्रवाद खरा आहे; एकदा वाटे, खोटा आहे, नि एकदा वाटे, की काहीही निष्कर्ष काढणे अशक्य आहे. त्या वेळी माझ्या मनात कोणत्या क्रमाने विचार येत गेले तो क्रम आता मी साफ विसरलो आहे; पण स्वतःचे विचार स्वतःला स्पष्ट व्हावे म्हणून २४ जुलै १९७१ या दिवशी मी एक टिपण काढले होते. त्या टिपणाच्या आधारे त्या वेळी मनात आलेल्या अनुकूल-प्रतिकूल मुद्यांचा निर्देश करता येईल :

प्रवाद खरा असावा असे जेव्हा वाटे तेव्हा पुढील मुद्दे मनासमोर येत : (१) माधवराव आपल्या आईला आई म्हणत नसत. उमा किंवा उमाबाई असा तिचा नावाने उल्लेख करीत किंवा केशवची आई, विनूची आई (म्हणजेच आपल्या भावंडांची आई) असे तिला संबोधीत. शेवटची एक कविता वगळता खऱ्या आईवर त्यांनी एकही कविता लिहिली नाही. आईवरच्या त्यांच्या बहुतेक विख्यात कविता मानलेल्या आईवर म्हणजे काशीबाई हेर्लेकरांवर आहेत. आईच्या वर्तनासंबंधी संशय असल्यामुळे आईविषयी त्यांच्या मनात ही तिटकाऱ्याची वृत्ती वसत असावी. (२) ८ मे १९१५ च्या एका पत्रात माधवराव सांगतात, की उमाबाई त्यांच्या खोलीवर आल्या आणि व्रतांसाठी नि तवऱ्याच्या यात्रेसाठी त्यांच्यापाशी पैसे मागू लागल्या. त्यावेळी माधवराव बडोद्याला विद्यार्थी होते आणि शिकवण्या करून कसेबसे भागवीत होते. तेव्हा, जवळ पैसे नसल्यामुळे त्यांनी उमाबाईंना नकार दिला. हे सांगून झाल्यावर त्यांनी म्हटले, "पण आहे की नाही गंमत?"—असे त्यांनी का म्हणावे? दुर्वर्तनी स्त्रीने यात्रेसाठी किंवा देवाधर्मासाठी पैसे मागावेत हे त्यांना विपरीत वाटले असावे. (३) माधवरावांचा धाकटा भाऊ गणपत ऊर्फ गणेश १९१८ साली प्लेगने अचानक मृत्युमुखी पडला. त्यावेळी १३-१-१८ च्या पत्रात त्यांनी मराठ्यांना म्हटले, की "I am not sorry myself." त्यांनी भावनेचा एवढा शुष्कपणा का दाखवावा? गणेश आपला खरा भाऊ नाही, असे त्यांना वाटत असावे, असा त्यावरून ग्रह होतो. (४) माधवरावांची धाकटी बहीण यमू हिचे १९२९ साली मोहनराव शहाण्यांशी लग्न झाले. पण या लग्नाला उपस्थित राहायला माधवराव तयार नव्हते. लोकांत वाईट दिसेल हे लीलाबाईंनी त्यांच्या मनावर बिंबवले नि त्यांची आर्जवे केली, तेव्हा केवळ कर्तव्य म्हणून ते मग उपस्थित राहिले. त्यांनी मराठ्यांच्या एका पत्रात म्हटले होते, की "काही कारणामुळे मी लग्नाला हजर राहाणार नव्हतो..." यामधले "काही कारण" कोणते? यमूला ते आपली बहीण मानीत नव्हते, हेच ते कारण असावे, असा तर्क होतो.

प्रवाद खोटा असावा असे जेव्हा मला वाटत असे तेव्हा पुढील मुद्दे मनासमोर येत असत : (१) आईला आई न म्हणण्याचा प्रघात अनेक घरांतून दिसतो. आईला ज्या इतर नावाने घरातील बाकीची मंडळी हाक मारीत असतील त्याच नावाने मुलेही हाक मारू लागतात. त्यामुळे असे होते. तेव्हा माधवराव उमाबाईना आई म्हणत नसत या सुतावरून प्रवाद खरा मानण्याचा स्वर्ग गाठण्यात अर्थ नाही. माधवरावांनी खऱ्या आईवर कविता लिहिल्या नाहीत, यालाही दोघांत उमाळ्याचे प्रेम नव्हते, हे साधे कारण असू शकेल. उमाळ्याचे प्रेम नव्हते त्या अर्थी उमाबाई दुर्वर्तनी असल्या पाहिजेत, असे म्हणता येणार नाही. प्रेमाच्या अभावाची दुसरी कारणे असू शकतात. (२) उमाबाईनी देवाधर्मासाठी पैसे मागितले तेव्हा "आहे की नाही गंमत ?" असे उद्‌गार माधवरावांनी काढले. पण त्या उद्‌गारांचा संबंध उमाबाईंच्या दुर्वर्तनाकडेच लागतो असे नाही. आपली निष्कांचन विद्यार्थीदशा व सुधारक मते ठाऊक असूनही आईने आपणाकडे पैसे मागावे, हीच माधवरावांना "गंमत" म्हणजे आश्चर्याची गोष्ट वाटत असेल. ते विद्यार्थी-दशेतही आईला खर्चासाठी नियमितपणे थोडे पैसे देत असत. तेव्हा पैसे नाकारून दुर्वर्तनासाठी राग व्यक्त करण्याचा प्रश्न नव्हता. (३) गणपतच्या मृत्यूनंतर "I am not sorry myself" असे माधवरावांनी लिहिले. पण त्यापुढे असेही लिहिले, की "...the thought of Umabai and what it means to her is bound to make sad anybody." म्हणजे, भावाच्या मृत्यूचे दुःख त्यांना जाणवले नाही तरी उमाबाईंच्या दुःखाविषयी त्यांना अभिज्ञता होती. शिवाय बडोद्याला स्थलांतर होण्यापूर्वी गणपतचा जन्म झालेला होता. तेव्हा तो आपला खरा भाऊ नाही असे त्यांना वाटण्याचे कारण नव्हते. अत्यंत आत्मकेंद्रित स्वभावामुळे नि पुरेशी जवळीक उत्पन्न झालेली नसल्यामुळे त्यांना गणपतच्या मृत्यूचे दुःख झाले नसेल, हे शक्य आहे. त्यांना दुःख झाले नाही हे त्यांच्या खास स्वभावाचे निदर्शक होतेच; पण दुःख झाले नाही हे त्यांनी पत्रात स्पष्टपणे नमूद केले हे त्यांच्या खास स्वभावाचे अधिक निदर्शक होते. (४) यमूच्या लग्नाला उपस्थित राहण्याचा माधवरावांचा विचार नव्हता हे खरे. पण मोहनराव शहाण्यांनी, म्हणजे यमूच्या यजमानांनी, आपल्या आठवणींत जे कारण दिले आहे, ते पटण्यासारखे आहे. मोहनरावांचे लग्न आधी दुसऱ्या एका मुलीशी ठरले होते आणि ते ठरवण्यात माधवरावांचा सहभाग होता. पुढे ते लग्न काही सबळ कारणास्तव मोहनरावांना मोडावे लागले नि कालांतराने यमूवर त्यांचे प्रेम बसले. अशा स्थितीत माधवराव जर यमू नि मोहनराव यांच्या लग्नाला उपस्थित राहिले असते तर आपल्या बहिणीसाठी त्यांनी पहिले लग्न मोहनरावांना मोडायला लावले, स्वार्थ साधला, असा त्यांच्यावर ठपका आला असता. शिवाय, आधी ठरलेले लग्न मोहनरावांनी मोडायला नको होते, असेही त्यांचे मत होते. तेव्हा या कारणांमुळे यमूच्या लग्नप्रसंगी उपस्थित राहायला ते नाराज असावे, यात आश्चर्य नाही.

मनात असे अनुकूल किंवा प्रतिकूल मुद्दे येत होते नि प्रारंभिक अवस्थेत माझे मन प्रवादा-विषयी दोलायमान झाले होते. काही खुबीदार चित्रांकडे एकीकडून बघितले तर त्यात पुरुष दिसतो आणि दुसरीकडून बघितले तर स्त्री दिसते, तसा प्रकार होत होता नि प्रवाद एकदा खरा तर एकदा खोटा वाटत होता. पण यानंतर त्रिंबकराव नि माधवराव या बापलेकांचा १९२०-२१ चा पत्रव्यवहार नि कोर्टकचेरीचे कागद मी वाचू लागलो आणि माझ्या मनाने दुसऱ्या

अवस्थेत प्रवेश केला. वास्तविक पाहता ही कागदपत्रे उमाबाईंसंबंधी उठलेल्या प्रवादाशी साक्षात संबद्ध नव्हती. पण प्रवादाचा विषय माझ्या डोक्यात असल्यामुळे त्यांचा अन्वय मी प्रवादाशी जोडीत राहिलो. आणि आश्चर्य असे की उलटसुलट धक्के देत देत या कागदपत्रांनी मला अचानक एका निर्णयापाशी नेऊन उभे केले. वर २४ जुलै १९७१ च्या ज्या टिपणाचा उल्लेख मी केला आहे त्याच टिपणाच्या आधारे या कागदपत्रांचा परिणाम वर्णन करता येईल :

त्रिंबकरावांची गिचमीड पत्रे वाचीत असताना त्यांमधील २६-१-२१ च्या पत्रावर माझे लक्ष खिळून बसले. त्रिंबकरावांनी माधवरावांना म्हटले होते, की "Mrs. Uma was deserted for more than 13 years (Hindu Law), but insisted on Kaka to supply rice etc. etc. direct to Baroda." म्हणजे, १९२१ पूर्वी १३ वर्षे त्रिंबकरावांनी उमाबाईंचा परित्याग केलेला होता. १९२१ च्या मागे तेरा वर्षे मोजली की १९०८ साल येते; आणि यमूचा जन्म तर १९१२ सालचा. तेव्हा उमाबाई परित्यक्त असताना तिचा जन्म झाला, असा सरळ अर्थ निघतो! खुद्द नवऱ्यानेच बायको विरुद्ध दिलेली ही लेखी साक्ष नव्हती का? आता उमाबाईंच्या दुर्वर्तनाचा आणखी कोणता पुरावा पाहिजे? त्रिंबकरावांचे हे पत्र वाचितल्यावर मला घटकाभर वाटले की प्रवाद-प्रकरणाचा आपला शोध येथे संपला. आता प्रवाद खरा धरून उमाबाईंच्या नि माधवरावांच्या चरित्राची जुळणी त्या धोरणाने केली पाहिजे.

पण माझ्यासमोरची कागदपत्रे शोधक दृष्टीने मी बघत राहिलो आणि त्या कागदपत्रांनीच माझ्या मनाचे पारडे पुन्हा फिरले. मला वाटले, की २६-१-२१ चे उपर्युक्त पत्र त्रिंबकरावांनी कोणत्या परिस्थितीत लिहिले? वडिलार्जित मिळकतीमधून त्यांनी उमाबाईंना पोटगी द्यावी, म्हणून त्यांच्यामागे माधवरावांनी लकडा लावला होता. आणि उमाबाईंवर राग असल्यामुळे त्यांना पोटगी द्यावयास ते तयार नव्हते. तेव्हा पोटगीची जबाबदारी टाळण्यासाठी हिंदू कायद्याचा आधार ते शोधीत होते. पत्रात 'हिंदू लॉ' हे शब्द त्यामुळेच त्यांनी घातले होते. हिंदू कायद्याचा आधार मिळवायचा तर तेरा वर्षे बायकोचा परित्याग केलेला हवा अशी त्यांची समजूत होती. म्हणून Uma was deserted for more than 13 years असे ते म्हणत होते. पोटगीची जबाबदारी टाळण्यासाठी ते जे म्हणत होते ते शब्दशः नि निरपवाद खरे मानता येईल का? त्यावरून तेरा वर्षे त्यांनी उमाबाईंचा संपर्क संपूर्ण टाळला होता, असा अर्थ काढता येईल का? या काळातील त्यांची बहुतेक सर्व पत्रे भरकटलेली नि भ्रांतिष्ट आहेत. त्यांत पुढच्याचा मागच्याशी मेळ नाही नि भाषेची शुद्ध नाही. तेव्हा त्या दृष्टीनेही 'डेझर्टेड', 'थर्टीन इयर्स' वगैरे उल्लेख काटेतोल अर्थाने घेणे युक्त ठरणार नाही. नवरा-बायकोचे बनत नव्हते नि नवरा वडिलार्जित मिळकतीमधूनही बायकोच्या उपजीविकेची सोय करायला वाटेल तसे आढेवेढे घेत होता एवढेच तात्पर्य या उल्लेखांवरून काढता येईल. शिवाय, १९२०-२१ सालातल्या सर्व पत्रव्यवहाराचा मथितार्थ घेतला तर तो प्रवादाला पोषक आहे की प्रतिकूल आहे? मथितार्थ जर प्रतिकूल असेल तर एवढ्याच उल्लेखांना किती महत्त्व द्यायचे?

मथितार्थाकडे मी वळलो तेव्हा वेगळे दृश्य दिसू लागले. सगळा पत्रव्यवहार वडिलार्जित मिळकतीसंबंधी होता आणि त्यामध्ये उमाबाईंच्या पोटगीबद्दलच नव्हे तर विनू नि यमू या भावंडांच्या तरतुदीबद्दलही माधवराव वडिलांची मनधरणी करीत होते, किंवा त्यांच्यामागे लकडा लावीत

होते. २३-९-२१ रोजी त्रिंबकरावांनी माधवरावांना फिर्यादीची जी नोटीस दिली तिच्या उत्तराच्या मसुद्यात तर माधवरावांनी दोघा भावंडांविषयी कमालीची आस्था दाखवली होती. मोडकळीस आलेले वडिलार्जित घर विकून नगद पैसा उभा करण्याचा अत्यंत जिकिरीचा उद्योग केवळ या भावंडांसाठी त्यांनी केला होता. त्या पैशाच्या व्याजातून दोघांची शिक्षणे व्हावीत, यमूचे लग्न व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. पण त्रिंबकराव, उमाबाई नि चुलत आजी रमाकाकू या त्रयीने त्यांच्याविषयी संशय घेतले, त्यांच्या मार्गात विघ्ने आणली, आणि त्यांना सतत नामोहरम केले. घरविक्रीच्या या उद्योगात मनावर नि शरीरावर अतोनात ताण पडून शेवटी ते आजारीदेखील पडले. या प्रकारे माधवराव जर आईसाठी नि भावंडांसाठी झटत होते तर आईविषयी त्यांच्या मनात संशय असेल का? ही आपली खरी भावंडे नव्हेत, असे ते मानीत असतील का? १९१३ साली 'ऑर्थोडॉक्स डेव्हिल' म्हणून मामांचा उल्लेख करणारे पत्र त्यांनी लिहिले तेव्हा मामांबद्दल नि आईबद्दल त्यांना संशय असेल; पण या घरविक्रीच्या खटपटीच्या प्रसंगी तरी तो निरस्त झालेला दिसतो. मला एकदा अशी शंका आली होती, की या प्रसंगी माधवरावांना वडिलार्जित मिळकत वाचवायची होती नि प्रकरण कोर्टात जाऊ घातले होते. तेव्हा उमाबाई नि विशेषतः दोन भावंडे यांच्याविषयी कागदोपत्री त्यांनी दाखविलेला उमाळा कृत्रिम तर नसेल ना? पण अधिक विचार केल्यावर तो कृत्रिम वाटेना. कारण यापूर्वी विनूला वळण लागावे नि त्याचे शिक्षण व्हावे म्हणून त्याला आपल्या खोलीवर आणून त्यांनी ठेवले होते आणि त्याच्याकडे जातीने लक्ष पुरवले होते. यमूच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन तिलाही "विदुषी" करण्याचा चंग त्यांनी बांधला होता. मराठ्यांना लिहिलेल्या १४-४-२०, १९-४-२०, नि १४-६-२० या तारखांच्या पत्रांत तशी स्पष्ट साक्ष आहे. अर्थात, भावंडांविषयी त्यांचा उमाळा खरा होता नि भावंडांच्या जन्माविषयी त्यांना कसली शंका राहिलेली नव्हती, असाच निष्कर्ष काढणे भाग होते.

माधवरावांच्या वृत्तीवरून प्रवादाचे असे निराकरण झाले, तरी माधवरावांपेक्षा प्रवादाबद्दल त्रिंबकरावांची वृत्ती अधिक महत्त्वाची होती. ती वृत्ती जोवर कळत नव्हती तोवर माझे मन पूर्ण समाधान पावून स्वस्थ बसायला तयार नव्हते. "Mrs. Uma was deserted for more than 13 years" हे वाक्य मला कोठे तरी बोचत राहिले असावे. अशा अवस्थेत मी असताना एके दिवशी (बहुधा २१ जुलै १९७१ या दिवशी, उपर्युक्त टिपण लिहिले त्या दिवशी) त्रिंबकरावांची वृत्ती मला अचानक उलगडली आणि मी स्वस्थ झालो. उमाबाई परित्यक्त, 'डेझर्टेड' आहेत हे सांगून त्रिंबकरावांनी स्वतःवरील जबाबदारी झटकल्यावर, माधवरावांनी त्यांची समजूत घालण्याचे काम पुढे चालूच ठेवले होते. उमाबाई परित्यक्त आहेत हे सांगत असताना त्रिंबकराव माधवरावांना पुत्रकर्तव्याची आठवण करून देत होते आणि माधवरावांनी 'हिंदू कायद्यानुसार' आईवडिलांना आधार दिला पाहिजे असे बजावीत होते! त्यावर २८-१-२१ च्या पत्रात माधवरावांनी पुत्रकर्तव्य मान्य केले; पण त्रिंबकरावांना त्यांच्या कर्तव्याचीही मर्यादापूर्वक जाणीव करून दिली. त्रिंबकरावांनी स्वकष्टार्जित मिळकतीतून बायकोची व स्वतःच्या मुलांची ("युवर चिल्ड्रेन") तरतूद एक वेळ केली नाही, तरी वडिलार्जित मिळकतीतून ती करायला हवी, असे माधवरावांनी लिहिले. माधवरावांच्या या लिहिण्यात त्रिंबकरावांच्या कर्तव्याच्या निर्देश तर होताच, पण कर्तव्य ज्या नात्यामुळे प्राप्त होत होते त्या पितृत्वाच्या नात्याचीही स्पष्ट नोंद होती.

त्रिंबकरावांना नाते जर अमान्य असते तर उत्तरात त्यांनी तसे म्हणणे क्रमप्राप्त होते. कारण "Uma was deserted for more than 13 years" असे वेधडक म्हणण्याच्या विथरलेल्या मनःस्थितीत ते या वेळी होते. पण उत्तरात त्यांनी नाते नाकारले नाही आणि विनू नि यमू ही आपलीच मुले आहेत अशा भूमिकेत सर्व पत्रव्यवहार केला. या मुलांच्या जन्मासंबंधी काही प्रवाद असेल याची पुसटशीदेखील जाण या पत्रव्यवहारात ते दाखवीत नाहीत. तेव्हा त्यांच्या या वृत्तीवरूनही प्रवादाविरुद्ध निर्णय घेणे भाग होते.

माधवरावांची नि विशेषतः त्रिंबकरावांची वृत्ती उलगडून प्रवादाचे असे निराकरण झाल्यावर मी सगळ्या प्रवाद-प्रकरणाचे सिंहावलोकन केले आणि पूर्वीचे अनुकूल-प्रतिकूल मुद्दे पुन्हा एकमेकांशी जुळवून बघितले. या वेळी प्रवादाला प्रतिकूल असणारे मुद्दे मला अधिक ग्राह्य वाटले. मी 'केसरी'त जे लेख लिहिले ते यानंतर लिहिले, पण प्रवादाविषयी मनात झालेला निर्णय मनातच ठेवून, पूर्वी म्हटल्याप्रमाणे, ते मुद्दाम उत्क्षोभक शैलीत लिहिले. त्यामुळे प्रवादाच्या निर्मितीला कारण झालेली परिस्थिती जाणण्यात मला कशी मदत झाली, ते याआधी सांगितले आहे. 'प्रवाद असला तरी तो खोटा होता' याविषयी मी निःशंक झाल्यावरही 'स्वप्नभूमी'मधल्या ज्या उल्लेखामुळे प्रवादाचा विषय माझ्या डोक्यात शिरला होता त्या उल्लेखाचा निर्वाह झालेला नव्हता. यानंतर थोडी कल्पना चालविल्यामुळे तो होऊ शकला. गिरीशांनी असे लिहिले होते, की "एकदा माधवराव यमूशी बोलताना एकदम म्हणाले, 'तू मला तात्या म्हणू नको! मी तुझा कुणी नाही!'" माधवराव असे का म्हणले? भावाचे नाते त्यांना खरोखरच नाकारायचे होते काय? मला वाटले, की माधवरावांच्या उद्‌गारांचा अर्थ वेगळ्या संदर्भात लावला पाहिजे. या उद्‌गारांबद्दल गिरीशांनी यमूला विचारल्यावर यमूने त्यांचा संदर्भ उमाबाईसंबंधी असलेल्या प्रवादाशी जोडला. कारण त्या प्रवादाचे कुसळ तिच्या मनात टुसटुसत होते. तिने रामभाऊ मराठ्यांशीही एकदा प्रवादाचा विषय उत्पन्न केलेला होता. (आठवणी, दि० ११-५-७१). पण या उद्‌गारांचा संदर्भ प्रवादाशीच जुळतो, असे नाही. माधवरावांच्या आवडीनावडी नावांविषयी फार तीव्र असत. पत्नीच्या 'गंगू' या नावामुळे ते किती रागावत, अस्वस्थ होत, ते 'आमची अकरा वर्षे'मध्ये बघायला मिळते. (पृ० १६३-६४) माधवरावांना 'तात्या' हे संबोधनही आवडत नसे. स्वतःच्या मुलांनी स्वतःला 'तात्या' ऐवजी 'ताता' म्हणावे, अशी त्यांची शिकवण असे. तेव्हा "तू मला तात्या म्हणू नकोस" असे यमूला त्यांनी सांगितले असेल.—आणि घरातल्या माणसांच्या चमत्कारिक वर्तनाने ते फार पोळलेले होते. यमूला "विदूषी" करण्याचे त्यांचे स्वप्न डाबमाईंच्या सनातनी समजुतींमुळे धुळीस मिळाले होते. म्हणून "मी तुझा कोणी नाही" असे वैतागाच्या भरात यमूला ते बोलले असतील. 'स्वप्नभूमी'तील उल्लेखाचा हा निर्वाह मला समाधानकारक वाटला.

जुन्या मुद्द्यांचा निचरा होत असताना, 'प्रवादात तथ्य नव्हते' असे सूचित करणारे काही नवे मुद्देही मला सुचत गेले. थोरल्या मामांना माधवरावांनी नवयौवनात एकदा 'ऑर्थोडॉक्स डेव्हिल' म्हटले असेल; पण त्यांच्या कुटुंबीयांपैकी या मामांशीच त्यांचे संबंध सर्वांत अधिक जिव्हाळ्याचे होते. मामांचे घर सोडून ते दुसरीकडे राहू लागले तरी त्या घरी त्यांचे जाणे-येणे चालूच होते. मोठेपणी मुलाच्या मुंजीत तर मामांना त्यांनी फार आदराने वागविले आणि त्यांना एक चांदीचे

घड्याळही भेट दिले. उमाबाईंनी माधवरावांना मातृप्रेम दिले नाही; पण माधवराव आईचा तिरस्कार करताना कोठेही दिसत नाहीत. ते आईला सतत पैशाची मदत करीत होते आणि आईचे प्रेम मिळावे म्हणून भुकेले होते. "सौ० उमा तापाने आजारी असल्यामुळे मी काल तिला भेटायला, तिच्यासाठी म्हणूनच, गेलो होतो. पंधरा मिनिटे बिछान्यावर...बोलत बसलो होतो. पण विहिरीत नाही तर पोहऱ्यात कोठून येणार?" असे उद्‌गार १९१४ च्या एका पत्रात त्यांनी काढले आहेत. त्या उद्‌गारांत आईवर राग आहे; पण तो प्रेमाचा राग आहे. त्यांना प्रेम हवे होते. पण ते मिळत नव्हते; नि म्हणून ते रागावले होते. शेवटी शेवटी आई त्यांच्या घरात राहायला आली तेव्हा त्यांना आनंद झाला; आणि मृत्युशय्येवर असताना अभंग लिहून आईच्या पायांना त्यांनी अभंग मिठी मारली! मामा नि आई यांच्याविषयी त्यांची ही सुसंगत वृत्ती मी बघितली आणि त्या दोघांविषयी त्यांच्या मनात काही संशय असेल हे मला पटेनासे झाले. किंबहुना 'ॲथॉडॉक्स डेव्हिल' हा उल्लेख मामांच्या अनैतिक वर्तनाविषयी असण्यापेक्षा त्यांच्या कडक सनातनीपणाविषयी असेल, असे वाटू लागले. कदाचित तो मामांच्याविषयी नसेल नि सनातनी कल्पनांनी मामांचे घर ग्रासून टाकणाऱ्या काल्पनिक वास्तुपुरुषाविषयी असेल, अशीही कल्पना मनात चमकून गेली. निदान मामांच्या वर्तनाविषयी माधवरावांच्या मनात विकल्प आलाच असला तरी तो प्रासंगिक होता, स्थायी नव्हता, याविषयी माझी खात्री पटली.

माधवरावांची वृत्ती सोडून मी उमाबाईंच्या जीवनाकडे साकल्याने बघू लागलो तेव्हाही 'प्रवादात तथ्य नव्हते' हाच निष्कर्ष बळकट होऊ लागला. मुळात मामांच्या घरात अनाचाराला फार फार प्रतिकूल परिस्थिती होती. कारण घर होते लहान, बैठे, तीन खण रुंद नि दहा खण लांब. त्यात माणसांची होती गर्दी. दोन मामा, त्यांच्या बायका, प्रत्येकाची दोनतीन मुले, उमाबाई, नि उमाबाईंची दोनतीन मुले असा लवेदा असे. या सर्वांवर उमाबाईंच्या आईची सारखी करडी नि कडक नजर फिरत राही. जरा इकडेतिकडे झाल्यास त्या बाईच्या शब्दांचे चाबूक कडाकड उडत. तेव्हा प्रवादाने गृहीत धरलेली गोष्ट अशा घरात घडणे शक्य होते का? दुसरे असे की उमाबाईंची मनोवृत्ती तसल्या गोष्टींशी तिळभरही जुळत नव्हती. त्या व्रतैवैकल्ये नि देवदेव यांत फावल्या वेळी रमलेल्या असत. परंपरेने पवित्र ठरलेला आचारधर्म प्रत्येकाने पाळलाच पाहिजे याविषयी त्यांचा आग्रह असे. माधवरावांनी जातीबाहेरच नव्हे, तर पोटजाती-बाहेरही लग्न करणे त्यांना अगदी पसंत नव्हते. विधवेशी लग्न केल्यास सारा भ्रष्टाकार होईल, अशी त्यांची पक्की समजूत होती. पुढे पुनर्विवाहित विधवेच्या नि देशस्थ अशा मुलीशी माधवरावांनी लग्न केले आणि कऱ्हाड्याशी यमूने लग्न केले, त्यामुळे त्यांचा तळतळाट झाला. एका समारंभप्रसंगी इतर नवविवाहितांच्या मागोमाग यमू नि मोहनराव जोडीने त्यांना नमस्कार करायला गेली तर त्या तटकन वळून बाजूला झाल्या. यमूचे गर्भाधान झाले नव्हते म्हणून तिच्या हातचे अन्न त्या घेत नसत! पावित्र्याची असली वेडी पण कडवी जपणूक करणाऱ्या उमाबाई भावाच्या घरात अनाचार करतील, हे मला संभाव्य वाटेना. मला हे ठाऊक आहे, की काही व्यक्ती करूनसवरून भागल्यावर मग देवपूजेला लागतात. फार भ्रष्ट असल्याने काही व्यक्ती फार सोवळ्या होतात. पण उमाबाईंना तसल्या व्यक्तींत ढकलणे मला अशक्य झाले. विशेषतः, श्री० मोहनराव शहाणे, डॉ० कमल गोखले नि सहस्रबुद्धे आजी यांच्या

आठवणींनी ज्या उमाबाई माझ्या दृष्टीसमोर उभ्या केल्या त्या उमाबाई प्रवाद-दर्शित उमाबाईंशी कुठेही जुळू शकत नव्हत्या.

प्रवाद-प्रकरण असे निकालात निघाले; पण उमाबाईंसंबंधी सर्वच प्रश्न सुटले नाहीत. विशेषतः उमाबाईंनी माधवरावांना नि इतर मुलांना अगदी कोरडेपणाने का वागवले, हा प्रश्न शिल्लक राहिला होता; आणि 'असतो एकेकाचा स्वभाव!' असे म्हणून त्याची बोळवण करणे मला जड जात होते. पण त्रिंबकरावांच्या वेडसरपणाचा जेव्हा मी माग काढला तेव्हा उमाबाईंच्या 'कोरडे'पणाचा प्रश्न, थोडीशी कल्पना चालवताच, आपोआप सुटला. अर्थात त्या प्रश्नाचा इतिहास सांगायचा तर त्रिंबकरावांकडे वळले पाहिजे.—म्हणजेच जुळ्या कोड्याची दुसरी बाजू हातात घेतली पाहिजे.

माधवरावांना 'वेताळ' नावाचे जे मानसिक झटके येत त्यांचा माग मी कसा काढला ते मागील प्रकरणात सांगितले आहे. (पृ० ५९). हे मानसिक झटके आनुवंशिक असतील का, असा प्रश्न नंतर माझ्यापुढे उभा राहिला आणि त्रिंबकरावांच्या वेडसरपणाचा शोध मी घेऊ लागलो. त्रिंबकरावांना प्रौढ वयात, १९३२ साली वेड लागले, येरवड्याच्या मानसिक रुग्णालयात त्यांना ठेवावे लागले, आणि तेथेच १९३७ साली त्यांचा अंत झाला, हे मला ठाऊक होते. ते "येरवड्याच्या इस्पितळात सहासात वर्षे" होते, असे खानोलकरांनी म्हटले आहे नि १९ नोव्हेंबर १९३० च्या पत्रात लीलाबाईंनी येरवडाभेटीचे केलेले वर्णन खानोलकरांनी उद्धृत केले आहे. (पृ० २६५) पण १३ नोव्हेंबर १९३२ ला त्रिंबकरावांना येरवड्याला प्रवेश देण्यात आला, हे येरवड्याच्या दप्तरावरून पुढे मला समजले, आणि लीलाबाईंचे पत्र १९ नोव्हेंबर १९३० चे नव्हे तर १९ नोव्हेंबर १९३२ चे होते, हेही अंतर्गत पुराव्यावरून माझ्या ध्यानात आले. त्रिंबकरावांचे शेवटच्या काळातले हे वेड जर वार्धक्यातून उद्भवलेले असेल तर त्याचा आनुवंशिक परिणाम माधवरावांवर होणे शक्य नव्हते, हे मला स्पष्ट दिसत होते. तेव्हा १९३२ पूर्वी नि माधवरावांच्या जन्माच्या सुमारास हे वेड किंवा त्याची चिन्हे त्रिंबकरावांच्या टिकाणी होती काय, ते मी तपासू लागलो. या तपासाकडे लक्ष वळल्यावर अचानक मराठ्यांकडील एक पत्र मला अंधुक आठवले नि त्याची टिपणे मी काढून बघितली. गंमत अशी, की त्या पत्राने त्रिंबकरावांचे वेड खाडकन १९१७ पर्यंत, म्हणजे सुमारे पंधरा वर्षे, मागे गेले! त्या पत्रात माधवरावांनी मराठ्यांना कळवले होते, की अण्णा (म्हणजे त्रिंबकराव) अवळसला आपल्या चुलत्यांशी अद्वातद्वा भांडले आणि चुलते विनवण्या करीत असता, त्या न जुमानता, कोठेतरी निघून गेले. पुढे तीन दिवसांनी, विचारशक्ती नि स्मृती भ्रष्ट झालेल्या अवस्थेत, मुंबईला एका पोलिसाला ते आढळले. पोलिसाने सरदेसाई नामक गृहस्थांकडे त्यांची सोय लावली; पण तेथूनही ते निसटले, आणि नर्मदाकाठच्या जानक गावाकडे गेले!—इत्यादी. या पत्रावर २७-७-१७ ही तारीख होती; तेव्हा त्रिंबकरावांचे वेड त्याच्याही आधीचे होते, याविषयी संशय राहिला नाही. पण माधवरावांचा जन्म १८९४ चा नि हे पत्र १९१७ चे; त्यामुळे मधली तेवीस वर्षे त्रिंबकरावांच्या वेडाची स्थिती काय होती, हा प्रश्न दुर्ध्यातच राहिला. मी येरवड्याच्या मानसिक रुग्णालयाच्या दप्तराकडे मुळात वळलो तो हा प्रश्न सोडविण्यासाठीच वळलो. रुग्णालयात रोग्याचा जो पूर्वेतिहास नोंदवलेला असतो त्यात

त्रिंबकरावांच्या वेडाचा प्रारंभकाळच सापडेल, अशी माझी अटकळ होती. थोड्याशा खटपटीने आणि डॉ० वि० रा० देव नि श्री० दा० वि० ओक यांच्या कृपेने येरवड्याला १९७१ च्या मे मध्ये त्रिंबकरावांची 'फाइल' मला बघायला मिळाली. तीमध्ये त्यांच्या वेडाची पुष्कळच माहिती तपशीलवार नोंदवलेली होती आणि माझे चरित्रकथन सजवायला नि सजीव करायला मला ती खूप उपयोगीही पडली. पण त्या 'फायली'त मला जी माहिती मुळात हवी होती ती मात्र नेमकी आढळली नाही! "Whether this is first attack of lunacy" या कलमापुढे फायलीत "First" अशी नोंद होती आणि "Age.. on first attack" या कलमापुढे "about 60 years" अशी नोंद होती. १९३२ साली त्रिंबकरावांना रुग्णालयात प्रवेश दिला तेव्हा त्यांचे वय एकाहत्तर वर्षांचे होते. त्यावरून हिशेब करता त्यांचे १९३२ चे वेड फक्त १९२१ सालापर्यंत मागे जात होते. पण मला त्रिंबकरावांचा १९१७ सालचा वेडाचा झटका मराठ्यांकडील पत्रात आधी माहीत झालेला होता. तेव्हा रुग्णालयातील नोंदी काळजीपूर्वक केलेल्या नव्हत्या, असा निष्कर्ष काढून मी साहजिकच नव्या माहितीकडे दृष्टी लावली.

त्रिंबकरावांना त्यांच्या बालपणी किंवा तरुणपणी ओळखणारी व्यक्ती मला भेटली असती तर हवी असलेली नवी माहिती मला मिळाली असती. पण १९७३ च्या जानेवारीपर्यंत तसा योग आला नाही. त्या वेळी मात्र पूर्वोक्त सहस्रबुद्धे आजींची गाठ पडली आणि मला हवी असलेली माहिती बव्हंशी मिळाली. दहाएक वर्षांच्या माधवरावांना नि आणखी एका धाकट्या मुलाला घेऊन १९०४ साली उमाबाई बडोद्याला गेल्या; तेव्हापासून सहस्रबुद्धे आजी उमाबाईंना जवळून ओळखीत होत्या आणि त्रिंबकरावांना अधूनमधून पाहत होत्या. त्यांनी सांगितले, की एकदा भाडभूतच्या यात्रेला त्या गेल्या असता भडोचला त्रिंबकराव नि उमाबाई यांच्या बिऱ्हाडी त्या उतरल्या होत्या आणि तेथे त्रिंबकरावांचे चमत्कारिक वागणे त्यांच्या दृष्टीस पडले होते. "तेव्हाही त्रिंबकरावांमधील भ्रमिष्टपणाची झाक आम्हाला जाणवली होती. ते नुसते कुठेतरी बघत गप्प बसून राहत. गंगूताईंनी (म्हणजे उमाबाईंनी) आंघोळीला पाणी दिले तर आंघोळ करीत. कावळा (नुसता) दिसला तरी 'अपशकुन झाला' म्हणत."—सहस्रबुद्धे आजींची ही आठवण त्रिंबकरावांचे वेड (किंवा वेडसरपणा) १९१७ वरून १९०४-५ पर्यंत मागे नेत होती. माधवरावांच्या जन्मकाळात नि या काळात आता फारसे अंतर उरत नव्हते. तेव्हा माधवरावांचा जन्म झाला त्याच्या आधीपासूनच त्रिंबकराव वेडसर, भ्रमिष्ट असले पाहिजेत, असे अनुमान मी काढले. हे अनुमान काढल्यावर माधवरावांचे मानसिक झटके किंवा वेताळ आनुवंशिक असावा, हे ओघानेच आले.

त्रिंबकरावांच्या वेडाचा माग मी काढू लागलो तेव्हा काहीतरी अनोळखी प्रदेशाच्या मुशाफरीला आपण चाललो आहोत अशी अद्भुताने शहारलेली भावना मला सुखवीत होती. जेव्हा येरवड्याच्या मानसिक रुग्णालयाच्या दप्तरापर्यंत मी पोचलो तेव्हा तर अलीबाबाच्या गुहेत शिरल्यासारखे मला वाटले. पण जेव्हा माग सापडू लागला, नि अखेर तो बव्हंशी सापडला, तेव्हा विषण्णतेचे एक पटल मनाला वेढून बसले. वाटले, की वडिलांच्या वेडामुळे माधवरावांना जन्मतः असंख्य कसला मनोविकार जडून बसला! त्या विकारामुळे जन्मभर त्यांच्या हळव्या, संवेदनाक्षम हृदयाचे किती हाल झाले, किती तडफड झाली! हा कविविहंग गगनात उंच भराऱ्या

घेण्यासाठी परमेश्वराने जेव्हा सोडून दिला तेव्हाच त्याच्या पायाला विकाराचा हा पाश करकचून कशासाठी बांधला? जो अधूपणा देऊन परमेश्वर मनुष्यप्राण्याला जन्माला घालील तो अधूपणा बरोबर घेऊनच त्याला जगात वावरायला हवे. ही बज्रलेप परवशता सारी उभारी खचवून टाकणारी आहे. माधवरावांनी बाणेदारपणाने घर सोडले, वडिलांकडून पैची अपेक्षा न करता स्वतःचे उच्च शिक्षण पार पाडले; पण वडिलांचे वडीलपण ते तोडू शकत नव्हते. वडिलांच्या वेडाने त्यांच्या रक्तातच ठाणे दिले होते; ते ठाणे ते कसे उठवणार? एक पाय जन्मतः आखूड असल्याने तरसाला म्हणे तीन पायांवर जन्मभर लंगडतच चालावे लागते; तशीच त्यांची अवस्था होती. आपल्या विकारावर झगडून झगडून उत्तर आयुष्यात त्यांनी विजय मिळवला; ती त्यांची बहादूरी. पण तोवर आयुष्याची, ऐन भरातली, छत्तीस वर्षे काळवडली, विपारली, त्याचे काय? निष्ठुर दैवगतीच्या हातातले माधवराव एक खेळणे होते. त्या सुंदर, राजस खेळण्याचा दैवगतीने केलेला चेंदामेंदा बघून मी स्वतःशीच पुनःपुन्हा हळहळलो!

त्रिंबकरावांच्या वेडाचा माग काढता काढता उमाबाईंच्या कोरडेपणाचे किंवा वात्सल्यशून्यतेचे रहस्य मला कसे उकलले, ते आता सांगता येईल. जी माहिती मी जमवीत होतो तीमधून त्रिंबकराव नि उमाबाई या दोघांची व्यक्तिचित्रे माझ्या कल्पनेसमोर आकार घेत होती. त्या चित्रात, त्रिंबकराव वेडसर तर होतेच, पैशापायी संशयी झालेले तर होतेच, पण विड्या फुंकून छातीचे खोके झालेले, अगदी अस्वच्छ, कळाहीन, नि बुरसट असे होते. त्यांना धुरकट, आंबूस वास येत होता! उलट, उमाबाई होत्या फार निर्मळ, फार टापटिपीच्या, केतकीच्या पानासारख्या कांतिमान नि धारदार! त्यांना केतकीचा सुगंधही येत होता! ही दोन माणसे पतिपत्नी म्हणून जर जवळ आली, पत्नीधर्म म्हणून पतीला देहार्पण करण्याची पत्नीवर जर पाळी आली, तर काय होईल? मी कल्पनेने उमाबाई झालो आणि अनुभव घेऊ लागलो. स्वच्छ पत्नीला गलिच्छ पतीशी समागम म्हणजे नरक वाटला असेल. तो समागम हक्काने मागणाऱ्या पतीविषयी तिरस्कार उत्पन्न झाला असेल. समागमाविषयी मनात कायमची अढी बसली असेल आणि त्यातून झालेली मुले आपलीशी वाटली नसतील! मुलांनी स्तनाला ओठ लावला तरी स्तनातून तटतटून पान्हा फुटला नसेल. मुले बघून केव्हा केव्हा तिच्या शरिराचे लाकूड होत असेल! थोडी मनोवैज्ञानिक कल्पकता चालवताच उमाबाईंच्या कोरडेपणाचे, वात्सल्यशून्यतेचे आणि पतीसंबंधीच्या दुराव्याचेही रहस्य माझ्यापुढे असे सहज उलगडले. ज्या परिस्थितीमुळे उमाबाई अ-साधारण—'अब्नॉर्मल'—झाल्या त्या परिस्थितीचा विचार केल्यावर माझी त्यांच्याविषयीची भावना साफ बदलली. खानोलकरांच्या लिहिण्यावरून, आपल्या "तटस्थ व सहानुभूतिशून्य वृत्तीमुळे" नवऱ्याच्या जीवनात "भकासपणा" आणणारी एक भयंकर स्त्री असा त्यांच्याविषयी माझ्या मनावर संस्कार होता. पण आता मला त्या करुणास्पद वाटू लागल्या. बिचारी सौभाग्यात पतिसुखापासून वंचित होती आणि मातृत्वात अपत्यसुखाला आचवली होती! समाजात एका घाणरेड्या प्रवादाने तिची पारध चालवली होती! एका दुर्दैवी, दुःखी, नि दुःखाने दाटरलेली स्त्री म्हणून उमाबाईंचे वर्णन सदय लेखणीने चरित्रात केले पाहिजे, असे मी ठरवून टाकले.

आईवडिलांचा शोध घेत असता, त्यांचा माधवरावांवर कोणता परिणाम झाला, हा प्रश्न मी सतत

दृष्टीसमोर ठेवला होता. त्यामुळे वडिलांच्या वेडाचे प्रतिबिंब माधवरावांच्या 'वेताळा'त उमटलेले मला कसे दिसले, ते आताच सांगितले. वडिलांनी न दिलेला आधार नि प्रम ही मिळवण्यासाठी माधवराव पूर्ववयात चंद्रशेखरांकडे नि उत्तरवयात तांब्यांकडे कसे वळले, ते याआधी तिसऱ्या प्रकरणात दिग्दर्शित केले आहे. (पृ० ५२). शिवाय त्यांचे श्वशुर बाबासाहेब गरुड यांच्या बाबतीतही तसलाच प्रकार मला आढळला. "बाबांना ते आपल्या वडिलांच्या ठिकाणी मानीत" हे लीलाबाईंचे वाक्य वाचल्यावर मला माझ्या अनुमानाला आधार मिळाल्यासारखे वाटले. (...वर्षे, पृ० १६८). माधवराव प्रियकर म्हणून जरी शांताबाईंवर प्रेम करीत होते तरी दोघांनी मातापुत्राचे नाते एकदा घेतले होते, हे खानोलकरांच्या पुस्तकावरून मला माहीत होते. माधवरावांनी शांताबाईंवर एकीकडे प्रियकर म्हणून प्रेम करावे नि दुसरीकडे पुत्र म्हणून त्यांच्याकडून वात्सल्याचीही अपेक्षा करावी, ही गोष्ट मला कशी चमत्कारिक वाटली होती, नि तिचा शोध मी कसा घेत होतो, याचा उल्लेख यापूर्वी पहिल्या नि तिसऱ्या प्रकरणात येऊन गेला आहे. (पृ० ५, ८, ४६, ४७). प्रेयसीकडून वात्सल्याची अपेक्षा करण्याची माधवरावांची ही जी विशिष्ट प्रवृत्ती तिचा संबंध मी साहजिकच त्यांची वात्सल्याबाबत जी उपासमार झाली होती, आईने त्यांची जी उपेक्षा केली होती, तिच्याशी जोडला. मला वाटले, की त्यांना जे आईकडून मिळाले नाही ते प्रत्येक स्त्रीत ते शोधीत राहिले आणि प्रणय नि वात्सल्य यांची त्यांच्या जीवनात चमत्कारिक गल्लत झाली. माझ्या या अन्वयार्थाला विठ्ठलराव घाटे यांच्या लेखनाचाही आधार होता. (दिवस०, पृ० ३५४). माधवरावांच्या मनात पोरकेपणाची आणखी एक भावना एखाद्या अशुभ अभ्रासारखी आमरण तरळत होती. ती त्यांच्या पत्रांत दिसते आणि कवितांतही दिसते. आपण भूतलावर एकाकी आहोत, निराधार आहोत, असे त्यांना वाटे आणि वाट हरवल्यासारखे ते सैरभैर होत. त्यांच्या या भावनेचा उगमही त्यांच्या गृहत्यागात नि त्यांच्या आईवडिलांच्या निष्प्रेम, दुराव्याच्या वागणुकीत मला दिसून आला.

माधवरावांच्या आईवडिलांचा शोध मी एवढ्या परिश्रमाने घेतला; पण तो जसाच्या तसा चरित्रात समाविष्ट केला का? निदान त्याचे फलित तरी चरित्रात मांडले का? चरित्र शोधकपणे चाळले तर या शोधाचे बहुतेक निष्कर्ष त्यात आढळतील; पण उमाबाईसंबंधी जो प्रवाद होता त्याचा उल्लेख आढळणार नाही. असे का? खरे म्हणजे या प्रवादाचा उल्लेख मी चरित्रात प्रथम केलेला होता आणि माधवरावांनी मामांचे घर सोडले त्याला हा प्रवाद अंशतः कारणीभूत असावा, ही गोष्टदेखील त्यात सांगितली होती. संशोधनात जे सत्य हाताशी लागेल ते निर्मळपणाने वाचकांपुढे ठेवायचे या माझ्या भूमिकेशी ते सुसंगतच होते. पण पुढे प्रवादाचा उल्लेख मला टोचू लागला. मला वाटले, की प्रवाद उठला हे सत्य असले, तरी तो खोटा होता याविषयी आपली खात्री पटली आहे ना? मग खोट्या प्रवादाची नोंद का करायची? वरदा-प्रकरणात माधवरावांविषयी अनेक खोटे प्रवाद उठले होते नि त्यांची नोंद मी केली होती. पण ते प्रवाद नि हा प्रवाद यांना एकाच पंक्तीला बसवणे मला योग्य वाटेना. वरदा-प्रकरणातल्या प्रवादांचे निःशेष निराकरण मी जे इतर निवेदन केले होते त्या निवेदनाच्या ओघात होऊन जात होते. पण या प्रवादाचे तसे नव्हते. हा प्रवाद खोटा होता, असे नुसते विधान मी करू शकत होतो. पण तेवढ्याने वाचकांचे समाधान होईलच अशी खात्री नव्हती. बरे, त्या

विधानाच्या जोडीला सारे युक्तिवाद मांडून वाचकांचे समाधान करावे, तर ग्रंथविस्तार तर होतच होता, पण विषयान्तराचा दोषही पदरात पडत होता. कारण ते युक्तिवाद माधवरावांच्या चरित्रापेक्षा उमाबाईंच्या चरित्राला जास्त अनुरूप होते. शिवाय, संशोधनात अंतर्भूत असलेले युक्तिवाद चरित्रात मांडायचे नाहीत, तर त्यांचे फल किंवा निष्कर्ष लक्षात बाळगून, घटना-प्रसंग सांगत सांगत भूतकाळ वाचकांसमोर उभा करायचा, अशी निवेदनशैली मी स्वीकारली होती. युक्तिवाद सांगितल्याने माझी ती शैली बिघडत होती आणि चरित्राच्या एकूण आशयात सात्म्य न पावणारी काही वस्तू मी मुद्दाम घुसवली असे होत होते. तेव्हा ज्या प्रवादाचे निःशेष निराकारण होऊ शकत नाही—शैली, विषयान्तर, ग्रंथविस्तार वगैरे गोष्टी विचारात घेतल्यामुळे होऊ शकत नाही —तो प्रवाद खोटा असूनही नोंदवायचा का, असा मला प्रश्न पडला. तो नोंदवल्यास उमाबाईंवर आपण मोठा अन्याय करू असे मला वाटले. बडोद्यातल्या ज्या लोकांनी तो प्रवाद पिकवला नि उमाबाईंचा कळत नकळत असह्य छळ केला त्या लोकांच्या वेजबाबदार गटात सामील व्हायची माझी तयारी नव्हती. उमाबाईंच्या मृत्यूनंतरही त्यांच्यावर उगाच शिंतोडे उडावे, हे मला मानवले नाही. तेव्हा, प्रवादाचा उल्लेखच गाळावा, असा विचार मी करू लागलो. जवळजवळ सर्व चरित्र लिहून झाल्यावर माझ्या असेही लक्षात आले, की या प्रवादाचा माधवरावांच्या जीवनावर कोणताच स्थायी परिणाम दिसत नव्हता. जिचा मागे-पुढे काही संबंध नाही नि जी नुसतीच अंधातरी लोंबकळत आहे अशी माधवरावांच्या जीवनातील ती एक उपरी घटना होती. माधवरावांनी मामांचे घर सोडले तेव्हा त्या घटनेचा काही प्रासंगिक परिणाम झाला असेल; पण तो संदिग्ध होता, पुसट होता. प्रवादाचे एकंदर चरित्रातील नगण्य स्थान असे लक्षात आल्यावर प्रवादाचा भाग अर्थातच मी फाडून टाकला! सत्य सांगणे हा चरित्रकाराचा धर्म असला तरी सर्वच सत्य त्याला सांगता येत नाही, त्याने सांगणे योग्यही नसते, या विचाराचा मला आलेला हा एक खास अनुभव होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय मंडळे
3128
शाखा (स्थळ प्रती)

शोध : शांताबाईंचा

खानोलकरांच्या पुस्तकातील माधवराव नि शांताबाई यांच्या प्रेमसंबंधाचा भाग वाचल्यावर माझी जिज्ञासा कशी जागी झाली आणि त्या प्रेमसंबंधाचे वेगळेच रूप मला कसे दिसू लागले, त्याचे वर्णन मी पहिल्या प्रकरणात केले आहे. (पृ० ३ ते ८). त्याचा सारांश असा, की खानोलकरांचे स्वतःचे भाष्य किंवा निवेदन एका दिशेने चालले आहे नि त्यांनी उद्धृत केलेली अस्सल साधनसामुग्री दुसऱ्या दिशेने वाटचाल करीत आहे, हे मला स्पष्टपणे दिसून आले. खानोलकरांचे भाष्य म्हणत होते, की शांताबाईंच्या मनात माधवरावांविषयी कौतुक होते, स्नेहभाव होता. पुढे त्यांच्या मनात प्रीतीचाही उद्भव झाला. पण त्यांना अध्यात्माची ओढ होती नि एका स्वामींविषयी आकर्षण वाटत होते. त्यामुळे प्रेम की अध्यात्म, माधवराव की स्वामी, असा त्यांना प्रश्न पडे. प्रीतीच्या एका उत्कट प्रसंगात माधवरावांकडे त्यांनी विवाहाची विचारणा केली, पण लगेच त्या बदलल्या. आपण चार वर्षांनी वडील आहोत म्हणून हा विवाह नको, असे त्या म्हणाल्या. पण अध्यात्म नि स्वामी यांनीच त्यांना बाजूला खेचले असावे. खानोलकरांनी उद्धृत केलेली साधनसामग्री मात्र असे दर्शवीत होती, की शांताबाईंना माधवरावांविषयी कौतुक असले तरी ते फार मर्यादित होते. अनेकदा माधवरावांची त्या थट्टाच करीत असत. त्यांच्या मनात माधवरावांबद्दल प्रीती उद्भवलीच असेल तर ती अगदी फिकी होती. माधवराव त्यांच्याहून लहान होते नि त्या त्यांना "विचारा मुलगा" समजत. भरदार पुरुषाबद्दल तरुण स्त्रीला जे आकर्षण वाटते ते त्यांना माधवरावांविषयी वाटत नव्हते, तर स्वामींविषयी वाटत होते. त्यांच्या स्वभावात जन्मतः पुरुषीपणा मिसळलेला होता. त्यामुळे माधवरावांचे बुजरे, मुलायम, काव्यात्म प्रेम त्यांना भिडणे शक्य नव्हते. स्वतःभोवती पुरुषांची प्रभावळ फिरवत ठेवावी नि स्वतःच्या अहंतेचे कोडकौतुक करवून घ्यावे, अशी त्यांना सवय होती. त्या सवयीखातर माधवरावांना त्यांनी जवळ केले आणि दीर्घ काळ खेळवीत ठेवले. विवाहाची विचारणा करून लगेच पलट खाण्यात खऱ्या प्रीतीपेक्षा या खेळवण्याचा भागच अधिक असावा!

माधवराव नि शांताबाई यांनी आपल्या प्रेमसंबंधात केव्हा तरी 'आई व मूल' हे नाते स्वीकारले होते. शांताबाईंनी लग्नाच्या कल्पनेतून अंग काढून घेतल्यावर हे नाते सुरू झाले, असे खानोलकर म्हणतात आणि हे नाते चालू असताना माधवरावांच्या मनात खरोखरच शुद्ध पुत्रभाव जागृत होता असे सूचित करतात. पण साधन-सामग्रीवरून माझ्या असे लक्षात आले, की माधवरावांनी पुत्राची भूमिका स्वीकारलेली असली तरी त्यांची प्रियकराची भूमिका सुटलेली नव्हती. त्यांच्या त्या वेळच्या पत्रांत नि कवितांत मातृप्रेमामध्ये प्रणय मिसळलेला आढळतो. माधवरावांच्या प्रेमभावनेला मत्सराचा किंवा क्रोधाचा स्पर्श झाला होता किंवा नाही याविषयी

खानोलकर काहीही विधान करीत नाहीत. पण साधनसामग्रीवरून मला असे दिसले, की पुढे निर्मत्सर प्रेमाची गाणी गाणारे माधवराव स्वतःच्या प्रेमात व्यत्यय आला तर त्या काळी मत्सराच्या नि क्रोधाच्या आहारी जात असत!

चरित्रलेखनाचा संकल्प सोडण्यापूर्वी माधवराव नि शांताबाई यांच्या प्रेमसंबंधाविषयी माझे विचार असे विकसित झालेले होते. चरित्रलेखनाचा संकल्प सुटून जेव्हा खानोलकरांनी उल्लेखिलेली सामग्री मी प्रत्यक्ष पाहू शकलो तेव्हा त्या विचारांचा मी पडताळा घेतला. खानोलकरांनी शांताबाईंच्या 'माझें जीवन' या आत्मचरित्राचा, नि त्या आत्मचरित्रासाठी ठेवलेल्या टिपणांच्या 'स्मरण-वही'चा, आधारासाठी उपयोग केला होता. माधवरावांच्या काही खाजगी पत्रांची मदतही त्यांनी घेतली होती. ही सर्व सामग्री मूळ स्वरूपात किंवा विस्तृत उताऱ्यांच्या स्वरूपात मला खुद्द खानोलकरांकडेच बघायला मिळाली. पण मौज अशी की तीमुळे माझ्या पूर्वविकसित विचारांत मला फारसे महत्त्वाचे बदल करावे लागले नाहीत. उलट, खानोलकरांशी माझे जे मतभेद होते त्यांना सर्वत्र पाठिंबाच मिळत गेला.

माझ्या आधीच्या निष्कर्षांत किंवा अंदाजांत मला जे गौण बदल करावे लागले त्याची दोन उदाहरणे मला चांगली आठवतात. पैकी पहिला बदल शांताबाईंनी माधवरावांच्या प्रेमाचा स्वीकार का केला या प्रश्नाच्या कारणमीमांसेमध्ये होता. शांताबाईंनी बरेच दिवस माधवरावांना घोळवून मग त्यांच्या प्रेमाचा जो स्वीकार केला, नव्हे स्वतःच्याच प्रेमाचा त्यांच्यापाशी जो आविष्कार केला, त्यामागे पुरुषांना खेळवण्याची हौस, मनस्वीपणा, थोडी पुरुषपिपासा, थोडे चाळवू लागलेले वात्सल्य वगैरे गोष्टी होत्या, असे मी मानीत होतो. पण 'माझें जीवन' मधील अनेक हकीगती वाचून माझी अशी खात्री पटली की शांताबाईंच्या मनस्वीपणात एक प्रकारची दयाबुद्धीही वसत होती. त्यामुळे त्यांच्या प्रेमव्यवहारात कुठे दयाबुद्धी असल्याचे त्यांनी सांगितले तर त्यावर विश्वास ठेवावा अशा भूमिकेवर मी आलो. साहजिकपणेच "ते फार उदासीन दिसत. मला एकदम त्यांची फार दया आली. मी त्यांच्या विमनस्कतेचा विचार करू लागले." असे जे 'माझें जीवन' मध्ये त्यांनी म्हटलेले दिसले त्याचा मी स्वीकार केला. माधवरावांविषयी त्यांनी जे प्रेम दाखवले त्यात त्यांच्या इतर स्वभावगुणांबरोबर दयाबुद्धीचीही काही प्रेरणा होती, अशी जुळणी मी करून घेतली.

मला करावा लागलेला दुसरा गौण बदल पुरुषांना स्वतःभोवती फिरवत ठेवण्याच्या शांताबाईंच्या हौसेविषयी होता. पूर्वी माझा असा समज होता, की 'तरण्याबांड' पुरुषांचे घोळके शांताबाईंच्या भोवती जे जमत ते मुख्यतः शांताबाईंनी केलेल्या सहेतुक प्रयत्नांमुळे जमत. पण मला आता अशी नवी माहिती मिळाली की हे 'तरणेबांड' पुरुष शांताबाईंनी प्रयत्न न करताही, आपण होऊन, त्यांच्या सभोवती रुंजी घालू लागत. 'माझें जीवन'वरून असे चित्र दिसत होते, की महाविद्यालयात मराठी विद्यार्थीच नव्हेत, तर गुजराथी विद्यार्थीही त्यांच्याशी सूत जमवण्याचा प्रयत्न करीत. महाविद्यालयात 'फेलो' असलेला एक विवाहित सिंधी विद्यार्थी त्यांच्या प्रेमाने विद्ध होऊन आत्महत्या करायला निघाला होता! खानोलकरांनी मला सांगितले, की श्रीधर रामजी शिंदे यांनीही शांताबाईंवर जीव जडवला होता आणि या बुद्धिमान, काव्यप्रेमी मराठ्याशी शांताबाईंचा विवाह होणार अशी वदंता बडोद्यात उठली होती.

खानोलकरांच्याच दप्तरात "सखे सुलोचने! सकल-लोक-भूषणे! तू अससी मज्जीवन!" ही शांताबाईंवर केलेली शिंद्यांची कविता मला आढळली. त्या कवितेच्या बाजूला शांताबाईंनी आपल्या हस्ताक्षरात नोंद केली होती, की "कविता माझ्यावर" ..."SRS ची कविता!" शांताबाईंवर लुब्ध झालेल्या इतरही काही व्यक्तींचा सुगावा 'माझे जीवन' मध्ये लागत होता. शांताबाई जर पुरुषी होत्या तर माधवरावांना त्यांचे एवढे आकर्षण का वाटले, असा प्रश्न पूर्वी माझ्या डोक्यात आला नव्हता आणि त्याचे उत्तरही अर्थातच मी शोधले नव्हते. पण आता तोच प्रश्न फक्त माधवरावांच्याच संदर्भात नव्हे तर शिंद्यांसारख्या अनेक व्यक्तींच्या संदर्भात माझ्यापुढे उभा राहिला आणि त्याचे उत्तर मला शोधावे लागले. माझ्या मनोवैज्ञानिक कल्पकतेने मला जे उत्तर पुरवले त्याचा मथितार्थ असा होता, की शांताबाई पुरुषी असल्या तरी 'रिपल्सिव्ह' किंवा नकोश्या वाटतील एवढ्या पुरुषी नव्हत्या. त्यांच्यामध्ये पुरुषत्वाचा अंश परमेश्वराने अशा बेताने मिसळला होता, की ज्यामुळे त्यांचे यौवनमंडित स्त्रीत्व अधिक धीट नि मोकळे व्हावे—ज्यामुळे त्या स्वतः पुरुषांविषयी कोमट राहाव्यात, पण पुरुषांना तापविण्याचे सामर्थ्य मात्र त्यांना भरपूर लाभावे! म्हणूनच त्या जरी पुरुषी होत्या तरी आकर्षक होत्या नि माधवरावांसारखे अनेक पुरुष त्यांच्याकडे ओढले जात होते.

मूळ साधन-सामग्रीच्या प्रकाशात मी माझे पूर्वीचे निष्कर्ष नि अंदाज तपासून घेतले; पण खानोलकरांनी आपल्या पुस्तकात घटनांचा जो क्रम दिला होता तोही तपासून घ्यायला हवा, हे माझ्या लक्षात आले नव्हते. 'माझें जीवन' वाचता वाचता कोठेतरी मला असे जाणवले, की शांताबाईंना अभिप्रेत असणारा घटनाक्रम नि खानोलकरांना अभिप्रेत असणारा घटनाक्रम हे एकमेकांशी मधूनमधून खटकत आहेत;—आणि मग मात्र खानोलकरांचा घटनाक्रम मी तपासू लागलो. आश्चर्य असे, की खानोलकरांचा घटनाक्रम मग डळमळू लागला आणि डळमळता डळमळता साफ कोलमडून पडला! खानोलकरांनी अशी मांडणी केली होती, की माधवराव नि शांताबाई यांच्यामध्ये प्रथम विवाहाची किंवा प्रेमाची बोलणी होऊन ती फिसकटली आणि मागाहून मैत्रीण, भगिनी, माता या नात्यांचे प्रयोग झाले. त्यांच्या मते, इंटरमीजिएटच्या परीक्षेत पहिल्या खेपेस शांताबाई अनुत्तीर्ण झाल्यावर माधवरावांनी त्यांना अभ्यासात खूप मदत केली आणि दुसऱ्या खेपेस त्या उत्तीर्ण झाल्या. माधवरावांच्या मदतीमुळे त्या प्रसन्न झाल्या होत्या, आणि प्रसन्नतेच्या अवस्थेतच विवाहाची गोष्ट माधवरावांकडे त्यांनी काढली होती. म्हणजे विवाहाचे बोलणे होणे, ते फिसकटणे वगैरे घटना १९१२-१३ च्या संधिकालातील होत. पुढे मैत्रीण, भगिनी, माता या नात्यांचे प्रयोग दोघांनी केले; म्हणजे ते १९१३ साली किंवा १९१३-१४ साली घडले. पण 'माझें जीवन' वाचीत असता "परीक्षा पास होणे व पदवीदान-समारंभाला जाणे" यांमधील रिकाम्या वेळात आपण आपले प्रेम माधवरावांसमोर उघड केले, असा शांताबाईंनी केलेला स्पष्ट उल्लेख मला आढळला आणि त्या उल्लेखापाशीच मी थबकलो. बी० ए० ची परीक्षा, तिचा निर्णय, नि पदवीदान-समारंभ या सर्व गोष्टी १९१४ च्या अखेरीस घडल्या. म्हणजे प्रेम-प्रकटन १९१४ च्या अखेरीलाच झाले नाही का? मग प्रेमप्रकटनाचा संबंध इंटरच्या परीक्षेशी जोडून खानोलकर ते १९१२-१३ च्या संधिकालात कसे टाकतात? मी खडबडून विचार करू लागलो आणि कालनिर्णयासाठी आणखी पुरावे शोधू लागलो. 'माझें जीवन'मध्ये इतरत्र आणि

शांताबाईंनी माधवरावांना १९१५ साली (म्हणजे लग्नाच्या काळात) लिहिलेल्या एका पत्रात मला '१९१४ची अखेरी' या काळाला पुष्टी देणारे तसे पुरावे उपलब्धही झाले. मग असा प्रश्न उत्पन्न झाला, की प्रेम-प्रकटन (म्हणजे विवाहाची बोलणी, ती फिसकटणे वगैरे) जर १९१४-च्या अखेरी घडले तर मैत्रीण, भगिनी, माता या नात्यांचे प्रयोग केव्हा घडले? १९१४ नंतर शांताबाईंनी बडोदे सोडले आणि त्या एम० ए० च्या अभ्यासासाठी मुंबईला जाऊन राहिल्या. तर ते प्रयोग नंतर घडणे शक्य होते काय? त्या प्रयोगांत जेव्हा 'आई व मूल' हे नाते दोघांनी घेतले होते तेव्हा माधवरावांनी लिहिलेल्या दोन कवितांचा नि एका पत्राचा उल्लेख खानोलकरांनी केला आहे आणि त्या कवितांवर व पत्रावर २३ ऑगस्ट १९१४ व २६ ऑगस्ट १९१४ अशा तारखा असल्याची नोंद केली आहे. (पृ० ५४-५५). 'आई व मूल' या नात्याशी जोडता येतील अशा ज्या आणखी दोन कविता मला सापडल्या त्यांवर १३ जुलै १९१४ व १५ जुलै १९१४ अशा तारखा आढळल्या. तेव्हा निरनिराळ्या नात्यांचे प्रयोग आधी जुलै-ऑगस्टमध्ये घडले आणि प्रेमप्रकरण, विवाहाची बोलणी वगैरे प्रणयप्रकार मागाहून नोव्हेंबरच्या सुमारास घडले, सर्व काही १९१४ साली घडले, असा निष्कर्ष मला काढावा लागला! खानोलकरांचा घटनाक्रम अर्थातच त्याज्य ठरला.

खानोलकरांच्या घटनाक्रमातील गफलत जेव्हा माझ्या लक्षात आली तेव्हा, किंवा तत्पूर्वी, त्यांच्या आणखीही एकदोन त्रुटी मला जाणवल्या. मैत्रीण, भगिनी व माता अशा तीन नात्यांचे प्रयोग झाल्याचे खानोलकर सांगत होते. (पृ० ५४). पण मैत्रिणीचे नाते ढोबळ नि दीर्घकालीन म्हणून दृष्टीआड केले तरी या तीन नात्यांपैकी भगिनीचे नाते केव्हा जडले ते समग्र साधन-सामग्रीत मला कुठेही आढळले नाही. माझ्यापेक्षा वेगळी साधनसामग्री खानोलकरांपुढे नव्हती याविषयी माझी खात्री होती. तेव्हा मातेच्या नात्याकडे जाणारी पायरी म्हणून भगिनीचे नाते खानोलकरांनी कल्पिले असावे असे मी समजलो आणि अवस्तू म्हणून त्याचा त्याग केला. खानोलकरांनी असेही म्हटले होते, की प्रेमाची गोष्ट प्रथम शांताबाईंनी काढली आणि त्यावेळी 'विवाहा'ची विचारणाही त्यांनीच केली. आपण ही हकीगत माधवरावांकडून जशी ऐकली तशी देत आहोत असे त्याविषयी खानोलकरांचे स्पष्टीकरण होते. (पृ० ५३). पण खानोलकरांनीच निर्देशिल्याप्रमाणे ही हकीगत 'माझें जीवन'मध्ये शांताबाईंनी अगदी वेगळ्या स्वरूपात दिली आहे. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे, की त्यांनी प्रेमाची गोष्ट प्रथम काढली, हे खरे; पण विवाहाची विचारणा त्यांनी केली नाही. कारण विवाहाची कल्पना त्यांच्या मनातच नव्हती. त्यांच्या प्रेमप्रकटीकरणामुळे आनंदून जाऊन माधवरावांनी विवाहाची विचारणा केली आणि त्यांनी तिला नकार दिला. या दोन हकीगतींपैकी शांताबाईंची हकीगत मला ग्राह्य वाटली; कारण घटनेचा प्रत्यक्ष अनुभव जसा त्यांना होता तसा खानोलकरांना नव्हता. खानोलकर आपल्या हकीगतीला माधवरावांचा हवाला देत होते; पण माधवरावांनी त्यांना नेमके काय सांगितले नि त्यांच्या लक्षात काय राहिले, त्याविषयी शंका घ्यायला जागा होती. 'शांता-बाईंनीच प्रथम *प्रेमाची* भाषा काढली' असे माधवराव म्हणाले असताना 'शांताबाईंनीच प्रथम *विवाहाची* भाषा काढली' अशी खानोलकरांची समजूत झाली असणे शक्य आहे. मुख्य म्हणजे, शांताबाईंची हकीगत मागच्या-पुढच्या संदर्भांशी नि त्यांनी भावी काळात

श्री० कशाळकरांशी जे वर्तन केले ('माझ्या चित्तात लग्नाचा विचारही येत नाही...पुरुषी वृत्ती माझ्या रंध्रारंध्रात मुरली आहे' वगैरे जे आत्मकथन केले) त्याच्याशी अधिक सुसंगत होती. त्यांनी स्वतःच विवाहाची भाषा काढली नि स्वतःच विवाहाला नकार दिला ही गोष्ट त्यांचा आत्मकेंद्रित नि चंचल स्वभाव लक्षात घेऊनही मला विश्वासार्ह वाटली नाही. अर्थात, खानोलकरांचे लेखन येथेही मी दुरुस्त करून घेतले.

जेव्हा खानोलकरांचा घटनाक्रम उलटापालटा झाला आणि त्यांच्या लिखाणातल्या काही त्रुटी मला सापडल्या तेव्हा काही नवे सत्य हाती लागल्याचा आनंद मला खचितच झाला. पण घटनाक्रम उलटला तेव्हा मी काहीसा गोंधळूनही गेलो. खानोलकरांचा घटनाक्रम आधाराला घेऊन माधवराव व शांताबाई यांच्या भावविश्वाची काही जुळणी मी माझ्या मनात केलेली होती. पण तो घटनाक्रम उलटल्याने ती जुळणी मोडणार, ती पुन्हा करावी लागणार, ती कशी करायची, अशा विचारावर माझे भ्रमण सुरू झाले. घटनांचा कालक्रम आणि माणसाच्या स्वभावाचे किंवा भावनांचे आपणाला जाणवणारे स्वरूप यांच्यात किती खोल नि गुंतागुंतीचा अनुबंध असतो, याची एक तीव्र प्रचीती त्या वेळी मला येऊन गेली. (१) मित्र-मैत्रीण, (२) प्रियकर–प्रेयसी, (३) माता-पुत्र हा खानोलकरांचा क्रम जेव्हा मी धरून चाललो होतो तेव्हा त्या क्रमातील दुसऱ्या टप्प्यावरून तिसरा टप्पा का नि कसा आला असेल याचीच कल्पना मला मुख्यतः करावी लागली होती. आणि मी असे कल्पिले होते होते, की शांताबाई फार आत्मकेंद्रित नि लहरी होत्या, म्हणूनच प्रियकर-प्रेयसीचे नाते लहरीखातर त्यांनी टाकले, विवाहाला नकार दिला, व मनस्वी मनाला काही खेळ हवा म्हणून माता-पुत्र-संबंध सुरू केला. उत्कट प्रेमभावनेमुळे माधवरावांना कशा का होईनात पण शांताबाई हव्या होत्या; त्यामुळे त्यांनी शांताबाईंच्या खेळात स्वतःकडे आली ती भूमिका वठवली. त्यांना मातृप्रेमाची भूक होतीच. तेव्हा ती भूमिका वठवणे त्यांना अवघड गेले नाही. ही जुळणी कल्पिताना खरे तर मला अशी शंका यावयास पाहिजे होती, की शांताबाई कितीही लहरी नि मनस्वी असल्या तरी ज्याचा एकदा प्रियकर म्हणून स्वीकार केला त्याला दूर लोटून त्याच्याशीच मातेचे खरेखोटे नाते यांनी काय म्हणून जोडावे? लहरीपणा जर अहंतेची तृप्ती नि स्वार्थ शोधीत असतो तर शांताबाईंचा लहरीपणा नव्या नात्याकडे वळलाच कसा? नव्या नात्यात त्यांच्या पुरुषपिपासेला जादा मर्यादाच पडणार नव्हत्या का? त्यांना वात्सल्याची हुक्की आली म्हणावे तर त्यांची मातृभावना केव्हाही प्रबल असलेली दिसत नाही. पुढे त्यांना स्वतःला मुले झाल्यावरही त्यांनी मुलांकडे प्रेमभराने कधी विशेष लक्ष दिले नाही. तेव्हा त्यांना वात्सल्याची हुक्की आली आणि तीही पुरुषाच्या सहज मिळणाऱ्या सहवासावर बंधन घालण्याइतकी जोरदार आली, असे कसे म्हणावे? शिवाय, मला असेही वाटायला हवे होते, की माधवराव जरी प्रेमाचे कितीही भुकेले असले तरी ज्या स्त्रीने एकदा प्रेमाचा खेळ करून त्यांना अव्हेरले त्याच स्त्रीला माता मानण्याइतके ते स्वाभिमानशून्य किंवा कोडगे होते काय? पण या प्रकारच्या शंका मला आलेल्या नव्हत्या. अशा शंका ज्या अर्थी आल्या नाहीत त्या अर्थी माझी मनोवैज्ञानिक कल्पकता नि संवेदनाक्षमता त्या वेळी कमी पडली, हे उघड आहे. वास्तव म्हणून समोर आलेल्या घटनाक्रमात मनाच्या हालचाली कल्पून मला बसवायच्या होत्या, त्याशिवाय मला गती नव्हती; त्यामुळे जे दडपण माझ्यावर आले त्या दडपणाने तसे घडले

असावे. घटनाक्रमाच्या प्रांत साच्यात बसवण्यासाठी मी शांताबाईंचा लहरीपणा भलताच ताणला होता आणि माधवरावांच्या प्रेमविवशतेला कोडगेपणाचे रूप दिले होते. जेव्हा घटनाक्रम बदलला तेव्हा हे सारेच बदलून घ्यावे लागले. (१) मित्र-मैत्रीण, (२) माता-पुत्र, (३) प्रियकर-प्रेयसी या दुरुस्त घटनाक्रमात पहिल्या टप्प्यातून दुसरा कसा आला, हे स्पष्ट करायला हवे होते; आणि दुसऱ्यातून तिसरा कसा निघाला, तेही उलगडून सांगायला पाहिजे होते. त्यासाठी माधवराव व शांताबाई यांच्या भावविश्वाची पहिली जुळणी मोडून नवी कशी करायची, म्हणून प्रथमतः मी गोंधळात पडलो होतो. पण नवी जुळणी प्रत्यक्ष करताना मला ती फार कठीण गेली नाही.

या नव्या जुळणीचे ठळक विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील : माधवरावांबद्दल शांताबाईंना प्रणयिनीची उत्कट ओढ नव्हती; पण त्यांच्या मनात एक पुसट पुरुषपिपासा वसत होती. माधवरावांना त्या लहान मानीत होत्या आणि त्यांच्या मनात स्वतःच्या वयानुसार वात्सल्यही सौम्यसे उमलू लागले होते. तेव्हा मनातल्या या संकीर्ण भावनांचा संकलित परिणाम होऊन त्यांनी माधवरावांना पुत्राची वरवरची भूमिका दिली आणि त्यांना शरीराने व मनाने जवळ घेतले! उत्कट, कोंडलेल्या प्रीतीमुळे माधवरावांना शांताबाईंची जवळीक कशीही मिळाली तरी हवीशी होती आणि आईच्या प्रेमाचेही ते भुकेले होते. तेव्हा प्रेयसी मातेचे रूप घेऊन सामोरी आली तरी त्यांनी हर्षभराने तिचा स्वीकारच केला! या मातापुत्रसंबंधात दोघांमध्ये जी जवळीक वाढली नि अंगलगट घडली तीमुळे शांताबाईंची पुरुषपिपासा चेतत गेली असेल आणि माता-पुत्रांच्या दिखाऊ नात्यात ती मावेनाशी झाली असेल. अर्थात, आपला "अनुराग" त्यांनी मग माधवरावांशी बोलून दाखवला. त्यांच्या मनात विवाहाची कल्पना पूर्वी आलेली नव्हती आणि आताचा त्यांचा अनुरागही विवाहाच्या पायरीपर्यंत पोचलेला नव्हता. त्या अनुरागाला प्रणयाची मौज हवी होती, पण विवाहाचे बंधन नको होते. त्यामुळे माधवरावांनी विवाहाची विचारणा करताच विवाहाला मात्र त्यांनी नकार दिला. वयातील अंतर, भिन्न सामाजिक दर्जा, आईवडिलांचा व समाजाचा संभाव्य विरोध वगैरे कारणेही त्या नकारामागे पूरक म्हणून उभी होती. माधवरावांनी माता-पुत्र-संबंध आधी मान्य केला होता; पण पुत्राच्या भूमिकेत प्रियकराची भूमिका छुपेपणाने ते वठवीत होते. तेव्हा माता-पुत्र-संबंध सोडून प्रेयसी-प्रियकर-संबंधाला ते आनंदाने तयार झाले यात नवल नाही. पुढे त्यांनी विवाहाचे बोलणे काढले आणि शांताबाईंनी नकार देताच त्यांचा स्वाभिमान जागा होऊन ते शांताबाईंपासून दूर झाले. दोघांच्या भावविश्वाच्या या नव्या जुळणीत शांताबाईंचा लहरीपणा मला फार ताणायला लागला नाही आणि माधवरावांच्या प्रेमविवशतेला कोडगेपणाचे रूपही द्यायला लागले नाही. ही नवी जुळणी प्रथम अवघड वाटली होती तरी प्रत्यक्षात त्या मानाने सुलभ का ठरली? मला वाटते, की घटनाक्रम सुलटा करून घेतल्याने व खानोलकरांच्या काही त्रुटी काढून टाकल्याने मी सत्याच्या अधिक जवळ गेलो होतो. किंबहुना, सत्याच्या गाभ्याला माझा स्पर्श झाला होता. त्यामुळे सत्याचा सारा भावसंभार आतूनच धुमारून आपोआप बाहेर आला!

माधवराव नि शांताबाई यांच्या प्रेमसंबंधाचा आतापर्यंत सांगितलेला शोध जवळजवळ रूपरेषात्मक होता. हा प्रेमसंबंध अथपासून इतिपर्यंत समूर्त नि सजीव करावा, अशी तर माझी

फार इच्छा होती. विशेषतः, या प्रेमसंबंधात वेळोवेळी माधवरावांच्या मनावर उठलेले भावनांचे लहानमोठे तरंग जाणावे नि शब्दबद्ध करावे, अशी उमेद मी बाळगली होती. रूपरेषेत रंग नि तपशील भरण्याच्या या कामात माधवरावांची रामभाऊ मराठ्यांना लिहिलेली पत्रे आणि त्यांच्या प्रकाशित नि अप्रकाशित कविता यांचा मला खूप उपयोग झाला. इतर साधनसामग्री अजिबात उपयोगी पडली नाही, असे नाही. पण तिचा उपयोग तुलनेने गौण म्हणावा लागेल. पत्रांवर रीतीप्रमाणे तारखा घातलेल्या होत्या आणि कवितांच्या लेखनमित्याही सुदैवाने मिळू शकत होत्या. तेव्हा आधीच्या प्रयत्नाने प्रेमसंबंधाची जी रूपरेषा तयार झाली होती तिच्याशी कालाच्या अनुरोधाने पत्रांची व कवितांची सांगड मी घातली आणि पत्रांत व कवितांत उमटलेल्या भावतरंगांचा अन्वयार्थ लावून बघितला.

प्रेमसंबंधाची रूपरेषा तयार होण्यापूर्वी, त्या रूपरेषेच्या संदर्भाशिवाय, माधवरावांच्या १९१२, १३ व १४ सालच्या पत्रांचे वाचन मी केले होते. पण त्या वेळी त्या पत्रांचा पूर्ण अर्थ मला उलगडलेला नव्हता; आणि त्या पत्रांत प्रणयाचे पुसटते उल्लेख जाणवले तरी त्यांत प्रणयसंबद्ध भावनांचाच मुख्य आविष्कार आहे हे समजले नव्हते. या पत्रांपैकी सत्तावीस पत्रे खानोलकरांनी आपल्या पुस्तकात सलग उद्धृत केली आहेत आणि त्यांच्या आगेमागे स्वतःचे थोडे भाष्यही जोडलेले आहे. (पृ० १६ ते ३३). पण त्यांचा प्रणयपर अर्थ खानोलकरांनाही उमजलेला असावा असे दिसत नाही. जेव्हा प्रणयसंबंधाची काही वैशिष्ट्ये, टप्पे, कालक्रम यांची रूपरेषा तयार करून त्या रूपरेषेशेजारी ही पत्रे मी कालानुरोधाने मांडली तेव्हा मात्र त्यांच्यावरून जणू जादूची कांडी फिरली आणि ती सजीव होऊन माझ्याशी बोलू लागली. त्यांनी माधवरावांच्या प्रणयाकुल हृदयाची नाजुक स्पंदने नि जोमदार धडधड मला अमाप ऐकवली. या पत्रांत एकीकडे मोकळे आत्मनिवेदन आहे तर दुसरीकडे गूढ आत्मगोपनही आहे. त्यांत माधवरावांनी आपली सुखदुःखे व भावनिक प्रतिक्रिया फार प्रामाणिकपणे नोंदवल्या आहेत; पण ही सुखदुःखे कशातून उद्भवली, या प्रतिक्रिया कशामुळे निर्माण झाल्या, ते जाणून किंवा नेणून बहुतांशी गुप्त ठेवले आहे! घराला दुरावल्यामुळे नि मातेच्या ममतेला आचवल्यामुळे ते निराधार झाले होते, मायेसाठी व्याकुळले होते, हे या पत्रांतून दिसते; पण ते प्रणयासाठीही तडफडत होते, हे पुरेसे स्पष्ट होत नाही. तेव्हा ही पत्रे प्रथमदर्शनी उलगडू नयेत आणि, योग्य संदर्भात पडल्याबरोबर झरझर उलगडत जावीत, हे साहजिक म्हणावे लागेल.

पत्रांपेक्षा कवितांची बाब काहीशी वेगळी होती; कारण १९१० ते १४ या प्रेमसंबंधाच्या काळात ज्या आत्मनिवेदनपर कविता माधवरावांनी लिहिल्या त्या पत्रांप्रमाणे गूढ नव्हत्या. त्यांपैकी बहुतेक कविता उघडउघड प्रणयपर होत्या. तेव्हा त्या कविता लेखनकालावरून व आशयावरून विशिष्ट घटनाप्रसंगांशी किंवा स्थितीशी मी सहज जोडू शकलो आणि त्यांमध्ये त्या त्या वेळचे माधवरावांचे मन वाचू शकलो.

पत्रे, कविता वगैरे साधनसामग्रीच्या साह्याने प्रेमसंबंधाची रूपरेषा कशी भरत गेली त्याचे काही नमुने येथे सांगण्यासारखे आहेत. प्रेमसंबंधाच्या प्रारंभकाळात माधवराव शांताबाईंवर एकतर्फी प्रेम करीत होते आणि प्रेमाला प्रतिसाद न मिळाल्यामुळे मनातल्या मनात तडफडत होते. अशा वेळी ते शांताबाईंना कसे दिसत, ते 'माझें जीवन'मध्ये शांताबाईंकडूनच मला ऐकायला

मिळाले : "कधी कधी दिवसच्या दिवस न बोलता तो गप्प बसत असे. कधी वडोद्याच्या कडक उन्हाळ्यात...रस्त्यातून अनवाणी भटकत असे. कधी वादळी पावसात शिरत असे नि स्वतःला चिंब भिजवून घेत असे." वगैरे वगैरे. या काळातल्या पत्रांत त्यांची अस्वस्थ, विषण्ण मनःस्थिती जागोजाग व्यक्त होत होती. ती मी टिपली आणि भुकेल्या प्रणयाची द्योतक म्हणून वाचकांना सादर केली : "मला कोठेही समाधान, सुख, शांती दिसत नाही."... "मी मनाने...आजारी आहे."..."आकाश ढगांनी व्याप्त झाले आहे. आत अंधार वाढत चालला आहे. लवकरच दिवा विझेल!"..."जगावे की मरावे हाच एक पुढे प्रश्न. जगावे? पण कुणासाठी? कशासाठी?"—वगैरे वगैरे. एका पत्रात माधवरावांनी म्हटले आहे, की "ऐहिक सुखांकडे तरी माझी सर्वस्वी प्रवृत्ती असावी तर तेही नाही. तीही मला एका वस्तूशिवाय मृत वाटतात." —ही एक वस्तू कोणती? ही वस्तू म्हणजे स्त्रीप्रेम हे मी जाणून घेतले. एका पत्रात माधवरावांनी लिहिले आहे, की "आता मला [वडोदे व भडोच] दोन्ही सारखीच रूक्ष वाटतात. प्रेमाचा बदला उपेक्षा व उपहास!" त्यांनी शांताबाईंविरुद्ध केलेली फिर्याद म्हणून त्यांची ही वाक्ये मी नोंदवून घेतली. शांताबाईंकडे लागणाऱ्या नि या काळात लिहिलेल्या त्यांच्या सहासात कविता माझ्या हाती आल्या. त्या कवितांत मला कोठे शांताबाईंचा सावळा रंग दिसला, कोठे तारकांसारखे टवटवीत डोळे दिसले, कोठे सुरेल कंठ ऐकू आला, कोठे बेफिकिरी जाणवली, आणि कोठे मैत्रीही प्रत्ययाला आली. या कवितांचे वेचक उतारे देऊन माधवरावांचे मन माधवरावांच्या शब्दांत मी वाचकांना ऐकवले : "आम्ही राहू अंधारात। नैराश्याचे गाणे गात॥"..."हृदय उकरू? फाडू? दावू मनी किति बाणले।"..."सखे, बरे जर नसती झाली ओळख अपुली दाट। नसती भरली मग काट्यांनी संसाराची वाट।"—वगैरे वगैरे.

या प्रेमसंबंधातील दुसरा टप्पा म्हणजे दोघांनी घेतलेले माता व पुत्र हे नाते होय. हे नाते गृहीत धरून लिहिलेल्या माधवरावांच्या चार कविता मला कशा उपलब्ध होत्या आणि त्यांचा उपयोग माधवरावांच्या भावनांचे वर्णन करण्यासाठी मी कसा केला त्याचा उल्लेख यापूर्वी केला आहे. (प्रकरण १ ले, पृ० ८; प्रकरण ३ रे, पृ० ४६). मातापुत्रांचे नाते जेव्हा भराला आले आणि मातेने पुत्राचे चुंबन घेतले, तेव्हाची एक कविता तर मला उपलब्ध होतीच, पण तेव्हाचे एक सविस्तर पत्रही माझ्या हाताशी होते. त्या दोन्हींत चुंबनप्रसंगाचे अत्यंत चित्रमय नि भावदर्शी वर्णन माधवरावांनी करून ठेवले होते. अर्थात त्यांची अवतरणे देऊन मी माझे काम साधू शकलो. पण चुंबन-प्रसंगी "आम्ही दोघे अविर्वचनीय शांतीत गर्क झालो"; चुंबनाचे सुख म्हणजे "शांत सुखानुभूती" होती; असे माधवराव म्हणत होते. त्यामुळे मी क्षणभर बुचकळ्यात पडलो. चुंबनाच्या वेळी नि शरीरसान्निध्याच्या तसल्या प्रसंगात जो अनुभव आला तो 'शांत' कसा? त्या वेळी शांताबाई किंवा माधवराव वासनांनी चेतले कसे नाहीत? माता-पुत्र या नात्याचे मानलेले व कृत्रिम का होईना पण जे कुंपण होते ते तोडून त्याच्या पलीकडे कसे गेले नाहीत?—अशी शंका मला त्रस्त करू लागली. तेव्हा त्या शंकेचे निवारण करून घेण्याची दक्षता मी घेतली. "शांताबाईंना माधवराव लहान वाटत होते; शांताबाईंच्या रोमरंध्रात एक 'शांताराम' मिसळला होता, एक 'टॉमबॉय' भिनला होता. त्यामुळे [वासनेचा] असा उमाळा त्यांना येऊ नये हे साहजिक होते."—असे शांताबाईंच्या बाजूने मी स्पष्टीकरण

दिले. पण माधवरावांचे काय ? पुत्राची भूमिका वठवीत असतानाही एक प्रियकर त्यांच्या मनात चांगला जागा होता; त्यांना शांताबाई मनाने नि शरीरानेही हव्याहव्याशा वाटत होत्या. मग प्रेयसीने माता म्हणून चुंबन घेतले त्या वेळी, किंवा गळ्याभोवती हातांचा घट्ट वळखा घातला त्या वेळी, ते कामविद्ध कसे झाले नाहीत ? यौवनधुंद प्रियकर का बनले नाहीत ?—या शंकेचे माधवरावांच्या बाजूने उत्तर देण्यासाठी त्यांच्या भावी वैवाहिक जीवनाचा जो अभ्यास मी केला होता तो मला उपयोगी पडला. "माधवरावांची प्रेमभावना कितीही उत्कट असली तरी समागमाची वासना तेवढी प्रबळ नव्हती. स्पर्शसुखाचा फिका आस्वाद त्यांना पसंत होता. त्या आस्वादाची मादक, कडक मदिरा बनवून मस्त होण्याची बेफाम ऊर्मी त्यांना फारशी पीडा देत नसे."—हे त्यांच्या पत्नी लीलाबाई यांच्या दैनंदिनीवरून व अन्य पुराव्यावरून मी ओळखलेले होते. तेव्हा माझ्या त्या ज्ञानाचे उपयोजन मी या ठिकाणी केले आणि शंकेला उत्तर दिले. एका ठिकाणचे ज्ञान दुसऱ्या ठिकाणी लावल्याने चरित्र कसे उलगडत जाते आणि मागच्यापुढच्या धाग्यांची वीण घातल्याने त्याचा पोत कसा एकरूप करता येतो, याचा एक संस्मरणीय अनुभव या वेळी घेता आला.

माता-पुत्रांचे नाते जुळल्यावर माधवरावांचा प्रेमविषय अंशतः का होईना पण माधवरावांना मिळाला होता. अशा वेळी त्यांची तप्त, त्रस्त, भ्रमिष्ट मनःस्थिती बदलली का ? ते थोडेफार सुखावले का ? माझ्या मनात हे प्रश्न साहजिकच उद्भवले आणि मी त्या काळच्या त्यांच्या पत्रांकडे वळलो. पत्रांत त्यांच्या खुललेल्या मनःस्थितीची अनेक प्रतिबिंबे मला विखुरलेली आढळली : "नागर लोकांप्रमाणे मी आता धोतराचा काचा मारणार आहे."..."हळू हळू मन निरोगी व कार्यक्षम होत चालले आहे."..."अभ्यासाची टंगळमंगळ चालली आहे."—वगैरे वगैरे. या काळात 'बिघडलेली घडी कशी बसली' या नावाची एक (अप्रकाशित) कविताही माधवरावांनी लिहिली होती. तीमध्ये प्रेयसी आपल्या काही अपराधाबद्दल प्रियकराची क्षमा मागते, प्रियकर झाले-गेले विसरून तिला क्षमा करतो, तिची चुंबने घेतो, आणि तिने आपले "पुष्पांग" त्याच्यावर टाकले की बिघडलेली घडी नीट बसते! शांताबाईंच्या वागण्यात झालेला बदल नि माधवरावांची खुललेली मनःस्थिती यांच्याशी या कवितेचे काही अप्रत्यक्ष नाते आहे, असे मला जाणवले आणि त्या दृष्टीने मी तिचा उपयोग करून घेतला. ही कविता मराठ्यांना पाठविलेल्या पत्रात नकलून झाल्यावर माधवरावांनी तिला अशी पुरवणी जोडली होती, की "नकल करीत असता माझ्या हृदयाला चमत्कारिक वेदना होत आहेत!" ही पुरवणी विलक्षण बोलकी होती यात शंका नाही.

ह्यानंतर शांताबाईंनी आपला "अनुराग" व्यक्त केला, त्यामुळे उत्तेजित होऊन माधवरावांनी विवाहाची गोष्ट काढली; पण शांताबाईंनी विवाहाला स्पष्ट नकार देऊन त्यांच्या हृदयावर जबरदस्त आघात केला. हा दोघांच्या प्रेमसंबंधातील तिसरा नि शेवटचा टप्पा होता. त्याचा वृत्तांत खानोलकरांच्या आठवणीवर न विसंबता शांताबाईंचे आत्मवृत्त ग्राह्य ठरवून मी कसा जुळवला ते पूर्वी सांगितले आहे. (पृष्ठ ४-५) मात्र शांताबाईंच्या नकाराने माधवरावांवर कोणता परिणाम झाला ते ठरवताना मला माझ्या दुसऱ्या एका निर्णयाचा उपयोग झाला. माधवरावांच्या मनात पुढील काळात लग्नासंबंधी काही 'इनहिबिशन' किंवा अबोध भय घर करून बसले होते,

अशा निर्णयाला मी आलेलो होतो. (पाहा पृ० ५७ ते ५९) तेव्हा त्या अनुरोधाने शांताबाईंच्या नकारातील नेमका कोणता भाग त्यांना झोंबला त्याची मी कल्पना केली. शांताबाईंनी नकार देताना दोघांच्या सांपत्तिक स्थितीमधील अंतर, सामाजिक प्रतिष्ठेमधील फरक, स्वामींनी केलेली मनाई, आईचा होणारा अपेक्षाभंग वगैरे गोष्टींचा उल्लेख केला होता आणि दोघांच्या वयांतले अंतर दाखवून "मला पती म्हणून भावही जाणवत नाही" असे उद्‌गार काढले होते. नकाराच्या या सर्व कारणांपैकी वयांतल्या अंतरात नि पती म्हणून भाव न जाणवण्यात जे कारण होते ते माधवरावांच्या जिव्हारी लागले असले पाहिजे, हे पुढील 'इनहिबिशन' वरून किंवा अबोध लग्न-भयावरून मी निश्चित केले. म्हणूनच मी म्हटले, की आपणाला शांताबाई भरभक्कम पूर्ण पुरुष समजत नाहीत, हा अर्थ मनात प्रकाशला आणि "आपल्या पौरुषाचा भयंकर अपमान झाला, असेच जणू माधवरावांना वाटले."..."त्यांच्या पौरुषाचा शांताबाईंनी नुसता अपमानच केला नाही, तर...ते अधूही केले!" (पृ० ७६, ७८), माता-पुत्र-संबंधात माधवराव कामविद्ध का झाले नाहीत, ते सांगण्यासाठी पुढील घटनांचा अन्वयार्थ मी मागे नेऊन भिडवला होता. येथेही मी तसेच केले; आणि—माझ्या समजुतीप्रमाणे—त्यामुळे चरित्राला सुसंगतपणाची घट्ट वीण पडून त्याचा पोत सुधारला.

प्रेमभंग झाला तेव्हा माधवराव काही काळ क्रोधाच्या नि मत्सराच्या आहारी गेले होते, हे खानोलकरांनी उद्‌धृत केलेल्या साधनसामग्रीवरून माझ्या लक्षात आले होते. शांताबाईंच्या आत्मवृत्तात त्याला आणखी आधार माझ्या हाती आले. शांताबाईंनी माधवरावांच्या स्वतःवरील एका "बोचक" कवितेचा उल्लेख केला आहे; आणि त्यांच्यावर आशक झालेल्या एका सिंधी विद्यार्थ्यावरून माधवराव त्यांना काय बोलले, ते सांगितले आहे. "हां, तुम्ही कशाला लग्न कराल? कॉलेजमधल्या तरुणांच्या प्रेमाचे घुटके प्यायला तुम्हांला मिळतात ना!"—असे माधवरावांचे मर्मभेदक शब्द होते. मी मराठ्यांचा पत्रसंग्रह धुंडाळला तेव्हा त्यात क्रोध नि मत्सर दाखविणाऱ्या प्रणयभंगाच्या वेळच्या दोन कविता मला प्रत्यक्षच बघायला सापडल्या. पैकी 'प्रणयचंचले' या कवितेत कवीने प्रेयसीला प्रणयचंचल तर म्हटले होतेच, पण 'मला तुझी नजर जहरमय वाटते. तू जवळ आलीस की स्पर्श नको! स्पर्श नको! असे ओरडत रोमांच सर्वांगावर उभे राहातात' असा तीव्र तिटकाराही व्यक्त केला होता.

यापुढील काळात शांताबाईंचा नीलकंठराव कशाळकरांशी स्नेह वाढला, दोघांनी लग्न करण्याचा बेत केला, आणि ते लग्न ७ मे १९१७ या दिवशी पार पडले. या प्रसंगी माधवरावांची जी वृत्ती दिसली ती प्रेमभंगाच्या वेळच्या वृत्तीपेक्षा अगदी वेगळी, दुसऱ्या टोकाची होती. शांताबाईंच्या लग्नाला त्यांच्या घरच्या मंडळींनी प्रखर विरोध केला; पण माधवरावांनी मात्र शांताबाईंना सहानुभूती दाखवली! शांताबाईंनी आत्मवृत्तात म्हटले आहे, की "मी सहा महिन्यांनी विवाहबद्ध होणार होते. माधवराव त्या काळात सहानुभूतीने वागत....त्यांनी 'स्पोर्ट्समनलाइक' वृत्ती दाखवली. त्यात ढोंग नव्हते. स्वतःच्या भावनांचा निरोध करून आपल्या पराकाष्ठेच्या संयमी व धीरोदात्त वृत्तीचा साक्षात्कार त्यांनी मला करून दिला." या काळात शांताबाईंनी कशाळकरांना लिहिलेली पत्रे पोस्टात टाकण्याचे कामदेखील माधवराव शांतपणे करीत असत! ते शांताबाईंच्या विवाहाच्या दिवशी त्यांना भेटले आणि वधूवरांचे

अभीष्टचिंतन करून परतले. रामभाऊ मराठ्यांना त्यांनी लिहिले, "आपल्या इच्छा काहीही असल्या तरी दुसऱ्याच्या सौख्याचा हेवा करणे हीनतेचे लक्षण आहे. सर्वसाधारणपणे मला ह्या विवाहामुळे संतोषच वाटतो व वधूवरांना सुखसमृद्धी लाभो, असे मी इच्छितो." खानोलकरांच्या पुस्तकावरून आणि शांताबाईंच्या आत्मवृत्तावरून माधवरावांची ही नवी वृत्ती अगदी स्पष्टपणे दिसू शकत होती.

जुन्या नि नव्या वृत्तीत जमीनअस्मानाचा फरक आढळल्यामुळे, तो फरक कशामुळे पडला या प्रश्नाचा शोध मी साहजिकच करू लागलो. नवी वृत्ती तात्पुरती नव्हती, तर चिरस्थायी होती. निदान त्यांच्या काव्यात भविष्यकाळात ती सतत दृग्गोचर होत राहिली. त्यांच्या काव्यामधला नायक त्यांच्या नव्या वृत्तीचा प्रत्यय आपणाला वारंवार देतो. तो नायक म्हणजे एकतर्फी उत्कट प्रेम करणारा, प्रेयसीला पूर्ण स्वातंत्र्य देणारा, तिला दुसऱ्याच्या गळ्यात माळ घालण्याचीही मोकळीक देणारा, एक जगावेगळा प्रेमिक आहे. तेव्हा नव्या वृत्तीचा शोध केवळ व्यावहारिक जीवनाचा उगम कळावा म्हणून नव्हे, तर काव्यजीवनाचा उगम कळावा म्हणूनही मला महत्त्वाचा वाटला. या शोधात गिरीशांकडील पत्रपेटीत माधवरावांना शांताबाईंनी लिहिलेली १९१५ सालची दोन पत्रे होती ती मला फार उपयोगी पडली. शांताबाईंनी लग्नाला नकार दिला नि माधवरावांची दारुण निराश झाली, क्रोधाने नि मत्सराने ते तडफडले; पण शांताबाईंशी त्यांनी संबंध तोडला नाही, हे या पत्रांवरून माझ्या लक्षात आले. ज्या स्त्रीने त्यांना खेळवले, त्यांना पती म्हणून ऐन वेळी झिडकारले, त्यांच्या पौरुषाचा एक प्रकारे अपमान केला, त्या स्त्रीशी माधवरावांनी संबंध का तोडला नाही? त्या वेळी शांताबाई शिक्षणासाठी मुंबईला गेल्यामुळे संबंध तोडणे सहज शक्य असूनही का तोडला नाही! मला वाटले, की त्यांचे उत्कट प्रेम नि स्त्रीविवशता त्यांना आडवी आली. लग्नाला नकार देताना शांताबाई म्हणाल्या होत्या, की 'एम० टी०,...पत्नी न झाले तरी मैत्री तुटणार नाही.' शांताबाईंच्या त्या शब्दांनाच ते आशाकमणे चिकटले आणि मित्र म्हणून त्यांच्याशी जवळीक ठेवून राहिले! शिवाय शांताबाईंनी नकाराला जी कारणे दिली होती त्यांमधील यथार्थता त्यांनी हळूहळू पटवून घेतली असावी. शांताबाईंनी त्यांची गरिबी, त्यांचा कनिष्ठ सामाजिक दर्जा, त्यांचे लहान वय वगैरे गोष्टींचा उल्लेख केला होता. पण या गोष्टी खऱ्याच नव्हत्या का? 'पती म्हणून भावही मला जाणवत नाही' असेही शांताबाई म्हणाल्या होत्या. पण त्यांना जर तसा भाव खरोखरच जाणवत नसेल तर त्यांनी तरी काय करावे? जे इष्ट आहे तेच अपरिहार्य आहे असा विचार करून अखेर माधवराव शांताबाईंशी संबंध ठेवू लागले! दोघांमधील पत्रव्यवहारात त्यांच्या वृत्तीला मग अंतिम घाट मिळाला. पत्रव्यवहारात दोघांनी सिंहावलोकन केले तेव्हा शांताबाईंनी आपली चूक कबूल केली. मैत्रीण, आई, प्रेयसी वगैरे नाती झपाट्याने बदलून आपण माधवरावांना भावनिक धक्के दिले, हे त्यांनी मान्य केले. त्यामुळे, माधवरावांची अहंता साहजिकच थोडी सुखावली असेल. नेमक्या त्याच वेळी माधवरावांच्या 'इल्लिबरल स्पिरिट'वर, अनुदार वृत्तीवर—त्यांच्या त्या क्रोधावर नि मत्सरावर—शांताबाईंनी बोट ठेवले आणि त्यांना आपला स्वभाव बदलण्याविषयी हळूच सुचवले. अर्थात् माधवरावांनी त्यांची ती सूचना मानली नि उदारपणाने प्रेमातील संन्यासयोग स्वीकारला! प्रेमदेवतेकडून आलेला आदेश झिडकारणे त्यांना अशक्य

होते. "तू आहेस सदा स्वतंत्र ललिते जा चारुतामंजरी। मांगल्यप्रद माळ घाल कुणिही श्रेष्ठाचिया कंधरी।"—असे ते प्रेयसीला म्हणू लागले! प्रेमभंगाच्या वेळी त्यांनी जी दुसरी कविता लिहिली होती तीमध्ये प्रेयसीला त्यांनी 'दगडी मूर्ती' म्हटले होते. पण 'माझ्या उत्कट भक्तीमुळे या दगडी मूर्तीलाही मी देवपणा आणीन' अशी उमेद धरली होती....तेव्हा स्वतःची वृत्ती पालटण्यात आपल्या उत्कट भक्तीचाच प्रत्यय आपण देत आहोत, अशी त्यांची समजूत असावी.

शांताबाईंच्या लग्नानंतर त्यांच्याशी माधवरावांचा संबंध जो तुटला तो सुमारे बारा वर्षे तुटलेलाच राहिला. त्या काळात शांताबाई चार मुलांच्या आई झाल्या, त्यांच्या मनस्वी वागण्याने पतीशी त्यांचे पटेनासे झाले, आणि त्यांचा संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गाला लागला. इकडे माधवराव वरदा-प्रकरणाच्या दिव्यातून पार पडले, विवाहबद्ध झाले, नि समाजात प्रतिष्ठा पावले. पुन्हा १९२९ साली दोघांची भेट झाल्यानंतर दोघांमधील संबंध नेमके कोणत्या स्वरूपाचे होते त्याचे वर्णन खानोलकरांनी आपल्या पुस्तकात केलेले होते. त्याचा निष्कर्ष असा होता, की पुनर्भेटीनंतर शांताबाई माधवरावांकडून सहानुभूतीची अपेक्षा करीत होत्या. एवढेच नव्हे, तर माधवरावांनी आपल्याशी पुन्हा प्रेमाचे संबंध जोडावे, अशी त्यांची इच्छा होती. प्रेमाचे जाळे सावधपणे पसरून त्यात माधवराव सापडतात का ते बघण्याचा प्रयत्नही त्यांनी चालवला होता. पण माधवराव अविचल राहिले. त्यांनी शांताबाईंना सहानुभूती दिली, मदत केली; पण ती 'भाऊ' म्हणून, मित्र म्हणून. पूर्वीचे प्रेम त्यांच्या मनात जागे झाले नाही आणि त्यांनी निग्रहपूर्वक शांताबाईंना चार हात दूर ठेवले. खानोलकरांनी आपल्या या वर्णनाला माधवरावांच्या पत्रांचे सज्जड आधारही दिले होते. पण हे वर्णन मला प्रथमतः समजले तरी उमजले नाही. माझ्या ते पचनी पडले नाही. त्यात माधवरावांची जी बदललेली वृत्ती गृहीत धरलेली होती त्या वृत्तीत माधवराव कसे गेले, का गेले, ते मला उलगडले नाही.—आणि त्या वृत्तीशी समरस होऊन तिचे चित्र उभे करायला माझी लेखणी कुरकूर करू लागली!

नव्या वृत्तीशी मी पटवून घेऊ शकत नव्हतो याचे एक कारण असे होते, की माधवरावांनी पूर्वी शांताबाईंवर किती जीव तोडून प्रेम केले होते ते त्यांच्याशी एकरूप होऊन मी अनुभवले होते. प्रेमभंग झाल्यावरही आपल्या कवितांतून त्या प्रेमाची अखंड जपणूक त्यांनी कशी केली होती ते मला ठाऊक होते. माधवरावांची प्रेमपरायणता नि स्त्रीविवशता माझ्या मनावर एवढी ठसली होती की पूर्वपूजित प्रेयसी कालांतराने पुढ्यात उभी राहिली नि खुणावू लागली तरी ते स्तंभासारखे अचल, निर्विकार राहतील, यावर माझा विश्वास बसत नव्हता. दुसरे असे, की पुनर्भेटीनंतर माधवरावांची शांताबाईंशी जी वागणूक झाली तीमध्येही त्यांचे पूर्वप्रेम क्वचित नि किंचित जागे झाल्याची शंका मला मधूनमधून येत होती. शांताबाईंच्या आत्मकथनावरून नि १९३१ साली त्यांच्यात, माधवरावांच्यात नि खानोलकरांच्या झालेल्या पत्रव्यवहारावरून मला असे दिसत होते की 'विरहतरंग' नि 'सुधारक' ही आपली पुस्तके माधवरावांनी शांताबाईंना वाचायला दिली होती. तेव्हा मला वाटे की आपले प्रतिभावैभव वधून शांताबाईंनी प्रसन्न व्हावे, त्यांच्या प्रसन्नतेच्या अमृतधारांत आपण न्हाऊन निघावे, अशी इच्छा माधवरावांच्या रोमँटिक मनात सुप्तपणे उसळत असावी! कदाचित, आपण भोगलेले प्रेमदुःख शांताबाईंना कळावे, अशीही आशा त्यांनी बाळगली असेल.

याच वेळी शांताबाईंच्या स्मरणवहीमधला पुढील भाग माझ्या दृष्टीस पडला नि मी चक्रावून गेलो. शांताबाईंनी लिहिले होते : "माधवराव, त्यांचा मुलगा, व मी केतकरांच्या समाधीकडे फिरायला गेलो होतो. मी त्यांच्याच कविता त्यांना म्हणून दाखविल्या. पाचांपैकी पावणेपाच मार्क त्यांनी दिले. परीक्षक म्हणून (बाकीचे मार्क)...कापले, असे ते म्हणाले." दोघे ज्ञानकोशकार डॉ० केतकरांच्या समाधीकडे फिरायला गेली होती;—म्हणजे १९३७ च्या एप्रिलनंतरचा काळ होता. दोघांचा संबंध १९२९ ते ३७ असा आठ वर्षे टिकून होता.—आणि ज्या कविता म्हणून दाखविण्यासाठी माधवरावांनी अनुनय करूनही शांताबाईंनी त्या पूर्वी म्हटल्या नव्हत्या त्या कविता आता शांताबाई आपल्या सुरेल आवाजात म्हणून दाखवीत होत्या. बरोबर छोटा दिनू असूनही त्या ऐकताना माधवराव रंगले होते. प्रसन्नपणे त्यांनी शांताबाईंना पावणेपाच मार्कांची शाबासकी दिली होती! शांताबाईंचे हे टिपण मनात घोळवल्यावर काही काळ तरी माझा असा ठाम ग्रह झाला, की उत्तर-आयुष्यातही माधवराव शांताबाईंच्यावर बेहद्द फिदा होते. खानोलकरांच्या वर्णनात फारसा अर्थ नाही!

पण संबंधित सर्व माहिती एकत्र करून तिचा विचार जेव्हा साकल्याने नि शांतपणाने मी करू लागलो तेव्हा खानोलकरांचे वर्णनच गोळाबेरजेने खरे धरले पाहिजे असे माझ्या लक्षात आले. सौजन्याच्या पलीकडची प्रेमाची किंवा प्रणयाची भावना माधवरावांच्या मनात जागी नव्हती, ते शांताबाईंपासून मनःपूर्वक दूर राहू बघत होते, असे दर्शविणाऱ्या पुढील गोष्टी साधन-सामग्रीत मला दिसू लागल्या : (१) शांताबाईंचे लग्न नि दोघांची पुनर्भेट यांमधील सुमारे बारा वर्षांच्या काळात माधवराव शांताबाईंवर प्रेमकवितांचा एकीकडे वर्षाव करीत होते, पण दुसरीकडे शांताबाईंच्या वागण्याने ते संत्रस्त झालेले होते. शांताबाईंनी माधवरावांचा नि आपली आई काशीबाई यांचा जिव्हाळ्याचा संबंध टिकू नये म्हणून खडा टाकला होता. आपली बहीण पिलूताई (गीताबाई) हिचे मन माधवरावांविषयी कलुषित केले होते. आणि आपली एक मावसबहीण फर्ग्युसनमधे शिकायला गेली तेव्हा 'पटवर्धनांशी मुळीच संबंध ठेवू नकोस' (तो मनुष्य चांगला नाही) असा इषारा तिला दिला होता! शांताबाईंच्या या वागण्यात स्वतः सोवळे असण्याचा नि सर्व दोष माधवरावांवर टाकण्याचा जो कांगावा होता तो माधवरावांच्या मनाला झोंबलेला होता. (२) पुनर्भेटीनंतर माधवरावांनी शांताबाईंच्या दुःस्थितीसंबंधी सहानुभूती दाखवली, पण मदत देताना ती 'भाऊ' म्हणून दिली. त्यांच्या पत्रांत प्रियकराची भूमिका चुकूनसुद्धा डोकावत नाही. (३) शांताबाईंनी त्यांना 'ॲटॅचची केस' भेट देण्याची इच्छा दर्शवली तेव्हा ती भेट नाकारावी अशीच त्यांची पहिली ऊर्मी होती. पण तसे करणे निष्ठुरपणाचे होईल असे वाटल्यावरून भेटीला त्यांनी मागाहून होकार दिला. (४) शांताबाईंनी प्रेमाची सूचक लगट जेव्हा चालवली तेव्हा तर त्यांनी ती सौजन्यपूर्वक पण निक्षून मोडून काढली. (५) शांताबाईंचे त्यांच्या पतीशी संबंध सुधारावे, यासाठी त्यांनी शांताबाईंना योग्य मार्गदर्शन केले. एकदा शांताबाईंना त्यांनी लिहिले : "आय विश यू हॅड लव्हड हिम विथ दॅट मॅड ऑर सुपरह्यूमन लव्ह व्हिच वुड हॅव प्रिव्हेंटेड मॅटर्स कमिंग टु धिस स्टेट..." (६) शेवटच्या आजारात शांताबाई त्यांना भेटायला गेल्या तेव्हा त्यांना 'आनंद झाला नाही' अशी विठ्ठलराव घाट्यांची साक्ष होती.—या साऱ्या गोष्टींच्या संदर्भात 'विरहतरंग' किंवा

'सुधारक' या पुस्तकांच्या भेटीचा जेव्हा मी विचार केला तेव्हा मला वाटले, की पूर्वप्रेम एखाद्या क्षणी माधवरावांच्या मनात उसळले असेल, नाही असे नाही; पण ती त्यांची स्थायी वृत्ती नव्हती. केतकरांच्या समाधीकडे ते शांताबाईंबरोबर फिरायला गेले वगैरे गोष्ट तर केवळ सौजन्याची द्योतक असेल. कविता म्हणताना शांताबाईंच्या मनात प्रेम असणारच; पण मार्क देताना माधवरावांच्या मनात प्रेम असेलच असे नाही. शांताबाईंच्या दुःखावर दुरून फुंकर घालण्याचा तो प्रयत्न असेल!

बुद्धीने खानोलकरांचे म्हणणे मी स्वीकारले; पण ते मनाने स्वीकारण्यापूर्वी एकेदोन गमतीदार निमित्ते झाली. शांताबाईंशी स्वतःचा जो पत्रव्यवहार होई तो लीलाबाईंपासून माधवराव लपवून ठेवीत नसत. १९३१ साली त्यांनी लीलाबाईंना नागपूरला एकदा कळवले, की शांताबाईंची स्वारी आता "शांत व समाधानी" झालेली दिसते. तेव्हा लीलाबाईंनी उत्तरात म्हटले, "काय, सौ० शांताबाई...सध्या शांत झाल्या आहेत म्हणतोस? उत्तम आहे. पण...तो सध्यापुरता थंड झालेला एक ज्वालामुखी आहे. केव्हा व कसा...त्याचा स्फोट होईल ह्याचा नियम समजू नकोस. बाकी तूही त्यांना खूप मिळाला आहेस म्हणा! बिचाऱ्यांची चांगलीच निराशा करून खोडकी मोडतोस. मग त्यांनी शांत व...समाधानी व्हावे नाही तर काय करावे?" या उत्तरात पत्नीला माधवरावांविषयी असलेला जो निःशंक विश्वास प्रकट झाला आहे तो विश्वास म्हणजे माधवरावांच्या नव्या वृत्तीची मला निर्णायक खूण वाटली. शिवाय एके दिवशी श्री० नाना रानड्यांनी त्यांच्या संग्रहामधले शांताबाईंचे प्रौढ वयातले एक छायाचित्र मला दाखवले. ते बघून माझा संदेह पुरता फिटला. छायाचित्रात मी कल्पनेने वधितलेली बडोद्याच्या महाविद्यालयातली नवयौवना, श्यामला, चपला, विपुलकुंतला, सुलोचना शांता मला दिसली नाही. मला दिसली एक जाडजूड, गच्च भरलेली, बसकट, काळी बाई. थेट तेलाच्या मेणचट बुधल्यासारखी! मी मनाशी उद्‌गारलो, 'छे! छे! या बुधल्यावर प्रेम करीत राहणे माधवरावांना शक्यच नव्हते!'—मनाने खानोलकरांचे म्हणणे पटल्यावर, माधवरावांच्या नव्या वृत्तीशी एकरूप होऊन तिचे चित्र उभे करणे मला अवघड गेले नाही.

१९१७ साली लग्न होऊन शांताबाई अलग झाल्यावर माधवरावांच्या कविमनात त्या कशा घोटाळत राहिल्या, कवितांत कशा नाना प्रकारांनी उमटल्या, त्याचा शोध घेणे म्हणजे एक प्रदीर्घ पण रमणीय प्रवास होता. काव्येतर साधनसामग्रीवरून शांताबाई नि माधवराव यांच्या संबंधाचा विस्तृत तपशील मी जमवला होता, दोघांच्या मनातील एकमेकाविषयीचे भाव नीट समजून घेतले होते, आणि हे सारे स्थलकालाशी पावलोपावली निबद्धही केले होते. त्यामुळे काव्यातील शांताबाईंचा शोध अवघड वाटला नाही. माधवरावांच्या बहुतेक सर्व कवितांची लेखनस्थळे नि लेखनदिनांक उपलब्ध असल्यामुळे, कोणती कविता कोणत्या वास्तवाशी जोडायची त्याची कल्पना करणे सोपे गेले. स्वतः माधवरावांनी आपल्या अनेक कवितांची "स्फूर्तिदात्री' म्हणून शांताबाईंकडे अंगुलिनिर्देश केलेला होता, आणि माधवरावांचे काही काव्यलेखन आपल्यावरून झाल्याची जाण खुद्द शांताबाईंनी नमूद करून ठेवलेली होती. शिवाय अमकीतमकी कविता शांताबाईंना उद्देशून लिहिलेली आहे, अमक्यातमक्या ओळीत शांताबाईंचा उल्लेख आहे, अशी माहिती माधवरावांच्या परिचितांनी आपल्या लेखांत किंवा आठवणींत पुरवलेली होती. तेव्हा हा शोध घेताना मला आत्मविश्वासाची उणीव नव्हती.

शोधाच्या मार्गात काही चकवे होते; पण ते टाळण्याचा मी शक्य तेवढा प्रयत्न केला. माधवरावांच्या जीवनात शांताबाईंखेरीज लक्ष्मीबाई, मैना, ताई, 'टी० आर०' वगैरे स्त्रियांकडे प्रेयसीची भूमिका कमजास्त काळ आलेली होती; वरदेने तर वेगळेच महत्त्व त्यांच्या भावविश्वात मिळवले होते; आणि ज्यांची नावे सांगता येत नाहीत अशा काही इतर स्त्रियाही त्यांच्या कविमनाला मोरपिसाचा स्पर्श करून गेल्या असतील. त्यामुळे कवितेत जिथे शांताबाईंचे म्हणून प्रतिबिंब पकडावे तिथे ते दुसऱ्या कुणाचे असण्याची एक शक्यता होती; एकाच कवितेत अनेकांची प्रतिबिंबे परस्परांत मिसळलेली असण्याची दुसरी शक्यता होती; आणि माधवरावांच्या भावनांचे संक्रमण होऊन एकीची भावना दुसरीला, दुसरीची तिसरीला चिकटण्याची तिसरीही शक्यता होती. शिवाय कवितेत वास्तव किती नि कल्पित किती हा प्रश्न कधीच पूर्णतया न सुटणारा होता. पण बाहेरचे निःसंदिग्ध वास्तव मी हातात घट्ट धरून ठेवले, इतर स्त्रियांची प्रतिबिंबे वेचून वेचून बाजूला काढली, जेथे थोडीफार शंका येईल अशा जागाही विचारातून वगळल्या, आणि हे चकवे जमतील तेवढे चुकवले. कवितांतील वास्तव शोधताना मी कोणती पथ्ये कशी पाळीत होतो त्याचे सर्वसामान्य विवरण यापूर्वी तिसऱ्या प्रकरणात (पृ० ४४ ते ४७ वर) केलेले आहे. ती पथ्येही शांताबाईंचा हा शोध करताना मी पाळीत होतो, हे वेगळे सांगायला नको.

हा शोध चालू असताना काव्याच्या उद्यानात शांताबाई मला जागोजाग सापडल्या. कधी या झाडाआड तर कधी त्या पुष्करणीपलीकडे, कधी या कुंजात तर कधी त्या वेलीच्या वलयात त्या सापडायच्या नि लपंडावात लपलेला भिडू हुडकून काढल्याचा विशेष आनंद मिळायचा. पण माझे मन आनंदाचे टवटवीत तुरे फुटून तरारले ते शांताबाईंच्या शोधात मला जे माधवराव सापडले त्यामुळे! माहीत असलेले माधवराव तर मला पुनःपुन्हा सापडलेच; पण माहीत नसलेले नवे माधवरावही अनेकदा सापडले. वास्तवात शांताबाईंनी माधवरावांना अव्हेरले होते आणि माधवराव बाणेदारपणाने स्वतंत्र, स्वावलंबी जीवन जगत होते. पण काव्यात शांताबाईंना शब्दांच्या आराशीत बसवून त्यांचा चिवट अनुनय त्यांनी चालवला होता. वास्तवात शांताबाईंनी त्यांच्याविषयी अनेकांची मने कलुषित केल्यामुळे ते चिडले होते, संतप्त झाले होते. पण काव्यात ते त्यांना म्हणत होते : "तूते देव करो क्षमा जरि मला घाईत देशी सुळी!" (तु० दु०, ६८). वास्तवात वरदेने फुलवलेल्या एका सात्त्विक प्रेमाच्या पौर्णिमेत ते स्वच्छंद फिरत होते; पण काव्यात त्याच वेळी आपल्या कवितांचा 'निर्माल्य' शांताबाईंच्या चरणांवर ते भक्तिभावाने 'समर्पण' करीत होते. शांताबाईंच्या दुराराध्य प्रतिमेभोवती प्रदक्षिणा घालण्याची त्यांच्या प्रतिभेला जणू सवय जडली होती; आणि लग्न झाले, पुनर्भेटीनंतर खऱ्या शांताबाईंचा लघळपणा त्यांनी झिडकारला, मुले झाली, तरी ही सवय सुटत नव्हती!—आणि त्यांच्या प्रतिभेची वार्ता काय सांगावी! शांताबाईंच्या शोधात त्या प्रतिभेची निर्मितिप्रक्रिया माझ्यापुढे कुतूहल जागवीत उलगडत होती. ते बडोद्याला होते, प्रेमभावनेच्या प्रचंड पुरात वाहत होते, नाकातोंडांत पाणी जाऊन घुसमटले होते, तेव्हा त्यांच्या काव्यनिर्मितीचा वेग मंद होता. ती निर्मिती संमिश्रतेने नि ओबडधोबडपणाने शबल झालेली होती. पण ते पुण्यात आले, भावनांच्या प्रवाहाच्या कडेला उभे राहून त्याकडे तटस्थपणे बघू लागले, तेव्हा निर्मितीचा वेग विलक्षण वाढला. तीमध्ये एकेक निर्मिश्र, काव्ययोग्य भावच्छटा नेमकी निवडली जाऊन तिचे कलापूर्ण अलंकरण होऊ

लागले. माधवरावांच्या प्रतिभेने मुळातल्या शांताबाईंना पुढे पुढे बदलले, त्यांचे उन्नयन (सब्लिमेशन) केले, त्यांना लोभसवाणे रूपगुणसौंदर्य दिले, आणि त्या नव्या मानसीशी ते इच्छापूर्तीची क्रीडा करू लागले. जे प्रत्यक्षात त्यांना मिळू शकले नाही ते काव्यात त्यांनी मनसोक्त मिळवले. मातीतील अन्नपाणी शोषून प्राजक्त अवकाशात भरघोस फुलावा तसे त्यांचे काव्य पूर्वायुष्यातील भग्न प्रेमाचे अनुभव पचवून उत्तर आयुष्यात गच्च फुलत राहिले!

माधवरावांच्या काव्यात शांताबाईंचा शोध घेत असताना मला ज्या विशिष्ट, अर्थपूर्ण जागा आढळल्या त्यांपैकी काहींचा निर्देश आवर्जून करण्यासारखा आहे :

१. फार्सी हा माधवरावांचा अभ्यासविषय होता आणि त्यांच्या काव्यातील प्रेयसी थेट फार्सी काव्यातील प्रेयसीसारखींच होती—स्वच्छंद, चंचल, बेजबाबदार, उद्धत! प्रियकरापेक्षा संपन्न नि प्रतिष्ठित. त्याला पाखराप्रमाणे हाताच्या बोटांवर खेळवणारी. त्यामुळे अनेकांचा असा समज झालेला होता, की त्यांनी आपल्या काव्यात जी प्रेयसी रंगवली ती फार्सीचे अनुकरण करून रंगवली. पण मला या काव्यगत प्रेयसीचे शांताबाईंशी जे साम्य होते ते उघड उघड नि जागोजाग जाणवले, नि लक्षात आले की फार्सीच्या अनुकरणातून नव्हे तर स्वानुभवातून त्यांच्या काव्यातील प्रेयसी उभी राहिली. त्यांच्या काव्यातील प्रियकरदेखील फार्सी काव्यातील प्रियकराची आठवण करून देणारा होता.—प्रेयसीपुढे दीन, लीन झालेला नि तिच्यासाठी तडफडणारा. ती दुसऱ्याच्या गळ्यात पडली तरी तिच्यासाठी जीव टाकणारा. त्यामुळे प्रियकरही त्यांनी फार्सी काव्यातून उचलला, अशी काहींची कल्पना होती. पण या प्रियकराचे खुद्द माधवरावांशी जे जवळचे नाते होते ते मला दिसले आणि तसली कल्पना माझ्या डोक्यात राहिली नाही. त्यांच्या अनुभवातली प्रेयसी काय किंवा प्रियकर काय, दोघेही मराठी कवितेच्या परंपरेत कोठेही बसत नव्हती. त्यामुळे त्यांचे चित्रण करणे हे एक धाडस होते. त्यासाठी चित्रणाची नवी चाकोरी पाडणे आवश्यक होते. पण माधवरावांचा फार्सी कवितेशी उत्तम परिचय असल्याने ते धाडस करणे, तशी चाकोरी पाडणे, त्यांना सुलभ गेले. त्यांनी तेवढे ऋण मात्र फार्सीकडून नक्की घेतले.

२. 'संगमोत्सुक डोह' ही नितांतरमणीय कविता माधवरावांनी शांताबाईंना उद्देशून लिहिली असावी, हे त्या कवितेमधले प्रारंभीचे चरण वाचतानाच मला वाटून गेले. कवितेचे लेखन १९२४ च्या ऑक्टोबरमध्ये, वरदा-प्रकरणात विजनवास भोगीत असताना आणि वरदेशी स्नेहाची देवाणघेवाण चालू असताना त्यांनी केले होते. पण "एकत्र गुंफून जीवित-धागे। प्रीतीचे नर्तन नाचलो मागे" हे भूतकाळ आठवणारे उद्गार, त्यांमधील "मागे" हा शब्द, मला शांताबाईंकडे घेऊन गेला—आणि गंमत अशी की शांताबाईंच्या आत्मचरित्रात त्याला आधारही मिळाला. शांताबाईंच्या आत्मचरित्राचे गिरीशांनी 'स्वप्नभूमी'साठी काही उतारे काढले होते नि त्यांखाली शांताबाईंची स्वाक्षरी मिळवली होती. त्यांपैकी एका उताऱ्यात शांताबाईंनी म्हटले होते : "'एकत्र गुंफून जीवित-धागे' या रूपकाचे धागेदोरे मजपर्यंत कसे पोचले होते, ते ध्यानात घेतले. मला स्वतःबद्दल धन्यता वाटली." कवितेचा वास्तवातला संदर्भ असा नेमका हाती आल्यावर कवितेमधले रूपक खोडकन माझ्या कल्पनेपुढे उघडले गेले. प्रियकर नि प्रेयसी यांच्यावर उदधी नि नदी यांचे रूपक करावे, ही शेकडो वर्षांची कविपरंपरा होती. पण ती परंपरा मोडून डोह नि नदी यांचे रूपक माधवरावांनी स्वीकारले होते; आणि डॉ० रा० चिं०

श्रीखंड्यांसारख्या टीकाकारांनी त्यासाठी त्यांची चेष्टाही केली होती. (लोकशिक्षण, डिसेंबर १९२५). पण उदधीची मोठी भूमिका सोडून त्यांचा प्रियकर डोहाएवढा संकुचित का झाला? उत्तर सरळ होते. आपला भाव व्यक्त करण्यासाठी माधवरावांचे कविमन प्रतिमा हुडकू लागले आणि ती प्रतिमा डोहाचीच निघाली. डोह नदीहून लहान असतो. डोहाचे जीवन नदीवाचून एकलकोंडे बनते. नदीची मिठी पडली की तो भरतो, वाहता होतो. मनातल्या शांताबाईंशी माधवरावांचे नाते असेच होते. त्या प्रतिष्ठेने नि वयाने मोठ्या होत्या. त्या दूर वाहत गेल्याने माधवराव एकटे पडले होते. त्यांची मिठी पडली तरच आपण भरू, वाढू अशी माधवरावांची कल्पना होती. तेव्हा त्यांच्या प्रियकराला डोह होण्यावाचून दुसरी गतीच नव्हती! रूपक असे उलगडले तेव्हा माझ्याजवळ कोणी नव्हते; नाहीतर मिठी मारून मी माझा आनंद जवळच्या माणसाला कळवला असता!

३. 'विरहतरंग' वाचण्यापूर्वी त्या खंडकाव्याच्या नायिकेविषयी विठ्ठलराव घाटे म्हणाले होते, की 'इंदू कोण हे मी नक्की सांगेन.' पण 'विरहतरंग' वाचून पाहिल्यावर, इंदू कोण ते त्यांना सांगता येईना! खानोलकरांना लिहिलेल्या १६ जून १९३१ च्या पत्रात माधवराव म्हणतात, की "त्यांचा [म्हणजे घाट्यांचा] ग्रह बदलून त्यांनी आपली चूक कबूल केली." पण घाट्यांना इंदू कोण ते हुडकता आले नसले, तरी इंदू कोण ते मी नेमके हुडकले आहे, अशी माझी समजूत आहे. मी माधवरावांच्याच हातचे विकीर्ण उल्लेख जमवीत नि जुळवीत गेलो आणि इंदूच्या मुळाशी आपोआप पोचलो. माधवरावांच्या सांगण्याप्रमाणे 'विरहतरंगा'चा आरंभ १९१३ साली 'प्रियकराची विरहपत्रिका' या वीस-पंचवीस श्लोकांच्या कवितेने झाला. म्हणजे शांताबाईंच्या संबंधात विरहाच्या जळत्या भावना जेव्हा ते अनुभवीत होते तेव्हा 'विरहतरंगा'चे बीज रुजले. पुढे त्यांच्याच सांगण्याप्रमाणे, त्या विरहपत्रिकेत १९२० साली काही श्लोकांची भर पडली आणि १९२३ मध्ये तिला 'विरहतरंग' हे नाव लाभले. डॉ० चुनेकरांच्या हिशेबाप्रमाणे १९२५ अखेर विरहतरंग लिहून पुरे झाले; तेव्हा १९२३ च्या ऑक्टोबरमध्ये माधवरावांनी रामभाऊ मराठ्यांना पाठविलेले एक सुनीत विरहतरंगाच्या घडणीत विचारात घ्यायला प्रत्यवाय नसावा. या सुनीतात नि विरहतरंगाच्या पहिल्या तरंगात एवढे साम्य आहे, की तेच त्या तरंगाचे पूर्वरूप असले पाहिजे, याविषयी शंका उरत नाही. त्या सुनीतात कवी म्हणतो :

"गेली सोडुन ती तिच्याविण नऊ पुष्पर्तु गेले रिते;
अन् विद्यार्थिदशा कधीच सरली, दूरावली वांछिते."

१९२३ या लेखनकालाच्या मागे सुनीतात निर्देशिलेले 'नऊ पुष्पर्तु' योजले की पुन्हा आपण १९१३-१४ सालाशी—म्हणजे शांताबाईंशीच—जाऊन ठेपतो. तेव्हा शांताबाई हेच इंदूचे उगमस्थान होय याविषयी माझी खात्री पटली. खुद्द शांताबाईंनी आपल्या आत्मवृत्तात म्हटले आहे, की "विरहतरंगात वह्यांवर लिहून एकमेकींशी बोलत राहाणाऱ्या मी व सुलभाबाई आहोत, हे वाचून गुदगुल्या झाल्या." त्यामुळे तर माझी खात्री दृढ झाली. मात्र, इंदूचे उगमस्थान शांताबाई असल्या तरी इंदू नि शांताबाई एक आहेत असे म्हणायला मी तयार झालो नाही. दोघींत साम्याप्रमाणे कितीतरी भेद मला दिसत होता आणि त्या भेदाचा निर्वाह

करायला हवा याची मला जाण होती. शांताबाईंच्या मानाने इंदू फार लोभस, दर्शनीय, काव्यात्म नि गूढरमणीय आहे. तेव्हा आपल्या सुप्त इच्छा तृप्त करण्यासाठी माधवरावांच्या प्रतिभेने शांताबाईंना बदलून घेतले का, त्यांचे उन्नयन केले का, ते बघण्याकडे मी लक्ष वळवले.

४. भूतभविष्यांचा अनुबंध जुळवणे हे माझ्या शोधाचे एक अंग होते. त्यामुळेच 'अतर्क्य प्रेम' या कवितेची निर्मितिप्रक्रिया माझ्या हाती लागली. फर्ग्युसन महाविद्यालय ही संस्था वरदा-प्रकरणात माधवरावांना सोडायला लागली होती. पण त्या संस्थेवर त्यांनी अखंड प्रेम केले. १९३५ साली फर्ग्युसनचा सुवर्णमहोत्सव झाला तेव्हा निमंत्रण आल्यामुळे माधवराव मोठ्या उल्हासाने महोत्सवाला उपस्थित राहिले. पण तेथे एका वृद्ध गृहस्थांनी त्यांना प्रश्न केला, 'काय माधवराव? तुम्ही आणि इथे फर्ग्युसनमध्ये? अहो, या सोसायटीने तुम्हांला बाहेर काढले ना?' या प्रश्नाने त्यांच्या साऱ्या उल्हासावर पाणी पडले आणि ते मुकाट्याने समारंभातून निघून गेले. यानंतर दोन दिवसांनी, २३ एप्रिलला, सायंकाळी, फर्ग्युसनच्या टेकडीवर 'अतर्क्य प्रेम' या कवितेचा जन्म झाला. ही कविता फर्ग्युसनवर आहे अशी माहिती लीलाबाईंनी पुरवली आहे आणि समारंभाला माधवरावांबरोबर उपस्थित असणाऱ्या गिरीशांचीही तशीच साक्ष आहे. पण कवितेत सुवर्णमहोत्सव नाही, तर विवाहसमारंभ आहे; फर्ग्युसन ही संस्था नाही, तर नववधू आहे; माधवराव नाहीत, तर त्या नववधूचा परित्यक्त प्रियकर आहे! हा प्रियकर परित्यक्त असूनही प्रेयसीवर मंगलाक्षता टाकण्यासाठी आलेला असतो. त्याला बघून लोक म्हणतात, की 'हा इथे कसा?' पण तो प्रेयसीला म्हणतो, 'मला लोकांच्या प्रश्नांची पर्वा नाही. तू माझ्यावर अन्याय केलास, पण त्या अन्यायाहून मोठे असे प्रेम माझ्या अंतरात भरून राहिले आहे. म्हणूनच मी इथे आलो. तुला अंकित करावे, हा माझा केव्हाच हेतू नव्हता; तर तुझी काही सेवा करावी अशी स्पृहा मी बाळगली होती. प्रिये, तुला सेवा नको असेल तर राहू दे. पण तुझ्या उत्कर्षाच्या या घटकेला मी मंगलाक्षताही टाकू नयेत का?' प्रियकराचे हे मनोगत मी वाचले आणि माझ्या दृष्टीसमोर अठरा वर्षांपूर्वीचा माधवरावांच्या जीवनातील प्रसंग उभा राहिला. १९१७ साली तेही परित्यक्त प्रियकर होते आणि तरीही शांताबाईंच्या लग्नानंतर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी कशाळकरांच्या घरी गेले होते! तो प्रसंग नि त्या वेळच्या भावना या कवितेत जाग्या झाल्या होत्या आणि फर्ग्युसनवरचे एक अपूर्व प्रेमगीत तयार झाले होते. छे, छे! लौकिकात ते प्रेमगीत फर्ग्युसनवरचे असले तरी माधवरावांच्या अंतरंगात ते कदाचित शांताबाईंवरचेच प्रेमगीत असेल!

माधवरावांच्या नुसत्या कवितांतच नव्हे तर त्यांच्या साऱ्या जीवनात मी घेतलेला शांताबाईंचा शोध म्हणजेही एक रमणीय प्रवास होता. त्या प्रवासातले काही टप्पे पूर्वलेखकांनी आधी मला सूचित केले होते; पण त्यातील अनेक चढउतार नवे होते, अनेक वळणे अनपेक्षित होती. टप्प्याटप्प्यावर भेटलेली नवलाई, नि विस्मय ही तर थक्क करणारी होती. या प्रवासाचे सिंहावलोकन केले तर वाटते, शांताबाईंचा शोध मी केला म्हणून माधवराव मला पुष्कळ सापडले. मी नुसते माधवरावच शोधले असते तर एवढे माधवराव मला सापडू शकले नसते!

७

□ □ □ □ □ □ □ □ □ □

शोध : वरदा-प्रकरणाचा

वरदा-प्रकरणामुळे माझी जिज्ञासा प्रथमारंभीच कशी चाळवली गेली, ते पहिल्या प्रकरणात सांगितले आहे. (पृ० ८ ते १०). १९७०-७१ साली बी० ए०च्या विद्यार्थ्यांना खानोलकरांचे पुस्तक शिकवीत असतानाच मला खानोलकरांच्या, घाट्यांच्या नि गिरीशांच्याही माहितीमधला अपुरेपणा जाणवला होता आणि त्या तिघांनी न बघितलेल्या डे० ए० सोसायटीच्या दप्तरात कोणती माहिती असेल अशी उत्सुकता लागून राहिली होती. डे० ए० सोसायटीत रँ० र० पु० परांजप्यांच्यासारखे समतोल बुद्धीचे सुधारणावादी लोक मुख्य स्थानांवर असतानाही माधवरावांच्या विरुद्ध साधे बहुमतच नव्हे तर तीनचतुर्थांश बहुमत का गेले, रविकिरण-मंडळात सर्वजण माधवरावांचे मित्र नि रोमँटिक जीवनाचे पुरस्कर्ते असूनही तेथेदेखील वरदा-प्रकरणावरून फाटाफूट का झाली, अशी प्रश्नचिन्हे माझ्यासमोर उभी होती. विशेष म्हणजे खानोलकर, घाटे, गिरीश या जवळच्या मित्रांचे लिखाण वाचूनही माधवरावांचे किंवा वरदेचे मन मला समजू शकत नव्हते. माधवरावांच्या मनात वरदेविषयी किंवा वरदेच्या मनात माधवरावांविषयी नेमकी कोणती भावना असेल, असे कोडे मला पडले होते आणि त्या कोड्याने मी अस्वस्थ झालो होतो.

वास्तविक पाहता, प्राध्यापकाने संशोधनात शिरावे अशी सामान्यतः अपेक्षा नसते. त्याने पुस्तकात बघून नीट शिकवले की कोणाची काही तक्रार असत नाही. पण वरदा-प्रकरणामुळे माझी जिज्ञासा इतकी चाळवली गेली, की शिकवता शिकवता नकळत मी संशोधनाकडे वळू लागलो. एकदा प्रा० रा० श्री० जोगांशी वरदा-प्रकरणातील माझ्या शंका मी सहज बोलून दाखवल्या. तेव्हा जोगांनी माधवरावांच्या विरोधकांचे काही मुद्दे मला स्पष्ट करून सांगितले आणि अशीही माहिती पुरवली, की वरदा एके रात्री माधवरावांच्या खोलीवर राहिली होती, अशी विरोधकांच्या गोटात फार बोलवा होती! माधवरावांच्या विरोधकांची बाजू खानोलकरांनी वगैरे स्पष्ट केलेली नाही असा माझा ग्रह होताच. तशात जोगांच्या या बोलण्याची भर पडली—आणि माधवरावांच्या विरोधकांची भूमिका सर्व बाजूंनी मनातल्या मनात मी सजवू लागलो. त्या वेळी माधवरावांच्या समर्थकांशी मनोमन माझा जो वाद झाला त्याची टिपणेदेखील मी करून ठेवली. मी तेव्हा जाणलेली विरोधकांची भूमिका पुढीलप्रमाणे :

माधवराव डे० ए० सोसायटीचे आजीव सदस्य होते. सोसायटी नि तिच्या संस्था यांच्या हिताला जपणे हे त्यांचे आद्य कर्तव्य होते. तेव्हा वरदा-प्रकरणाचा निर्णय करताना त्यांचे वर्तन सोसायटीच्या हिताला साधक होते की बाधक होते एवढेच सोसायटीने बघितले. ते बाधक दिसले म्हणून त्यांना शिक्षा दिली. त्यांचे वर्तन पुरोगामी समाजसुधारणेला (मोकळ्या स्त्रीपुरुष-संबंधाला) पोषक होते काय, उच्च नीतीच्या दृष्टीने समर्थनीय होते काय, वगैरे प्रश्न सोसायटीच्या

कक्षेत येत नव्हते. त्या प्रश्नांचा विचार करण्याची सोसायटीला जरूर नव्हती. तेव्हा ते प्रश्न उत्पन्न करून मूळ मुद्याला बगल देण्यात अर्थ नाही. वरदा वसतिगृहातील एक अविवाहित तरुण विद्यार्थिनी होती. त्यामुळे सर्व आजीव सदस्यांशी तिचे नाते पाल्याचे होते; त्यांच्याकडे तिच्या आई-वडिलांनी तिचे पालकत्व सोपविलेले होते. अशा स्थितीत एखादा तरुण, अविवाहित आजीव सदस्य जर तिच्याशी टेनिस खेळू लागला; तिच्याबरोबर फिरायला नि सहलीला जाऊ लागला; तिच्या वारंवार गाठीभेटी घेऊ लागला; घाट्यांनी म्हटल्याप्रमाणे, वडीलधारी मंडळी पाहुणी आलेली असताना का होईना पण तिला आपल्या खोलीवर रात्री ठेवून घेऊ लागला; तर ते पालकाला शोभणारे कृत्य म्हणता येईल का? माधवरावांच्या वर्तनावर टेनिसच्या खेळावरून आजीव-सदस्य-मंडळात प्रथम टीका झाल्यानंतरही त्यांचे असले वर्तन हटेलपणाने चालूच राहिले. तेव्हा सोसायटीने त्यांना दोन वर्षे सक्तीच्या रजेवर पाठवले, तर त्यात काय चुकले? सक्तीच्या रजेच्या काळातही त्यांनी आपले वर्तन सुधारले नाही. त्यांनी वरदेशी पत्रव्यवहार चालू ठेवला आणि नाना रानड्यांच्या घरी ते तिला समक्ष भेटले. मग त्यांच्यावर राजिनामा देण्याचा प्रसंग सोसायटीने का आणू नये? रानड्यांच्या घरी त्यांची जी भेट झाली ती त्यांना अनपेक्षित असेल; पण तिच्याशी संबंध न ठेवण्याची अट जर त्यांच्यावर होती तर त्यांनी भेटीत भाग का घेतला? वरदेशी अवाक्षर न बोलता ते तेथून चालते का झाले नाहीत? त्यांचे वर्तन समाजाच्या दृष्टीने आक्षेपार्ह होते, हे सोसायटीतल्या विरोधकांनाच वाटले नाही, तर रविकिरण-मंडळातल्या त्यांच्या मित्रांनाही वाटले. तेव्हा त्यातील आक्षेपार्हता नाकारता कशी येईल? माधवराव म्हणत होते, की वरदेच्या मनात त्यांनी लग्नाविषयी अपेक्षा निर्माण केल्या नाहीत आणि तशी लालूच दाखवून तिला फसवले नाही. पण त्यांनी वरदेशी जो घनिष्ठ संबंध ठेवला होता तोच उपवर मुलीचे मन चाळवायला पुरेसा नव्हता काय? वरदेच्या मनात लग्नाच्या अपेक्षा नसत्या तर वसतिगृहात लग्नाबद्दल कानगोष्टी तिने का केल्या असत्या? पुढे रानड्यांच्या घरी लग्नाची विनंती का केली असती? तिच्यावर आपले एक प्रकारचे "प्रेम" होते, असे माधवरावांनीच म्हटलेले आहे (खानोलकर, पृ० १८८); तर तिच्या भावनांशी ते खेळले, तिची त्यांनी वंचना केली, हा आरोप खोटा कसा म्हणता येईल? सारांश, त्यांचे वर्तन बेजबाबदारपणाचे होते, वाईट लोकप्रवादांना वाव देणारे होते, एका विद्यार्थिनीच्या जीवनाची घडी विसकटवणारे होते, सोसायटीची प्रतिष्ठा कमी करणारे होते, यात शंका नाही. पुनःपुन्हा सूचना मिळूनही त्यांनी अशा वर्तनाचा हेका चालू ठेवला. अशा स्थितीत सोसायटीने त्यांना स्वतःपासून दूर केले तर त्यात काय चुकले? सोसायटीचा निर्णय अगदी न्याय्य होता.

माधवरावांवर दोष ठेवणारी त्यांच्या विरोधकांची भूमिका मी युक्तिवादपूर्वक अशी सजवली आणि मौज अशी की त्या वेळी ती मला पटायलाही लागली. खानोलकर, घाटे, नि गिरीश या तिघाही माहितगार व्यक्तींनी माधवरावांना निर्दोष ठरवलेले असताना असे का व्हावे? मला आता वाटते, की त्या तिघांच्या समर्थनात जी लटपट होती तिची प्रतिक्रिया माझ्या मनात झाली असावी. खानोलकरांनी प्रतिपक्ष फारसा समजून न घेता त्याच्यावर यथेच्छ शेरेमारी केली होती. 'शिक्षणक्षेत्रात शिरलेले क्षुद्र जंतू' असे त्या पक्षाला तुच्छतेने संबोधिले होते. (पृ० १५०). माधवरावांच्या मृत्यूनंतर घाट्यांनी रेडिओवर जे भाषण केले त्यात माधवरावांच्या तथाकथित

अपराधांचा त्यांनी पाढा वाचला होता. पण तो पाढा उघड-उघड अपुरा किंवा फसवा होता. (पाहा, खानोलकर, पृ० १२३–२४). गिरीशांनी 'स्वप्नभूमी'त वरदा-प्रकरणातील काही अस्सल नि महत्त्वाची कागदपत्रे छापली होती. पण त्यांतून 'कानिटकर-पार्टीचे निवेदन' वगैरे प्रतिपक्षाला अनुकूल असा भाग नेमका गाळलेला होता. (पाहा, पृ० ६८). तेव्हा असल्या लटपटीत समर्थनांबद्दल अरुची वाटून मी विरुद्ध बाजूला झुकलो असेन. प्रा० केशवराव कानिटकर, प्रा० वि० के० जोग वगैरे आजीव सदस्यांनी आपल्या गटाच्या स्वार्थासाठी नि आकस धरून माधवरावांवर हल्ले चढवले असतील, हे मला मान्य होते. पण सोसायटीने जो निर्णय केला त्यात रँ० परांजपे, प्रा० गो० चि० भाटे वगैरे समतोल बुद्धीची सुधारणावादी मंडळी सामील होती. एवढेच नव्हे तर माधवरावांच्याविषयी उघड सहानुभूती बाळगणारे प्रा० नाईक नि प्रा० कोल्हटकर वगैरे सद्गृहस्थही त्या निर्णयाला अनुकूल झाले होते. तेव्हा माधवरावांची बाजूच लंगडी असली पाहिजे, या निष्कर्षाकडे मी लोटला गेलो. शिवाय मीही डे० ए० सोसायटीचा एक आजीव सदस्य होतो. आजीव सदस्याच्या वर्तनाचा प्रश्न निघाला तर त्याची शहानिशा सोसायटीत किती कसून होते ते मला ठाऊक होते. आजीव सदस्याविरुद्ध उपाययोजना व्हायची तर ती गुप्त मतदानाने तीनचतुर्थांश मते पडली म्हणजे मगच होते, हेही मी जाणून होतो. तेव्हा सोसायटी माधवरावांचा 'नाहक' बळी घेईल यावर विश्वास ठेवणे मला साहजिकच फार कठीण होते.

यानंतर माधवरावांचे चरित्र स्वतःच लिहिण्याचा संकल्प मी सोडला आणि साधनसामग्रीचा शोध चालू केला. त्या शोधात १९७१ च्या एप्रिल, मे, नि जून महिन्यांत जेव्हा डे० ए० सोसायटीचे दप्तर मी धुंडाळले तेव्हा वरदा-प्रकरणासंबंधी माझ्या ज्या समजुती होत्या त्यांना अक्षरशः भूकंपाचे धक्के बसले. भूकंपाने जुन्या बांधकामाची मोडतोड व्हावी, नद्यांचे प्रवाह बदलावे, जुन्या डोंगरांच्या जागी नवे डोंगर दिसू लागावे, सृष्टीचा चेहरामोहराच पालटावा, तसा प्रकार झाला! दप्तराच्या कागदावरची अक्षरे कोरडी नि थंड होती. पण आजीव सदस्य म्हणून मला जो पंधरा वर्षांचा अनुभव होता त्या अनुभवाचा प्रकाशझोत त्या अक्षरांवर मी टाकला आणि त्यांना ऊब दिली, त्यांच्यात प्राण भरला. मग त्याच अक्षरांनी भूकंपाचे रामायण माझ्या दृष्टीसमोर घडवले आणि होत्याचे नव्हते, नव्हत्याचे होते करून टाकले. मला जाणवलेले भूकंपाचे मुख्य धक्के थोडक्यात पुढीलप्रमाणे :

१. वरदा-प्रकरणापूर्वीच कानिटकर-पक्षाशी माधवरावांचे संबंध बिघडलेले होते. कानिटकर-पक्षाशी माधवरावांचा उडालेला एक खटका गिरीशांनी सांगितलेला आहे (पृ० ४९-५०); पण तसे अनेक खटके उडालेले होते. कारकून-प्रकरण, प्रा० म० कृ० जोशी-प्रकरण, प्रा० काळे-प्रकरण वगैरे प्रकरणांत माधवरावांनी ज्या भूमिका घेतल्या त्यामुळे ते कानिटकर-पक्षाच्या डोळ्यांत खुपत होते. साहजिकच, वरदा-प्रकरणात कानिटकर-पक्षाने त्यांना धडा शिकवला असला तर त्यात नवल नव्हते.

२. माधवरावांचा वरदेशी स्नेहसंबंध होता. पण लग्नाची लालूच वरदेला त्यांनी दाखविलेली नव्हती. दोघांत लग्नासंबंधी कोणतेही 'अंडरस्टँडिंग' नव्हते. उलट, मुलींच्या वसतिगृहात जेव्हा लग्नाची कुजबूज पसरली तेव्हा आपल्या स्नेहसंबंधाशी लग्नाचा सुतराम संबंध नाही, हे

माधवरावांनी वरदेला स्पष्ट सांगितले होते. अर्थात् वरदा मुलीमुलींच्या गप्पांत केव्हा लग्नाबद्दल बोलली असेल तर त्याला माधवरावांच्या बाजूने काही आधार नव्हता; आणि वरदेचे ते बोलणे थट्टेचे होते, गंभीर नव्हते.

३. माधवरावांच्यावर कानिटकर-पक्षाने जे आरोप केले होते त्यांत भरपूर अतिरंजन नि कमालीचा विपर्यास भरलेला होता. उदाहरणार्थ, यवतच्या सहलीच्या वेळी वरदा माधवरावांच्या बिऱ्हाडी रात्री राहिली हे सांगून दोघांतील अनैतिक संबंध कानिटकर-पक्ष सूचित करीत होता. पण त्या वेळी माधवरावांच्या बिऱ्हाडी काही वडीलधाऱ्या स्त्रिया नि काही पुरुष पाहुणे म्हणून उतरले होते, त्यांपैकी काहींच्या आग्रहावरून वरदा तेथे राहिली होती, फर्ग्युसनचे वसतिगृह गावापासून दूर असल्यामुळे तसे करण्यात काही गैर नव्हते, वगैरे गोष्टी तो पक्ष कटाक्षाने गुलदस्तात ठेवीत होता. टोळे-दंपतीवरून जो एक ओंगळ आरोप सूचित करण्यात आला होता तो आरोप म्हणजे तर कानिटकर-पक्षाच्या कुटिल नि कुभांडरचनाकुशल अंतःकरणाची ढळढळीत साक्ष होती.

४. माधवरावांचे वर्तन सुधारकी असेल; पण सोसायटीची प्रतिष्ठा धोक्यात आणणारे खासच नव्हते. त्यांच्यापूर्वी फर्ग्युसनच्या क्रीडांगणावर स्त्रियांशी नि विद्यार्थिनींशी आजीव सदस्य टेनिस खेळलेले होते. आजीव सदस्यांबद्दल वाईट प्रवादही उठलेले होते; आणि सोसायटीने तिकडे रास्त रीतीने दुर्लक्षही केले होते. माधवरावांविरुद्ध उठलेल्या प्रवादांना कानिटकर-पक्ष जे महत्त्व देत होता नि जे खतपाणी घालीत होता त्यामुळे मात्र माधवरावांची नि सोसायटीची प्रतिष्ठा धोक्यात आली होती.

५. कानिटकर-पक्षाने माधवरावांच्या विरुद्ध जी कारवाई केली तीमागे पक्षस्वार्थ होता. त्या पक्षाची दादागिरी माधवराव मानीत नव्हते, त्या पक्षाचे दोष निर्भयपणे ते चव्हाट्यावर आणीत होते, त्या पक्षाला स्वतःचे संख्याबल वाढवायचे होते, आणि टीकाकारांना नामोहरम करायचे होते. तेव्हा माधवरावांच्या वागणुकीचे निमित्त शोधून त्या पक्षाने त्यांचा काटा काढला.

६. 'सक्तीच्या रजेच्या काळात माधवरावांनी वरदेला भेटता कामा नये, अशी त्यांच्यावर सोसायटीने अट घातली होती' असे गिरीश (पृ० ७३) नि खानोलकर (पृ० १४५–४६) हे दोन्ही चरित्रकार सांगतात. पण तशी अट घातल्याचा किंवा माधवरावांनी ती मान्य केल्याचा उल्लेख सोसायटीच्या दप्तरात कोठेही नाही! माधवरावांना अनौपचारिक रीतीने तशी अट कदाचित सांगितली गेली असेल; पण माधवरावांनी ती केव्हाही मान्य केली नव्हती. आपले स्नेहस्वातंत्र्य (फ्रीडम ऑफ फ्रेंडशिप) अबाधित राखण्यावर त्यांचा शेवटपर्यंत कटाक्ष होता. अर्थात्, वरदेशी पत्रव्यवहार ठेवून किंवा नाना रानड्यांकडे तिला भेटून त्यांनी वचन मोडले, सोसायटीचा विश्वास-घात केला, वगैरे आरोपांत काही तथ्य नव्हते. उगाच राळ उडवण्याचा तो प्रकार होता.

७. माधवरावांनी कानिटकर-पक्षाशी जो झगडा केला तो केवळ वरदेच्या स्नेहाखातर केला नाही. आजीव सदस्यांमधील समानता आणि व्यक्तिस्वातंत्र्य (विशेषतः व्यक्तीचे स्नेह-स्वातंत्र्य) ही दोन तत्त्वे उराशी बाळगून ते झगडत होते. ते कवी आहेत, तरुण नि अविवाहित आहेत, (आपले टीकाकार आहेत), म्हणून वेगळे आचार-नियम त्यांच्यावर कानिटकर-पक्ष लादू बघत होता. नाहीतर फक्त त्यांनीच विद्यार्थिनींशी टेनिस खेळू नये, विद्यार्थिनींशी घरगुती संबंध जोडू

नयेत, या म्हणण्याला दुसरातिसरा काही अर्थ नव्हता. पण निकराची झुंज देऊन नि अखेर स्वतःच्या लौकिकाचे बलिदान करून माधवरावांनी स्वतःची समानता नि स्वातंत्र्य यांचे रक्षण केले. सोसायटीच्या नियमांनुसार आजीव सदस्यांच्या वर्तनावर आजीव सदस्यांची 'बॉडी'च नियंत्रण ठेवू शकते, अशी शुद्ध काटेतोल भूमिका त्यांनी घेतली होती आणि त्या भूमिकेला ते अखेरपर्यंत चिकटून राहिले होते. जेव्हा 'बॉडी'च गडबडली तेव्हा राजिनामा देऊन ते सोसायटीच्या बाहेर पडले. 'बॉडी'ला बगल देऊन वरच्या नियामक-मंडळाकडे दाद मागण्याची पळवाट त्यांना उपलब्ध होती. पण आजीव सदस्यांनी स्वयंनियंत्रणाचा जो अधिकार परंपरेने मिळविला होता तो त्या पळवाटेने धोक्यात आला असता. तेव्हा ते नियामक-मंडळाकडे गेले नाहीत. त्यांच्या या धीरोदात्त वर्तनाने आजीव-सदस्य-मंडळाची सोसायटीमधील परंपरा अधिक उज्ज्वल झाली.

८. आजीव सदस्यांचे मोठे बहुमत माधवरावांच्या विरुद्ध गेले, ते माधवराव अपराधी होते म्हणून गेले नाही. त्याला बाह्य कारणे बरीच होती. कानिटकर-पक्ष मुळातच थोडे बहुमत राखून होता. संघटनाकौशल्य, कृतिचापल्य, नि मतप्रचार या गुणांत हा पक्ष एवढा वरचढ होता, की पक्षाबाहेरच्या नाईक वगैरे मंडळींचे त्याच्यापुढे काही चालत नसे. माधवरावांवर ठपका ठेवण्यास आवश्यक असे तीनचतुर्थांश बहुमत आपल्याकडे होत नाही ही गोष्ट दिसल्यावर या पक्षाने चक्र संपाची धमकी दिली आणि पेचप्रसंग निर्माण केला. संपाने सोसायटी दुभंगली असती नि तिचे अस्तित्वच धोक्यात आले असते. तेव्हा सोसायटी वाचविण्यासाठी रँ० परांजपे, प्रा० भाटे, प्रा० नाईक वगैरे वडीलधाऱ्या मंडळींनी नि त्यांच्या अनुयायांनी कानिटकर-पक्षाच्या पारड्यात, माधवरावांच्या विरुद्ध, नाइलाजाने मते टाकली. (कानिटकर-पक्षाला काही मते प्रचाराच्या चलाखीमुळेही मिळाली असावीत. यवतच्या सहलीच्या वेळची वस्तुस्थिती प्रा० नाईक आदिक दहा आजीव सदस्यांनी नि माधवरावांनी आपापल्या लेखी निवेदनांमध्ये मांडलेली होती; पण कानिटकर-पक्षाने प्रचाराचा असा धोशा लावला होता, की तिच्याकडे इतरांचे लक्षच गेले नाही. ती वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास आली असती तर आपले मत फिरण्याची शक्यता होती असे सांगणारे, पण कानिटकर-पक्षाला मुळात अनुकूल असणारे, अत्यंत जबाबदार आजीव सदस्य मला भेटलेले होते!)

सोसायटीचे दप्तर धुंडाळायला लागण्यापूर्वीच गिरीशांकडचा पत्रसंग्रह मला मिळाला होता आणि रामभाऊ मराठ्यांकडील पत्रसंग्रहही या सुमारास मला बघता आला होता. तेव्हा सोसायटीच्या दप्तरात वरदा-प्रकरणाचा जो नवा अर्थ मला प्राप्त होत होता त्याला त्या दोन पत्रसंग्रहांची जोड मी साहजिकपणेच देत होतो. गिरीशांकडील संग्रहात कारकून-प्रकरण नि प्रा० म० कृ० जोशी-प्रकरण यांची काही महत्त्वाची कागदपत्रे माधवरावांनी जपून ठेवलेली मला आढळली. त्यावरून त्या प्रकरणांत त्यांनी बरेच लक्ष घातले असावे, असा अंदाज मी बांधला; आणि त्या प्रकरणांचा सोसायटीच्या दप्तरावरून अभ्यास केला. कानिटकर-पक्षाचे सत्य स्वरूप त्या अभ्यासावरूनच माझ्या नीट लक्षात आले. चरित्रात ही प्रकरणे गौण म्हणून मी शक्य तेवढ्या संक्षेपाने दिली आहेत; पण सोसायटीमधल्या तत्कालीन पक्षबाजीचा ज्याला अभ्यास करायचा असेल त्याने ही प्रकरणे आवर्जून वाचण्यासारखी आहेत.

रामभाऊ मराठ्यांकडील पत्रांत भावनांनी स्पंदन पावणारे माधवरावांचे मन व्यक्त झाले होते. तारखा व अंतर्गत उल्लेख यांच्या आधारे त्या मनाची सांगड सोसायटीतील घडामोडींशी मी घालू शकलो आणि सोसायटीत घडलेले वरदा-प्रकरण जसे बाहेरून तसे आतून, माधवरावांच्या मनात शिरून, बघू शकलो. या दोन पत्रसंग्रहांखेरीज मी जमवलेल्या आठवणी मला थोड्याफार उपयोगी पडल्या. विशेषतः डॉ० प० ल० वैद्य नि प्रा० चिं० रा० देवधर यांच्या आठवणींच्या आधारे मला दप्तरावरून काढलेले काही निष्कर्ष पडताळता नि पक्के करता आले.

एवढे झाले तरी माधवराव व वरदा यांच्या भावनांचा तळ मला पुरता सापडला नव्हता. त्यांचे स्नेहजीवन समूर्त नि सजीव होऊन माझ्यासमोर वावरू लागले नव्हते. सोसायटीतील वाद उलगडल्याने त्यांच्या सहजीवनाच्या जणू बाह्य रेषा मला गवसल्या नि आतल्या काही रेषा अंधुकपणे जाणवल्या. या रेषांत अद्यापि छायाप्रकाश खेळायचा होता नि रंगभरणी व्हायची होती. गिरीशांकडील पत्रसंग्रहात वरदेने माधवरावांना लिहिलेली वीस-पंचवीस दुर्लभ पत्रे माझ्या हाती लागली होती. ती पत्रे वाचता वाचता, त्यांवर चिंतन करता करता, इतर सामग्रीशी त्यांचा अन्वय जुळवता जुळवता, मला चित्रात छायाप्रकाश खेळवता आला नि रंगभरणी करता आली.—छे ! छे ! मूळच्या रेषाचित्रात मी प्राणदेखील फुंकू शकलो! या वेळी माधवराव नि वरदा या दोघांच्या हृदयाशी माझी जणू भावसमाधी लागली होती. मी केव्हा माधवराव झालो होतो, तर केव्हा वरदा झालो होतो. दोघांच्या भूमिका मी एकटाच आलटूनपालटून तन्मयतेने वठवीत होतो. चरित्रकाराला निर्मितीचा म्हणून जो आनंद मिळतो तो या वेळी मी खूप खूप चाखला. नवा नवा अर्थ प्रतीत होई, संगती सापडे, तेव्हा मनाला नाजुक नाजुक सुखद धक्के बसत. सारे चित्र भरले, सजीव झाले, तेव्हा मी त्या चित्राकडे किती वेळ टक लावून बघितले, किती वेळ त्याच्याशी मुका सुखसंवाद केला, एक अलौकिक तंद्री अनुभवली !

'माधवरावांचा वरदेशी स्नेह होता.—मान्य. त्या स्नेहात लग्नकल्पना नव्हती. मान्य.—पण त्या स्नेहाचा नेमका आशय काय होता ? नेमकी उत्कटता किती होती ?'—असे एक कोडे स्वतःला घालून ते मी सोडवीत बसलो होतो. माझ्या मनात कोड्याची अनेक वैकल्पिक उत्तरे तेव्हा येऊन गेली; पण आता ती नीट आठवत नाहीत. सगळी उत्तरे दोन टोकांत आंदोळत होती, एवढे मात्र स्पष्ट आठवते. पैकी एक टोक या स्नेहाला अगदी सपक, फिके, ओकेबोके रूप देई. वाटे, की सोसायटीतल्या झगड्याला निमित्त म्हणूनच हा स्नेह टिकला होता. नाही तर, वरदेसारखी अवखळ, क्रीडापटू नवयौवना आपल्याशी लग्न करणार अशी कुजबूज सुरू होताच त्या कुजबुजीचा मुलायम पिसारा माधवरावांनी समूळ का उपटला असता ? कानिटकर-पक्षाच्या एका निवेदनात म्हटले आहे, की ' वरदेने वसतिगृहाचे नियम मोडले असतील तर वसतिगृहाच्या प्रमुखांनी तिला वाटेल ती कठोर शिक्षा करावी ' असे उद्‌गार माधवरावांनी एका बैठकीत काढले होते. त्यांच्या मनात जर गहिरा स्नेहभाव असता तर त्यांनी असे उद्‌गार कसे काढले असते ? मला जी पत्रे मिळाली त्यांत माधवरावांनी वरदेला लिहिलेल्या एकाही भावघन, उत्कट पत्राचा चुकूनही सुगावा का लागू नये ? माधवराव सक्तीच्या रजेवर असताना मुंबईला नाना रानड्यांच्या घरी त्यांची वरदेशी ती गाजलेली भेट झाली. त्या भेटीत तर वरदेने त्यांच्याकडे

विवाहाची विनंती केली होती. पण आपल्या स्नेहाचे विवाहात रूपांतर करायला ते तयार झाले नाहीत.—असे का ? खानोलकरांशी माझ्या ज्या चर्चा झाल्या त्यांत खानोलकरांचे म्हणणे असे दिसले, की माधवरावांच्या मनात शांताबाई हेर्लेकरांना जे महत्त्व होते ते वरदेला नव्हते. त्यांच्या लेखी वरदा एक सामान्य बुद्धीची उथळ मुलगी होती. तेव्हा मलाही सारखी शंका येई, की माधवरावांच्या स्नेहाचा फुगा अफवांनीच खूप फुगवला नि लोककल्पनेनेच तो सुंदर रंगांत रंगवला; पण मुळात तो पोकळ असावा !

पुन्हा माझे मन दुसऱ्या टोकाला झेप घेई नि माधवरावांचा स्नेह खोल, गंभीर, उत्कट असल्याचे, अलौकिक असल्याचे दृश्य मला दिसू लागे. माधवराव तत्त्वासाठी सोसायटीत झगडले यात शंका नाही. पण केवळ तत्त्वासाठीच एवढा झगडा त्यांनी केला असेल यावर विश्वास ठेवणे मला जड जाई. वाटे, की झुंज चालू असताना कोणी स्फूर्तिदेवता त्यांना प्रेरणा देत असली पाहिजे. ही देवता वरदेशिवाय दुसरी कोण असणार ? श्री० गोपीनाथ तळवलकर यांच्या आठवणींवरून व माधवरावांच्या अनेक कवितांवरून मला हे जाणवले होते, की दृश्य सौंदर्याने, विशेषतः स्त्रीच्या सौंदर्याने, माधवराव एकदम हेलावून जात. दृश्य सौंदर्य अंतर्यामी गुणाढ्य नि उदात्त असणार, असे गृहीत धरीत. तेव्हा, वरदा बुद्धीने किंवा विचाराने कदाचित सामान्य असली, आणि त्यांच्या मेंदूला हे कळत असले, तरी तिची एक भावमूर्ती त्यांच्या हृदयाने निर्माण केली असेल, त्या मूर्तीची पूजा बांधली असेल, अशी अटकळ माझ्या मनाला उद्दीपित करी. प्रा० श्री० के० क्षीरसागर यांनी माझी अशी खात्री पटवली होती, की 'तेथे चल राणी' या कवितेत जी प्रेमकल्पना आहे तीच प्रेमकल्पना वरदा-प्रकरणात माधवरावांच्या मनात होती. त्यामुळे, त्या कवितेमधल्या मनोराज्याचे सात्त्विक, ध्येयवादी, काव्यरम्य नि जगावेगळे रंग मी माधवरावांच्या स्नेहचित्रात भरून ते पूर्ण करीत असे. माझ्या लक्षात येई, की वरदेच्या सान्निध्याने माधवराव खुलत, प्रभावित होत, अशी त्यांच्या मित्रांची साक्ष आहे. माधवराव आपला वाढदिवस कधी साजरा करीत नसत; पण वरदेची ओळख झाल्यावर तिच्या नि इतर मंडळींच्या सहवासात त्यांनी तो फार उत्साहाने साजरा केला. वरदेबरोबरची ओळख लघळपणाने त्यांनी वाढविली नसेल; पण अभिजात आस्थेने तिची जोपासना त्यांनी केली नि ती टिकवून धरली. टॉडच्या ज्या 'स्टूडंट्स मॅन्युअल'ने ध्येयवादी जीवनाची प्रेरणा त्यांना दिली होती ते 'स्टूडंट्स मॅन्युअल' वरदेला त्यांनी भेट दिले. तेव्हा वरदेशी जडलेल्या स्नेहाला त्यांनी काही अलवार, हळवा अर्थ दिला असला पाहिजे.

एकदा, नेहमीच्या रीतीप्रमाणे मी वरदा-प्रकरणातल्या व त्याच्या भोवतालच्या घटना काल-दृष्ट्या एकमेकींशी लावून बघू लागलो. तेव्हा अकस्मात प्रकाशाचा एक झोत माझ्या धूसर, दोलायमान मेंदूत लकलक करीत घुसला. पूर्वी डॉ० प० ल० वैद्यांची धाकटी बहीण माधवरावांच्या मनात फार भरली होती; आणि पुढेमागे तिचे स्थळ आपल्याला लाभेल या आशेवर त्यांनी एका अनुरूप, पसंत विधवेला नकार दिला होता. पण पुढे आपल्या बहिणीसाठी डॉ० वैद्यांनी आपण होऊन जेव्हा त्यांच्याकडे विचारणा केली तेव्हा त्यांनी नकार कळवला !—आणि हा नकार नेमका केव्हा कळवला ? तर वरदेशी थोडा परिचय होताच कळवला ! वरदेने त्यांचे भावजीवन एकदम आपल्या कवेत घट्ट पकडल्याची मला ती निःशंक खूण वाटली. ही खूण पूर्णतया तर्कसंगत नसेल;

पण तिने मला काही प्रातिभ प्रचीती आली. बहुधा याच ठिकाणी मग माझ्या मनातली आंदोलने थांबली. येथून पुढे मी पक्का निर्णय घेतला, की माधवरावांच्या स्नेहभावनेच्या गाढपणाविषयी शंका घेण्याचे कारण नाही.

स्नेहभावनेचा गाढपणा जेव्हा मी मान्य करू लागलो तेव्हाच त्या स्नेहभावनेचा वेगळेपणा मला उमगू लागला. शिवाय गाढपणा जर मान्य करायचा तर गाढपणा नि स्नेहभावनेचे सर्व आविष्कार यांची संगती लावण्यासाठी स्नेहभावनेचा वेगळेपणा पतकरणे अपरिहार्य झाले. तोवर 'प्लेटॉनिक लव्ह' किंवा 'निर्विषय प्रेम' हा शब्द मी ऐकून होतो; पण वास्तव वस्तू म्हणून त्याचा स्वीकार मी कधी केला नव्हता. माझा त्याच्यावर फारसा विश्वास नव्हता. त्यामुळे माधवरावांच्या स्नेहभावनेचा वेगळेपणा उमगू लागला तरी तिची जातकुळी निश्चित करताना मला माझी मनोवैज्ञानिक कल्पकता पुष्कळ ताणावी लागली. बरेच बौद्धिक कष्ट घ्यावे लागले. (हे कष्टही आनंददायक प्रसूतीचे होते, तो भाग वेगळा.) स्नेहाची जी जातकुळी मी निश्चित करीन ती त्याच्या सर्व आविष्कारांना स्वतःच्या कुशीत सुखाने घेऊ शकेल अशी हवी, हे तर उघडच होते. पण ती बाकीच्या सर्व चरित्रात चपखल बसली पाहिजे, याचीही मला जाणीव होती. म्हणून वरदा-प्रकरणातल्या यच्चयावत घटनांशी, माधवरावांच्या एकूण स्वभावाशी, त्यांच्या पूर्वसंस्कारांशी सुसंगत असेल असे तिचे रूप मी कल्पू लागलो.—आणि कल्पनेच्या या खेळातून जी जातकुळी थोड्या दिवसांनी बाहेर निघाली ती 'प्लेटॉनिक लव्ह'चीच निघाली! माधवरावांच्या संदर्भात तिला व्यक्तिविशिष्ट रूप द्यावे लागले, पण तिच्या 'निर्विषय', 'कामरहित' स्वभावाविषयी शंका घ्यायला जागा नव्हती. मला दिसलेले माधवरावांचे 'प्लेटॉनिक लव्ह' चरित्रात मी तपशीलवार रंगवलेले आहे; पण विश्लेषण-पद्धतीने त्याचे ठळक विशेष येथे संक्षेपाने सांगण्यासारखे आहेत :

सगळ्या 'प्लेटॉनिक लव्ह'सारखे माधवरावांचे प्रेम शारीरिक भोगाविषयी निरपेक्ष होतेच; पण शारीरिक भोगाशी ते स्वभावतः थोडेफार विसंगतही होते. माधवराव एकीकडे वरदेच्या सावळ्या यौवनसौंदर्याने नि सुबक, लयदार हालचालीने कलावंतासारखे मोहरले होते, तर दुसरीकडे तिच्यातील मार्दव नि मातृत्व यांनी बालकासारखे आसावले होते. आपली भावना फार विशुद्ध, सात्त्विक, उन्नतिकारक, नि मुलायम आहे; ती शरीरसंबंधाने दूषित होईल; अशी त्यांची अबोध श्रद्धा होती. आपले उदात्त जीवनाचे ध्येय वरदेने दिलेल्या मनःप्रसादामुळे आपण साध्य करू, असे कल्पनाचित्र ते रंगवीत बसत. "अंकावर खेळू नि शिकू सृष्टिसतीच्या। आत्मप्रगतीच्या—। त्या गूढ कथा ज्या न कुराणी न पुराणी। तेथे चल राणी।"—अशी त्यांच्या हृदयाची उत्स्फूर्त साद होती. त्यांच्या मनोराज्यात त्यांना वरदा बौद्धिक नि भावनिक साथ देत होती आणि दोघेही हातात हात घालून एका उत्तुंग प्रकाशशिखराकडे निघाली होती. त्यांचे हे प्रेम म्हणजे त्यांच्या स्वप्नाळू कवि-मनाचेच एक अपत्य होते. वास्तव वरदेशी त्याचा संबंध निमित्तापुरताच असेल; पण या प्रेमाने त्यांच्या हृदयाला असे घनदाट व्यापून टाकले होते, की त्या काळात तरी ते प्रेमच त्यांना वास्तवाहून वास्तव वाटत होते!

माधवरावांच्या 'प्लेटॉनिक लव्ह'चे अशा प्रकारचे स्वरूप गृहीत धरताच, तोवर गोंधळात टाकणारे सगळे विरोधाभास माझ्या पुढ्यातून बघता बघता लुप्त झाले; नि अनेक गुंते एकदम

सुटले. माधवराव लग्नाला अनुकूल का नव्हते त्याचे कोडे पडेनासे झाले. वरदेने लग्नाची गोष्ट काढली तेव्हा त्यांना कसेसेच का वाटले, वीट का आला, ते कळू शकले. 'माझे वरदेवर प्रेम नाही' अशी भूमिका घेऊन डे० ए० सोसायटीत ते आत्मसमर्थन का करीत होते त्यावर प्रकाश पडला. उलट, 'माझे तिच्यावर एक प्रकारचे प्रेम होते' असे पत्नीलाही निरपराध भावनेने ते कसे सांगू शकले, त्याचा उलगडा झाला. 'मी खरोखरीच इतर लोकांहून भावनांच्या बाबतीत वेगळा आहे' या त्यांच्या उद्‌गारांमधले सत्य मनावर धाडकन येऊन आदळले!

वरदा-प्रकरण चरित्रात लिहिण्यापूर्वी 'अमृत'चा १९६९ चा दिवाळी अंक मी मिळवला आणि 'वरदा-माधव-गाथेचे एक नवे पान' हा श्री० वि० मा० दी० पटवर्धन यांचा त्यामधील लेख वाचला. त्या वेळी माझे मन आधी घेतलेल्या निर्णयांबद्दल क्षणभर का होईना पण दोलायमान झाले. 'माधवराव व वरदा यांचा संबंध केव्हाही पवित्र स्नेहाची लक्ष्मणरेषा ओलांडून रोमान्सच्या स्तरावर गेला नाही' अशा प्रकारचा निष्कर्षच त्या लेखात वि० मा० दी० काढतात; पण चक्षुर्वै सत्यम् म्हणून दोघांच्या प्रेमसंबंधाचे असे काही चुरचुरीत वर्णन करतात, की ते 'प्लेटॉनिक लव्ह'पेक्षा सामान्य प्रणयभावनेचेच द्योतक वाटावे. ते वर्णन मी कल्पिलेल्या स्नेहभावनेत काही केल्या सुखाने बसण्यासारखे नव्हते. बरे, वि० मा० दी० जे सांगत होते ते स्वानुभवावर आधारलेले म्हणून सांगितले असल्याने सहज नाकारण्याची सोय नव्हती. पण थोड्या विचारानंतर माझ्या असे लक्षात आले, की वि० मा० दीं०च्या लेखनात सत्याबरोबर कल्पिताची काही भर होती, मूळ अनुभवांना त्यांनी थोडे नाट्यरूप दिले होते आणि परिणामाकडे लक्ष देऊन लेखणी चालविली होती. शिवाय द्रष्ट्याप्रमाणे दृश्य बदलण्याचा प्रकारही अभावितपणे झाला असावा. तेव्हा त्यांच्या लेखातला काही भाग वजा टाकून उरलेल्या भागाला मी माझ्या लेखनाशी जमवून घ्यायचे ठरवले. 'स्त्रीस्नेहाचे वादळ' या आठव्या प्रकरणातील प्रारंभीचे वरदेचे शब्दचित्र मी त्यांच्या लेखावरूनच चितारले आहे. माधवरावांच्या 'प्लेटॉनिक लव्ह'मध्ये स्त्रीच्या बाह्य सौंदर्याचे एक प्रबळ आकर्षण होते. तेव्हा तसे शब्दचित्र देणे मला आवश्यक वाटले.

माधवरावांच्या तुलनेने वरदेची स्नेहभावना जाणून घेताना मला कष्ट असे पडलेच नाहीत. तिने माधवरावांना लिहिलेली वीसपंचवीस पत्रे माझ्या हातात होती आणि ती पत्रे मला सारे काही सरळपणे सांगत होती. त्या पत्रांनी मला कष्ट तर दिले नाहीतच; पण नवी नवी अपूर्व माहिती सांगून आश्चर्य व आनंद यांचा अपार सोहळा भोगायला दिला. तोवर प्रकाशित झालेल्या इतिहासावर ज्या नव्या शोध-ज्योती त्या पत्रांनी टाकल्या त्या पुढीलप्रमाणे :

१. माधवरावांप्रमाणे वरदेच्या मनातही प्रारंभकाळात, पुण्याला असताना, विवाहाचा विचार नव्हता. दोघांची इच्छा नसताना त्यांची लग्नगाठ बांधू पाहणाऱ्यांना ती मूर्ख म्हणत होती. "...हाउ कॅन दे ब्रिंग यूनियन व्हेन द टू...पार्टीज आर क्वाइट अनविलिंग? दे फूल्स आर होपिंग अगेन्स्ट द होप..." अशी तिच्या एका पत्रातील वाक्ये आहेत.

२. माधवराव केव्हा केव्हा वरदेकडे आईची भूमिका देत आणि ती त्या भूमिकेत शिरून त्यांना वात्सल्य देई. "इफ यू कॉल मी मदर—ॲज यू यूज्ड टु—माय ब्लेसिंग्ज आर विथ माय बेबी फॉर एव्हर."—हे वरदेचे वाक्य वाचून मी काही क्षण अक्षरशः थक्क होऊन गेलो.

माधवरावांना आईची जी अतृप्त भूक होती ती शांताबाई कशाळकरांशी पूर्वी घडलेल्या प्रणय-संबंधात प्रकट झालेली मी वघितली होती. तीच भूक येथेही जागृत असलेली पाहून 'एकरूपता' नि 'सातत्य' यांचे तंत्रोरे माझ्या मनात जुळू लागले. (उत्तरकालात आपल्या पत्नीकडूनही वात्सल्याची अपेक्षा माधवरावांनी केली असली पाहिजे, असा अंदाज मी बांधला.—आणि गंमत अशी, की १९७१ च्या आक्टोबरमध्ये जेव्हा माधवराव व लीलाबाई यांचा पत्रव्यवहार मला वघायला मिळाला तेव्हा तो अंदाज खरा ठरला!)

३. सोसायटीमधील वादात वरदेचे एक पत्र नाईक-पक्षाने हजर केले होते व त्या पत्रावरून माधवरावांचा नि तिचा स्नेह शुद्ध होता, त्यात लग्नाची कल्पना नव्हती, कोणी कोणाला फसवलेले नव्हते, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला होता. 'स्वप्नभूमी'त हे पत्र गिरीशांनी छापल्यावर (पृ० ७०–७१) माधवरावांवरील अनेक घाणेरडे आरोप निरस्त झाले होते. पण विठ्ठलराव घाटे, नाना रानडे वगैरे चोखंदळ सत्यशोधक मला म्हणत, की ते पत्र वरदेने स्वतःच्या बुद्धीने लिहिले हे कशावरून? वडिलांच्या मार्गदर्शनाखाली तिने ते लिहिले असावे आणि वडिलांनी मुलीच्या हितरक्षणासाठी 'पवित्र स्नेहा'ची कथा तिच्या तोंडून वदवली असावी. घाटे व रानडे यांचा हा संशय वरदेच्या पत्रव्यवहारावरून साफ निरस्त झाला. कारण त्या पत्रव्यवहारात असे काही उल्लेख सहज येऊन जातात, की ज्यांवरून तिनेच स्वतःच्या बुद्धीने ते पत्र लिहिल्याचा निष्कर्ष काढावा लागतो.

४. वरदेच्या मनात विवाहाचा विचार प्रथम नव्हता; पण माधवराव अमळनेरला असताना व ती औरंगाबादेला असताना दोघांमध्ये जो पत्रव्यवहार झाला त्यावरून असे दिसते, की १९२५ च्या मार्चमध्ये तो विचार तिच्या मनात उद्भवला. म्हणूनच पुढे नाना रानड्यांकडील भेटीत तिने माधवरावांना विवाहाची विनंती केली. (तिच्या मनातील या परिवर्तनाची वार्ता गूढ राहिल्यामुळेच भविष्यकाळात नानाविध गैरसमज पसरले आणि माधवरावांना बराच मनस्ताप सोसावा लागला.)

५. नाना रानड्यांकडे वरदेशी जी भेट झाली ती माधवरावांना अनपेक्षित असावी, असा सर्वसामान्य समज आहे. पण ती भेट माधवरावांना मुळीच अनपेक्षित नव्हती. त्या भेटीविषयी कोणतीही पूर्वसूचना रानड्यांनी माधवरावांना दिली नव्हती, हे खरे. रविकिरण-मंडळाच्या बैठकीसाठी म्हणून रानड्यांनी माधवरावांना बोलाविले व तेथे वरदेलाही आधी बोलावून दोघांची भेट घडवली, हेही खरे. पण तत्पूर्वी माधवराव नि वरदा यांची पत्रापत्री चालू होती, आणि नानांच्या घरी माधवरावांना भेटण्याचा मनोदय स्पष्ट शब्दांत वरदेने माधवरावांना कळविला होता. ३१ मार्च १९२५ च्या पत्रात आपण मुंबईला जाण्यास निघत असल्याचे वरदेने माधवरावांना कळविले होते आणि तत्पूर्वी १४ मार्चच्या पत्रात "आय शॅल फील ओब्लाइज्ड इफ यू वुड कम ॲंड सी मी ॲट नानाज. धिस वुड बी माय लास्ट रिक्वेस्ट टु सी यू."—अशी माधवरावांची विनवणी केली होती. (ही माहिती मी रानड्यांना दिली तेव्हा ते आश्चर्याने थक्क झाले. वर्षानुवर्षे ही भेट अचानक घडवून आणल्याबद्दल नि माधवरावांच्या पुढील संकटपरंपरेला कारण झाल्याबद्दल त्यांनी टीकेचे प्रहार सहन केले होते. पण माधवरावांना भेटीची पूर्वकल्पना होती हे समजताच स्वतःच्या डोक्यावरचे एक अवजड ओझे उतरल्यासारखे त्यांना वाटले नि त्यांनी सुटकेचा दीर्घ निःश्वास टाकला!)

६. वरदेला भेटल्यामुळे पराचा कावळा होईल नि सोसायटीतील आपले हितशत्रू उचल खातील, याची माधवरावांना पूर्ण कल्पना असली पाहिजे. तरीही ते मुंबईला गेले व वरदेला भेटले. याचे कारण प्रत्यक्ष भेटीचा आग्रह—वर निर्देशिल्याप्रमाणे—वरदेने पत्रांतून वारंवार चालविला होता आणि 'ही माझी शेवटची इच्छा आहे; ती तरी पुरी करा' अशी निर्वाणीची भाषा वापरली होती. तिची निर्वाणीची भाषा त्यांच्या हृदयाला भिडली असली पाहिजे. (धोका पतकरून ते वरदेला भेटले यात त्यांच्या स्नेहाच्या गाढतेबद्दल नि उत्कटतेबद्दल मला नवे प्रत्यंतर मिळाले.)

वरदेच्या पत्रांनी पूर्वप्रकाशित इतिहासावर या ज्या शोधज्योती टाकल्या त्यांनी नव्या घटना उजेडात आल्याच; पण आधीच्या लेखकांनी घटनांचा जो अन्वयार्थ लावला होता तोही बदलत गेला. शिवाय नव्या घटना व नवा अन्वयार्थ यांनी नवे प्रश्नही निर्माण केले! विशेषतः, मुंबईच्या भेटीबद्दल माधवरावांनी रानड्यांना दोष का द्यावा, त्याचे मला कोडेच होऊन बसले. वरदेची पत्रे उजेडात येण्यापूर्वी साऱ्यांची समजूत अशी होती, की माधवरावांना पूर्वकल्पना न देता, रविकिरण-मंडळाच्या बैठकीचे निमित्त करून, रानड्यांनी माधवरावांची व वरदेची जी भेट घडवून आणली तीमुळे सोसायटीत माधवरावांच्या विरुद्ध गहजब झाला आणि त्यांना जीवनातून जवळजवळ उठावे लागले. या समजुतीप्रमाणे त्या भेटीबद्दल माधवरावांनी रानड्यांना दोष द्यावा, हे सुसंगत होते. पण वरदेची पत्रे उजेडात आल्यावर त्या समजुतीलाच जबरदस्त धक्का बसला नि ती खोटी ठरली. त्या भेटीपूर्वी रानड्यांनी माधवरावांना विश्वासात घेतले नसले तरी ती भेट माधवरावांना पूर्णपणे अपेक्षित होती, असे ही पत्रे सांगतात. मग माधवरावांनी भेट जर जाणूनबुजून घेतली तर त्या भेटीबद्दल रानड्यांवर त्यानी दोषारोप का करावा? भेटीनंतर सोसायटीत गहजब झाला, तेव्हा रामभाऊ मराठ्यांना एका पत्रात त्यांनी लिहिले, "रा० रानडे ह्यांनी मुंबई येथे केलेल्या एकांगी लुडबुडीबद्दल मला प्रायश्चित्त भोगलेच पाहिजे. रामभाऊ, 'मूर्ख मित्रापेक्षा शहाणा शत्रू पुरवतो' ह्या म्हणीची सत्यता मला आताच पटू लागली आहे." रा० खानोलकरांना दुसऱ्या एका पत्रात त्यांनी म्हटले, "वरदा अथवा तिचे वडील ह्यांस सावधगिरीची सूचना मी देणे इष्ट नाही. वास्तविक हे काम ज्यांनी अगोदर माझ्याशी दिलखुलाशाने न बोलता चमत्कारिक सहानुभूतीने व अदूरदर्शीपणाने मुंबईस नसती ढवळाढवळ केली त्यांचे [म्हणजे नाना रानड्यांचे] आहे." (खानोलकर, पृ० १४८–१४९). दोन्ही पत्रांत त्यांचा रानड्यांवरील राग स्पष्ट आहे. पण त्याचे कारण काय? वरदेची पत्रे त्यांच्याखेरीज कोणाला ठाऊक नव्हती. तेव्हा भेट अनपेक्षित होती ही इतरांची समजूत सोयिस्कर रीत्या कायम ठेवून आपल्यावरील संकटपरंपरेची जबाबदारी सरळ आपल्यावर न घेता त्यांनी मानभावीपणाने ती रानड्यांवर टाकली की काय? माधवराव मानभावीपणाने वागले असे मानून माझा प्रश्न तात्पुरता सुटण्यासारखा होता. पण असला मानभावीपणा त्यांच्या एकूण वर्तनक्रमात बसत नव्हता. तेव्हा प्रश्न कायमचा कसा सुटणार?

पुन्हा माधवरावांच्या परिस्थितीत नि मनोभूमिकेत मी स्वतःला घालून घेतले, स्वतःच माधवराव होण्याचा प्रयत्न केला; आणि प्रश्न कायमचा सुटला. भेटीपूर्वी माधवरावांचा व वरदेचा पत्रव्यवहार चालू होता आणि वरदा भेटीसाठी उत्सुक आहे, नानांकडे आपल्याला भेटण्याचा तिचा

वेत आहे, हे माधवरावांना ठाऊक होते. पण वरदेच्या मनात लग्नाची इच्छा उसळू लागली आहे, हे त्यांना उमगले नव्हते. (त्यांच्या एकमार्गी भाबडेपणाचा तो एक नमुना होता.) वरदेने आपल्या चित्तवृत्ती हेलावल्याचा सुगावा पत्रांतून त्यांना दिला होता; पण लग्नाचा उल्लेख चुकूनसुद्धा केला नव्हता. तेव्हा जी भेट होणार ती दोन चिरवियुक्त स्नेह्यांची होणार असे ते धरून चालले होते. त्या भेटीतला सारा धोका पतकरायला ते अर्थातच तयार असणार. पण नाना रानड्यांनी जी भेट घडवली ती वेगळी होती. तीमध्ये वरदेने त्यांच्याकडे विवाहाची मागणी केली आणि तीही चारचौघांसमक्ष केली. रानड्यांनी भेटीचा जणू गाजावाजा केला. त्यांच्या एका नातेवाइकाने तर पुण्याला जाऊन माधवरावांच्या प्रतिपक्षाला भेटीची साग्रसंगीत माहिती दिली. तेव्हा या वेगळ्या भेटीची जबाबदारी रानड्यांवरच पडत होती आणि तीबद्दल माधवरावांचा त्यांच्यावर रोष व्हावा, हे सरळ होते. शिवाय, वरदेने जी विवाहाची मागणी केली तिचा रानड्यांनी पाठपुरावा केला होता. त्या मागणीने तर सोसायटीत माधवरावांविषयी हलकल्लोळ माजला. त्यांच्या मनातला स्नेह निर्विषय होता. तो शरीरसंबंधाने नासणार होता. वरदेच्या मनात लग्नाची कल्पना (म्हणजे शरीरसंबंधाची कल्पना) दृढमूल झाली, तिने ती इतरांच्या बैठकीत बोलून दाखविली की तो स्नेह संपणार होता. पुन्हा सांधता येण्याच्या अवस्थेपलीकडे जाणार होता. रानडे माधवरावांशी आधी "दिलखुलाशाने" बोलले असते तर त्यांना हे कदाचित कळले असते. पण तसे काही न करता, माधवरावांबरोबर जो गरिबीचा संसार करावा लागला असता त्या संसारासाठी त्यांनी तिचे मन तयार केले! म्हणजे त्यांच्या "एकांगी लुडबुडी"ने एकीकडे माधवरावांचे सोसायटीमधील अस्तित्व संपले आणि दुसरीकडे जिवापाड जमवलेला नि जोपासलेला एक अलौकिक स्नेहही नष्ट झाला! आपली ही दुहेरी हानी माधवरावांनी कधी स्पष्टपणे बोलून दाखविली नाही, त्या हानीमधील प्रथमार्धाचाच थोडाफार उल्लेख केला, पण ही एकूण हानी त्यांच्या रोषाला कारण होती.

शांताबाईंची प्रतिबिंबे माधवरावांच्या काव्यात मी कशी शोधीत होतो ते मागील प्रकरणात सांगितले आहे. शांताबाईंप्रमाणे वरदेची नि एकंदरीने फर्ग्युसनमध्ये घडलेल्या प्रकरणाची प्रतिबिंबेही मी शोधीत होतो. हे करीत असताना, श्री० आर० एल० राव यांची 'श्यामलेस' या कवितेबाबत कशी फजिती झाली, ते माझ्या ध्यानात होते. वरदा सावळी होती आणि तिला वश करून घेण्यासाठी माधवराव धडपडत आहेत अशी वदंता सर्वत्र पिकली होती. तेव्हा "हे श्यामले, नानापरी बंदा तुझी सेवा करी। बक्षीस तू काहीहि दे, दे भाकरी दे खापरी।" वगैरे आर्जवे कवीने आपल्या वर्गातील एका विद्यार्थिनीस उद्देशून केली आहेत, अशा अर्थाचे विधान मद्रासच्या 'त्रिवेणी' मासिकात श्री० रावांनी ठोकून दिले. पण माधवरावांशी वरदेची ओळख झाली १९२३ च्या सप्टेंबरमध्ये आणि कवितेचे लेखन झाले होते तत्पूर्वी १९२० च्या जुलैमध्ये! शिवाय १९२२ च्या जुलैमध्ये 'गज्जलांजली' या लेखमालेत 'महाराष्ट्र साहित्या'मध्ये ती कविता प्रसिद्धही झालेली होती! तर नंतर ओळख झालेल्या वरदेवर आधीची ही कविता कशी असू शकेल? माधवरावांनी ही वस्तुस्थिती उघड केली तेव्हा श्री० रावांच्या फजितीला पारावार उरला नाही. आपल्याही वाट्याला अशी फजिती येऊ नये म्हणून कवितांचे लेखन-दिनांक काळजीपूर्वक बघून, १९२३ च्या सप्टेंबरनंतर लिहिलेल्या कविता मी निवडून बाजूला काढल्या, आणि त्यांतच

वरदा किंवा फर्ग्युसन-प्रकरण या गोष्टी कोठे दिसतात का ते तपासू लागलो. या गोष्टींना १९२६-पर्यंत विशेष जोर चढलेला होता, म्हणून तोपर्यंतच्या कविता मी अधिक बारकाईने तपासल्या. माधवरावांच्या भावजीवनात वरदेवरील आगळ्या प्रेमाला अनन्यसाधारण महत्त्व होते; तेव्हा माझी अशी अपेक्षा होती, की पुष्कळ कवितांत या ना त्या रूपाने ती प्रतिबिंबित झालेली दिसेल. पण आश्चर्य असे, की वरदेशी किंवा फर्ग्युसन-प्रकरणाशी संबंधित अशा कविता मुद्दाम हुडकूनही मला आठदहासुद्धा आढळल्या नाहीत ! या कवितांतही काही कवितांचा संबंध संदिग्ध होता, तर काहींचा दूरान्वित होता. निःसंदिग्धपणे संबंधित नि विशेष महत्त्वाच्या अशा फक्त दोनच कविता बाजूला काढता आल्या : (१) "हा रस्त्यात दिसे न तो पटपटा संभाषणे थांबती" हे 'तुटलेल्या दुव्यां'तील सुप्रसिद्ध १४ वे सुनीत, आणि (२) 'तेथे चल राणी' ही 'गज्जलांजली'तील पूर्वी अनेकदा उल्लेखिलेली ६० वी गझल. मात्र दोनच कविता हाती लागल्या तरी माधवरावांच्या-संबंधी त्या मला बरेच काही सांगून गेल्या.

पुण्यात वरदेवरून माधवरावांविषयी जेव्हा अफवांचे नि कंड्यांचे काहूर माजले होते तेव्हा २४ मार्च १९२४ या दिवशी 'हा रस्त्यात दिसे' हे सुनीत लिहिले गेले. (याच सुनीताचा उल्लेख मागे प्र० ३, पृ० ४२ वर झालेला आहे.) त्या वेळी माधवराव किती संत्रस्त होते, 'करावे तरी काय ?' म्हणून कसे हतबल झाले होते, आत्महत्येच्या उंबरठ्यावर काही काळ कसे घोटाळले होते, ते मला ठाऊक होते. पण अशा स्थितीतही त्यांच्यामधला कलावंत, कवी जागा असे, हे या सुनीतावरून मला कळले. या सुनीतात दोघा व्यक्तींच्या संभाषणातून कवीचे, म्हणजे स्वतःचे, एक देखणे शब्दचित्र त्यांनी उभे केले आहे. ते बघून वाटले, की आरशात स्वतःला पाहावे तसे माधवराव स्वतःच्या मनात स्वतःला पाहू शकत. आपले निसर्गप्रेम, आपली आंधळ्यापांगळ्यांविषयी दयाबुद्धी, आपले लहान मुलांतले रमणे, आपले पांडित्य, आपले स्त्रीप्रेम, आपला कलंदरपणा—सारे सारे काही ते जाणून होते ! नव्हे, आपल्या या गुणविशेषांवर ते लुब्धही होते ! आपल्या "चारु गौर वदना"चा त्यांना अभिमान होता आणि वदनावरच्या "विषादच्छटे"चीही त्यांना ऐट वाटत असावी ! बाहेर काहूर पेटलेले असताना आणि त्याच्या झळा सर्वांग भाजीत असताना त्यांच्या मध्यभागी हा 'इब्राहीम' आत्मतृप्तीच्या शीतल कुंजात जणू बसून राहिला होता !

'तेथे चल राणी' ही कविता वरदा-प्रकरणाच्या संदर्भात मी जडवली आणि तिचा खोल, खरा भावार्थ मला प्रतीत झाला. या कवितेत सामाजिक दोषांची नुसती यादी आहे, तीमध्ये तार्किक संगती असली तरी भावसंगती नाही, काही चरण तर अपुष्टार्थतेच्या दोषाने डागळलेले नि संदिग्ध आहेत, असे तोवर माझे मत होते. पण जेव्हा माधवरावांची परिस्थिती नि मनःस्थिती यांच्याशी जोडून ती कविता मी पुन्हा वाचू लागलो तेव्हा तीमधे काही उत्कट, एकरूप रसायन मला चाखायला मिळाले. काही नवा अर्थ जाणवू लागला. कवीला "इमानी" प्रेम हवे होते; "भाळे न इथे प्रीति धनावीण कुणाला" अशी त्याची फिर्याद होती; "डोळ्यात इथे लाडिक जादू परि खोटी" हा त्याचा कटू अनुभव होता. मला ठाऊक होते, की शांताबाईंनी प्रेमाच्या खेळात त्यांना दगा दिला होता, त्यांची गरिबी बाहेर काढली होती, नि अलीकडे त्यांच्याविषयी संशयही पेरायला प्रारंभ केला होता. तेव्हा कवी वेगळ्या,

विशुद्ध प्रेमाची मागणी का करत आहे ते मी समजू शकलो. वरदेकडून माधवरावांना जे विशुद्ध प्रेम हवे होते त्यात कामभावना नव्हती, लग्नाची इच्छाही नव्हती. पण दोघांची लग्नगाठ बांधण्याचा उपद्व्याप समाजातील टोळभैरवांनी नि डे० ए० सोसायटीतल्या काही प्रतिष्ठितांनी चालवला होता. तेव्हा कवीने म्हटले, "नाते पुरुषस्त्रीमधि ते एकच वाटे। ऐसे उफराटे। ज्यांचे मत त्यांचे वच यावे नच कानी। तेथे चल राणी।" लग्नाशिवाय दोघांचे जीवैक्य झालेले होते आणि दोघांना लग्न नको होते. म्हणून कवी आपल्या राणीला हाक देत होता की "गे लग्नविधी जेथ न जीवैक्य-निशाणी। तेथे चल राणी।" विमानातून दूर गेल्यावर एकान्तस्थळी हा कवी प्रणयाची मौजमजा कशी उडवत नाही, अशी शंका आता मला येईनाशी झाली. कारण वरदे-बरोबरचा स्नेह म्हणजे उदात्त जीवनाच्या प्रकाशशिखराची वाटचाल होती, हे मला पटलेले होते. "अंकावर खेळून शिकू सृष्टिसतीच्या। आत्मप्रगतीच्या। त्या गूढ कथा ज्या न कुराणी न पुराणी।..." ही कुराणाच्या नि पुराणाच्या पलीकडे जाणारी, कवितेच्या शेवटची, आत्मप्रगतीची उडी त्यामुळेच मला स्वाभाविक वाटत होती. वास्तव नि ही कविता यांचा संबंध जेव्हा मी जोडला तेव्हा कवितेमुळे वास्तव परिपुष्ट झाले, फुलारले, हे खरे; पण त्याहूनही वास्तवामुळे ही कविता अधिक अर्थपूर्ण, एकरूप, नि जिवंत झाली.

शांताबाई नि वरदा या दोघींनाही माधवरावांच्या प्रेमजीवनात महत्त्वाचे नि स्वतंत्र स्थान होते. असे असताना, शांताबाईंची प्रतिबिंबे माधवरावाच्या काव्यात सर्वत्र गच्च भरलेली दिसावीत आणि वरदेचे प्रतिबिंब मात्र शोधले तरच पाचदहा कवितांत सापडावे, असे का, हा एक यक्षप्रश्न होता. तो सोडवल्याशिवाय वरदा-प्रकरणाची किंवा माधवरावांच्या चरित्राची तड खऱ्या अर्थाने लागण्यासारखी नव्हती. पण का कुणास ठाऊक, चरित्र लिहून पुरे होईपर्यंत हा प्रश्न माझ्या मनाला तितकासा भिडलाच नाही; आणि त्याला थोडीफार बगल देऊन मी चरित्र-लेखन पुरे केले. फारच थोड्या कवितांत वरदेची प्रतिबिंबे आढळतात, हे निरीक्षण चरित्रात मी नोंदवले आणि 'वरदा माधवरावांच्या कविप्रतिभेला कधी डसली नाही; म्हणून त्यांच्या काव्यात फारशी घुसली नाही' अशी त्याची वरवरची कारणमीमांसा केली. (पृ० २०२, २९०). पुढे, १९७६ च्या मार्चमध्ये, मुंबई मराठी साहित्य संघात 'माधव जूलियन : प्रेमजीवन आणि प्रेमकविता' या विषयावर जेव्हा मी व्याख्याने दिली तेव्हा मात्र तो प्रश्न खऱ्या अर्थाने मला जाणवला. मला वाटले, की दोघींनी जर माधवरावांच्या भावजीवनावर एवढा प्रभाव गाजवला तर एकीला काव्यात एवढे महत्त्व का नि दुसरीला एवढे गौणत्व का? शांताबाईंवरील प्रेमाचे स्वरूप वरदेवरील प्रेमापेक्षा अधिक काव्ययोग्य होते असे म्हणता येईल का? दोन्ही प्रेमांत चाकोरी-बाहेरचीच चाल होती, काही खास व्यक्तिवैशिष्ट्ये गुंतलेली होती, उत्कट नि हळव्या भावनांचा खेळ होता, मग असे का व्हावे? तसे पाहिले तर वरदेवरचे प्रेम अधिक ध्येयात्म, अधिक मानस, नि अधिक तरल होते. त्याच्या योगाने खऱ्या कविप्रतिभेला मोठे आव्हान नि आवाहन मिळण्या-सारखे होते. मग माधवरावांनी त्यावर रचना का करू नये?

त्या वेळी प्रश्नाची उत्तरे म्हणून जे अनेक पर्याय माझ्या दृष्टीसमोर आले त्यांची साधकबाधक चर्चा म० सा० पत्रिकेच्या जानेवारी ते जून १९७७ च्या जोड-अंकात मी केलेली आहे. सर्व पर्यायांत मला जो पर्याय ग्राह्य वाटला तो असा, की व्यावहारिक अडचणींमुळेच वरदेविषयी

आपली भावना माधवराव काव्यात व्यक्त करू शकले नाहीत. प्रेमकवितांनी आपली अपकीर्ती होत आहे हे १९२३ च्या ऑक्टोबरमध्येच त्यांना जाणवले होते. पुढे श्री० बा० अ० भिड्यांनी 'किरण'वर टीका करताना म्हटले, की "चटोरपणात माधव जूलियन धाडसी आहेत, हे निभ्रान्त कबूल केले पाहिजे." डे० ए० सोसायटीत प्रा० वि० के० जोगांनी टोमणा मारला, की "कॉलेजातील मुलींशी तहाहयात तरुण सभासदांनी खेळणे—विशेषतः केशकलाप पाहून ज्यांना काव्यस्फूर्ती होते अशांनी खेळणे—गर्ह्य, अनुचित आहे." मग सोसायटीत नि समाजात त्यांच्याविरुद्ध निंदेचे जे मोहोळ उठले त्यात त्यांचा पक्का निश्चय झाला, की शत्रुपक्ष आपल्या विरुद्ध आपल्या कवितांचा उपयोग केल्याशिवाय सोडणार नाही. म्हणूनच माडखोलकरांकडली आपली कवितांची वही त्यांनी आवर्जून परत मिळवली आणि तुकडे करून ती नदीत फेकली. कवितांचा उपयोग केवळ आपल्याविरुद्धच नव्हे, तर वरदेविरुद्धही केला जाईल, अशी शंका-देखील त्यांना भेडसावीत असावी. तेव्हा स्वतःच्या नि वरदेच्या रक्षणासाठी आपली प्रेमभावना त्यांनी मनातच कोंडली आणि विचारपूर्वक तिला काव्यात प्रकट होऊ दिले नाही. त्यांच्या या कृतीमुळे, एका सुंदर भावनेचा मोर मराठीच्या आंबराईत पिसारा पसरून नाचणार होता तो नाचू शकला नाही. त्याचा पिसारा मिटलेला राहिला नि पाय काष्ठ होऊन पडले! पण त्याला त्यांचा इलाज नव्हता.

वरदा-प्रकरणाच्या शोधात अनेक नव्या गोष्टी माझ्या हाती लागल्या आणि सत्यात खूप खोलवर मी डोकावू शकलो. पण एका बाबतीत माझी कशी फसगत झाली ते शेवटी सांगायला हवे. गिरीशांकडली पत्रसंग्रहाची पेटी आणून तीमधील वरदेच्या पत्रांचे पुडके जेव्हा मी बघू लागलो तेव्हा त्यात तीन पोस्ट-कार्डे मला आढळली. वरदा-प्रकरण १९२३ च्या सप्टेंबरपासूनचे; पण या कार्डांवर तारखा होत्या १९२३ च्या फेब्रुवारी व एप्रिल महिन्यांतल्या—म्हणजे नक्की आधीच्या. पण कार्डे कोणी कोणाला लिहिलेली असावीत? 'वरदे'ने ती 'माय डियर गंगू'ला म्हणजे माधवरावांच्या भावी पत्नी लीलाबाई यांना, लिहिलेली होती! मी घटकाभर दिङ्मूढ झालो नि विचार करू लागलो. वरदेची माधवरावांशी ओळख होण्यापूर्वी तिची लीलाबाईंशी ओळख होती? मग लग्न ठरण्यापूर्वी माधवरावांनी लीलाबाईंना फर्ग्युसन-प्रकरण ऐकवले तेव्हा त्यांना काय वाटले असेल? लग्नानंतर त्यांची व वरदेची भेट घडवून आणली तेव्हा काय घडले असेल? दोघी जर आधीपासून एकमेकींना ओळखत असतील तर या दोन प्रसंगांत केवढे नाट्य अनुस्यूत असेल? ते नाट्य माधवरावांना ठाऊक होते का? दोघींनी त्याचा स्फोट केला का? कसा केला? या साऱ्यामध्ये जी 'आयरनी ऑफ सिच्युएशन' होती तिने माझे मन थरारून गेले! पुढे माधवराव व लीलाबाई यांची पत्रे जेव्हा मला मिळाली तेव्हा त्यांतही वरदेचे निर्देश सापडू लागले. ३० नोव्हेंबर १९२८ च्या पत्रात लीलाबाईंनी म्हटले होते : "वरदाताईचे पत्र आले....तिचे पत्र ज्या अर्थी डोळ्यातून अश्रू काढील असे आले त्या अर्थी तितक्याच ममतेने मलाही तिला लिहिणे भाग आहे. दुसऱ्याने आमच्याजवळ प्रेम मागितले तर ते आम्ही आम्हाला नकळतच देतो. तुझे मात्र उलटे आहे." लीलाबाईंच्या या लिहिण्यावरून मला वाटले, की मध्यंतरी घडलेल्या फर्ग्युसनमधील रामायणानंतरही या दोन मैत्रिणी पुनश्च जवळ आल्या. इतक्या जवळ आल्या की दोघींच्या मैत्रीत माधवरावांचीच अडचण होऊ लागली! या समजुतीला

धरूनच चरित्रातील पृ० ३३५–३३६ वरील मजकूर मी लिहून गेलो. तेव्हा घटनांच्या जुळणीत एक कादंबरी मला दिसत होती आणि तिने मी काहीसा प्रभावित झालो होतो.

पण ज्या वरदेशी लीलाबाईंची १९२३ च्या फेब्रुवारीपासून मैत्री असेल ती वरदा माधवरावांच्या वरदा नायडूपेक्षा वेगळी असेल ही शक्यताच माझ्या ध्यानात आली नव्हती! दोघी त्या वेळी पुण्यात होत्या, दोघी फक्कड इंग्रजीत पत्रे लिहीत, नि दोघींचे हस्ताक्षर सारखवट होते; त्यामुळे माझा घोटाळा व्हायला मदत झाली होती. चरित्राचे हस्तलिखित श्री० खानोलकरांनी जेव्हा वाचून पाहिले तेव्हा माझा घोटाळा त्यांच्याही लक्षात आला नसावा. पण 'रसिक'च्या १९७८ च्या दिवाळी अंकात मी लिहिलेला वरदा-प्रकरणावरील लेख जेव्हा त्यांनी वाचला तेव्हा तो घोटाळा त्यांच्या लक्षात आला; आणि त्यांनी मला दूरध्वनीवर म्हटले, 'अहो, तुमच्या लेखातला शेवटचा भाग बरोबर नाही. लीलाताईंची वरदा म्हणून हिंगण्याची एक मैत्रीण होती. ती वरदा नायडू नव्हे. ह्या वरदेला भेटायला माधवराव नि लीलाताई एकदा कल्याणला गेली होती, हे मला ठाऊक आहे!' या दूरध्वनीमुळे मी गारच झालो. पुन्हा माधवराव व लीलाबाई यांचा पत्रव्यवहार मग मी चाळला, वरदा या नावाचे सर्व उल्लेख तपासले, नि समजून चुकलो की आपण फार चुकलो आहोत! लीलाबाईंची वरदा वेगळी होती नि माधवरावांची वरदा वेगळी होती. माधवरावांच्या वरदा नायडूबद्दल लीलाबाईंच्या मनात काही किंतू राहिला नव्हता, हे खरे. पण माधवरावांची अडचण वाटावी एवढ्या त्या दोघी जवळ आल्या नव्हत्या. ३० नोव्हेंबर १९२८ च्या पत्रात, जिच्या पत्राने डोळ्यांत अश्रू आले असे लीलाबाईंनी म्हटले, ती वरदा म्हणजे त्यांची वरदा नायडू नव्हती!

चरित्राची दुसरी आवृत्ती कधीकाळी निघाली तर त्या वेळी वरदा-प्रकरणात हा 'शोध' मला घालायला हवा.

८

□ □ □ □ □ □ □ □ □ □

शोध : वैवाहिक जीवनाचा

माधवरावांच्या वैवाहिक जीवनाचा भाग कितपत आकर्षक होईल, याबद्दल प्रथमपासून मी साशंक होतो. लीलाबाईंचे 'आमचीं अकरा वर्षें' हे पुस्तक मी वाचलेले होते आणि पतिपत्नींत वारंवार झालेले संघर्ष, माधवरावांना येणारे 'वेताळा'चे झटके, समाजातील गैरसमज, वगैरे गोष्टींतील नाट्य नि चटकदारपणा मला ठाऊक होता. पण तरी वाटे, की चरित्रातील आधीच्या भागांपेक्षा हा भाग अळणी होणार. आधीच्या चरित्रात शांताबाई नि वरदा येऊन गेलेल्या असणार. दोघींशी माधवरावांचा जो संबंध होता त्यातील प्रेमाचे स्वरूप विलक्षण होते, त्यातील घटनांची वळणे अनपेक्षित होती, संघर्ष नि ताण तीव्र होता, अंतरंगातील हालचाली तर किती गूढ नि उत्कंठ करणाऱ्या होत्या. तेव्हा शांताबाई नि वरदा यांच्यानंतर लीलाबाई फिक्याच वाटणार! माधवरावांच्या वैवाहिक जीवनामधला अंगभूत आकर्षकपणा आपण कितीही ताकदीने उभा केला तरी तुलनेने तो कमीच पडणार! वैवाहिक जीवनाचा अकरा वर्षांचा दीर्घकालीन वृत्तांत रसवत्तेच्या दृष्टीने तोलून धरायला तो आकर्षकपणा अपुराच ठरणार! चरित्र म्हणजे इतिहास असल्यामुळे जे वैवाहिक जीवन अकरा वर्षें खरोखर अस्तित्वात असेल तेच आपल्याला सांगायला हवे. फार तर ते संक्षेपाने सांगता येईल नि त्याचा व्याप त्याच्या आकर्षकपणाला पेलेल अशी व्यवस्था करता येईल. पण कल्पिताची भर घालून किंवा मुळातले रंग गडद करून त्याची रंगत वाढवता येणार नाही. संक्षेपातही एक धोका आहे. तोपर्यंतचे चरित्र ज्या तपशिलाने नि विस्ताराने सांगितले त्याच तपशिलाने नि विस्ताराने जर वैवाहिक जीवन सांगितले नाही तर चरित्राचा तोल बिघडेल, त्याच्या मांडणीत विषमता येईल.—मी असा साशंक होतो; आणि चरित्रकारापुढे सौंदर्याकडे जाणारी जी एकच अटळ वाट असते त्या वाटेने माझी पावले पडत होती. ती वाट म्हणजे वास्तव सत्यातच खोल खोल शिरायचे, त्यामधील जटिलता, संमिश्रता, भावनांची तरल क्रीडा शोधायची, आणि त्यातच वाचकाला गुंगवायचे!

मी १९७० च्या डिसेंबरमध्ये चरित्रलेखनाचा संकल्प सोडला आणि काहीशा उशिरा, म्हणजे १९७१ च्या मेमध्ये, वास्तव सत्यात खोल शिरण्यासाठी एक दार माझ्यापुढे किलकिले झाले. हे दार म्हणजे लीलाबाईंची, सुमारे ६३ पृष्ठे लिहिलेली, एक वही ऊर्फ आत्मकथनपर दैनंदिनी. खानोलकरांच्या संग्रहातील ही अमूल्य दैनंदिनी अभ्यासताना प्रथमतः माझ्या हे लक्षात आले, की वैवाहिक जीवनात प्रवेश करताना माधवराव जसा आपला भूतकाळ बरोबर घेऊन आले होते तशाच लीलाबाईही आपला भूतकाळ बरोबर घेऊन आल्या होत्या. 'आमचीं अकरा वर्षें' या त्यांच्या पुस्तकावरून जशी कल्पना होते तशी त्यांच्या मनाची पाटी काही कोरी नव्हती. पंधराव्या वर्षापासून 'हिस्टेरिया' त्यांच्या पाठीस लागला होता आणि पतिसुखासाठी त्या

आसुसलेल्या आहेत हे भोवतालच्या सुज्ञ मंडळींना जाणवत होते! माधवरावांशी लग्नाला तयार होताना आपण धास्तावलो होतो, "लग्नामुळे होणारा साहजिक आनंद तेव्हा मला मुळीच झाला नाही", असे '० वर्षे'मध्ये त्या कितीही म्हणोत; पण त्यांना लग्न वाच्यार्थाने हवे होते नि माधवरावांच्या रूपगुणसौंदर्याने त्या कुठेतरी मोहित झालेल्या होत्या, यात शंका नाही. इंग्रजी सहावीत असताना, म्हणजे त्या सतरा-अठरा वर्षांच्या होत्या तेव्हा, त्यांचा नि धोपेश्वरकर नामक एका शिक्षकांचा संबंध जोडून मुलींनी म्हणे काही अफवा पिकवली होती!—आणि बहुधा त्याच धोपेश्वरकरांकडे लग्नानंतर, हिंगण्याला शिकत असता, त्या चारदोनदा काही कारणांनी गेल्या होत्या! त्यांच्या दैनंदिनीमधले असले उल्लेख बघून मी प्रथम अवाक झालो. मग बाळबोधच पण काही छक्केपंजे पुसट अनुभवलेल्या, वेगळ्या लीलाबाई मला दृष्टीसमोर दिसू लागल्या. माधवरावांच्या संसारात प्रारंभी कलहाची जी टाळी वाजली ती एका हाताऐवजी दोन हातांनी तर वाजली नसेल ना, अशी शंका येऊ लागली.

खरे म्हणजे धोपेश्वरकर-प्रकरणाची श्री० मोहनराव शहाण्यांना काही माहिती असेल, अशी माझी कल्पना नव्हती. पण दैनंदिनीत लीलाबाईंनी अशा अर्थाचा एक उल्लेख केला होता, की अगदी खाजगी अशी काही गोष्ट माधवराव मोहनराव शहाण्यांपाशी बोलले होते नि त्यामुळे पतिपत्नींतले एक रहस्य त्रयस्थासमोर गेले होते. त्यामुळे त्या अस्वस्थ होत्या. तेव्हा हे रहस्य कोणते, ते जाणून घ्यावे म्हणून १९७१ च्या जुलैमध्ये मोहनरावांची मी गाठ घेतली. माझ्या-जवळच्या पत्रव्यवहारामधील काही अस्पष्ट स्थळेही मोहनरावांकडून मला स्पष्ट करून घ्यायची होती. पण मोहनरावांनी जी माहिती सांगितली तीमुळे धोपेश्वरकर-प्रकरण आपसूक उलगडले. मोहनराव म्हणाले, "लग्नापूर्वी लीलाबाईंना धोपेश्वरकर नामक गृहस्थांबद्दल आकर्षण वाटत होते;...आणि ही गोष्ट लीलाबाईंनी मला सांगितली होती....लीलाबाईंजवळ लग्नानंतर धोपेश्वर-करांचा फोटो होता...." वगैरे वगैरे. रहस्य उलगडण्याच्या ओघात मोहनराव हे बोलून गेले आणि पुढे म्हणाले, "जी० ए० च्या परीक्षेसाठी पुण्यास जाण्याचा प्रसंग आला, तेव्हा पुण्यास धोपेश्वरकर भेटल्यास लीलाबाईंनी कसे वागावे असा प्रश्न उत्पन्न झाला; त्या वेळी माधवरावांनी लीलाबाईंना अशी अनुमती दिली होती, की त्यांनी चांगल्या स्नेह्यांप्रमाणे एकमेकांशी वागायला हरकत नाही. माधवराव आपल्या कोणातरी मैत्रिणीचा फोटो खोलीत लावीत असत. त्यावरून पतिपत्नींत जेव्हा वाद झाला तेव्हा लीलाबाईंनी विचारले होते, की मी धोपेश्वरकरांचा फोटो घरात लावल्यास चालेल का?—आणि माधवरावांनी 'माझी हरकत नाही' असे उत्तर दिले होते. हे धोपेश्वरकर-प्रकरण फार दिवस टिकले नाही; कारण लीलाबाई माधवरावांवर मनापासून प्रेम करू लागल्या."

मोहनरावांची ही हकीगत दात्यांत दाते बसावी तशी लीलाबाईंच्या पूर्वोक्त उल्लेखांत चपखल बसत होती. शिवाय प्रत्यक्ष अनुभवावरून मोहनरावांनी ती सांगितली होती. त्यामुळे तिच्या-विषयी संशयाला जागा नव्हती. तरीही तिच्यामधील सत्य आणखी पडताळावे म्हणून तिच्या अनुरोधाने लीलाबाईंची दैनंदिनी मी पुन्हा वाचली.—आणि मौज अशी की तिच्याशी जमणारे आणखीही काही उल्लेख दैनंदिनीत मला आढळले. (लीलाबाईंच्या काही पत्रांतही त्या हकी-गतीला दुजोरा मिळाला.) अर्थात्, मोहनरावांची हकीगत जर खरी तर धोपेश्वरकर नि लीलाबाई

यांच्याविषयीची अफवा उगाच पिकली नव्हती—आणि दैनंदिनीत लीलाबाई जेवढ्या दिसत होत्या तेवढ्याही निर्व्याज नव्हत्या! पतिपत्नींत लग्नानंतर जे खटके उडाले त्याला मुख्यतः माधवरावांचा स्वभाव नि वरदा-प्रकरण ही कारणे असतील; पण त्याला एखादा टक्का का होईना पण या धोपेश्वरकर-प्रकरणाचा हातभार लागला होता. शिवाय माधवरावांनी लीलाबाईंना जे उत्तर दिले त्याने माधवरावांच्या उत्कट, एकमार्गी, भाबड्या मनावर केवढा प्रकाश पडत होता! त्यांना पत्नीने परपुरुषाशी ठेवलेला निर्मळ स्नेह मान्य होता, पण स्नेहभावनेत प्रेमभावना, नि प्रेमभावनेत कामभावना गुंतलेली असू शकते, यातील धोका मात्र दिसत नव्हता!

माधवराव नि लीलाबाई यांचा प्रारंभिक संघर्ष नव्या माहितीमुळे माझ्या मनात नव्याने रंगू लागला आणि त्यात मोहनरावांनी पतिपत्नींमधले म्हणून जे रहस्य सांगितले त्याने तर विशेष भर पडली. ते म्हणाले, "लीलाबाई माधवरावांपेक्षा अधिक पॅशनेट होत्या. त्या जशा लवकर रागावत, लवकर चिडत, लवकर रडत, तशाच एकांतात अधिक वासनावश होत. माधवराव हे त्या मानाने वासनेच्या ताब्यात लवकर जात नसत आणि गेले तरी त्यांची वासना तेवढी पेटत नसे. ही वॉज कोल्डर दॅन लीलाबाई. दोघांनाही या गोष्टीचा त्रास होई....मी तेव्हा अविवाहित होतो; पण मीच जवळचा व विश्वासातला म्हणून माधवराव स्वतःला होणाऱ्या त्रासाविषयी माझ्यापाशी बोलले होते..." हे रहस्य आश्चर्यकारक तर होतेच; पण त्यामुळे पतिपत्नींतील संघर्षावर नवा प्रकाश पडत होता. कारण पतिपत्नींत जेव्हा कामविषमता असते तेव्हा त्यांच्यातील मतभेद, कलह, दूरता ही लवकर संपत नाहीत. किंबहुना ती वाढीलाही लागतात.

पण मोहनरावांनी हे जे रहस्य सांगितले ते खरे होते का? मोहनराव माधवरावांचे नि लीलाबाईंचेही त्या काळातले एक जिव्हाळ्याचे स्नेही होते नि स्वानुभवावरून बोलत होते, यात शंका नाही. पण सत्य फार पारखून घ्यावे लागते, त्याला आधार सापडल्याशिवाय ते स्वीकारणे धोक्याचे असते, अन् हे रहस्य तर माझ्या अपेक्षेला धक्का देणारे होते. तेव्हा त्याची प्रचीती पाहण्यासाठी मी पुन्हा लीलाबाईंच्या दैनंदिनीकडे वळलो. खरे म्हणजे त्या दैनंदिनीवरूनच मोहनरावांना विचारण्यासाठी मी असा एक प्रश्न नोंदवून ठेवला होता, की "वॉज माधवराव ओव्हर-सेक्स्ड्?"—आणि मोहनराव तर सांगत होते, की "ही वॉज कोल्डर दॅन लीलाबाई!" त्यामुळे दैनंदिनीकडे पुन्हा वळण्यावाचून गत्यंतर नव्हते. दैनंदिनीत मोहनरावांना अनुकूल असे फक्त एकच वाक्य प्रथमतः दिसले. लीलाबाईंनी लिहिले होते : "माधव पुष्कळ वेळा मला म्हणतो की मला 'कोल्ड वाइफ' पाहिजे होती." म्हणजे त्यांची वासना माधवरावांच्या मानाने तप्त असे नि ती निवावी असे माधवरावांना वाटत असे, हे सूचित होत होते. पण हे वाक्य वगळता सगळी दैनंदिनी मोहनरावांना प्रतिकूल होती! निदान प्रथमदर्शनी तरी "वॉज माधवराव ओव्हर-सेक्स्ड्?" अशीच शंका तीव्रतेने येत होती!

'कोल्ड वाइफ'चा उल्लेख ३-१२-१९२८ च्या नोंदीत झालेला आहे. लीलाबाई भाट्यांकडील काही एका विलक्षण प्रसंगाच्या उडत उडत केलेल्या अपुऱ्या निर्देशाने या नोंदीचा प्रारंभ होतो. तो निर्देश असा : "...दिवाळीत श्री० लीलाबाई भाट्यांच्याकडे सकाळी ८ वाजता फराळाला गेलो होतो. त्या वेळची माझी भयंकर मनःस्थिती माझ्या डोळ्यासमोर ह्याच कारणाने उभी राहते. ह्याच्या सहवासात ह्याला व आपल्याला कितपत सुख होईल?—हा प्रश्न अजूनही

माझ्या मनःचक्षूंपासून दूर जात नाही. रात्रंदिवस ह्या विचाराने अजूनही मला भणभणल्यासारखे होते. मला ह्याच्या कलाप्रमाणे वागता येईल काय? वागणे अत्यंत कठीण काम आहे..." या निर्देशानंतर असे म्हटले आहे, की काही झाले तरी आपण माधवशी जमवून घ्यायलाच हवे; त्याशिवाय गत्यंतर नाही. त्यापुढील नोंद पुढीलप्रमाणे : "दोन व्यक्ती आनंदात व सुखाने राहाव्या अशी इच्छा असली तर तीन तुरी वेगळ्या शिजवून कसे चालावे? माधव पुष्कळ वेळा मला म्हणतो की मला 'कोल्ड वाइफ' पाहिजे होती. पण हे म्हणणे त्याचे कितपत बरोबर आहे? तिऱ्हाईत या दृष्टीने जरी विचार केला तरी मला वाटते, त्याला सुख झाले नसते. पण हे त्याला कसे पटावे? पटवून देण्याची माझी इच्छाच नाही. मला जसे वागायचे तसेच शेवटी मी वागणार!" ही नोंद एकंदरीने पाहता, माधवरावांची वासना लीलाबाईंपेक्षा सौम्य होती, असा निर्वाळा माझे मन देईना. 'मला कोल्ड वाइड पाहिजे होती' असे ते 'पुष्कळदा' म्हणाले असतील; पण लीलाबाई सांगत होत्या की तशी बायको मिळाल्याने त्यांना सुख झाले नसते. भाट्यांच्या घरी कोणता प्रसंग घडला, ते समजायला मार्ग नाही. पण जो प्रसंग घडला त्यावरून लीलाबाईंनी दोन निष्कर्ष काढले होते : १. माधवरावांशी जमवून घेणे अत्यंत कठीण आहे. २. त्यांना 'कोल्ड वाइफ'कडून सुख होणार नाही. तेव्हा मला वाटले, की भाट्यांच्या घरी लीलाबाई भाट्यांविषयीचे स्वतःचे आकर्षण माधवरावांना लपवता आले नसावे, त्या आकर्षणाचे भलतेच प्रदर्शन त्यांच्या हातून झाले असावे, नि त्यामुळे लीलाबाईंची—त्यांच्या पत्नीची—मनःस्थिती 'भयंकर' झाली असावी. लीलाबाई भाट्यांसारख्या सुस्वरूप पण प्रौढ स्त्रीला बघून आपला नवरा जर असा पाघळत असेल तर त्याच्याशी आपण कसे जमवून घेणार, असा पेच त्यांना पडला असेल. लीलाबाई भाट्यांच्या अचानक भेटीने रस्त्यात एकदा माधवराव कसे चमकले, कसे मोहरले, कसे भांबावले, ते श्री० गोपीनाथ तळवलकर व प्रा० श्री० के० क्षीरसागर यांनी मला सांगितलेले होते. तेव्हा तसे काही घडून नवऱ्याची स्त्रीविवशता लीलाबाईंच्या लक्षात आली असेल आणि अशा नवऱ्याला वश करायचे तर कोल्ड वागून उपयोगाचे नाही, शृंगारानेच काम साधले पाहिजे, असे त्यांनी ठरवले असेल, असा मी कयास केला. अर्थात्, या कयासात माधवराव ठरले तर ओव्हर-सेक्स्ड् ठरत होते!

दि० २६-३-२९ ची नोंद तर मला फारच बुचकळ्यात टाकीत होती. नोंद अशी : "पुष्कळ ठिकाणी असे आढळून येते, की लग्न झाल्यानंतर वाटेल तसे मोकळेपणाने वागून एकदम डोक्यात फिट् आली की तटका तोडून वागायचे. पण ह्याचा परिणाम बायकोच्या मनावर किती होतो ह्याची कल्पना नवऱ्याला नसते. तेच क्षण असे असतात, की त्या वेळेस प्रेमाने अगर ममतेने वागले नाही तर त्याचा पुढील आयुष्यावर परिणाम फार वाईट होतो! जितके दिवस नावीन्य वाटते तितके दिवस ती वस्तू वापरायची व कंटाळा आला की तिजबद्दल बेपर्वाई वृत्ती दाखवायची ह्याहून अमानुषपणा तो दुसरा कोणता? नवराबायको म्हणजे एकच अर्थ घेऊन वसायचा नसतो..." वगैरे वगैरे. येथे सगळी नोंद माधवरावांना उद्देशून केलेली आहे, हे मला उघड दिसत होते. या नोंदीत लीलाबाई 'लग्नानंतरचे मोकळे वागणे', 'ती वस्तू', 'एकच अर्थ' इत्यादी जे संदिग्ध उल्लेख करतात ते संदिग्ध असल्यामुळेच मला समागमाचे निदर्शक वाटले. अर्थात्, नोंदीचा निष्कर्ष असा निघत होता, की समागमात नावीन्य होते तोवर, आणि नावीन्य

असे तोवर, माधवराव रंगात असत, पण मागाहून तुटक वागत. त्यांनी तसे वागू नये, अशी लीलाबाईंची अपेक्षा होती. ही नोंद माधवरावांना उघडपणे ओव्हर-सेक्स्ड् ठरवीत होती; आणि कोल्ड वाइफबद्दलची त्यांची मागणी एक तर वायफळ ठरवीत होती, किंवा समागम दीर्घ काळ चालावा म्हणून त्यांनी अपेक्षिलेली ती क्लृप्ती असावी असे सूचित करीत होती! छे, छे! ही नोंद मोहनरावांच्या आठवणीशी कुठेच जमत नव्हती.

दि० ८-२-२९ची मधल्या काळातली नोंद अशीच चमत्कारिक होती. तीमधला एक भाग पुढीलप्रमाणे : "काही क्षण इतके नाजूक असतात की त्या वेळेस 'आपण जर एखादी गोष्ट नाकारली तर सहवासातील माणसाला काय वाटेल?' असे वाटते....अशीच स्थिती पहिल्या-प्रथम आमची दोघांची झाली होती....संकोचामुळे व भिडस्तपणामुळे काही गोष्टी दुसऱ्याकरता कर्तव्य म्हणून केल्या. पण त्या करण्यास तो वेळ योग्य नव्हता. त्याहून उत्तम संधी पुढे आली असती....आयुष्यभर ती गोष्ट अयोग्य वेळी केल्याबद्दल पश्चात्ताप वाटतो." या नोंदीवरून असे दिसत होते, की माधवराव समागमासाठी आतुर असत; पण तो नाकारणे लीलाबाईंना भिडस्त-पणामुळे शक्य होत नसे. त्या कर्तव्य म्हणून तयार होत. पण तसे केल्याने त्यामधील मौज निघून जाई. मन व शरीर उमलल्यावर पुढे समागम आनंदाचा होऊ लागला. पण इच्छा नसताना आधी जे केले त्याचा पश्चात्ताप टळू शकला नाही.

मोहनरावांची आठवण किंवा 'कोल्ड वाइफ'संबंधी लीलाबाईंनीच सांगितलेले माधवरावांचे उद्‌गार यांची सांगड लीलाबाईंच्या दैनंदिनीशी बसत नव्हती आणि काही दिवस मी खोड्यात सापडल्यासारखा झालो होतो. पण पुढे त्या दैनंदिनीची मनात चर्वणा झाल्यावर, आणि पति-पत्नींची सुमारे २११ खाजगी पत्रे बारकाईने वाचल्यावर, मला असे जाणवू लागले, की मोहन-रावांच्या म्हणण्याप्रमाणे लीलाबाईंची वासना माधवरावांपेक्षा अंमळ जास्तच असावी, त्यांना हिस्टेरिया लागला होता नि "लग्नाची घाई" झाली होती, हे तर खरेच; पण दैनंदिनीत भोळ्या-भाबड्या शैलीच्या पदराआड सहवाससुखाच्या आठवणी त्यांनी भरपूर खेळवलेल्या होत्या. पत्रांत तर आपल्या प्रबळ वासनेची जाणीव त्या जागोजाग देतात. पतिपत्नींच्या पत्रव्यवहारात चुंबनांची नि आलिंगनांची जी साहजिक देवाणघेवाण व्हायची ती दोघांच्या पत्रांत होते; पण ती लीला-बाईंच्या बाजूने जरा अधिक होते. त्यातही लीलाबाईंच्या देवाणघेवाणीत मनःपूर्वकता स्पष्ट दिसते; पण माधवरावांची देवाणघेवाण कधी उपचार म्हणून तर कधी लीलाबाईंना बरे वाटावे म्हणून झाल्याची शंका येते. "तुझ्या गुलगुलीत मऊ गालाचा माधव, पापा कधी देशील?" असा लहू प्रश्न लीलाबाईच विचारीत असत! "तू लवकर ये ना! मला तू हवा आहेस. तुझ्या येण्याने माझ्या अभ्यासात मात्र मुळीच व्यत्यय येणार नाही. नाहीतर तुला वाटायचे की ही मला चैनीकरता बोलावते. तर तसे नाही. अभ्यास करून चैन करता आली तर रावसाहेब! आपल्यालासुद्धा ती जणू काय नकोच असेल नाही? खरे सांग!" असे चैनीचे मुक्त निमंत्रण लीलाबाईच देऊ शकत. त्यांचे पत्रलेखन हा केव्हा केव्हा मानसिक समागम असायचा. "मी दररोज रात्री स्वप्नात तुझ्या कुशीत शिरून स्वस्थ निजते. तेसुद्धा तुझ्या मानेला विळखा घालून तोंडात तोंड खुपसून निजते.—असे स्वप्न पडल्याशिवाय माझी एकही रात्र सुनी जात नाही."—हा तसल्या समागमाचा एक नमुना. लीलाबाईंच्या वासनेसंबंधी एकीकडे मी मोहनरावांच्या आठवणीच्या

असा जवळ आलो; पण दुसरीकडे दैनंदिनीची त्या आठवणीशी सांगड कशी घालावी, हा प्रश्न उरलेलाच होता.

१९७२ च्या सप्टेंबरमध्ये, म्हणजे मोहनरावांच्या आठवणी घेतल्यापासून तेराचौदा महिन्यांनी, त्या प्रश्नाकडे मी पुन्हा वळलो. त्या वेळी, आपली सहवासाची किंवा शृंगाराची भूक साजरीगोजरी करून ती माधवरावांना पटविण्याचा प्रयत्न लीलाबाई करीत असत, ही गोष्ट मला थोडीफार जाणवलेली होती. २३-११-२९ च्या पत्रात त्यांनी म्हटले होते : "...काही अगदी क्षुल्लक गोष्टींतसुद्धा तू केव्हा रागावशील ह्याची मला सदोदित भीती वाटते रे! दूर असताना तू जितका गोड वागतोस तितका मी तुझ्या सहवासात असताना वागत नाहीस. तुला असे म्हटले तर त्याचा तू अर्थ करशील की मला आपले सदोदित आलिंगन-चुंबनादी गोष्टी आवडतात. मला तुझ्याजवळ यायला तर आवडतेच, त्याहून तुझ्याजवळ झोपायला आवडते. म्हणून त्याचा अर्थ तू निराळा करू नकोस." वगैरे वगैरे. या किंवा अशाच इतर पत्रांवरून माझी जाणीव बनलेली असावी. अर्थात्, आपली वासना माधवरावांना पटविण्याचा प्रयत्न लीलाबाईंनी दैनंदिनीत केला असेल का, अशी शंका मनात कुठेतरी वावरत असताना, या वेळी दैनंदिनीकडे मी पुनश्च वळलो. आणि बुद्धी चालविल्यावर, लीलाबाईंशी तद्रूप झाल्यावर, दैनंदिनीचा अर्थ लागत गेला! मोहनरावांच्या आठवणीशी तिचा सांधा बरोबर जमला!

प्रथमतः 'कोल्ड वाइफ'संबंधी नोंद बिकट म्हणून मी सोडून दिली आणि बाकीच्या नोंदींकडे वळलो. ८-२-२९ च्या नोंदीत लीलाबाई म्हणतात, की "संकोचामुळे व भिडस्तपणामुळे काही गोष्टी दुसऱ्याकरता कर्तव्य म्हणून केल्या." पूर्वी मला वाटले होते, की माधवरावांच्या आतुरतेपुढे नाइलाज झाल्यामुळे त्यांनी दिलेल्या संमतीचा हा उल्लेख असावा. पण आता लक्षात आले, की स्वतःच केलेल्या घाईचे हे समर्थन होते! आपण घाई केली नि माधवराव विशेष उत्सुक नसता त्यांना समागमात ओढले याची जाणीव लीलाबाईंना होती; आणि माधवरावांची तत्संबंधी नाराजी दूर करावी अशी त्यांची इच्छा होती. तेव्हा त्यांनी म्हटले, की आपण ती गोष्ट 'कर्तव्य' म्हणून केली. "आपण जर एखादी गोष्ट नाकारली तर सहवासातील माणसाला काय वाटेल?" अशी त्यांना म्हणे शंका आली आणि त्यांनी 'भिडस्तपणामुळे' पुढचे पाऊल टाकले! स्वतःच्या घाईची ही सात्त्विक दिसणारी बतावणी लीलाबाई करीत आहेत, हे उघड झाल्यावर, प्रस्तुत नोंद मोहनरावांच्या आठवणीशी जोडणे कठीण नव्हते. कारण दोहोंचा आशय मग एकच ठरत होता. २६-३-२९ ची नोंद याहून थोडी कठीण होती. सर्वसामान्य समजूत अशी आहे, की लग्नानंतर पुरुष शरीरसुखासाठीच पत्नीला जवळ करतो आणि इच्छातृप्तीनंतर तिला दूर लोटतो. त्यामुळे "लग्न झाल्यानंतर वाटेल तसे मोकळेपणाने वागून एकदम डोक्यात फिट् आली की तटका तोडून वागायचे" वगैरे उल्लेख माधवरावांच्या तसल्याच वागणुकीसंबंधी असणार, अशी माझी कल्पना होती. पण आता वाटले, की लीलाबाईंनी फार लगट केल्यामुळेही माधवरावांनी तटका तोडला असेल. ते "वाटेल तसे मोकळेपणाने" वागले, म्हणजे पत्नीशी बरोबरीने, मित्रासारखे वागले. पण त्यामुळे उत्तेजित होऊन लीलाबाई फार लाडात आल्या तेव्हा ते नकोसे वाटून त्यांनी तटका तोडला! ही गोष्ट लीलाबाईंना लागली होती. म्हणूनच त्या म्हणत होत्या, "ह्याचा परिणाम बायकोच्या मनावर किती होतो

ह्याची कल्पना नवऱ्याला नसते" वगैरे. हा अर्थ बरोबर होता याचा प्रत्यय या नोंदीचा (यापूर्वी उद्धृत न केलेला) उर्वरित भाग वाचला की येऊ शकतो. तेथे लीलाबाई म्हणतात, "बायको सुशिक्षित असली तर नवरा प्रथम तरी तिच्याशी भलत्या गोष्टीत फाजील स्वतंत्रतेने मन मानेल तसे वागत नाही....सुशिक्षित पुरुषाला...अनोळखी सुशिक्षित मुलीबद्दल लग्न होताक्षणीच प्रेम वाटणे अशक्य आहे. पण म्हणून साधा प्रेमळपणा म्हणून काही असतोच की नाही ?..." म्हणजे, माधवराव त्यांच्याशी "भलत्या गोष्टीत" फाजील स्वतंत्रतेने वागले नव्हते. पण त्यांनी "प्रेम" नसले तरी "प्रेमळपणा" दाखवायला हवा होता, तो दाखवला नाही, अशी त्यांची तक्रार होती. आधीच्या व नंतरच्या भागाची अशी सांगड बसल्यावर नोंदीच्या मधल्या भागाकडे मी वळलो. "नवराबायको म्हणजे एकच अर्थ घेऊन बसायचा नसतो. पण ह्या नात्यात एकमेकांची ओळख नसताना नावीन्य एका गोष्टीखेरीज कशातच वाटत नाही."—ही त्या भागातील वाक्ये, संदर्भ दिलेला नसल्यामुळे, पूर्वी मी माधवरावांकडे लाविली होती. पण ती लीलाबाईंकडे लागू शकतात, हे आता मला उमजले. 'नवराबायको म्हणजे एकच अर्थ घेऊन बसायचा नसतो (हे मला मान्य आहे.) पण ह्या नात्यात एकमेकांची ओळख नसताना नावीन्य एक गोष्टीखेरीज कशातच वाटत नाही. (तसे माझे झाले.)' अशी ती वाक्ये मी लीलाबाईंकडे जोडून घेतली आणि सर्व ग्रंथ उलगडला! 'एकच अर्थ', 'एक गोष्ट' म्हणजे शरीरसुख हे माधवरावांनी नव्हे तर लीलाबाईंनी महत्त्वाचे मानले होते, हे त्यातून निष्पन्न झाले! लीलाबाईंच्या संदिग्ध, संकोची शैलीमुळे प्रथम माझा घोटाळा झाला होता.

यानंतर 'कोल्ड वाइफ'ची नोंद तोवर संपादन केलेल्या माहितीच्या बळावर मी समजून घेऊ शकलो. माधवरावांनी "मला कोल्ड वाइफ पाहिजे होती" असे म्हणणे आणि लीलाबाईंनी त्याला नकार देऊन "मला जसे वागायचे तसेच शेवटी मी वागणार" असे म्हणणे, हे मोहनरावांच्या आठवणीशी सुसंगतच होते. फक्त, लीलाबाई भाट्यांच्या घरी जो गूढ प्रसंग घडला, नि ज्या प्रसंगाने लीलाबाईंची स्थिती "भयंकर" झाली, त्या प्रसंगातील माधवरावांचे वागणे मोहनरावांच्या आठवणीशी सुसंगत होते का, एवढा प्रश्न बाकी होता. पण भाट्यांकडील प्रसंग खरे तर अज्ञात होता आणि त्या प्रसंगाची व त्या वेळच्या माधवरावांच्या वागण्याची मी नुसती कल्पना केलेली होती. तेव्हा मला वाटले, की 'तो प्रसंग माधवरावांनी स्त्रीच्या आकर्षणामुळे पाघळण्याचाच असेल हे कशावरून ? श्री० तळवलकर किंवा प्रा० क्षीरसागर यांनी लीलाबाई भाट्यांशी संबंधित अशी माधवरावांची जी आठवण सांगितली होती त्या आठवणीतही माधवराव कशाने चमकले, मोहरले, भांबावले, ते नक्की नव्हते. त्यात मुख्यतः स्त्रीविषयक "वासना" प्रबळ होती की "सौंदर्याचे आकर्षण" प्रबळ होते ? विचारान्ती आपण असा निर्णय केला आहे, की त्यात सौंदर्याचे आकर्षण प्रबळ असावे. शिवाय, लीलाबाई भाट्यांसंबंधी आदरही असावा. तेव्हा तसेच काही दिवाळीत भाट्यांच्या घरी घडले असले तर ते लीलाबाईंनी स्त्रीसुलभ गैरसमजाने "वासने"पर्यंत नेऊन भिडवले असेल, हे अगदी शक्य आहे. आणि मुळात काय घडले, माधवराव कसे वागले, हे तर अज्ञातच आहे. तेव्हा सुताने स्वर्गाला जाण्यात काय अर्थ आहे ? तो भाग बहुतकरून मोहनरावांच्या आठवणीशी विसंगत नसावा, आणि अज्ञात असल्याने तो विचारातून वगळायलाच हवा.'

—माधवरावांपेक्षा लीलाबाईंच्या ठिकाणी वासनेचा जोर अधिक होता, हा मुद्दा अभ्यासातून असा संथपणे प्रस्थापित झाला. तो मुद्दा अगदी नवा नि रोचक होता, यात शंका नाही. पण त्याला चरित्रात किती महत्त्व द्यायचे हे त्याच्या नावीन्यावरून किंवा रोचकतेवरून ठरवण्यापेक्षा वास्तवात तारतम्याने त्याला किती महत्त्व होते त्यावरूनच मी ठरवले. कामविषमतेमुळे दोघांचे वैवाहिक जीवन फक्त प्रारंभकाळात—फार तर दिनूच्या जन्मापर्यंत—अस्वस्थ होते. तेव्हा तेवढ्या-पुरताच चरित्रात त्या मुद्याचा उपयोग मी केला. प्रारंभकाळातही अस्वस्थतेच्या अनेक कारणांपैकी एक कारण म्हणून त्याच्याकडे मी बघितले. अस्वस्थतेची इतर कारणे पूर्वलेखकांनी सांगितलेली होती. साधनसामग्रीवरून त्यांचेही सापेक्ष बलाबल मी अजमावले आणि त्याला अनुसरून त्यांनाही कमजास्त महत्त्व दिले.

लग्नानंतर सुमारे तीन महिने, कोल्हापूरला, माधवराव नि लीलाबाई यांच्यामध्ये कलह होत राहिला; पण लीलाबाई शिक्षणासाठी हिंगण्याला गेल्यावर पुढील सात-साडेसात महिन्यांत दोघांची दिलजमाई झाली. या दिलजमाईचा वृत्तान्त थोडासा लीलाबाईंच्या पुस्तकात नि त्याहून जास्त खानोलकरांच्या पुस्तकात येऊन गेलेला होता. तेव्हा ती दिलजमाई अधिक सूक्ष्मपणाने नि अधिक संवेदनाक्षमतेने समजून घ्यायची नि वेचक तपशिलातून अधिक गोचर करायची एवढेच काम माझ्यासाठी बाकी होते. त्यासाठी, जेव्हा मी साधनसामग्रीवरून दृष्टी फिरवली तेव्हा अनेक लहानलहान सत्ये माझ्या दृष्टिपथात आली. उदाहरणार्थ, मला असे जाणवले, की लीलाबाईंनी जरी माधवरावांच्या उत्तराला प्रत्युत्तर दिले होते नि स्वतंत्रपणाची भाषा काढली होती, तरी त्यांना माधवरावांचा सर्व प्रकारचा आधार हवा होता. जसा मानसिक तसा शारीरिक. त्या आधारासाठी त्या कसलीही किंमत द्यायला तयार होत्या! तेव्हा आपल्या आर्जवी पत्रांतून माधवरावांच्या करुणेला त्यांनी हाक दिली.—आणि माधवराव बदलले ते त्यांच्यातील भोळ्या महादेवाची करुणा जागी झाली म्हणून बदलले! माझ्या असेही लक्षात आले, की माधवरावांना समजून घेऊन त्यांच्याशी सर्वार्थाने एकरूप होण्याचा निकराचा प्रयत्न या काळात लीलाबाई करीत होत्या. म्हणूनच, आतून तशी ऊर्मी नसताना एकदा माधवरावांना त्यांनी लिहिले, "मी तुझी आई आहे!" प्रेयसीच्या किंवा पत्नीच्या ठिकाणी माधवराव जशी आई शोधीत होते तशीच मैत्रीणही शोधीत होते. त्यासाठी एकदा माधवरावांना त्यांनी हळूच म्हटले, "तूच माझा मित्र आहेस"! माधवरावांचा आवडता टॉडदेखील त्यांनी माधवरावांसाठी वाचला नि माधव-रावांच्या विचारांशी जुळते घेण्याची धडपड केली. दोघांची जी दिलजमाई झाली तिचा प्रत्यय छोट्याछोट्या खुणांवरून मला येत गेला; म्हणून त्या खुणा मी वेचून घेतल्या. एकदा टिपूर चांदण्यात दोघे फर्ग्युसनच्या टेकडीवर फिरायला गेली होती. तेथे उताणे पडून माधवराव नक्षत्रांची माहिती लीलाबाईंना सांगत होते.—आणि मौज अशी, की माहिती सांगता सांगता त्यांना सुखाच्या तंद्रीत झोप लागली! ते घोरू लागले! अशा छोट्या खुणा माझ्या पुस्तकाच्या ३२० ते ३२३ या पृष्ठांवर बघायला मिळतील. लीलाबाईंना दिवस गेल्याचे दोघांच्या लक्षात येते नि तेथे या खुणा उत्कर्षबिंदू गाठतात. मला वाटते, या खुणांनी दोघांच्या दिलजमाईचा प्रत्यय जसा मला आला तसा वाचकांनाही येऊ शकेल.

लग्नानंतरही माधवरावांच्या जीवनातून शांताबाई नि वरदा पूर्णपणे पुसल्या गेल्या नव्हत्या; आणि

त्यामुळे लीलाबाईंशी माधवरावांची जी दिलजमाई झाली तीमध्ये काही ताण नि काही संघर्ष बाकी उरला होता. ही वस्तुस्थिती चरित्राचे साहित्यमूल्य वाढवायला नक्कीच पोषक होती; पण तिचा पुरेपूर उपयोग करून घेण्यात मी काहीसा अयशस्वी ठरलो. मागच्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे वरदा नायडू म्हणजेच लीलाबाईंची मैत्रीण वरदा असे मी चुकून समजलो आणि वरदा नायडूविषयी लीलाबाईंच्या मनात काहीही किंतू राहिलेला नव्हता असा सदोष निष्कर्ष काढला! त्यामुळे माधवरावांनी वरदा नायडूच्या लग्नाची खटपट केली तेव्हा त्यांचा नि लीलाबाईंचा जो पत्रव्यवहार झाला त्याकडे माझे अक्षम्य दुर्लक्ष्य झाले! आश्चर्य असे, की या पत्रव्यवहारावर खानोलकरांनी अचूक बोट ठेवले होते (पृ० १८७-१८८). तरीही हे दुर्लक्ष झाले! या पत्रव्यवहारात लीलाबाईंनी माधवरावांना म्हटले होते, की "तू करीत असलेली गोष्ट स्तुत्य आहे....मलाही एका पोळलेल्या अंतःकरणाचे कल्याण झाले म्हणून अतिशय आनंद होईल. [पण] पुष्कळ वेळेस माझ्या मनात तुझ्याशी माझेच लग्न व्हावे ह्यात ईश्वरेच्छा काय आहे, यावद्दल गौडबंगाल वाटते. त्यापेक्षा तिच्याशी झाले असते तर अधिक चांगले झाले असते. माझे काय? 'असेल हरी तर देईल खाटल्यावरी' ह्या म्हणीप्रमाणे कल्याण झाले असते, किंवा नसतेही. पण कसेही झाले असते तरी तुझ्यासारख्याच्या—ज्याला माझी परिस्थिती आजपर्यंत ठाऊक नव्हती त्याच्या—अंतःकरणात सदोदित तळमळ लागून राहिली नसती..." येथे उदारपणाची भूमिका वठवण्याचा प्रयत्न लीलाबाईंनी केला होता, पण त्यांच्या मनात जी स्त्रीसुलभ असूया नि धुसफूस वावरत होती ती लपून राहू शकत नव्हती. लीलाबाईंना दिलेल्या उत्तरात माधवरावांनी म्हटले, की "...[लग्न] 'तिच्याशी झाले असते तर अधिक चांगले झाले असते...' असे तू का लिहावेस? मला तसे वाटत नाही, अजून वाटत नाही. तिला आरंभी समाधान वाटले असते ह्यात शंका नाही; परंतु हे समाधान फार दिवस टिकलेच नसते; आणि मग?—माझे तिच्यावर प्रेम असले, तरी तिला ते ज्या प्रकारचे असावे असे वाटले असते, तसे नसल्यामुळे तिला असमाधान वाटून त्याची तीव्रता हक्काच्या जाणिवेने उलट वाढली असती. माझ्या अंतःकरणाला लागून राहिलेली तळमळ तुला वाटते तशा प्रकारची नाही....मी खरोखरच इतर लोकांहून भावनांच्या बाबतीत वेगळा आहे." माधवरावांच्या या उत्तराची दखल वरदा-प्रकरणाच्या शोधात मी घेतली होती; पण मौज अशी, की वर उल्लेखिलेल्या कारणाने त्यांच्या वैवाहिक जीवनाच्या शोधात मात्र मी ती घेतली नाही. या उत्तरावरून हे स्पष्ट दिसत होते, की 'माझे वरदेवर प्रेम होते' असे लीलाबाईंना सांगण्याचा निर्भीड प्रामाणिकपणा माधवरावांत होता; आणि 'ते प्रेम वेगळे होते' असा खुलासा करून लीलाबाईंना धीर देण्याचे, विश्वासात घेण्याचे, सौजन्येही त्यांच्यापाशी होते. सारांश, या पत्रव्यवहारात दोघांच्या स्वभावातील काही दुर्मिळ जागा उघड होत होत्या आणि दोघांमधील एक अबोल, सूक्ष्म संघर्ष कल्पनेच्या डोळ्यांना दिसू शकत होता! मी जर दोन वरदांच्या घोटाळ्यात फसलो नसतो तर 'वैवाहिक जीवनाच्या शोधा'त या साऱ्याचा अंतर्भाव खचित केला असता. पण...पण संधी हुकली होती!

दिलजमाई झाल्यानंतर, आणि वरदा किंवा शांताबाई यांची अभ्रे थोडी विरल्यानंतर, १९२९ ते १९३७ या सातआठ वर्षांच्या काळात, माधवरावांचे नि लीलाबाईंचे भावसंबंध कसे होते? पूर्वलेखकांनी त्यासंबंधी विशेष माहिती दिलेली नव्हती; आणि कागदपत्रांवरून ती जाणून घेणे

मला भाग होते. या काळातील सुमारे सव्वाशे पत्रे—पतिपत्नींनी एकमेकाला लिहिलेली—अगदी खाजगी, अगदी ऐसपैस—मला उपलब्ध होती; पण एवढी पत्रे उपलब्ध असूनही ती माहिती जाणणे प्रथम वाटले तेवढे सोपे गेले नाही. या पत्रांत काही संदर्भ संदिग्ध किंवा अज्ञात होते; दैनंदिन व्यवहाराच्या गोष्टींत मर्मबंधातल्या गुप्त ठेवी मिसळून गेलेल्या होत्या; प्रासंगिक रागलोभ, क्षणभंगुर रुसवेफुगवे, खोल दुःख नि उत्कट आनंद, उपचाराचे बोलणे, एकच नव्हे तर अनेक स्थायी वृत्ती यांची अस्ताव्यस्त गर्दी उडालेली होती; आणि दाखविलेल्या भावना मुळात तशाच होत्या किंवा नाही, याविषयी कुठे कुठे शंका वाटत होती! शिवाय, दोघे दूर होती तेवढ्या काळातली पत्रे उपलब्ध होती; पण जवळ होती तेव्हाचा काळ कोरा होता! त्यामुळे फोलांतून सत्त्व निवडीत निवडीत, सत्त्वाचे पृथक्करण नि वर्गीकरण करीत करीत, भावसंबंधांचे खरे स्वरूप प्रयत्नपूर्वक जाणून घ्यावे लागले. उक्तीवरून किंवा कृतीवरून भाव जाणण्यासाठी मानसशास्त्रीय कल्पकतेचाही उपयोग करावा लागला. हा सारा प्रयत्न म्हणजे एक मानसिक क्रीडा होती; त्यामुळे तीमध्ये श्रम झाले तरी ते फार आनंददायक होते. त्या क्रीडेत जे फल मिळत गेले त्यामुळे तर 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते!' असेही होत गेले.

पत्रे बारकाईने वाचितल्यावर असे लक्षात आले, की या सातआठ वर्षांच्या दीर्घ कालाविषयी काही सर्वसामान्य निष्कर्ष काढणे कठीण आहे, धोक्याचेही आहे. दोघांमधील भावसंबंध बदलत होते; तेव्हा बदल ध्यानात घेऊन या कालाचे निदान दोन खंड पाडले पाहिजेत. पैकी पहिला खंड १९२९ च्या उत्तरार्धापासून १९३२ च्या प्रथमार्धापर्यंत, म्हणजे दिनू पाच महिन्यांचा होईपर्यंत पडत होता; आणि दुसरा खंड साधारणतः १९३६ च्या अखेरपर्यंत पडत होता. हे खंड पाडल्यावर त्या त्या खंडापुरते सर्वसामान्य निष्कर्ष काढणे पुष्कळ सुलभ झाले. पहिला खंड लहान असला तरी त्यामधील सुमारे शंभर पत्रे उपलब्ध होती आणि दुसरा खंड मोठा असला तरी त्यामधील सुमारे पंचवीस पत्रेच उपलब्ध होती. त्यामुळे पहिल्या खंडातील भावसंबंधांचे चित्र अधिक साधार नि अधिक तपशीलवार असे मला वाचता आले, आणि दुसऱ्या खंडातील चित्र त्या मानाने कल्पनेवर थोडा अधिक भरवसा ठेवून पाहावे लागले.

पहिल्या खंडातील चित्राला आकृती मिळून तीमध्ये रंगरेषांची भरणी झाली त्याचा मला आठवणारा विकासक्रम पुढीलप्रमाणे : (१) हिंगण्याला असताना लीलाबाईंनी माधवरावांना समजून घेण्याचा नि त्यांच्याशी सर्वार्थाने एकरूप होण्याचा प्रयत्न केलेला होता, हे मला ठाऊक होते. त्यामुळे या खंडातही त्यांचा तसलाच प्रयत्न सुरू होता, हे पत्रांवरून मला सहज दिसू शकले. त्यांनी मासिकातून काही गोष्टी लिहिल्या, काही लेख लिहिले, काही परीक्षा दिल्या, बेळगावला जाऊन महिनाभर शिक्षिकेची नोकरी केली, वगैरे गोष्टींत त्यांचा प्रयत्न प्रतिबिंबित होत होता. त्यांच्या प्रयत्नाला माधवरावांकडून कोणता प्रतिसाद मिळाला, हे जेव्हा मी वधू लागलो तेव्हा या खंडात लीलाबाईंना स्वतःच्या मनातील आदर्श मानसी बनवण्याचा आग्रह माधवरावांनी सोडून दिलेला होता, हे मला कळून चुकले.—आणि त्यांनी लीलाबाईंना लीलाबाई म्हणूनच स्वीकारलेले होते, असा तर्क करता आला. (२) आधीच्या दिलजमाईतील समाधान नि आनंद, प्रेम नि जिव्हाळा यांचा प्रत्ययही या खंडातील पत्रांतून वारंवार येत गेला. पण त्याबरोबर लीलाबाईंच्या पत्रांत कुठे असमाधान, कुठे तक्रार, कुठे दुःख, कुठे सहानुभूतीची याचना

यांचे सूर ऐकू आले आणि माधवरावांच्या पत्रांत कुठे हळहळ, कुठे पश्चात्ताप, कुठे कणव, कुठे आत्मसुधारणेचा संकल्प यांचे सूर कानावर पडले. त्यामुळे या खंडातील भावसंबंधांचे नेमके स्वरूप काय होते, याविषयी मला प्रथम संभ्रम पडला. पण नंतर तारतम्याने मी ठरवले, की हे संबंध वरवर थोडे अस्थिर नि अतृप्त वाटले तरी पृष्ठभागाखाली फार स्थिर नि तृप्त होते. लीलाबाईंना जे असमाधान कुठेतरी वाटे त्याची कारणे थोडीफार पूर्वीचीच होती. "तुझ्याशी जेव्हा तेव्हा लडिवाळपणाने खेळावेसे वाटते!" ही त्यांची मागणी होती; आणि वाङ्मयाच्या तपस्येत गढलेल्या माधवरावांकडून ती पुरी झाली तरी "जेव्हा तेव्हा" पुरी होत नव्हती. (३) पण लीलाबाईंनी काही जागी दुःखाचे तीव्र सूर का छेडावे? सहानुभूतीची ठसठशीत याचना का करावी? त्या त्या जागा जेव्हा मी तपासल्या, तेव्हा तर वास्तवातील दुःखापेक्षा हे सूर नि ही याचना मला जास्त मोठी दिसली!—आणि एकदम ध्यानात आले, की लीलाबाईंच्या मनात जे असमाधान रेंगाळत राही तेच त्यांना माधवरावांचे लक्ष स्वतःकडे ओढण्यास प्रवृत्त करी! मग आपल्या बारीकसारीक दुःखाला त्या नकळत मोठे स्वरूप देत नि माधवरावांची सहानुभूती जागी करीत. माधवराव सहानुभूतीने बरसले, की त्या बरसातीत चिंब झाल्यावर त्यांना धन्य वाटे! म्हणजे, या खंडातील सुखःदुखांत विरोध नव्हता, तर विरोधाभास होता. दुःख हेही सुखासमाधानाचे एक साधन होते! (४) पण सुखदुःखांचा हा अन्वयार्थ लीलाबाईंच्या बाजूने जमत असला तरी माधवरावांचे काय? वास्तवाहून वाढवून दाखवलेल्या दुःखाने ते चकले कसे? सहानुभूतीने बरसले कसे? त्यांच्या चकण्याचे मूळ मी साहजिकच त्यांच्या भाबडेपणाशी नेऊन भिडवले. कारण त्यांचा भाबडेपणा त्यांच्या बालपणापासून मी शोधलेला होता नि याच कालखंडात लीलाबाईंच्या दैनंदिनीबाबत आंधळ्यालाही दिसावा इतका तो स्पष्ट झाला होता. ही दैनंदिनी हिंगण्याला असताना लीलाबाईंनी लिहिली होती आणि आपली कथा नि व्यथा माधवरावांना कळवावी हाच त्यामागे उद्देश होता. "माधव! केव्हा जर तू ही वही पाहिलीस तर..." असा चक्क उल्लेख दैनंदिनीच्या प्रारंभी त्यांनी केला होता. पण १९३० च्या जूनमध्ये ही दैनंदिनी लीलाबाईंच्या अपरोक्ष माधवरावांनी बघितली आणि दुःखाने ते एवढे गहिवरले, की आपणालाच उद्देशून ती लिहिली आहे, हे त्यांच्या लक्षात आले नाही! 'स्ट्रिक्टली प्रायव्हेट' अशी दैनंदिनी वाचल्याबद्दल पत्रात लीलाबाईंजवळ त्यांनी दिलगिरी व्यक्त केली! या दैनंदिनीच्या प्रकरणामुळेच मला असेही वाटून गेले, की लीलाबाई माधवरावांच्या भाबडेपणाचा उपयोग समजून-उमजूनही करत असतील. कारण दैनंदिनी माधवरावांसाठी आपण लिहिली होती हे माहीत असूनही माधवरावांना त्यांनी लिहिले, "तुला माझी वही काढून वाचायला कोणी सांगितले होते? उगीचच वेड्यासारखे काहीतरी काढून वाचीत बसायचे का? ते मी माझ्याकरता लिहिले आहे. तू वाचून रडत बसायला नव्हे! राजा, तुझे अश्रू मोलाचे आहेत. त्यांना उगीच फुकट का घालवतोस?"!!

या कालाच्या दुसऱ्या खंडात, म्हणजे १९३२ ते ३६ या चार-साडेचार वर्षांत, दोघांचे भावसंबंध फार सुखाचे नि समाधानाचे होते, असेच चित्र मी रंगवले आहे. कारण कागदपत्रांवरून मला हे दिसत होते, की दोन मुलांच्या हसण्याबागडण्याने दोघांचा संसार भरला होता, माधवराव मुलांचे करतात म्हणून लीलाबाई संतुष्ट होत्या, "माझ्या चिमण्यांची आई" म्हणून माधवरावांना

लीलाबाई अधिक प्रिय झाल्या होत्या, एका अवघड बाळंतपणात माधवरावांनी लीलाबाईंची शुश्रूषा मनोभावे केली होती, त्यांच्यासाठी स्वतःवर संततिनियमनाची शस्त्रक्रियाही लगेच करून घेतली होती, दोघांचे बिऱ्हाड एकेका नव्या वस्तूने हळूहळू सजत होते, माधवराव केवळ आपले एकटीचेच आहेत असा विश्वास लीलाबाईंना आला होता, आणि स्वतःच्या नव्या घराच्या उभारणीत दोघे दंग दोती. या खंडात लीलाबाई पूर्वीसारख्या अल्पस्वल्प असंतुष्ट होत्या का? स्वतःचे दुःख मोठे करून माधवरावांची सहानुभूती मिळवीत होत्या का? भावड्या सहानुभूतीने माधवराव बरसत असत का? वगैरे प्रश्न माझ्या मनात डोकावत होते; पण त्या प्रश्नांना कागदपत्रांत फारसा आधार दिसत नव्हता. तेव्हा कागदपत्रांत जसे दिसले तसे सुखाचे नि समाधानाचे चित्र रंगवून मी बाजूला झालो. मनातले प्रश्न मनात ठेवून बाजूला झालो.

यानंतर १९३७ ते ३९ या पुढच्या नि शेवटच्या कालखंडाकडे मी वळलो. त्याचे वर्णन करताना प्रारंभी मी म्हटले आहे, की 'गट्टीतुट्टीचा खेळ माधवरावांच्या व लीलाबाईंच्या संसारात नेहमीच चाललेला असे.' हे म्हणून, दिनूच्या वहाणांवरून झालेल्या एका गट्टीतुट्टीचे साग्र-संगीत चित्र मी रंगविले आहे. (पृ० ४०२ ते ४०४). या गट्टीतुट्टीत लीलाबाईंनी माधवरावांना लिहिले होते, की "केव्हा केव्हा मला असे वाटते, की खरोखरच जवळ राहणे नको....तुम्ही माझ्या सतत जवळ राहण्याने त्रासता, पण मी जाणार तरी कोठे?...जरा शांत व्हायला शिकलात तर फार बरे होईल. कारण जरा जास्त खर्च झाला की अस्वस्थ होता, जरा बरेच दिवस एका ठिकाणी राहणे झाले की चिडता, मी जरा काही बोलले तर तितकेच लक्षात ठेवता....मी लग्न झाल्यापासून यत्किंचितही बदलले नाही." माधवरावांनी उत्तरी म्हटले होते, की "मी त्रासतो, चिडतो, हे खरे आहे आणि शांतपणा मला शिकायला हवा याविषयी मला शंका वाटत नाही. मी तो अंगी बाणविल्यावाचून राहणार नाही."...'जे मिळाले आहे तेवढ्यात संतुष्ट राहण्याचा तूही मनापासून प्रयत्न कर.' यानंतरच्या लीलाबाईंच्या पत्रात पुढील वाक्ये होती : "माझ्या प्रांजळ बुद्धीला आपण दोघेही चुकतो असे वाटते. मी चिडते हेही तितकेच खरे....तुम्हीही हल्ली थोडेसे बदलले आहात. आपण दोघांनी चांगले वागायला पाहिजे, नाही का?...तुम्ही समोर असला म्हणजे मी चिडते, परंतु दूर गेलात की मला हुरहूर लागते. तुम्हांला असे होत असेल का?" ही गट्टीतुट्टी अखेर दोघांच्या मनोमिलनात विरघळून गेली. पण फार जवळ राहिल्याने होणारी चिडचीड टळावी, म्हणून दोघांनी शक्य तेवढे दूर राहण्याचा निर्णय शांतपणाने घेतला. १९३८ च्या जूनपासून, मुलांचे शिक्षण चांगले व्हावे असे निमित्त शोधून, दोन बिऱ्हाडे थाटण्यात आली! एक कोल्हापूरला तर दुसरे पुण्याला!

दोघे दोन बिऱ्हाडांत दूर दूर होती, तेव्हा परस्परांची काळजी करीत होती, परस्परांवर प्रेम करीत होती, नि परस्परांच्या भेटीसाठी आतुरही होत होती. पण मुळात दोघे वेगळी का राहिली? फार जवळ राहिल्याने चिडचीड का उत्पन्न होई? दोघांच्या पत्रव्यवहारात प्रतिबिंबित झाली तेवढीच कारणे मी वाचकांपुढे ठेवली. पण त्यापलीकडे काहीच कारणे नसतील का?—आणि 'स्वभावभिन्नता' या कारणाच्या अंतरंगात काय काय लपलेले असेल? मी जरी पत्रव्यवहारात प्रतिबिंबित झालेली कारणेच वाचकांपुढे ठेवली, तरी त्या कारणांना ओलांडून कल्पनेने मी खूप दूर भटकून आलो होतो. भटकताना माझे लक्ष साधनसामग्रीवर होते; पण माझ्या पंखांत कल्पनेचा

जोमही भरपूर भरलेला होता. या भटकंतीत मला वाटले होते, की "मी लग्न झाल्यापासून यत्किंचितही बदलले नाही" असे लीलाबाई ठासून सांगत असल्या, तरी त्या पुष्कळ बदलल्या होत्या. लग्नानंतर लगतच्या काळात त्या भयग्रस्त होत्या. शांताबाई आपला संसार उधळतील असे भय त्यांना कदाचित वाटले नसेल, पण वरदा नावाचे कृष्णकमळ आपल्या महादेवाच्या मस्तकावर (किंवा मस्तकात) विराजमान होईल म्हणून त्या धास्तावलेल्या होत्या. माधवरावांच्या स्वभावाशी, वेताळाशी आपले जमत नाही, तेव्हा इतर नातेवाइकांप्रमाणे माधवराव आपल्यालाही सोडून देतील की काय, म्हणून त्यांचे मन भेदरलेले होते. या भयग्रस्ततेच्या दडपणाखाली त्या माधवरावांशी जमवून घेण्याचा सर्व बाजूंनी प्रयत्न करीत होत्या. पण पुढे काळ पालटला. माधवरावांच्या एकनिष्ठेची त्यांना खात्री पटली. दयेने पाझरून माधवराव त्यांच्यावर माया करू लागले. दोष दाखवला नि आत्मसुधारणेची तार छेडली की माधवराव बदलतात हे त्यांना कळून चुकले. अनेक प्रसंगी उपदेश करून माधवरावांना स्वमताप्रमाणे त्यांनी वळणावर आणले. तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यांच्या रूपामधली किंवा गुणांमधली उणीव माधवराव उगाळीत राहिले असते तर त्यांचा आत्मविश्वास असा वाढला नसता. पण माधवराव होते सुजन. त्यांनी त्यांच्या रूपाची जाणीव (एक अपवाद वगळता) त्यांना कधी दिली नाही; आणि त्यांच्या गुणदारिद्र्यावरही कधी बोट ठेवले नाही. ध्येयात्मक उंच भराऱ्या सोडून ते त्यांच्याच पातळीवर उतरले आणि संसाराला लागले.

"तुज वादविवादे नच माझी दृष्टि ये
अन् श्रद्धा आता विदुषीस न ती प्रिये;
तू अबला, तुजवर भार कसा लादु मी?
आश्रिता लता तू असुख तुला कासया?
द्यावीच तिलांजलि मग स्वतत्त्वास या"

हे पत्नीला उद्देशून व्यक्त झालेले त्यांचे मनोगत फार बोलके आहे. ('...वर्षे' पृ० ४४). पण 'स्वतत्त्व' सोडणाऱ्या त्यांच्या सौजन्यामुळे लीलाबाईंवर दडपण राहिले नाही; आणि त्या 'स्वत्व' प्रस्थापित करू लागल्या. माधवरावांच्या भाषेत त्यांचा "मागरेपणा" वाढला. त्यांना संसारातील गरजेच्या वस्तू जशा हव्या होत्या तशा चैनीच्या वस्तूही हव्या होत्या. माधवरावांकडे स्वतःसाठी वेगळ्या चांदीच्या गाळण्याचा त्यांनी हट्ट धरला होता! शिवाय माधवरावांनी आपले खूप लाड करावे, सारखी आपल्याभोवती रुंजी घालावी, आपल्याला कुशीत घेऊन झोपावे, अशीही त्यांची मागणी होती! हा मागरेपणा विशिष्ट मर्यादेपलीकडे पुरवणे माधवरावांना शक्य नव्हते. एकीकडे त्यांची प्रीती वेताची होती, दुसरीकडे प्रणयाची तहान माफक होती, आणि तिसरीकडे वाङ्मय-साधनेपुढे त्यांना कशाला फुरसत नव्हती! अशा स्थितीत उभयपक्षी असंतोष साचत जावा, चिडचीड व्हावी, नि वेगळे राहावेसे वाटावे, हे अपरिहार्य होते.

मला आणखी अशीही सूक्ष्म शंका येई, की लीलाबाईंसारख्या सावळ्या, गुटगुटीत, ठेंगण्या, नि बाळबोध चेहऱ्याच्या पुरंध्रीचे विभ्रम माधवरावांसारख्या रूप-रसिक कवीला ओबडधोबड वाटत असतील. पण त्या विभ्रमांना तोंड देण्याचा प्रसंग त्यांना नको एवढा येत असेल. पत्रांतून

लीलाबाई कधी म्हणायच्या, "माधव, चहा फार वेळ प्यायचा नाही. नाहीतर माझ्या हातचा मार खावा लागेल!" कधी सांगायच्या, "खुळा कुठला! असे डोळ्यांतून पाणी काढले तर मी तुझ्या गोड ओठांना चावीन हं!" असली लाडीक लगट प्रत्यक्षात झाली, की माधवराव मोहरण्याऐवजी संकोचत असतील, विटतही असतील.—आणि त्यांनी दूर ढकलल्यावर लीलाबाईंचा मनोभंग होऊन दुरावा वाढत असेल.

वेगळे होण्याची ही कारणमीमांसा मला मधूनच स्वीकार्य वाटे. पण नंतर ध्यानात येई की ती थोडीफार कल्पनारंजित आहे. तिला कुठे कुठे वास्तव सत्याचा आधार होता, हे खरे; पण प्रत्येक अंगात नि उपांगात ती साधार नव्हती. त्यामुळे ती अवास्तव असण्याचाही संभव होता. यदाकदाचित ती अवास्तव असली, तर माधवराव नि लीलाबाई यांच्या वैवाहिक जीवनाची हाताळणी मी धृष्टपणाने केली असे होणार होते. त्यात त्या जीवनाचा अपमान होता.—आणि मुख्य म्हणजे, चरित्राला कल्पनेबरोबर इतके भटकू देण्यास मी तयार नव्हतो. जेथे साधनसामग्रीतील स्पष्ट वास्तव अंधुक होता होता दिसेनासे होते आणि कल्पनेचेच उंच, विरळ अंतराळ भोवती उरते तेथे चरित्र हे चरित्र राहू शकत नाही. तेव्हा साधनसामग्रीत दोघांच्या गट्टीतुट्टीची जेवढी कारणे ठामपणे दिसली तेवढीच चरित्रात मी मांडली नि तिथे थांबलो. माझ्या कल्पनेत जी कारणमीमांसा तयार झाली तिचा प्रथमार्ध त्यातल्या त्यात ठाम वास्तवाच्या जवळ असल्यामुळे तो मी नुसता सूचित करून ठेवला, आणि द्वितीयार्ध तसा नसल्यामुळे गाळूनच टाकला.

अखेरच्या काळात माधवराव आजारी होते नि सगळ्या घरावर मृत्यूची उदास छाया पसरली होती. तेव्हा दुराव्याची नि चिडचिडीची कारणे कुठच्या कुठे विरून गेली. दोघांच्या मनात जी गाढ आपुलकी नि अपार जिव्हाळा दोघांच्या नकळत वर्षानुवर्ष साचत आला होता तो उमाळून बाहेर पडला. त्याचा जो प्रत्यय मला लीलाबाईंच्या पुस्तकावरून आला होता तोच प्रत्यय वाचकांना देण्याचा मी प्रयत्न केला.—आणि त्या ठिकाणी वैवाहिक जीवनाचा शोध संपवला. लीलाबाईंच्या दैनंदिनीत माधवरावांच्या मृत्यूनंतर केलेली एक नोंद मला आढळली होती. तीमध्ये लीलाबाईंनी म्हटले होते : "माधव, तुझा उपदेश मी अंतःकरणावर कोरून ठेवला आहे. त्याप्रमाणे मी वागेन....तुझ्या कीर्तीला काळिमा लागणार नाही अशाच रीतीने झटेन. तुझ्यामागे माझे हेच कर्तव्य आहे. आपण काही कारणाने भांडलो असू; परंतु आपले दिवसही पुष्कळ सुखात गेले. त्याची विस्मृती मला कशी होईल? तुझी मूर्ती माझ्या डोळ्यापुढून हलत नाही.... ह्यापुढे तुझी तरळती मूर्ती मला हा लंगडा संसाराचा गाडा हाकायला सामर्थ्य देईल. आणि काय लिहू? लिहवत नाही." या नोंदीमधील लीलाबाईंची भावना शेवटच्या दोघांच्या भावसंबंधातून वाचकांपर्यंत पोचावी, अशी माझी इच्छा होती.

चरित्राचे शब्दांकन

माधवरावांच्या जीवनाचा शोध मी सर्व अंगांनी करू पाहत होतो. आतापर्यंत त्यांपैकी काही अंगांचा शोध सांगून झाला. पण तेवढ्याच अंगांचा नि तेवढाच शोध मी केला असे समजणे योग्य होणार नाही. त्यापेक्षा माझ्या शोधाचे क्षेत्र पुष्कळच व्यापक होते. उदाहरणार्थ, माधवरावांच्या विचारांचा नि अध्ययनाचा विकास कसकसा झाला ते मी बघत होतो. ते फार्सी-मराठी कोशाच्या रचनेपर्यंत कसे पोचले, त्यांचे पद्यशास्त्रीय संशोधन कोणत्या क्रमाने वाढत गेले, त्यांची भाषाशुद्धीसंबंधी भूमिका का नि कशी बदलली, वगैरे गोष्टी मी हुडकीत होतो. एवढेच नव्हे, तर बी० ए०च्या किंवा एम० ए०च्या वेळी त्यांनी अध्ययनविषयांची धरसोड कशी केली, त्यांच्या राजकीय नि सामाजिक विचारांवर कोणते तरंग उमटले, लो० टिळक किंवा म० गांधी यांसारख्या समकालीन थोर व्यक्तींविषयी वेळोवेळी त्यांची मते काय होती, इत्यादी गोष्टीही मी कुतूहलाने पाहत होतो. त्यांच्या काव्यनिर्मितीचे टप्प्याटप्प्याने पालटणारे स्वरूप हा तर माझ्या अभ्यासाचा महत्त्वाचा विषय होता. त्यात त्यांची प्रतिभा, त्यांच्या भावभावना, त्यांची जीवनदृष्टी यांची प्रतिबिंबे मी न्याहाळीत होतो. मागील चार प्रकरणांत शोधाच्या ज्या क्षेत्रांचे वर्णन मी केले त्या क्षेत्रांना आनुषंगिक अशी क्षेत्रेही मी अवलोकनासाठी निवडली होती. उदाहरणार्थ, वरदा-प्रकरणात मी एकीकडे माधवराव-वरदा यांच्या स्नेहाचे स्वरूप शोधीत होतो, आणि दुसरीकडे डे० ए० सोसायटीमधील अधिकारपदस्थ प्रतिपक्षाशी माधवरावांचा जो संग्राम झाला त्याचे रंग-ढंगही हुडकीत होतो. त्याचप्रमाणे वैवाहिक जीवनाच्या शोधात पतीपत्नींमधील भावसंबंधावर जसे माझे लक्ष खिळलेले होते तसेच ते माधवरावांना मुलांविषयी जे अपार वात्सल्य होते त्यावरही केंद्रित झालेले होते. मात्र शोध सर्वांगीण व्हावा असा माझा प्रयत्न असला तरी त्या शोधाची संपूर्ण हकीगत आतापर्यंत मी दिलेली नाही. कारण जेवढी हकीगत दिलेली आहे तेवढीवरूनच शोधाची एकंदर कल्पना करणे वाचकांना शक्य होईल. चरित्रदृष्ट्या, माधवरावांच्या सार्वजनिक जीवनापेक्षा त्यांचे खाजगी जीवन महत्त्वाचे होते आणि त्यांच्या बाह्य धडपडीपेक्षा त्यांचे आंतरिक विचार-विकार अर्थपूर्ण होते. तेव्हा या अधिक महत्त्वाच्या, अधिक अर्थपूर्ण गोष्टींचा शोध मुख्यतः स्पष्ट व्हावा अशा धोरणाने ही हकीगत मी निवडली आहे.

शोध करता करता, जेव्हा असण्या-घडण्याच्या माहितीने माधवरावांचे जीवन तुडुंब भरल्या-सारखे मला वाटले, आणि माधवराव साकार नि सजीव होऊन माझ्या मनःचक्षूंसमोर साक्षात वावरू लागले, तेव्हा चरित्रलेखनासाठी मी लेखणीला हात घातला. चरित्रलेखनाला प्रारंभ करण्यापूर्वी चरित्रातील वृत्तांत कोणत्या क्रमाने सांगायचा त्यासंबंधी काही धोरण चरित्रकाराला मनाशी ठरवावे लागते; आणि तसे धोरण मी मनाशी ठरवलेले होते. वृत्तांत-क्रम मुख्यतः

विषयानुसारी असू शकतो किंवा मुख्यतः कालानुसारी असू शकतो, हे माझ्या ध्यानात आलेले होते. पैकी विषयानुसारी क्रमाऐवजी कालानुसारी क्रम आपण स्वीकारायचा, असा माझा निर्णय झालेला होता. विषयानुसारी क्रमात चरित्रनायकाच्या जीवनाचे विषयानुसार उभे छेद चरित्रकार घेतो, आणि एकेक विषय निवेदनात पुरा करीत जातो. त्या त्या विषयाचे निवेदन मग जन्म-मृत्यूच्या मध्यंतरात आवश्यकतेप्रमाणे कितीही पसरू शकते आणि त्या निवेदनाच्या पोटातील घटनाप्रसंग कालानुसार सांगितले जाऊ शकतात. या पद्धतीने माधवरावांच्या चरित्राची आखणी मला करायची असती तर गृहस्थिती, शिक्षण, काव्यनिर्मिती, अध्यापन, प्रेमप्रकरणे, भाषाशुद्धी, पत्रशास्त्रीय संशोधन, मित्रमंडळी यांसारखे विषय घेऊन एकेका विषयाची पूर्तता अथपासून इतीपर्यंत करणे मला भाग पडले असते. या पद्धतीचा मुख्य लाभ असा, की विषयसूत्र तुटत नाही आणि तो तो विषय वाचकांसमोर पूर्ण नि सलग उलगडला जातो. पण ही पद्धती मला स्वीकारावीशी वाटली नव्हती. कारण इतिहासाचे किंवा वास्तवाचे हुबेहूब प्रतिबिंब वटवण्यात किंवा चित्र रेखाटण्यात ती फार दुबळी ठरते. प्रत्यक्ष जीवन आपल्यापुढे एकेका अंगाने, विषयशः कधीच येत नाही. एक विषय पुरा करून मग दुसरा हातात घ्यावा, अशी शालेय वेळापत्रकासारखी कामाची पद्धत जीवन कधीच स्वीकारीत नाही. जीवनात अनेक विषय एकाच वेळी सुरू असतात, ते एकमेकांवर परिणाम करतात नि एकमेकाच्या पुढेमागे उत्पन्न होऊन ते एकमेकाच्या पुढेमागे विलय पावतात. जीवनात विषयांची ही जी गुंतागुंत असते, जी एक-कालिकता असते तीतच जीवनातले नाट्य सामावलेले असते, तीतच व्यक्तित्वाचा खरा आविष्कार होत असतो. पण विषयानुसारी पद्धतीमुळे जीवनाचा हा स्वभावच दुर्लक्षिला जातो. ही पद्धती एकेका विषयाचा पाठपुरावा करणारी, विषयशः विश्लेषण करून विश्लेषणाशी थांबणारी, नि म्हणून शोध-निबंधाला जवळची वाटते. पण जेथे जीवनाचे संश्लिष्ट 'दर्शन' घडवायचे असते, जीवनाची एकत्रित 'प्रचीती' आणून द्यायची असते अशा कलात्मक इतिहासात—म्हणजे चरित्रात—ती उपयोगाची नाही. निदान चरित्राकडे मी कलात्मक इतिहास म्हणून बघत असल्यामुळे मला ती उपयोगी वाटली नाही. ही पद्धती न स्वीकारण्याचे माझे दुसरे कारण असे होते, की तीमध्ये मुख्य विषय धरून प्रकरणे पाडावी लागतात आणि जे विषय गौण किंवा लहान असतील त्यांना जागा देणे अवघड जाते. असले विषय—म्हणजे छोट्या घटना, जीवनसरणीमधली एखादी लकब, व्यक्तित्वाचे काही चुकार आविष्कार—हे कितीही अर्थपूर्ण असले तरी, केवळ पद्धतीत बसत नाहीत, कोणत्याच प्रकरणात जमत नाहीत, म्हणून गाळावे लागतात. तेव्हा मोठ्या विषयांप्रमाणे लहान नि गौण विषयांतूनही चरित्र उभे करावे, आणि संपूर्ण चरित्र उभे करावे, अशी माझी कल्पना असल्यामुळे ही पद्धती मला अनुकूल नव्हती. माधवरावांचे चरित्र लिहिण्या-पूर्वी, डॉ० केतकरांचे चरित्र लिहिताना, प्रारंभकाळात, या पद्धतीचा प्रयोग मी करून बघितला होता आणि तिचे गुणदोष तेव्हाच मला कळून चुकले होते.

वृत्तान्त कालानुसार सांगण्याची पद्धती मी स्वीकारली; पण त्या पद्धतीच्या मर्यादा मला ठाऊक होत्या. काटेतोलपणे कालानुसार वृत्तान्त सांगणे, ही गोष्ट अशक्यप्राय नव्हे, तर अशक्यच असते. प्रत्यक्ष जीवनात एका वेळी अनेक घटना घडू शकतात, पण कागदावर लिहिताना त्या एकापुढे एक अशाच लिहाव्या लागतात. त्यामुळे ही पद्धती कितीही कालानुसारी म्हटली तरी खरोखर

कालानुसारी असत नाही. म्हणूनच 'मुख्यतः कालानुसारी' असा तिचा निर्देश मी केला आहे. एककालिक वृत्तान्त एकाच वेळी सांगण्याची इच्छा आणि तो एकापुढे एक लागोपाठ सांगावा लागणे ही अपरिहार्यता या दोन्हींतून या पद्धतीला मार्ग काढावा लागतो. मग एकाच वेळी घडलेल्या गोष्टी चरित्रकार एकीनंतर दुसरी अशा क्रमाने सांगतो आणि त्या शक्य तेवढ्या जवळ जवळ आणून किंवा एक सांगताना दुसरीचा निर्देश करून त्यांच्या एककालिकत्वाचा प्रत्यय देतो. पण सुसूत्रपणे एखादा विषय उलगडावा, विषयचित्र डोळ्यासमोर सलगपणे उभे राहावे, अशीही वाचकांची अपेक्षा असते आणि ती अपेक्षा पुरी करावी अशी चरित्रकाराची ऊर्मी असते. त्यामुळे या पद्धतीला आणखी मर्यादा पडतात. एकेका विषयाकडेच लक्ष दिले तर चरित्राचे उभे छेद कसे पडतात, जीवनदर्शनालाच चरित्र अंशतः कसे हरवून बसते, नि काही संकीर्ण विषय कसे गाळावे लागतात, ते आताच आपण बघितले. याउलट, विषयाकडे लक्ष दिले नाही तर चरित्र म्हणजे नुसती रोजनिशी किंवा कालवार लावलेल्या गोष्टींची जंत्री होऊन बसते. वृत्तान्त कालानुसार सांगायचा म्हणजे त्या त्या वर्षातल्या गोष्टी त्या त्या वर्षात, त्या त्या महिन्यातल्या गोष्टी त्या त्या महिन्यात, एवढेच नव्हे तर त्या त्या दिवसातल्या गोष्टी त्या त्या दिवसात सांगितल्या पाहिजेत. मग एकेका वेळी आठआठ, दहादहा निरनिराळ्या गोष्टी घडत असतात, नि त्या एकत्र सांगण्याचा प्रसंग येतो. ज्या गोष्टी अल्पकालिक नसतात आणि दीर्घकाळ घडत राहतात त्याही दिवसागणिक, महिन्यागणिक वगैरे तोडाव्या लागतात. मिळून ज्या काही संकीर्ण गोष्टी पुढे येतात त्या गोष्टींतून कोणतेही एक सुसंबद्ध चित्र निर्माण झालेले नसल्याने वाचकांसमोर दर वेळी विस्कळीत वस्तूंची एक अस्ताव्यस्त पोतडी जणू खोलली जाते! मराठीतील काही बड्या चरित्रकारांच्या लेखनातही (बहुधा चरित्राच्या उत्तरार्धात) असा प्रकार झालेला दृष्टीस पडतो. तेव्हा विषयाच्या चिंध्या होऊ नयेत म्हणून कालानुसारी पद्धतीची सांगड विषयानुसारी पद्धतीशी घालणे आवश्यकच असते. कालाचे सोयिस्कर खंड पाडून नि त्या खंडांच्या क्रमानुसार लेखन करून एकीकडे कालानुसारित्व साधायचे, आणि त्या त्या काल्खंडाच्या पोटात विषयानुसार लेखन करून दुसरीकडे विषयानुसारित्वही साधायचे, अशी सांगड घालण्याची सर्वसामान्य रीत असते. माधवरावांच्या चरित्रात 'मुख्यतः' कालानुसारी पद्धतीने वृत्तांत सांगायचा, म्हणजेच अशी सांगड घालायची, असे मी ठरवले होते.

कालाचे सोयिस्कर खंड पाडणे ही गोष्ट वरवर दिसते तेवढी सोपी नसते. एखाद्या चरित्रात ती सहज, विनासायास होऊन जाते; पण एखाद्यात ती साध्य करता करता नाकी नऊ येतात. माझ्या दृष्टीने खंड पाडणे म्हणजे एक यांत्रिक क्रिया नव्हती, तर कलात्मक निर्मिती होती; निदान कौशल्याचे काम होते. व्यक्तिजीवन प्रवाही असल्यामुळे त्यातील भूतकाळ वर्तमानकाळात नि दोन्ही भविष्यकाळात अनेक प्रकारांनी मिसळत असतात. साहजिकच, जन्ममृत्यूच्या दोन टोकांत व्यक्तिजीवन जरी स्वयंपूर्ण नि एकात्म असले, भासले, तरी त्याचे खंड नेहमीच तसे असत नाहीत, किंवा भासत नाहीत. मागे, चवथ्या प्रकरणात (पृ० ६२-६३ वर) म्हटल्याप्रमाणे, मला स्वयंपूर्णता नि एकात्मता हा कोणत्याही कलाकृतीचा एक अपरिहार्य गुणधर्म वाटतो. सबंध कलाकृती तर स्वयंपूर्ण नि एकात्म असावीच; पण तिचे कलाकाराने पाडलेले खंडही आपापल्या परीने (आपापल्या सापेक्ष ठिकाणी) स्वयंपूर्ण नि एकात्म असावेत, अशी माझी अपेक्षा असते.

या अपेक्षेला अनुसरून चरित्रातील कालखंडांची रचना मी करू पाहत होतो. मला वाटे, की विशिष्ट कालखंडात जे पाचदहा विषय स्वाभाविकपणे आले असतील ते त्याच कालखंडात पूर्णपणे समाविष्ट असावेत; म्हणजे त्यांचा उदय, उत्कर्ष, नि विलय तिथेच व्हावा. निदान, त्या कालखंडाने त्या विषयांचा जेवढा भाग व्यापलेला असेल तेवढा भाग म्हणजे त्या विषयांचा एक स्वाभाविक अंश असावा, उसाच्या कांडाप्रमाणे निसर्गानेच तो वेगळा केलेला असावा. या सर्व विषयांच्या एकत्रित उपस्थितीने जो संकलित परिणाम होईल तोही स्वतंत्र वाटावा. त्यातून जीवनाची एक अवस्था आपण पाहिली, एक पूर्ण चित्र आपणाला दिसले, असा अनुभव वाचकांना यावा. थोडक्यात, माझ्या दृष्टीने कालखंड म्हणजे कलात्मक खंड होते. ते पाडताना मला थोडे प्रयास पडावे, यात नवल नाही.

चरित्रातील काही कालखंड नि त्यांवर आधारलेली प्रकरणे आपोआप आकारत गेली. अमळनेरच्या वास्तव्यावर आधारलेले 'विजनवास (१९२४ ते १९२६)' हे असेच एक प्रकरण होय. त्या प्रकरणातील अमळनेरची नोकरी, जळगाव-अमळनेरच्या मंडळींशी जडलेला संबंध, 'विरहतरंगा'चे नि 'सुधारका'चे लेखन वगैरे विषय त्या प्रकरणाच्या कालखंडातच आमूलाग्र घडले, असे म्हणता येईल. वरदेच्या स्नेहभावनेला मिळालेली कलाटणी, नि तिच्या विवाहसूचनेला माधवरावांनी दिलेला नकार हा आधीच्या वरदा-प्रकरणाचा उत्तरार्ध आहे; पण तो अर्धही आपल्या परीने पुरा आहे! तीच गोष्ट डे० ए० सोसायटीत घडलेल्या पानपताची, माधवरावांच्या राजिनाम्याची किंवा रविकिरण-मंडळात त्यांच्यावर झालेल्या निकराच्या टीकेची. प्रकरणातील सारे विषय किंवा त्यांचे भाग असे हवे तेवढे स्वयंपूर्ण तर आहेतच; पण ते सर्व विषय नि विषयभाग मिळून माधवरावांच्या जीवनाची एक अवस्थाही पूर्ण झाली आहे. अमळनेरला गेलेल्या माधवरावांपेक्षा तेथून परतलेले माधवराव वेगळे होते, असे त्यामुळेच जाणवते. अपवादच हुडकायचे झाले, तर फार्शी-मराठी कोशाचे काम जसे या कालखंडात तसेच आधीच्या कालखंडात चालू होते असे दाखवून देता येईल आणि तो विषय या प्रकरणात पूर्णांशाने वसत नाही, असे म्हणता येईल. पण बाकी सर्वत्र, हा कालखंड जणू नियतीनेच कलात्मक रीतीने कोरून वेगळा काढलेला आहे.

'विजनवास' या प्रकरणाप्रमाणे आणखीही काही प्रकरणे नियतीने कोरून काढलेली, आयती माझ्या हातात पडली. पण बाकीच्या प्रकरणांच्या बाबतीत, कालखंड ठरवताना, मला बरेच डोके खाजवावे लागले. आठ प्रकरणे लिहून जेव्हा १९२४ अखेरचा वृत्तान्त मी हातावेगळा केला तेव्हा तर प्रकरणरचनेसंबंधी माझ्या विचारांना मोठा हेलकावा बसला होता. मला वाटले होते, की एकेका प्रकरणात एकेक कालखंड क्रमाने घ्यावा नि त्या कालखंडाच्या पोटातील वृत्तान्त मग विषयानुसार सांगावा, ही आपली योजना पुरेशी यशस्वी होत नाही! त्या वेळी, ३१-५-१९७३ या दिवशी, मी स्वतःसाठीच 'प्रकरणरचने'वर एक टिपण लिहिले होते. त्या टिपणाचा सारांश असा, की 'विषयांची एककालिकता (सायमल्टेनिटी) लेखनात उभी राहावी आणि विषयांची एकरूपता(युनिटी)देखील ढळू नये, म्हणून आपण ही योजना स्वीकारली, पण 'प्रकरणां'ची युनिटी आपण साधू शकतो का? या योजनेमुळे काही प्रकरणे म्हणजे विविध विषय भरलेली पोती होणार की काय? तिसरे, सातवे, नि आठवे प्रकरण तसे झाल्याची शंका येते. मे १९२१

ते मे १९२३ या कालखंडावरील सातवे प्रकरण तर नक्कीच पोतेवजा झाले आहे. जर सायमल्टेनिटी साधताना 'प्रकरणां'ची युनिटी साधत नसेल तर काय करावे? एक मार्ग असा दिसतो, की कालखंडांवर प्रकरणे आधारण्याची योजना सोडून द्यावी; आणि छोट्या-छोट्या विषयांवर छोटी-छोटी कांडे लिहावीत. विषयदृष्ट्या एकरूप असणारी ही कांडे कालक्रमानुसार एकापुढे एक मांडावीत. यामुळे आधी युनिटी साधेल नि मग कालक्रम अथवा सायमल्टेनिटी देखील वह्यंशी सूचित होईल.' मला सुचलेला हा मार्ग 'विषयानुसारी' प्रकरणांपेक्षा वेगळा होता, हे स्पष्ट व्हावे. कारण कांडांचे विषय फार लहान असणार होते, सर्व जीवनाचे ते उभे छेद नव्हते, आणि कांडे एकापुढे एक कालक्रमाने लावणे (त्यांतील विषयांच्या लहानपणामुळेच) अधिक सुलभ होते. या मार्गाने मी कांडरचनेचा विचार सुरू केला; पण त्यातही काही गंभीर अडचणी दिसू लागल्या. विचारासाठी मी जून १९१८ ते मे १९२४, म्हणजे माधवराव पुण्याला डे० ए० सोसायटीत आले तेव्हापासून ते अमळनेरला रजेवर गेले तेव्हापर्यंतचा काळ निवडला आणि त्याची कांडरचना करू लागलो. त्या काळातील विषय नि त्यांच्या कालमर्यादा मी कागदावर मांडल्या तेव्हा त्या पुढीलप्रमाणे दिसू लागल्या :



यांपैकी एकेका विषयावर मी सलग लिहू शकलो असतो आणि एकरूप कांडे तयार झाली असती. पण ती कांडे कालक्रमाशी जुळती करणे वाटले तेवढे सोपे नव्हते. 'विषयानुसारी' प्रकरणांपेक्षा ही कांडे कालक्रमाशी नक्कीच अधिक जुळती करता आली असती; पण 'कालखंडानुसारी' प्रकरणांपेक्षा त्यांची जुळणी कालक्रमाशी अधिक सुसंगत झाली असती का, याची जबर शंका होती. एककालिक विषय एकाच वेळी सांगता येत नाहीत, ते लागोपाठ सांगावे लागतात, ही मूलभूत अडचण तर कांडरचनेत दूर होत नव्हतीच; पण विषय लागोपाठ सांगण्यातही अडचणी येत होत्या. ट, ड, यांसारख्या विषयांत, ट आधी सुरू झाला म्हणून आधी सांगायचा, ड नंतर सांगायचा असे करता आले असते; पण क, ख, ज यांसारख्या विषयांचे काय? कच्चा पोटात ज येत होता आणि त्या दोहोंच्या पोटात ख उभा होता. त्यामुळे त्यांचा क्रम कसाही ठेवला तरी कालक्रमाशी तो विसंगतच झाला असता. अर्थात्, क फोडून त्याच्या दोन साधारणतः स्वयंपूर्ण भागांत ख किंवा ज, किंवा दोन्ही बसवायचे, किंवा क, ज, ख, असा काहीतरी क्रम पतकरून एका विषयाचा दुसऱ्या विषयाशी असलेला कालसंबंध मधूनमधून स्पष्ट करायचा, वगैरे तडजोडी पतकराव्या लागल्या असत्या. या तडजोडींमुळे कालक्रम शबल होत गेला असता, आणि जो काही कालक्रम उरला असता तो 'कालखंडानुसारी' प्रकरणांपेक्षा अधिक परिणामकारक झाला असता काय, हा प्रश्नच होता. कालखंडानुसारी प्रकरणांना कालखंडदर्शक मथळे देता येत होते आणि त्या मथळ्यांमुळे प्रकरणांतील सर्व मजकूर त्या कालखंडाशी सहज बांधून ठेवता येत होता; पण तशी सोय कांडरचनेत हाताशी नव्हती. शिवाय, कांडरचना सर्व चरित्रभर करता आलीच असती असे नाही. मी पहिल्या नि दुसऱ्या प्रकरणांकडे दृष्टी टाकली तेव्हा असे दिसले, की ती प्रकरणे 'बाल्य', 'शालेय जीवन' अशा जीवनावस्थांवर केंद्रित झालेली होती आणि अशा जीवनावस्थांचे वर्णन चरित्रात अपरिहार्य होते. पण कांडशः ते वर्णन करणे अवघड होते. कारण एवढ्या बारीक-बारीक स्फुट विषयांच्या संयोगातून या अवस्था उभ्या राहत होत्या की त्या विषयांत कांडाचे रूप घेण्याइतकाही जीव नव्हता. ते विषय एकत्र आणावे तर त्यातून कांडाऐवजी प्रकरणच तयार होत होते. शेवटी, कालखंडांवर आधारलेली प्रकरणे पुरेशी एकरूप होत नाहीत, म्हणून मी कांडरचनेकडे वळलो होतो. पण कांडरचनेतून तरी पुरेशी एकरूपता साधणार होती का? एकेका प्रकरणापेक्षा एकेक कांड नक्कीच एकरूप उतरले असते. पण एकूण चरित्राचे काय? कालखंडात्मक रचनेत त्या त्या प्रकरणातील विषय किंवा विषयांश आपल्या परीने एकरूप होते, ते ते प्रकरणही विशिष्ट जीवनावस्था दर्शवून बऱ्याच प्रमाणात एकरूप होऊ शकत होते, आणि प्रकरणांतून आकारणारे चरित्र तर आशयदृष्ट्या मुळात एकरूप होते नि ते तसे जाणवावे असाही प्रयत्न होता. पण कांडरचनेत एकरूप कांडांच्या नंतर एकदम सर्व चरित्राचा मोठा विस्तारच वाचकांपुढे मांडणे भाग होते. एकरूपतेचा मधला टप्पा तेथे उपलब्ध नव्हता. तेव्हा कांडरचनेत एकरूपतेचा परिणाम वाढण्याऐवजी उणावण्याचाच संभव होता! म्हणून, कांडांची कल्पना सोडून मी पुन्हा कालखंडात्मक प्रकरणांकडे वळलो!

या वेळी माझ्या डोक्यात सिंहावलोकनांचा प्रश्नही घोळत होता. चरित्रात निरनिराळ्या जागी निरनिराळ्या प्रकारांनी जर सिंहावलोकनांना चातुर्याने वाव दिला तर चरित्र सुबद्ध नि एकरूप होण्यास मदत होते. पण कांडात्मक रचनेत सिंहावलोकनांना तितक्याशा सुलभपणे वाव देता

आला नसता. जेव्हा कालखंडावर प्रकरण आधारले जाते तेव्हा त्या कालखंडाच्या पोटातील विषयांचे त्या कालखंडापुरते सिंहावलोकन त्या विषयांच्या अखेरीस (किंवा अधेमधे) जरूर तर करता येतेच, शिवाय त्या सर्व कालखंडात व्यक्त झालेल्या जीवनावस्थेचे सिंहावलोकनही त्या कालखंडाच्या अखेरीस करता येते. पण कांडात्मक रचनेत जीवनावस्थांचे सिंहावलोकन तरी अवघड होऊन बसले असते. कारण अमुक इतकी कांडे अमुक जीवनावस्थेची द्योतक, असा प्रकार तेथे राहिला नसता; आणि कोणत्या कांडानंतर सिंहावलोकन करायचे ते सहजगत्या दर्शवले गेले नसते. तेव्हा मी कांडात्मक रचनेची कल्पना सोडून दिली त्याला सिंहावलोकनांचा प्रश्न हेही एक निमित्त झाले.

लिहून झालेल्या प्रकरणांपैकी तिसरे, सातवे, नि आठवे ही प्रकरणे मला खटकत होती. त्यांचा जेव्हा मी पुनर्विचार केला तेव्हा तिसरे नि आठवे ही प्रकरणे मुळातील कालमर्यादा कायम ठेवूनही केवळ विषय पुढेमागे करून नि वेगळ्या प्रकाराने जुळवून सुबद्ध करता येतील, असे मला आढळले. तेव्हा ती मी तशी करून घेतली. मग प्रश्न फक्त सातव्या प्रकरणाचा राहिला. त्या प्रकरणाचा मात्र कालखंडच बदलणे मला भाग पडले. सहावे प्रकरण मी एप्रिल १९२१ अखेर तोडले होते आणि मे १९२१ ते मे १९२३ या कालखंडावर सातवे प्रकरण आधारले होते. पण या कालविभागणीमुळे सहाव्या प्रकरणातील काही विषयांची शेपटे सातव्या प्रकरणात लोंबत राहिली होती. उदाहरणार्थ, शाहूराव कानिटकरांना कर्जाऊ दिलेल्या नि बुडालेल्या पैशांचा विषय १९२० च्या जुलै-ऑगस्टमध्ये सुरू होऊन १९२२ च्या जूनमध्ये कसाबसा संपत होता; आणि वरदा-प्रकरणापूर्वी डे० ए० सोसायटीत गाजलेल्या भानगडी १९२०–२१ साली चालू होऊन १९२२–२३ साली तात्पुरत्या संपुष्टात येत होत्या. पुन्हा सहाव्या प्रकरणातून सातव्या प्रकरणात ओसंडलेले हे विषय आणि मुख्यतः सातव्या प्रकरणातच बहरलेले काही विषय यांचे सात्म्य होत नव्हते. सातव्या प्रकरणाच्या काळात माधवरावांच्या विद्वत्वाला नि कवित्वाला मोठा बहर आला. त्यांच्या भोवती रविकिरणमंडळाचाही उदय झाला. या वाङ्मयसंबद्ध विषयांचे घरगुती अडचणी, डे० ए० सोसायटीतील भानगडी वगैरे व्यावहारिक विषयांशी कसे जमावे ? सातव्या प्रकरणात व्यावहारिक विषय आणखीही वाढत होते. मिळून त्या प्रकरणाची एकरूप भट्टी साधत नव्हती. शिवायः त्यात सहाव्या प्रकरणामधले काही विषय ओसंडल्यामुळे सहावे प्रकरणही किंचित बिघडल्यासारखे वाटत होते. जून १९१८ हा सहाव्या प्रकरणाचा प्रारंभकाळ; म्हणून जून १९१८ पासून थेट मे १९२३ पर्यंत—म्हणजे सातव्या प्रकरणाच्या अखेरीपर्यंत—सगळा काळ मी पुन्हा पुन्हा न्याहाळला; आणि १९२१ च्या एप्रिल-मेऐवजी कालविभाजक रेषा दुसऱ्या कोठे सोयीने ओढत, येते का ते बघितले. पण ज्या कालखंडांतील विषय किंवा विषयविभाग आपल्या परीने पूर्ण आहेत आणि ज्या कालखंडांमुळे जीवनाची एकेक अवस्था नीट चित्रित झाली आहे असे दोन कालखंड दर्शविणारी रेषा मला दुसऱ्या कोठे ओढता येईना. जून १९१८ पासून मे १९२३ अखेर एकच कालखंड करण्याचा पर्याय माझ्यासमोर होता; पण त्या कालखंडांतील विषय नि त्यांचा आशय बघता, तो कालखंड संकीर्ण किंवा संमिश्र होईल, असे मला वाटले. शिवाय तो मुख्यता फार मोठा होईल, इतर कालखंडांत आकाराने विशोभित दिसेल, वाचकांच्या दृष्टीत कदाचित सहज मावणार नाही, अशी मला शंका आली. अखेर कालखंड एकच करायचा, पण त्याचा

उभा छेद घेऊन उभ्या दोन भागांना दोन प्रकरणे द्यायची, असा निर्णय मी घेतला. या काल-खंडात एकीकडे माधवरावांचे व्यावहारिक जीवन टक्केटोणपे खात पुढे जात होते आणि दुसरीकडे वाङ्मयीन जीवन अंगोपांगांनी फुलून गच्च बहरले होते; दोन्हींची विशेष गुंतागुंत झालेली नव्हती;—म्हणून असा उभा छेद घेऊन उभी प्रकरणे पाडणे शक्य झाले. 'विकट वहिवाट (१९१८ ते १९२३)' आणि 'वाङ्मयविहार (१९१८ ते १९२३)' ही ती प्रकरणे होत. कालक्रम नि विषयसूत्र या दोन विरोधी तत्त्वांचा संपूर्ण समन्वय साधणे कधीच शक्य नसते. पण दोन समकालिक (उभ्या) प्रकरणांच्या योजनेमुळे तो समन्वय पूर्वीपेक्षा मी अधिक चांगल्या रीतीने साधू शकलो, अशी माझी समजूत आहे.

१९२८ साली लग्न झाल्यापासून १९३९ साली निधन होईपर्यंत, अकरा वर्षे, माधवराव कोल्हापुरात राहत होते; आणि त्या काळात त्यांच्या जीवनामध्ये सहज जाणवण्याजोगे कोणतेही मोठे स्थित्यंतर झालेले नव्हते. त्यामुळे तेथेही स्वयंपूर्ण कालखंड कसे पाडावे नि सुटसुटीत सुबद्ध प्रकरणे कशी तयार करावी, असा माझ्यापुढे प्रश्न होता. पण त्या अकरा वर्षांत परस्परांहून सूक्ष्मपणे वेगळ्या अशा तीन जीवनावस्था विचाराअंती मला दिसू शकल्या आणि त्यांवर आधार-लेली तीन कालबद्ध प्रकरणे मी पाडू शकलो. माझ्या पुस्तकावरून त्या जीवनावस्थांची नि प्रकरणांची कल्पना येऊ शकेल. मात्र त्यांपैकी 'हा! हन्त हन्त! (१९३७ ते १९३९)' हे शेवटचे प्रकरण पाडताना 'स्वयंपूर्ण कालखंड' किंवा 'स्व-तंत्र जीवनावस्था' यासारख्या विचाराच्या जोडीला आणखी एक विचार माझ्या मनात प्रबळ होता. तो असा, की माधवरावांचे जीवन चढत चढत उत्कर्षाच्या शिखराला जाऊन पोचले नि तेथून अकालमृत्यूच्या वज्राघातामुळे धाडकन दरीत कोसळले, असा परिणाम नुसत्या निवेदनातूनच नव्हे तर प्रकरणाच्या रचनेतूनही वाचकांच्या मनावर व्हावा. तेव्हा वेगळी जीवनावस्था १९३७ साली सुरू होते म्हणून तर ते प्रकरण १९३७ साली मी सुरू केलेच, पण त्यात जीवनाचा परमोत्कर्ष नि दुःखान्त ही दोन्ही एकत्र यावी म्हणूनही तेथे सुरू केले. त्यामुळे त्यात माधवरावांचे डी० लिट्०मधील सर्वोच्च यश, त्यांचा अपार आनंद वगैरे गोष्टींचे वर्णन मी करू शकलो नि लगेच त्यांच्या आकस्मिक मृत्यूची दुःखद, सुन्न करणारी वार्ताही सांगू शकलो. या योजनेमुळे इष्ट परिणाम साध्य झाला असावा.

मुख्यतः कालानुसार जीवनवृत्त सांगितल्यामुळे एक महत्त्वाची गोष्ट अहेतुकपणे साध्य झाली, हे सर्व ग्रंथ लिहून संपवल्यावर माझ्या लक्षात आले. मागे, चौथ्या प्रकरणात, मी म्हटले आहे की व्यक्तित्वाची निरनिराळी अंगे टप्प्याटप्प्याने पुनःपुन्हा पुढे यावी नि दर वेळी ती नव्या परिस्थितीत पुढे यावी, आणि त्यामुळे चरित्रात एक संमिश्र, समृद्ध लय घुमत राहावी, अशी माझी इच्छा होती (पृ० ६१–६२). जीवनवृत्त कालानुसार सांगितल्यामुळे माझी ती इच्छा आपोआप फलद्रूप झाली. जीवनवृत्त मी जर विषयानुसार सांगितले असते तर विषयानुसार पाडलेल्या कोणत्याही एका प्रकरणात माधवरावांच्या व्यक्तित्वाची ठरीव अंगेच सातत्याने जाणवत राहिली असती आणि पुरेशा अंतराने होणाऱ्या त्यांच्या आवर्तनातून जी लय निर्माण व्हायची ती निर्माण झाली नसती. मुळात जर लयच निर्माण झाली नसती तर ती संमिश्र नि समृद्ध होण्याचा प्रश्नच उरला नसता. पण मी जीवनवृत्त कालखंडानुसार नि कालखंडांच्या पोटात विषया-नुसार सांगितले. त्यामुळे एका प्रकरणात एका विषयाच्या अनुषंगाने व्यक्तित्वाची काही अंगे पुढे

यावी आणि मध्यंतरी इतर विषयांचे अंतर पडून पुढच्या प्रकरणात त्याच विषयाच्या किंवा तत्सम विषयाच्या अनुषंगाने पुन्हा ती अंगे पुढे यावी, असे घडत गेले. शिवाय एका प्रकरणात निरनिराळे विषय असल्याने निरनिराळी अंगे पुढे यावी नि पुढच्या प्रकरणात त्या निरनिराळ्या अंगांचे आवर्तन व्हावे, असाही प्रकार होत गेला. त्यामुळे लय साधली नि ती एकेरी न राहता संमिश्र नि समृद्धही झाली!

जीवनातील असण्या-घडण्याचे चित्र किती तपशिलाने उभे करायचे, हा लेखनाच्या वेळी सोडवावा लागणारा एक महत्त्वाचा प्रश्न असतो. या प्रश्नाचे उत्तर ठरवताना चरित्रकाराला उपलब्ध सामग्रीचा विचार करावा लागतो. साधनसामग्री जर विपुल असेल आणि ती जर जीवनाच्या सर्व अंगांवर सम प्रमाणात पसरलेली असेल तर भरपूर तपशील देत देत त्यातून असण्या-घडण्याचे संपूर्ण नि घन चित्र उभे करता येते. पण साधनसामग्री जर बेताची असेल नि ती बेताच्याच प्रमाणात का होईना पण सर्व जीवनभर सारखी पसरलेली असेल तर चरित्रकाराला चरित्रलेखनाची वेगळी शैली स्वीकारावी लागते. अशा वेळी थोड्या पण वेचक तपशिलाचे फटकारे तो लेखणीने मारीत जातो आणि भित्तिचित्राप्रमाणे त्या फटकाऱ्यांतून एक जाडेभरडे पण पूर्णतेचा भास उत्पन्न करणारे चित्र रंगवू शकतो. जेव्हा साधनसामग्री विपुल असली तरी जीवनाच्या निरनिराळ्या भागांवर विषम प्रमाणात पसरलेली असते तेव्हा त्याला चित्राचा पोत सर्वत्र सारखा राखण्यासाठी पूर्ण, भरीव चित्र नि फटकाऱ्यांचे चित्र यांच्या मधला मार्ग स्वीकारावा लागतो. तेव्हा तो बहुधा विपुल साधनसामग्रीच्या भागात आपल्या चित्रासाठी बेताने तपशील निवडतो नि विरळ साधनसामग्रीच्या भागात सढळ हाताने निवड करतो आणि पोत सारखा राखण्याचा प्रश्न सोडवतो. जेव्हा साधनसामग्री मुळात बेताची असते आणि तीही विषम असते, तेव्हा चरित्रकारापुढचा प्रश्न सर्वात अवघड असतो. अशा वेळी एक तर तो चरित्र (म्हणजे कलात्मक चरित्र) लिहिण्याच्या फंदात पडत नाही; किंवा चरित्राऐवजी व्यक्तिचित्र, प्रसंगचित्र, तशा प्रसंगचित्रांची तुटक मालिका, यासारखी वेगळी निर्मिती करतो. अशा वेळी कलात्मक चरित्र लिहिताच येणार नाही, असे मी म्हणणार नाही; पण माझे म्हणणे एवढेच, की ते कसे लिहावे याचा उलगडा मला झालेला नाही. माधवरावांच्या चरित्राला हात घालण्यापूर्वीच साधनसामग्री नि चरित्राची मांडणी यांच्या परस्परसंबंधाविषयीचे हे विचार माझ्या मनात वागत होते. म्हणूनच साधनसामग्री किती नि कशी उपलब्ध आहे याचा अंदाज मी प्रथम घेतला आणि मग लेखनाला प्रारंभ केला. मला मिळालेली सामग्री भरपूर होती आणि ती जीवनाच्या सर्व अंगांवर सम प्रमाणात पसरलेली होती. तेव्हा भरपूर तपशील देत देत, असण्या-घडण्याचे संपूर्ण नि घन चित्र उभे करायचे, असे मी साहजिकच ठरवले.

पण भरपूर साधनसामग्री होती एवढ्या एकाच कारणासाठी मी भरपूर तपशील दिला, असे म्हणता येणार नाही. माधवरावांच्या जीवनाचे स्वरूपच असे होते की भरपूर तपशील दिल्याशिवाय ते नीट चित्रित होण्यासारखे नव्हते. जेव्हा व्यक्तीच्या भावना असामान्य असतात किंवा चढउतारांनी भरलेल्या असतात, किंवा एकमेकींत गुंतलेल्या असतात, तेव्हा ती व्यक्ती भावनांचा बारीकसारीक तपशील दिसल्याशिवाय वाचकांच्या मनापुढे स्पष्ट उभी राहत नाही नि हलतीबोलती होत नाही. सामान्य भावना नामनिर्देशानेही वाचकांना समजतात आणि चारदोन वैशिष्ट्यपूर्ण

आविष्कारांनीही वाचकांपर्यंत जाऊन पोचतात. पण असामान्य भावनेला मुळात बहुधा नाव नसते, आणि नाव असले किंवा नसले तरी ती नुसत्या नामनिर्देशाने चांगली कळत नाही, आणि तिचे अनेक आविष्कार तपशीलवार सांगितल्याशिवाय मनाला ती भिडत नाही. जेव्हा एखादी भावना एकाच पातळीवर दीर्घकाळ राहते तेव्हा ती कितीही असामान्य असली तरी एकदा समजली, एकदा मनाला भिडली, की तिचे पुढचे आविष्कार फार तपशिलात न शिरता दाखवले तरी प्रत्ययकारी होऊ शकतात. पण जेव्हा त्या भावनेत चढउतार होतात, तिला वेडीवाकडी वळणे मिळतात, तेव्हा ते चढउतार नि वळणे काही तपशिलानेच पुन्हा दाखवावी लागतात. याही पुढे जाऊन जेव्हा सामान्य किंवा असामान्य भावना एकमेकींत गुंततात तेव्हा तर तो गुंता तपशिलाशिवाय परिणामकारक रीतीने दाखवताच येत नाही.—आणि माधवरावांच्या जीवना नेमक्यात अशाच भावनांचा खूप खेळ होता. त्यांच्या जीवनातील शांताबाई, वरदा, लीलाबाई, त्र्यंबकराव, उमाबाई, नाना रानडे, माडखोलकर वगैरे नुसती नावे आठवली तरी ते जीवन असामान्य भावनांनी, भावनांच्या हेलकाव्यांनी, नि भावनांच्या गुंतागुंतीने कसे भरलेले होते ते दिसू शकते. तेव्हा ते जीवनच जणू मला म्हणत होते, की 'बाबा रे, मला न्याय द्यायचा असेल तर माझे तपशीलवार चित्रण कर!'

तपशीलवार चित्रणाचा मार्ग मी स्वीकारला त्याला आणखीही एक कारण होते. ते हे, की माधवरावांच्या जीवनावर गैरसमजांची अनेक जाळी नि जळमटे माजलेली होती आणि ती झटकून टाकल्याशिवाय त्यांची शुद्ध प्रतिमा मला उभी करता येत नव्हती. माधवरावांचे आचरण नीतिदृष्ट्या शुद्ध नव्हते, त्यांनी विवाहाला नकार देऊन वरदा-प्रकरणात आपली जबाबदारी टाळली, शांताबाईंशी ते आधी प्रियकराच्या नात्याने नि मागून मुलाच्या नात्याने वागले, ते ओव्हरसेक्स्ड (अतिकाम) होते, आईवडील नि कुटुंब यांची पर्वा त्यांनी केली नाही, डे० ए० सोसायटीमधील आपली कर्तव्ये त्यांनी दुर्लक्षिली, कोणाशी मैत्री टिकवणे त्यांना जमले नाही, उत्तरकालात त्यांची काव्यनिर्माणशक्ती थंडावली, वगैरे तऱ्हेचे हे गैरसमज होते. पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करून नि पुरावे देऊन हे गैरसमज मला जागोजाग दूर करता आले असते; पण ती रीत ललित चरित्राचा जो स्वभाव मला अभिप्रेत होता त्याच्याशी जुळली नसती. माझ्या मते, ललित चरित्रकाराने साधनसामग्री जमवायची असते, पुरावा बघायचा असतो, युक्तिवादपूर्वक सत्यासत्याचा निर्णय करायचा असतो, आणि जे निखळ सत्य सामोरे येईल त्याचा मनाने अनुभवही घ्यायचा असतो. पण ही सारी प्रक्रिया त्याने स्वतःजवळ ठेवायची असते. चरित्रात त्याने या प्रक्रियेच्या पुढे जाऊन, जे सत्य स्वतः अनुभवले असेल ते वाचकांसमोर फक्त मांडायचे असते आणि ते अशा रीतीने मांडायचे असते की त्यांनाही ते अनुभवता यावे. पण मधूनमधून मी जर आधार देऊन नि युक्तिवाद करून गैरसमज घालवीत बसलो असतो तर चरित्राचे हे स्वरूपच बिघडले असते. चरित्राची शैली तर विषमतेने विद्रूप झालीच असती, पण सत्याची समक्ष गाठ पडल्याने त्याच्या अनुभवाची जी तंद्री वाचकांना लागायची तीही भंगली असती. तेव्हा तपशीलवार चित्रण करून तिथेच थांबण्याचा मार्ग मला श्रेयस्कर वाटला. अशा चित्रणाने वाचकांसमोर सत्य मांडून त्याचा अनुभव त्यांना देता येणार होता आणि गैरसमजांचेही सहजपणे निराकरण होणार होते. गैरसमज मुख्यतः अपुऱ्या माहितीवर किंवा माहितीच्या सदोष जुळणीवर अवलंबून असतात. पण अशा चित्रणात भरपूर माहिती पुढे येणार होती नि तिची निर्दोष जुळणीही बघायला मिळणार होती.

त्यामुळे गैरसमजांचा पायाच उखडला जाऊन, गैरसमज दूर करण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न न करताही ते आपोआप दूर होणार होते.

यापूर्वी चवथ्या प्रकरणात, पृष्ठ ६४ पासून पृष्ठ ७५ पर्यंत, मी चरित्रातील निवडीविषयी लिहिले आहे आणि निवड कशी अपरिहार्य नि आवश्यक असते, तीमधून कलेचा कसा परिपोष होतो, त्यासंबंधी विवेचन केले आहे. येथे तपशीलवार चित्रणासंबंधी मी जे प्रतिपादन करीत आहे ते सकृद्दर्शनी निवडीसंबंधीच्या त्या विवेचनाशी विसंगत वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुतः निवड नि तपशीलवार चित्रण यांत विसंगती नाही. जीवनातील सत्त्वांशाचे नि पृथगात्मतेचे दर्शन घडावे नि ते दर्शन एकजीव स्वरूपात घडावे म्हणून निवडीच्या वेळी काही असणे-घडणे स्वीकारले जाते नि काही धिक्कारले जाते. ही निवड अर्थातच स्थूल असते. ही निवड होऊन गेली की मग जे असणे-घडणे स्वीकारले असेल त्याच्या चित्रणाचा प्रश्न उपस्थित होतो आणि तेथे तपशीलवार चित्रणाला प्रारंभ करता येतो. तेव्हा एका प्रक्रियेनंतर दुसरी येत असल्यामुळे नि दोहींच्या पातळ्या भिन्न असल्यामुळे त्यांत संघर्ष होण्याचे कारण नसते.

तपशील देत देत जर चरित्र उभे करायचे असेल तर त्या पद्धतीची म्हणून काही पथ्ये असतात, हे लेखनाला प्रारंभ करताना मला जाणवलेले होते. माझ्या मनात माधवरावांच्या जीवनाची जी अंतिम प्रतिमा उमटलेली होती ती वाचकांच्या मनावर उमटवायची हे तपशील देण्याचे प्रयोजन होते. तेव्हा त्या प्रतिमेशी सुसंगत नि तिला पोषक असाच तपशील चरित्रात यायला हवा होता. इतिहासाच्या किंवा सत्यदर्शनाच्या अघळपघळ नावाखाली भारूडभरती तपशील चरित्रात शिरण्याचा जो धोका असतो तो टाळायला हवा होता. शिवाय, तपशिलाच्या पद्धतीचा मुख्य उद्देश सत्य वाचकांसमोरच साकार व्हावे, सजीव व्हावे, नि वावरू लागावे हा असतो. तेव्हा तो उद्देश साध्य होण्याला आवश्यक तेवढाच तपशील द्यायचा, अधिक द्यायचा नाही, याकडेही मला लक्ष पुरवायला हवे होते. म्हणजे तपशीलवार चित्रणाच्या या पातळीवरही वेगळ्या रीतीची निवड करण्याचे पथ्य सांभाळणे आवश्यक होते.

दुसरे असे, की चरित्रकाराने नुसता तपशील मांडून चरित्र उभे करण्याची केवढीही प्रतिज्ञा केली तरी त्या तपशिलाला स्वतःचे भाष्य त्याला जोडावेच लागते. हे भाष्य कधी निष्कर्षस्वरूप वाक्यांत, कधी प्रतिपादनात, कधी वर्णनात, कधी एखाद्या विशेषणात, तर कधी निवेदनाच्या ढंगात नि रोखात असू शकते. पण ते अपरिहार्य असते नि आवश्यकही असते. चरित्रकाराच्या वृत्तीत किंवा दृष्टीत त्याचा जन्म असल्यामुळे ते अपरिहार्य ठरते; आणि समोरच्या तपशिलातून चरित्रकाराच्या मनातील नेमक्या प्रतिमेकडे ते वाचकांना घेऊन जाते म्हणून आवश्यकही ठरते. पण तपशिलातून चरित्र उभे करण्याचा मार्ग मुख्यतः स्वीकारलेला असल्यामुळे हे भाष्य गौणत्वानेच यायला पाहिजे होते, हे उघड आहे. तेव्हा भाष्याचे प्रमाण कमीत कमी ठेवायचे, आणि एकदा नाटक सुरू झाल्यावर ज्याप्रमाणे नाटककार रंगभूमीवर येऊन त्यात लुडबूड करीत नाही त्याप्रमाणे आपणही शक्यतो लुडबूड करायची नाही, हे पथ्य मला ओघाने स्वीकारावे लागले.

तपशील नि भाष्य यांच्यासंबंधी जी पथ्ये मी स्वीकारली ती पाळण्यात मी कितपत यशस्वी झालो, ते चरित्रावरून दिसू शकेल. पण येथे काही अनुभव नि काही अपयश ही नोंदवली पाहिजेत. मूळ भूमिकेप्रमाणे तपशील कमी देण्यातही चूक होती आणि जास्त देण्यातही चूक

होती. पैकी जास्त तपशील देण्याची चूक माझ्या हातून झालेली मला अनेकदा जाणवली आणि ती मी दुरुस्त करून घेतली. उदाहरणार्थ, विठ्ठलराव घाट्यांनी 'दिवस असे होते' या आत्मचरित्रात आपले नि माधवरावांचे कविवर्य चंद्रशेखरांशी जे संबंध होते त्याचे अतिशय प्रत्ययकारी चित्र रेखाटलेले आहे. मला ते चित्र म्हणजे माधवरावांच्या चरित्रातून निखळलेला एक तुकडा आहे असे प्रथम वाटले आणि ते जवळजवळ सर्वच्या सर्व मी माझ्या लेखनात, माझ्या भाषेमध्ये उतरवून काढले. पण नंतर माझ्या असे लक्षात आले, की हे सर्व चित्र माधवरावांच्या चरित्रात बसत नाही. तेव्हा केवळ चंद्रशेखरांच्या जीवनदर्शनात जो भाग शोभेल, केवळ घाट्यांच्या आत्मकथनात जो भाग खपेल, पण ज्याचा संबंध दुरूनच माधवरावांशी पोचेल, असा त्या चित्रातील सगळा भाग मी निग्रहाने बाजूला टाकला; आणि तेवढी पाने पुन्हा लिहून काढली. पुनर्लेखनाच्या वेळी चंद्रशेखरांसंबंधी माधवरावांचा एक लेख नि एक पत्र यांचाही उपयोग मी विशेष रीतीने केला आणि पुनर्लिखित मजकुराला माधवरावांच्या दृष्टीची डूब दिली. (पृ० ३३ ते ३६). माधवरावांच्या चरित्रात पुण्यातील वडिलोपार्जित घराच्या विक्रीचे जे प्रकरण घडले ते मला अनेक दृष्टींनी महत्त्वाचे वाटत होते. त्यात माधवरावांच्या नातेवाइकांचा तऱ्हेवाईकपणा, माधवरावांची कुटुंबाविषयी कर्तव्यभावना, त्यांचा व्यावहारिक साक्षेप, त्यांचा उद्योगीपणा, त्यांचे तरल क्षोभसुलभ मन, नि त्यांचे दुर्दैव वगैरे गोष्टी जशा एकत्रित नि तीव्रतेने उमटल्या होत्या तशा अन्यत्र क्वचितच उमटल्या असतील. शिवाय ते प्रकरण पूर्वीच्या चरित्रकारांनी जवळजवळ पूर्णपणे दुर्लक्षिले होते. तेव्हा भरपूर तपशील देऊन मी ते साग्रसंगीत उभे केले. पण मीच जेव्हा ते वाचले तेव्हा ते प्रमाणाबाहेर लांबल्याचे मला जाणवले आणि मी ते सर्वच्या सर्व बाद केले. या प्रकरणाला संक्षेप देऊन ते इतर मजकुराशी जुळवून घेता यावे म्हणून, मुद्रणासाठी तयार केलेल्या प्रतीतून सुमारे साठ अर्धे ताव मी बाहेर काढले आणि त्याऐवजी नवे सुमारे पन्नास अर्धे ताव लिहिले. (पृ० १०८ ते १४५). माझ्या पुस्तकाची दुरुस्त मुद्रणप्रत वाचून आपली बारीकसारीक निरीक्षणे विजयाबाई राजाध्यक्षांनी मला कळवली होती. त्यांत त्यांचे एक निरीक्षण अशा प्रकारचे होते, की 'संबंध कविता किंवा त्यांचे दीर्घ उतारे जिथे दिले आहेत तिथे विधाने स्पष्ट करण्यापुरताच त्यांतील भाग देता आल्यास पाहावे.' तेव्हा कवितांच्या मोठाल्या अवतरणांच्या अटरा जागा मी बारकाईने तपासल्या आणि पाच जागांवरची अवतरणे संक्षिप्त केली. (पृ० ९०-९१, १२९, २१८, ३५४, ३६४).

येथवर जास्त तपशील देण्याच्या चुका मी कशा केल्या नि कशा सुधारल्या त्याची तीन उदाहरणे दिली. पण अशा सर्वच चुका मी सुधारू शकलो असे नाही. प्रकाशित पुस्तकात राहून गेलेली जास्त तपशिलाची निदान एक चूक तरी अद्यापि माझ्या मनात ठुसठुसत आहे. १९३० साली नागपूरला नीडहॅम पार्कजवळ माधवरावांचा माडखोलकरांशी जो वाद झाला तो पत्रव्यवहाराच्या निबिडातून माझ्या हाताला लागला होता आणि मला फार अर्थपूर्ण वाटला होता. विशेषतः, स्वतःच्या चुकीने स्वतः कोंडीत सापडल्यास स्वतःला आत्मदंड करून घेण्याची (स्वतःच्याच मुस्कटीत मारून घेण्याची) माधवरावांना जी खोड होती ती मला लक्षणीय वाटली होती. तेव्हा तो वाद जसा घडला तसा, त्यातील युक्तिवादांसह, मी चरित्रात समाविष्ट केला. (पृ० ३४२ ते ३४५). पण आता असे वाटत आहे की त्यातील युक्तिवाद आपण उगाच एवढ्या

तपशिलाने दिले. कोण, कोणास, काय म्हणाले नि कोणत्या संदर्भात म्हणाले, हे वाचकांना चटकन उलगडणार नाही आणि उलगडले तरी त्यामुळे त्यांच्या पदरात फारसे काही पडणार नाही. तेव्हा त्या युक्तिवादांना जवळजवळ फाटाच द्यायला हवा होता.

जास्त तपशील देण्याच्या चुका जशा झाल्या, तशाच कमी तपशील देण्याच्या चुकाही कदाचित झाल्या असतील. आणि भाष्यही कुठे कमी तर कुठे जास्त झाले असण्याची शक्यता आहे. पण कमी तपशिलाच्या किंवा कमी वा जास्त भाष्याच्या चुका अद्यापि तरी माझ्या ध्यानात आलेल्या नाहीत. विजयाबाई राजाध्यक्षांनी मला सुचविले होते, की "समारोपादाखल एखादे प्रकरण घातले तर अनेक धागे एकत्र येऊन चरित्रपट अधिक रेखीव वाटेल." "त्याचप्रमाणे माधव जूलियन यांच्या कवितेचा विचार कालानुक्रमाने केला आहे तसा एखाद्या प्रकरणात एकत्रितपणे केला तर या पुस्तकाचे मोल वाढेल." विजयाबाईंचे असेही म्हणणे होते, की तांबे नि चंद्रशेखर यांच्याव्यतिरिक्त समकालीन साहित्यसृष्टीत जे काही घडत होते त्याचा अधिक मागोवा मी घ्यायला हवा होता, "कारण माधवरावांचा काळ हा अखेर त्यांच्या समकालीनांच्या, [आणि] त्यांच्याशी असलेल्या माधवरावांच्या संबंधांच्या आकलनाखेरीज संपूर्णपणे उभा राहणे अवघड आहे. कवी यशवंतांचा उल्लेख फारसा कोठे नसावा याचे आश्चर्य वाटते." पण तपशील नि भाष्य या दोन्हींशी संबंधित असणाऱ्या विजयाबाईंच्या या सूचना किंवा अशाच प्रकारच्या इतरांच्या सूचना मला पटू शकत नाहीत. या सूचना मी मानल्या तर साहित्यसमीक्षेच्या नि प्राध्यापकीय कामाच्या दृष्टीने पुस्तकाची उपयुक्तता वाढेल हे खरे; पण पुस्तकाला चरित्र म्हणून, एक कलाकृती म्हणून, जी काही एकरूपता आहे ती नष्ट होऊ लागेल. माधवराव मूलतः नि मुख्यतः एक उत्कट, क्षोभसुलभ, बुद्धिमान, नि प्रतिभाशाली माणूस होते. हा मनुष्य जे स्वतःचे, स्व-तंत्र, भावजीवन जगला त्याचा ठसा शेवटी चरित्रात वाचकांच्या मनावर उमटणे आवश्यक होते. मागे प्रकरण ४ मध्ये पृ० ६९ वर म्हटल्याप्रमाणे, शेवटच्या आजारात ज्या व्यक्ती माधवरावांना भेटून गेल्या त्या व्यक्तींच्या रूपाने हे भावजीवन आपोआप जागे झाले होते आणि त्याचे सिंहावलोकन घडले होते. नियतीनेच चरित्राचा असा कलात्मक समारोप केल्यावर मी पुन्हा तो शब्दांच्या ओबडधोबड माध्यमातून करू बघणे म्हणजे कलेचा अवमान होता. तेव्हा विजयाबाई म्हणतात तसा समारोप मी केला नाही. माधवरावांच्या कार्याचा मी एकत्रित आढावा घ्यावा अशी जर विजयाबाईंची कल्पना असेल तर तीही मला मान्य नाही. एक तर कार्यकर्ता म्हणून, विद्येच्या किंवा साहित्याच्या क्षेत्रातला कार्यकर्ता म्हणून, किंवहुना कवी म्हणून, जे माधवराव होते त्यापेक्षा आताच सांगितलेले माणूस म्हणून असलेले माधवराव हे खरे माधवराव होते. तेव्हा त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन नि कार्यावर वाचकांची दृष्टी खिळवून मला त्यांच्या चरित्राचा तोल ढळवायचा नव्हता. दुसरे असे, की मृत्यूपूर्वी नजिकच्या काळात माधवरावांना डी० लिट्० ची जी सर्वोच्च पदवी मोठा गाजावाजा होऊन मिळाली तीमुळे त्यांच्या विद्वत्तेचा पुरेसा ठसा वाचकांवर उमटलेला होता; आणि त्यांचे सारे काव्यकर्तृत्व त्यांनीच शेवटी-शेवटी संग्रहीत केलेल्या काव्यग्रंथांवर जे अभिप्राय प्रसिद्ध झाले त्यांमधून नि त्या अभिप्रायांची जी मांडणी नि हाताळणी मी केली आहे त्यावरून वाचकांच्या मनावर बिंबलेले होते. त्यामुळे पुन्हा त्याचाच आढावा घेऊन पिष्टपेषण करण्यात अर्थ नव्हता. विजयाबाईंचे बाकीचे म्हणणे

असे दिसते, की मी माधवरावांच्या काव्याचे साकल्याने मूल्यमापन करायला हवे होते आणि त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या समकालीन साहित्यसृष्टीचा अधिक शोध घेऊन ती सृष्टी संपूर्णपणे उभी करायला पाहिजे होती. पण मी ते सारे केले असते तर माझ्या पुस्तकाचे चरित्रपण हरवले असते आणि ते चरित्र न राहता त्याचा समीक्षा-ग्रंथ किंवा वाङ्मयेतिहास झाला असता. म्हणून मी तसे काही केले नाही. कविवर्य यशवंतांचा उल्लेख फारसा कोठे नाही याचेही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. खुद्द यशवंतांशी गाठभेट झाल्यावर, नि भरपूर संशोधन केल्यावर, माधवरावांच्या जीवनात यशवंतांचे सापेक्ष स्थान नगण्य होते, हे माझ्या ध्यानात आलेले होते. तेव्हा यशवंत हे थोर समकालीन कवी असले नि रविकिरणमंडळाचे महत्त्वाचे सदस्य असले तरी माधवरावांच्या चरित्रात त्यांचा उल्लेख "फारसा" कोठे करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

चरित्राचा आशय मी जर निवडून घेतला आणि त्याची मांडणी करताना तपशील उगाच वाढू न देण्याविषयी मी जर दक्ष राहिलो, तर चरित्राला योग्य आकार आपोआप यायला हवा, अशी माझी अपेक्षा होती. पण चरित्र लिहून झाल्यावर, नि त्यात लेखनोत्तर काही काटछाट केल्यावरदेखील, त्याचा आकार साधला आहे अशी दाद मला माझ्याकडूनच मिळाली नाही! 'अतिस्नेहः पापशङ्की' असा प्रकार होत असेल, म्हणून मी चरित्र प्रकाशित होऊ दिले. पण अद्यापीही तशी दाद मिळत नाही.—असे का व्हावे? काही प्रथितयश, आबाडीच्या लेखकांनी चरित्र एका झपाट्यासरशी वाचून काढल्याचे मला कळवले आहे, काही मुरब्बी समीक्षकांनी नि जाणकार वाचकांनी चरित्र अथपासून इतीपर्यंत वाचनीय झाल्याचे मत दिले आहे, मग असे का व्हावे? चरित्र लिहून झाल्यावर मी स्वतः ते अनेकदा चाळले नि त्यातील काही भाग वाचले. दर वेळी मीही माझ्या लेखनात गुंगलो. मग आकार साधल्याची दाद का मिळू नये? मला वाटते, की कलाकृतीचे एकेक अंग नि उपांग सुंदर असणे नि तिचा आकार साधणे यांत फरक आहे. कलाकृती एकरूप असणे नि तिचा आकार साधणे यांतही फरक आहे.—आणि कलाकृतीची आकृती (शेप) नि आकार (साइझ) यांतही फरक आहे. माझे पुस्तक अंगोपांगी सुंदर असले, आशयदृष्ट्या एकरूप असले, नि त्याला मिळालेली आकृतीही यदाकदाचित योग्य असली तरी तेवढ्याने त्याचा आकार जमला असेल असे नाही. आकाराचा आशयाच्या वजनाशी काहीतरी सौंदर्यसंबंध आहे. तो सौंदर्यसंबंध प्रस्थापित होणे म्हणजे आकार जमणे होय. चरित्र लिहिता लिहिता शेवटी या सौंदर्यसंबंधाची सम पकडणे जरूर असते. नव्हे, पदोपदी या समेवर येऊन पुढे जावे लागते आणि शेवटी समेवरच थांबावे लागते. पण अंतर्मनात याची सुप्त जाण असूनही ते मला जमवता आलेले नाही. आशयाचे वजन म्हणजे काय? एकूण आशयाचा मनावर जो परिणाम होतो, जो दाब उत्पन्न होतो, त्याला आशयाचे वजन म्हणता येईल. किती वजनाला किती आकार शोभतो, हे कोष्टकात मांडता येणार नाही. पण सौंदर्याचे कोडे जुळवताना वजन जेव्हा आकारात चपखल बसते तेव्हाच ते कोडे जुळते. ते बहुधा तार्किक पद्धतीने नव्हे तर अंतर्ज्ञानाने (इंटयूइशनने) किंवा प्रतिभेनेच जुळवता येते. डॉ० केतकर-चरित्र लिहिते वेळी माझे कोडे सहजगत्या जुळलेले होते. पण 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' लिहिताना ते जुळले नाही. माधवरावांचे उत्कट, क्षोभसुलभ, नि गुंतागुंतीचे भावजीवन, त्यांची कविप्रतिभा, त्यांची संशोधक बुद्धी, त्यांच्या दुर्दैवाचे दशावतार वगैरे साऱ्या गोष्टी ध्यानात घेतल्या तरी तेवढ्या आशयाच्या वजनाला

डेमी सव्वाचारशे पानांचा आकार लागावा म्हणजे फार झाले. तेवढे वजन सुमारे साडेतीनशे पृष्ठांनी पेलले पाहिजे नि पाऊणेकशे पृष्ठे घटली पाहिजेत. म्हणजे मगच आशय नि आकार यांचा सौंदर्यमेळ बसेल, असा माझा कयास आहे.

पण आकार कमी करायचा तर तो वरवरच्या कापाकापीने आता फारसा कमी करता येण्यासारखा नाही. आता आकाराचा संबंध अंतर्गत रचनेशी जडलेला असणार. तेव्हा, आकार कमी करण्यासाठी ती रचनाच बदलावी लागेल.—आणि रचना बदलायची म्हणजे काय? म्हणजे सर्व चरित्र श्रीपासून ज्ञपर्यंत पुन्हा लिहून काढायचे! पुनर्लेखन करायचे तर मला कितीतरी गोष्टी कराव्या लागतील. आशयाची निवड आजच्यापेक्षा अधिक चाळणी लावून करावी लागेल आणि त्या निवडीत जीवनाच्या काही विरल, तरल छटा नि काही अगदी ढोबळ छटा गाळाव्या लागतील. काही गुंता सोपा करून घ्यावा लागेल. दर वेळी कमी तपशिलाने तो तो आशय उभा करावा लागेल; आणि निवेदनातील सोपेपणा थोडा बाजूला टाकून ते अधिक अर्थघन बनवावे लागेल. भाष्याचा पल्ला नि नि खोली यांचा संकोचही उघड्या डोळ्यांनी मान्य करावा लागेल. हे सर्व केले नि ते यशस्वी झाले तर? तर आशय नि आकार यांचा मेळ बसून, चरित्राचे जे एक सौंदर्यपरिमाण आज हुकले आहे ते त्याला मिळेल. शिवाय, आकारमान कमी झाल्यामुळे आनुषंगिक परिणाम म्हणून अवशिष्ट जीवन अधिक उठावदार दिसेल. पण प्रथम-लेखनात जो उत्साह नि ताजेपणा असतो तो या पुनर्लेखनात राहील का? जी एक तंद्री नि सुसंगती असते ती टिकेल का?—मला त्याबद्दल जबरदस्त शंका आहे. शिवाय, आकाराला संक्षेप देताना जो आशय गाळावा लागेल त्याबद्दलही मला हुरहूर लागून राहील.

वृत्तान्त-क्रम नि तपशील यांच्याबद्दल याआधी सांगितलेल्या विचारानुसार चरित्राचे बहुतेक लेखन न अडता मी पार पाडू शकलो. पण जेथे माधवरावांच्या वाङ्मयाचा परामर्श घेण्याचा प्रसंग आला तेथे त्या विचारावर काही संस्कार मला करावे लागले किंवा त्यांत काही भर घालावी लागली. लेखकाच्या चरित्रात त्याच्या वाङ्मयाचा परामर्श अपरिहार्यपणे घ्यावा लागतो हे आपण तिसऱ्या प्रकरणात बघितले आहे. पण वाङ्मयाबरोबर त्यावरील अभिप्रायांनाही चरित्रात स्थान मिळते असे नाही. एखादे वेळी अभिप्रायांचा उपयोग आपल्या समीक्षणात चरित्रकाराने केला तरी त्यांना स्वतंत्र स्थान तो देतो असेही नाही. तेव्हा माधवरावांच्या वाङ्मयावर जे अभिप्राय वेळोवेळी प्रसिद्ध झालेले होते त्यांचे काय करायचे, हे ठरवणे मला प्राप्त होते. हे अभिप्राय वाचीत असता माझ्या असे ध्यानात आलेले होते, की माधवरावांच्या वाङ्मयाविषयी आपली दृष्टी काहीही असली तरी आपली जाण या अभिप्रायांमुळे समृद्ध होत जाते. समकालीनांच्या अपेक्षा माधवरावांनी कशा तृप्त केल्या, कशा वाढवल्या, नि प्रसंगी त्यांना कसे हादरे दिले ते या अभिप्रायांत स्पष्ट बघायला मिळते. शिवाय भाषा, साहित्य, काव्यरचना, कला वगैरे क्षेत्रांत काही ठिकाणी माधवराव समकालीनांच्या किती पुढे गेले होते तेही हे अभिप्राय अभावितपणे दाखवून देतात. थोडक्यात असे म्हणता येईल, की या अभिप्रायांनी माधवरावांना नि विशेषतः माधवरावांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाला कालाच्या कोंदणात घट्ट जडवून ठेवलेले होते. तेव्हा अभिप्रायांचे हे स्वरूप लक्षात घेऊन त्यांना चरित्रात स्वतंत्र स्थान द्यायचे, सर्व प्रकारच्या अभिप्रायांची प्रातिनिधिक अवतरणे संक्षेपाने वाचकांपुढे मांडायची, असा मी निर्णय घेतला.

अभिप्रायांना स्वतंत्र स्थान दिले तरी ते कुठे द्यायचे, हा पुढचा प्रश्न होता. बऱ्याचद वाङ्मय लिहून झाल्यावर काही वर्षांनी त्यांचे प्रकाशन झालेले होते आणि त्यानंतर त्याच्यावर अभिप्राय आलेले होते. त्यामुळे लेखन आधीच्या कालखंडात तर अभिप्राय पुढच्या कालखंडात असा प्रकार होत होता. साहजिकच, लेखनाबरोबर अभिप्राय दिले नि विषयसूत्र सलग ठेवण्याचा प्रयत्न केला तर कालभंग होत होता; आणि लेखन व अभिप्राय कालानुसार वेगवेगळ्या ठिकाणी दिले तर विषयसूत्र खंडित होत होते नि पुनरुक्तीचाही भास उत्पन्न होत होता. शिवाय लेखनाबरोबर अभिप्राय देऊन नि तेथेच अभिप्रायांच्या वेगळ्या काळाचा निर्देश करून कालभंगाचा दोष नीट निरस्त करता येत नव्हता. कारण लेखन आपल्या कालखंडाशी नि अभिप्राय आपल्या कालखंडाशी जीवनावस्थेच्या दृष्टीने किंवा भावावस्थेच्या (मूडच्या) दृष्टीनेही बांधलेले होते. त्यांना त्यांच्या कालखंडातून उचलून दुसऱ्या कालखंडात घातल्यास दोन्ही कालखंडांचा नूर पालटत होता. उदाहरणार्थ, 'विरहतरंगा'चे लेखन अमळनेरच्या कालखंडात झाले म्हणून तेथे त्याचा परामर्श घेतला आणि त्यावरील भविष्यकालीन अभिप्रायही तेथेच सांगितले तर अभिप्रायांतील प्रशंसापर भागामुळे त्या कालखंडातील उदास, एकलकोंडी भावावस्था बिघडत होती. तसेच पुढच्या कालखंडातील अभिप्राय तेथून गळल्यामुळे तो कालखंडही फिका होत होता, त्याच्यातील काही गतिमानता नि काही प्रसन्नता उणावत होती. अशा स्थितीत त्यातल्या त्यात बरा पर्याय स्वीकारून तो शक्य तितका निर्दोष करायचा, असा निर्णय मी घेतला. लेखन नि अभिप्राय आपापल्या जागी, ज्या त्या कालखंडात, आल्याने कालाशी जी संगती साधणार होती आणि त्या त्या जीवनावस्थेचा जो परिपोष होणार होता तो मला अधिक महत्त्वाचा वाटला. म्हणून लेखन नि अभिप्राय कालानुसार फोडून द्यावेत, असे मी ठरवले. मात्र तसे करताना, लेखनाच्या परामर्शात केवळ स्वतःचा अन्वयार्थ द्यायचा नि अभिप्रायांच्या वेळी केवळ इतरांच्या प्रतिक्रिया नोंदवायच्या, असे धोरण मी स्वीकारले. यामुळे विषयसूत्र तुटण्याचा किंवा पुनरुक्तीचा दोष टळेल, अशी माझी अपेक्षा होती. या मांडणीत तोच विषय काही अंतराने नव्या रूपात वाचकांसमोर येत होता. त्यामुळे लयीची कल्पना कदाचित साधून जाईल, असेही मला वाटत होते.

पण वाङ्मयाच्या परामर्शात अभिप्रायांना स्वतंत्र स्थान द्यायचे किंवा नाही आणि ते कुठे द्यायचे, हा प्रश्न फार गौण होता. त्यापेक्षा, मूळ वाङ्मयपरामर्शच कसा घ्यायचा, त्यासाठी कोणत्या तपशिलाचा उपयोग करायचा, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा होता. लोकमान्य टिळकांच्या चरित्रात 'ओरायन' किंवा 'गीतारहस्य' यांचे सरळ सारांश दिल्याने ते चरित्र कसे बिघडू शकते ते मला माहीत होते. डॉ० केतकर-चरित्रात वाङ्मयाचा परामर्श चरित्रात कसा घ्यावा त्याचा एक प्रयोग मी करून पाहिलेला होता. तेव्हा ते पूर्वसंचित बरोबर घेऊन मी या प्रश्नाकडे बघितले. वाङ्मय नि कार्य हे निःसंशय व्यक्तीच्या चरित्राचे घटक होत. दोन्हींत चरित्रनायकाचे व्यक्तित्व अंतर्भूत असते. एवढेच नव्हे तर त्याच्या जीवनक्रमाचे नि जीवनकालीन परिस्थितीचे प्रतिबिंबही कमजास्त प्रमाणात पडलेले असते. तेव्हा वाङ्मयाचा नि कार्याचा साग्र परामर्श चरित्रात घ्यायला काय हरकत आहे, अशी शंका येऊ शकते. पण जो जो वाङ्मयात किंवा कार्यात खोल शिरावे, दूरवर संचार करावा, तो तो चरित्राचे चरित्रपण कमी होत जाते, त्याला समीक्षाग्रंथाचे किंवा इतिहासाचे स्वरूप येऊ लागते, असा अनुभव आहे. यासाठी, वाङ्मयातून नि कार्यातून व्यक्तिजीवनाचा

प्रत्यय देण्याचे काम जिथे पुसट होऊ लागते तिथे चरित्रकाराने थांबले पाहिजे. चरित्रात (म्हणजे कलात्मक चरित्रात) सर्वप्रथम व्यक्तित्वाला, मग जीवनक्रमाला, नि शेवटी परिस्थितीला महत्त्व असते. पुन्हा, व्यक्तित्वाचा परिपोष होईल नि त्याला सुयोग्य पार्श्वभूमी लाभेल अशा रीतीनेच जीवनक्रम नि परिस्थिती यांचा चरित्रात अंतर्भाव व्हावा लागतो.—आणि तिन्हींचे मिळून एक रसायन बनावे लागते. तेव्हा, वाङ्मयाच्या परामर्शातून हे तीन चरित्रघटक त्यांच्या महत्त्वानुसार परिपुष्ट झाले पाहिजेत नि त्यांच्या रसायनात हा परामर्श विरघळला पाहिजे. या तत्त्वाचा विचार माझ्या मनात आधीच रुजलेला होता. अर्थात् या विचाराचे उपयोजन करीत मी माधवरावांच्या वाङ्मयाचा परामर्श घेतला.

उपयोजनात, वाङ्मयलेखनाचा दैनंदिन जीवनात जो भाग होता तो मी टिपून घेतला. त्यासाठी माधवरावांचा वेताळ उतरताना एखादी कविता कशी तयार होई, केव्हा केव्हा त्यांची पत्रे कशी काव्यरूप असत, संशोधनाच्या नि लेखनाच्या गदारोळात त्यांच्या खोलीला कचरापेटीची कशी कळा येई, वगैरे गोष्टी मी सांगितल्या. आपल्या वाङ्मयाविषयी माधवरावांची जी वृत्ती असेल, जी मते असतील, ती मी ध्यानात घेतली. त्यासाठी, "प्रीतीची रडगाणी मजसाठीच होत", 'आईची आठवण' या कवितेत व्यक्त झालेल्या भावना "आज ५-६ वर्षे माझ्या हृदयात तुफान करीत असल्यामुळे स्वानुभवाचा जोर साहजिकपणेच तीत उतरला आहे" वगैरे उद्गार मी उद्धृत केले. वाङ्मय कोणत्या परिस्थितीत निर्माण झाले ती परिस्थिती मी पाहिली. त्यासाठी 'संगमोत्सुक डोह' अमळनेरच्या वैराण एकान्तवासात कसे लिहिले गेले, किंवा 'नकुलालंकारा'च्या लेखनाला लक्ष्मणशास्त्री लेल्यांची बौद्धिक चपळाई कशी निमित्त झाली, ते मी स्पष्ट केले. शक्य तेथे निर्मितीच्या प्रक्रियेचे काही विशेष मी नोंदवले. त्यासाठी 'विरहतरंग' तब्बल बारा वर्षे कसे घडत होते, किंवा 'सुधारका'तील शब्दरचनेकरिता मित्रमंडळीतील चर्चा कशा उपयुक्त ठरत होत्या, ते मी दाखवून दिले. जिथे वाङ्मयात सरळसरळ माधवरावांच्या वास्तव भावनांचा आविष्कार झाला होता तिथे तो मी व्यक्त केलाच, पण जिथे वास्तव भावना रूपांतरित होऊन वाङ्मयात मिसळल्या होत्या तिथे त्यांचीही मी दखल घेतली. अशा वेळी वास्तव नि वाङ्मय यांच्यातील संवाद-संबंध नि विरोध-संबंध या दोहोंकडे मी लक्ष पुरवले. त्या दृष्टीनेच माधवरावांच्या प्रेमकवितांतील नायक बराचसा माधवरावांसारखा कसा होता नि थोडासा वेगळा कसा होता, 'विरहतरंगा'तील नायक किंवा 'सुधारका'तील वासू राजे यांच्यात माधवरावांची प्रतिबिंबे कशी नि किती प्रमाणात उमटलेली आहेत, त्याचा मी शोध घेतला. शिवाय 'सुधारका'तील श्यामा वेंगुर्लेकर निर्माण करून माधवरावांनी आपल्या निर्विषय प्रेमकल्पनेची (प्लेटॉनिक लव्हची) परिपूर्ती कशी करून घेतली असेल, किंवा अन्यत्र इच्छापूर्ती कशी साधली असेल, ते मी दिग्दर्शित केले. काव्यात शांताबाईंचा माग तर मी निघेल तेवढा काढला. वास्तव नि वाङ्मय यांच्या तौलनिक दर्शनातून वास्तव गडद व्हावे, वाङ्मयनिर्मितीची प्रक्रिया आणखी उलगडावी, आणि दोन्ही मिळून जे व्यापक वास्तव असते तेही दिसावे, अशी माझी अपेक्षा होती. वाङ्मयाचे विशेष हे शेवटी व्यक्तित्वाचेच विशेष असल्यामुळे मी त्यांचे निरीक्षण केले. पण हे निरीक्षण म्हणजे वाङ्मयसमीक्षा होऊ नये, म्हणून त्यात ठळक-ठळक विशेषच घेतले, आणि ते अशा रीतीने सादर केले की त्यात इतरत्र प्रकटलेल्या व्यक्तित्वाचे परिचित

किंवा परिणत स्फुरण जाणवावे. म्हणूनच त्या त्या कालखंडाच्या संदर्भात त्या त्या वेळच्या वाङ्मयावर मी लिहिले आणि वाङ्मयाविषयी आतापर्यंत ज्या पद्धतीने लिहिले म्हणून उल्लेख केला त्या पद्धतीच्या लिहिण्यात हे विशेष मुरवून टाकले. आशयाच्या विशेषांपेक्षा शैलीचे विशेष कित्येकदा व्यक्तित्वाचा ठसा चटकन उमटवतात. त्याकरिता माधवरावांना 'अन्' या उभयान्वयी अव्ययाची कशी खोड होती, ते वारंवार चमत्कारिक यमके कशी जमवीत, किंवा आपली कविता नव्या धर्तीने कशी छापीत, त्याचे निर्देश मी केले. जो न्याय मी वाङ्मयविशेषांना लावला तोच न्याय वाङ्मयातील चढउतारांना नि वळणांनाही लावला. अर्थात्, केवळ ठळक चढउतार नि वळणे मी ध्यानात घेतली नि जीवनाच्या प्रवाहातील एक भाग म्हणून त्यांना त्या प्रवाहात सोडून दिले. वाङ्मयपरामर्श चरित्रात कसा घ्यावा त्यासंबंधीच्या विचाराचे हे उपयोजन येथे मी फोड करून नि उदाहरणे देऊन मांडले आहे. पण तशी सोदाहरण फोड लेखनापूर्वी मी केलेली नव्हती. मूळ विचार माझ्या मनात स्पष्ट असल्यामुळे त्यातून हे उपयोजन सहजपणे, विश्लेषणाच्या खटाटोपाशिवाय, आपोआप होत गेले.

वृत्तान्त कोणत्या क्रमाने सांगावा, प्रकरण-रचना कशी करावी, चित्रणात किती तपशील द्यावा, वाङ्मयाचा परामर्श कसा घ्यावा, वगैरेसंबंधी जे विचार मनात वागवून मी चरित्राचे लेखन केले ते विचार येथपर्यंत थोडेफार सांगितले. पण लेखनाच्या वेळी माझी मनःस्थिती कशी होती? कोणत्याही प्रकरणाचा किंवा प्रकरण-विभागाचा प्रारंभ करण्यापूर्वी त्यातील सर्व आशय मी मनात एकत्र करीत होतो आणि त्याच्याशी एकरूप होत होतो. ही एकरूपता मुख्यतः व्यक्तींशी होती, पण केवळ व्यक्तींशी नव्हती. व्यक्तींच्या सकट जी संपूर्ण परिस्थिती होती तिच्यात साधन-सामग्रीच्या साह्याने मी शिरत होतो आणि तिच्याशी कल्पनेने रममाण होत होतो. या एकरूपतेमुळे परिस्थितीचे सर्व अंश एकमेकांशी जुळत होते आणि तिचे सलग, सजीव चित्र माझ्या दृष्टीसमोर तयार होत होते. मी नेमका कोणाशी एकरूप होत होतो, असा अडचणीचा प्रश्न चिकित्सक समीक्षापंडित येथे उत्पन्न करतील; पण त्यांना युक्तिवादपूर्वक काही पटविण्याच्या भानगडीत न पडता मी एवढेच म्हणेन, की निरनिराळ्या संबंधित व्यक्तींशी नि घटना-प्रसंगांशी मी एकैकशः एकरूप होत होतो नि समूहशःदेखील एकरूप होत होतो. यापैकी आधी एकैकशः नि मागाहून समूहशः असा सीधा क्रम नव्हता. त्यात उलटापालटही होती, अत्यंत संथपणे क्रमाची दिशा बदलत होती किंवा ती फार झपाट्यानेही बदलत होती; आणि एकाच वेळी आपण अनेकांशी किंवा समग्र परिस्थितीशी एकरूप झालो असू, असे वाटण्याजोगीही परिस्थिती होती. ही एकरूपता म्हणजे मुख्यतः तदात्मता होती. तीमुळे व्यक्तींच्या मनातले विचार-विकार, त्या विचार-विकारांतील प्रवाहित्व, घटनाप्रसंगांतील संगती किंवा भावनिक वातावरण ही मला जाणता आली, भावता आली. ती लेखनातही जेवढी उतरली आहेत तेवढी उतरवता आली. मला वाटते, की कल्पनेने उजळलेली तदात्मता चरित्राला जेवढी कसदार वास्तवता देऊ शकते तेवढी दुसरी कोणतीही गोष्ट देऊ शकत नसेल. मात्र मागे एका प्रकरणात म्हटल्याप्रमाणे, ही कल्पना मनोवैज्ञानिक हवी आणि तदात्मता दीर्घ अभ्यासावर अधिष्ठित हवी.

संशोधनासंबंधी लिहिताना, एकरूप होण्यासंबंधी किंवा तदात्मतेसंबंधी मी अनेक उल्लेख केलेले आहेत. आता लेखनासंबंधी लिहितानाही मी तसेच उल्लेख करीत आहे. पण संशो-

धनाच्या वेळची एकरूपता किंवा तदात्मता आणि लेखनाच्या वेळची एकरूपता किंवा तदात्मता यांचे कार्य एकच म्हणता येणार नाही. दोन्ही वेळी तादात्म्यामुळे माझे आकलन वाढले, त्यात एकजीव (ऑर्गॅनिक) सलगता आली, ते बौद्धिक पातळीवरून भावनिक पातळीवर गेले, हे खरे. पण संशोधनाच्या वेळी काही अर्थगर्भ सामग्री झटकन माझ्या नजरेत भरत होती, काही 'इनसाइट्स' मला येत होत्या, काही कल्पना स्फुरत होत्या; आणि तादात्म्यामुळे त्या विशेषांचे (स्पेसिफिक्सचे) रूपांतर एखाद्या सामान्यात (जनरॅलिटीमध्ये) मी करीत होतो. तादात्म्याचा कस लागल्यावर काही विशेष क्वचित धिक्कारले जात होते; पण बरेच विशेष कसाला उतरून सामान्य बनत होते. लेखनाच्या वेळी मात्र माझी गती अशी विशेषाकडून सामान्याकडे फारशी नव्हती. त्यापेक्षा ती सामान्याकडून विशेषाकडे होती. म्हणजे आधी बघितलेल्या सामान्याच्या रूप-रेषेत, तादात्म्याच्या वेळी, अनेक रंग, रेषा, नि तपशील साधनसामग्रीतून उठून आपापल्या जागी आपोआप जाऊन बसत होते. अगदी क्वचित एखादा तपशील सुखाने बसायला नकार देई आणि मग सामान्य बदलून त्या तपशिलाशी जुळवून घ्यावे लागे. पण बहुतेक प्रसंगी तादात्म्यामुळे सामान्य समृद्ध नि प्राणमय होई. किंबहुना असेही म्हणता येईल, की संशोधनाच्या वेळी तादात्म्य विशेषांना सामान्यापर्यंत नेत होते आणि आता लेखनाच्या वेळी ते सामान्याला पूर्णता देत होते.

माझ्या एकरूपतेत तदात्मता होती; पण तदात्मतेसह स्वात्मताही होती. हे म्हणणे कोणाला विसंगत वाटेल, वदतोव्याघात वाटेल; पण एकरूपतेत दोन आत्मे जर परस्परात मिसळत असतील तर त्या मिश्रणाच्या विश्लेषणात दोघांचे अस्तित्व अंशतः का सापडू नये? निदान माझ्या एकरूपतेत तदात्मतेला लगटून स्वात्मता बसली होती, अशी माझी धारणा आहे. चरित्राच्या विशिष्ट आशयाशी तदात्म झालेले माझे मन वारंवार तादात्म्याच्या परिघातून बाहेर पडून स्वत्व पावत होते आणि त्या आशयाकडे दुरून बघत होते. त्यामुळे त्या आशयाचे साकल्य, संगती नि वजन ही मला कळू शकत होती. माझ्या मूल्यश्रेणीवर तो आशय कळत-नकळत घासला जाऊन त्याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष मूल्यांकन होत होते. माधवरावांचे समग्र जीवन नि एकूण मानवी जीवन यांच्या परिप्रेक्ष्यात (पर्स्पेक्टिव्हमध्ये) त्या आशयाला त्याचे स्थान मिळत होते. जे घडत होते ते निर्दोष किंवा पूर्ण होते, असा माझा दावा नाही. माझ्या व्यक्तित्वाच्या, दृष्टीच्या मर्यादा त्याला नक्कीच होत्या. पण जे घडत होते ते तादात्म्यातून बाहेर पडल्यामुळे, स्वात्मतेमुळे घडत होते, हे नक्की. तदात्मतेमुळे ती ती व्यक्ती त्या त्या व्यक्तीच्या दृष्टीने नि तो तो घटनाप्रसंग त्या त्या घटनाप्रसंगाच्या अंतरंगात शिरून मी उभा करीत होतो आणि स्वात्मतेमुळे त्याकडे पुन्हा माझ्या स्वतःच्या दृष्टीने बघत होतो. त्यामुळे चरित्राचा सर्व आशय माझ्या दृष्टीच्या सूत्रात जणू ओवला जात होता. त्याला त्याच्या आंतरिक सलगतेखेरीज माझ्या दृष्टीची एक बाह्य सलगता प्राप्त होत होती. माझ्या मते चरित्र एकजीव होण्यास ही बाह्य सलगता खूपच उपयोगी पडते. माझ्या एका ज्येष्ठ स्नेह्याने लिहिलेल्या साने गुरुजींच्या चरित्राची समीक्षा १९५० च्या आसपास केव्हातरी मी केलेली होती. त्या चरित्रात, गुरुजींची आत्महत्या म्हणजे जीवात्म्याची परमात्म्याशी भेट होती, सान्ताचे अनंताशी मीलन होते, वगैरे प्रशंसात्मक काव्य एकीकडे फुलवलेले होते, आणि दुसरीकडे ती आत्महत्या म्हणजे दुबळेपणा होता, पराभव होता,

असाही टीकात्मक सूर लावलेला होता. चरित्रात चरित्रकाराला एक दृष्टी लागते नि ती सलग नसेल तर चरित्राला भेगा जातात, हा विचार तेव्हापासून माझ्या मनात रुजलेला होता. अर्थात्, माझ्या स्वात्मतेत विस्कळीतपणा किंवा विसंगती नसावी म्हणून संशोधनाच्या वेळी नि लेखनाच्या वेळी चरित्राचा एकूण आशय मनात बराच घोळवून त्याविषयी माझी वृत्ती मी स्थिर होऊ दिलेली होती.

तदात्मता नि स्वात्मता यांची प्रक्रिया काही उदाहरणांनी आणखी स्पष्ट होऊ शकेल. शांताबाईंनी आणि माधवरावांनी आई-मूल होऊन परस्परांचा सहवास अनुभवला होता, हे संशोधनाच्या अवस्थेतच मला कळलेले होते. पण शांताबाई नेमक्या आईच्या भूमिकेपर्यंत कसकशा गेल्या असतील, ते त्यांच्याशी तदात्म झाल्यावर लेखनाच्या वेळी मला स्पष्ट झाले. माधवरावांनीही मनातली प्रियकराची भूमिका सोडून मुलाची भूमिका नेमकी का नि कशी बठवली असेल, ते त्यांच्याशी तदात्म झाल्यावर लेखनाच्या वेळी मला उमगले.—आणि दोघांशी नि परिस्थितीशी तदात्म झाल्यावर दोघांच्या मधला "शांत सुखानुभूती"चा चुंबनप्रसंग मी शब्दांकित करू शकलो. मात्र तदात्मतेतून बाहेर येऊन स्वात्मतेने मी हे सर्व दुरून बघत होतो. त्यामुळेच त्यात शांताबाई नि माधवराव यांनी जी आत्मवंचना चालविली होती ती मला कळली आणि आई-मुलाचे नाते नैसर्गिक नव्हते, दुधखुळे होते, असे ध्वनित करीत मी तो प्रकार सादर केला. (पृ० ६३ ते ६८). 'आपण माधवरावांचा नुसता स्नेह जोडून काय उपयोग? आपण त्यांचे गृहिणीपद मिळवले पाहिजे' हे वरदेच्या मनात झालेले स्थित्यंतर (पृ० २३१ ते २३३), किंवा माधवरावांचे स्थळ त्यांचा दुर्लौकिक कळलेला असूनही लीलाबाईंनी मान्य केले त्यामागची कारणमीमांसा (पृ० २९७ ते २९९), किंवा लग्नाचे नक्की झाल्यावरही माधवरावांनी लीलाबाईकडून लग्नाला नकार घेण्याचा केलेला अजब प्रयत्न (पृ० २९९–३००) वगैरे ठिकाणी लेखनाच्या वेळी झालेल्या तादात्म्यामुळेच तो तो तपशील सहज गोळा झाला, एकरस बनला, आणि त्याचा अनेकांगी वेध घेणे मला शक्य झाले. उलट, 'वेताळा'चा अथवा आनुवंशिक मनोविकलतेचा विकार असूनही माधवराव पंडितांच्या पंक्तीला जाऊन बसले, कविमंडळात वाहवा मिळवू लागले, हा त्यांचा सर्वोच्च विजय होता, हे माझे निरीक्षण (पृ० १८०) म्हणजे तादात्म्य सोडून, पण ते लक्षात ठेवून, लेखनाच्या वेळी स्वात्मता स्वीकारल्याचे फळ होते. डे० ए० सोसायटीत माधवरावांनी पराभवाची जी कडवी झुंज दिली तिची अनेकांगी पार्श्वभूमी माधवरावांशी, त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांशी, रँ० परांजपे, सीतारामपंत देवधर वगैरे वडीलधाऱ्यांशी, नि परिस्थितीशी तदात्म झाल्यासुळे मी भरगच्च नि सुसंगत देऊ शकलो; पण या प्रकरणी मी माधवरावांना किंवा सोसायटीला सरसकट दोषी धरले नाही, कारण संशोधनाच्या वेळी नि लेखनाच्या वेळीही तादात्म्य टाकून स्वात्म तटस्थतेने सर्व प्रकरण मी बघितले होते. (प्रकरण ८ वे). संशोधनाच्या वेळी माधवरावांच्या भाषाशुद्धीचे सर्व ठळक विशेष माझ्या ध्यानात आलेले होते; पण लेखनाच्या वेळी त्यांच्या विचारांशी मी पुन्हा तद्रूप झालो; त्यामुळे मोठमोठे साहित्यिक त्यांच्यावर टीका करताना कुठे चुकत होते त्यावर मी बोट ठेवू शकलो. शिवाय दोन्ही वेळी मी माझ्या भूमिकेवर उभाच होतो, त्यामुळे माधवरावांच्या भूमिकेचे टीकाकारांच्या संदर्भात शेवटपर्यंत रक्षण करूनही मी ती भूमिका स्वीकारली नाही. गालातल्या

गालात हसत, त्यांच्या घरादारातील भाषाशुद्धीची हकीगत मी सांगितली (पृ० ३८० ते ३८४), आणि चरित्राला 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' असे चक्क अशुद्ध नाव दिले!

चरित्र हे शेवटी इतिहास असल्यामुळे चरित्रकाराने निर्विकार नि तटस्थ मनाने सत्याचा शोध घेतला पाहिजे, न्यायाधीशाच्या थंडपणाने आपले निवाडे दिले पाहिजेत, लेखनात स्वतःच्या भावना लपवल्या पाहिजेत, अशी एक समजूत आहे. पण आतापर्यंतच्या निवेदनावरून हे स्पष्ट होईल, की या समजुतीचे नियंत्रण माझ्या मनावर केव्हाही नव्हते. संशोधनाच्या वेळी काय, किंवा लेखनाच्या वेळी काय, माझे मन स्वागतशील होते, लवचिक होते, जिज्ञासू होते; पण निर्विकार नक्कीच नव्हते. चरित्रातील व्यक्तींशी किंवा परिस्थितीशी तदात्म होऊन तत्रस्थ भावना मी अनुभवीत होतो, स्वात्म होऊन मी माझ्याही भावना अनुभवीत होतो, उभयविध भावनांनी नि संलग्न विचारांनी माझी काही वृत्ती बनत होती आणि त्या वृत्तीच्या तंद्रीत माझे लेखन होत होते. अर्थात् ती वृत्ती नि तदंतर्गत भावना माझ्या लेखनात ओघानेच उतरत होत्या. जे सत्य मला दिसले ते त्याच्या शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधासह मी वाचकांसमोर ठेवू पाहत होतो, वाचकांची नि सत्याची गाठ परस्पर नि समक्ष पडावी म्हणून मी प्रयत्नशील होतो; पण त्याच वेळी माझे मन मी लपवू शकत नव्हतो. मला दिसलेल्या सत्यात माझे मन अविभाज्यपणे मिसळलेले होते, म्हणून त्या सत्यासह ते अपरिहार्यपणे प्रकटत होते. किंबहुना, मला दिसलेले सत्य जसेच्या तसे वाचकांपर्यंत पोचावे, म्हणूनच कृत्रिम थंडपणा मी स्वीकारीत नव्हतो आणि जाणून-बुजून मनाची मुस्कटदाबी करीत नव्हतो. आपल्या कवितेमध्ये सृष्टिसौंदर्याचा सोहळा वाचकांना भोगवीत असता बालकवी स्वतः त्यात जसे सहभागी होतात तसे आपल्या हातून थोडेफार घडल्यास त्यात वावगे काय, अशी माझी भूमिका होती. अर्थात् घटना, प्रसंग, व्यक्तींच्या कृती नि स्वभाव वगैरेंच्या यथार्थ वर्णनात जी गुणविशेषणे वापरावी लागतात ती मी निःसंकोच वापरीत होतो. त्यांच्यासंबंधी माझी वृत्ती नि मूल्यांकन हीदेखील, वर्णनाचा नैसर्गिक ओघ खंडित न करता, जर सूचित करावीशी वाटली तर सूचित करीत होतो, क्वचित सरळ सांगतही होतो. आणि साऱ्या शब्दयोजनेत, मांडणीत, निवेदनाच्या रोखात आपला मी अनुस्यूत आहे हे ठाऊक असूनही त्या मीला मी तेथे सुखेनैव राहू देत होतो. माझी अशी कल्पना होती, की चरित्र जर साहित्य व्हायचे असेल तर हे आवश्यक आहे. साहित्यस्वरूप चरित्रात सत्य वाचकांच्या केवळ बुद्धीला पटवून चालणार नाही, तर ते भावनांकरवी त्यांच्या मनाला भोगवले पाहिजे. चरित्रकार जर थंड नि तटस्थ राहिला तर ते शक्य कसे आहे? भावना नि वृत्ती या संसर्गाने, सूचनेने फुलारतात. तेव्हा चरित्रकाराने आपले फुलारणे बंद करून चालणार नाही.

पुरेसे संशोधन झाल्यावर १७ ऑक्टोबर १९७२ या दिवशी दसऱ्याच्या मुहूर्तावर मी लेखनाला प्रारंभ केला; आणि ११ फेब्रुवारी १९७५ या दिवशी शेवटच्या प्रकरणातील शेवटची ओळ लिहिली. म्हणजे दोन वर्षे, तीन महिने, नि सव्वीस दिवस इतका प्रदीर्घ काळ, माझा नेहमीचा व्यवसाय सांभाळून, मी लेखनात गुंतलेला होतो. मला लेखनासाठी एवढा वेळ का लागावा? माझे मन जड असेल, मला शब्द तितकेसे वश नसतील, मी फार चोखंदळ असेन, माझे निर्णय झटपट होत नसतील, वगैरे अनेक कारणे सांगता येतील; आणि त्यांपैकी काही खरीही असतील. पण मला वाटते, की संशोधित आशयाशी, त्यातील बारीक तपशिलासह,

तदात्म होणे, स्वात्मतेने त्या आशयाचे निरीक्षण करणे, आणि त्यापेक्षा तदात्मता नि स्वात्मता यांचे एक रसायन मनात तयार होणे, या गोष्टी माझ्या बाबतीत बराच वेळ घेत असत. मी तदात्मता पुरी झाल्यावर, किंवा स्वात्मतेने आशयाकडे विहंगमदृष्टी टाकल्यावर, किंवा तदात्मता नि स्वात्मता यांचे रसायन मनात तयार झाल्यावर, अमक्या वेळी लेखन सुरू करीत होतो, असे सांगता येणार नाही. पण गोळाबेरजेने असे म्हणता येईल, की या तीनही गोष्टी विशिष्ट अवस्थेला गेल्या की मला लिहावेसे वाटे आणि लिहिता लिहिता त्या गोष्टी केव्हातरी पूर्णावस्थेला पोचून माझे अंतिम लिहिणे तयार होई. तोवर मी अनेक कागद अर्धेमुर्धे लिहीत असे, कागदामागून कागद फेकून देत असे, आणि पुन्हा लिहीत असे. तदात्मता, स्वात्मता, नि दोन्हींचे रसायन यांची प्रक्रिया लिहितालिहिताच पुरी होई; ती केव्हा पुरी झाली हे मला कळत नसे, पण 'हे लिहिणे जमले बरे का!' असा मनाचा कौल मिळून जेव्हा माझे लिहिणे मी स्वीकारीत असे तेव्हा ती प्रक्रिया पूर्ण होऊन तिची कामगिरी संपलेली असे. मी स्वीकारलेल्या अंतिम हस्त-लिखितात उणेपुरे नऊशे चवरखे समाविष्ट आहेत; पण फेकून दिलेल्या चवरख्यांची संख्या निदान दोन हजार सातशे सहज भरली असती! त्यांपैकी काही चवरख्यांची चवड अद्यापि एका कपाटात पडलेली आहे आणि ती, माझ्या मनात घडलेल्या पण मला न कळलेल्या, त्या प्रक्रियेची साक्ष देत आहे.

आज लेखनाकडे जेव्हा मी पुन्हा बघतो तेव्हा तदात्मता, स्वात्मता, दोन्हींचे रसायन, तिन्हींची प्रगल्भ अवस्था,—एवढ्या प्रक्रियेतूनच लेखनाचा अंतिम मसुदा तयार होत होता असे वाटत नाही. तिन्हींच्या प्रगल्भ अवस्थेत मी जे लिहीत होतो त्यातून मी वारंवार बाहेर पडता होतो नि माझ्या लेखनाकडे तटस्थपणे बघत होतो. या तटस्थ निरीक्षणाच्या वेळी केव्हा वाटे, मनातला आशय नि कागदावरचा आविष्कार यांचा सूर जुळला आहे; केव्हा वाटे, जुळल नाही. मग न जुळलेला सूर जमवण्यासाठीही मी पुनर्लेखन करीत होतो. उदाहरणार्थ, चरित्राच्या प्रारंभी माधवरावांच्या जन्माची नि दोन महिन्यांनी सुरू झालेल्या त्यांच्या रडण्याची जी बाळबोध हकीगत मी दिली आहे तीदेखील मी तीनचार वेळा थोडथोडी बदलली. जन्माच्या वेळचे माधवरावांचे रूप त्यांच्या पुढच्या राजबिंड्या रूपाशी मला जुळवून द्यायचे होते आणि त्यांच्या बाळपणच्या अखंड रडण्यातून त्यांचे भावी दुर्दैवग्रस्त जीवन सूचित करायचे होते. हे अगदी नकळत, नाजुकपणे मला करायचे होते, पण ते जमत नव्हते. त्यामुळे ते जमेपर्यंत माझी बदलाबदली चालू राहिली. (पृ० १ व पृ० २). शांताबाईंचे कशाळकरांशी लग्न झाले त्याची हकीगत देताना मी पुढील वर्णन केले होते: "वधूविषयी ज्या अपेक्षा होत्या त्यांपैकी कोणत्याच अपेक्षेला शांताबाई उतरत नव्हत्या. त्यांचे वय होते सत्तावीस. वर्ण काळा. उंची मध्यम. बांधा भरलेला नि त्यामुळे पुरंध्रीची प्रौढता हालचालींत आलेली. पांढरे कोइमतुरी पातळ सकच्छ पद्धतीने त्या नेसल्या होत्या. अंगावर त्यांनी घेतलेली बनारसी शालही पांढरीच होती. डोळ्याल सोन्याच्या काडीचा चष्मा बहुधा असावा.—आणि त्यांचे काळे मोजे नि काळे बूट लग्नसमारंभात कसलेतरीच वाटत होते." हे वर्णन अक्षरशः खरे होते. पण शांताबाईंविषयी जी प्रतिकूलता माझ्या मनात होती तीपेक्षा तिची इयत्ता या वर्णनाने चरित्रात वाढत होती आणि हे वर्णन परिणामाच्या दृष्टीने मला दुषित होते. तेव्हा बदलता बदलता, मुद्रणप्रतीच्या वेळी मी ते बव्हंशी

बादच केले. (पृ० ९८–९९). १९३७ पासून माधवराव कसे अंतर्मुख होऊ लागले होते त्याचा वृत्तान्त मी पृ० ४०९–१० वर दिला आहे. पण मुळात तो वृत्तान्त देता देता माझ्या लेखणीचा थोडा तोलच ढळला. मी लिहिले : "लोकांत मिसळण्याचा त्यांचा उत्साह कमी झाला. त्यांच्या नानाविध उद्योगांत उत्साहापेक्षा कर्तव्यबुद्धी दिसू लागली. आधीच्या तीनएक वर्षांत प्रचार, सभासंमेलने, सत्कार यांची जी गर्दी उसळली होती ती त्यांच्या एकान्तप्रिय स्वभावाला मानवली नसावी. लीलाताईंनी म्हटल्याप्रमाणे ते 'आत्मलक्षी' झाले; त्यांना एक प्रकारची 'विरक्ती' आली. डी० लिट० चे आनंदमेघ गडगडून नि बरसून गेल्यानंतर या मोराने जणू आपला पसरलेला पिसारा मिटवून घेतला आणि रंगलेला नाच हळूहळू थांबवला. या मोराचे लक्ष आकाशातील मेघांपेक्षा आता भूमीवरील जिवलगांकडे नि स्वतःच्या अंतरात्म्याकडे लागून राहिले. अंतरात्म्याने साद घातल्यामुळेच, १९३९च्या जानेवारीत माधवरावांनी काही वेदमंत्रांचे भाषांतर केले असावे आणि 'रामद्वारी' ही प्रसिद्ध कविता लिहिली असावी." पण काव्यात्म शैलीच्या नादाने मी सत्यापासून दूर जाऊ लागलो होतो. मोर नि ढग ठीक होते; पण विरक्ती किंवा अंतरात्म्याची ओढ तितकीशी वास्तवात दिसत नव्हती. माधवरावांनी वेदमंत्रांचे जे भाषांतर केले त्यात विरक्ती-पेक्षा भाषांतराचा उत्साह अधिक होता; आणि 'रामद्वारी' ही जी कविता लिहिली तीमध्ये स्वतःच्या अंतरात्म्यापेक्षा दुसऱ्या कोणाच्या अंतरात्म्याची ओढ ऐकीव माहितीवरून व्यक्त केलेली होती. तेव्हा मनातले हे सत्य अचूक व्यक्त व्हावे म्हणून ह्या वृत्तान्ताचा तोल मी सावरून घेतला.

माधवरावांचे जीवन संशोधनाच्या वेळी मी कल्पनेने एकदा जगलो होतो. लेखनाच्या वेळी, सव्वा दोन वर्षे, ते पुन्हा जगलो. या जगण्यात खूप कष्ट होते नि खूप आनंदही होता. तदात्मता नि स्वात्मता यांची जी निर्विकल्प समाधी लावावी लागे ती लागेपर्यंत मनावर अतिशय ताण येई. समाधी लागली की ताणाचे भानच उरत नसे. आनंदाचीही जाणीव होत नसे. पण समाधी उतरली की आपण अनिर्वचनीय आनंदाच्या डोहात डुंबत होतो, असे मागाहून वाटे. मन पुन्हा समाधीसाठी आतुर होई. समाधीने मनात साकारलेला आशय कागदावर हवा तसा उमटत गेला की फार फार समाधान वाटे. पण अभिव्यक्ती बिघडली की वैताग येई. त्या वैतागाच्या भरात मग पुनर्लेखनाचे हवे तेवढे कष्ट होऊन जात. कारण सदोष अभिव्यक्तीने जी अस्वस्थता येई ती अभिव्यक्ती सुधारल्याशिवाय जातच नसे. सुधारणा जमली की स्वस्थता येई. शीतल सावलीत वाऱ्याच्या झुळका खात आम्रवृक्षाखाली पहुडल्यासारखे वाटे. असे चक्र अखंड चालू होते. सव्वादोन वर्षे चरित्राचा गर्भ जणू उदरात वाढत होता. कधी गर्भभार असह्य होई, तर कधी गर्भाची हालचाल ग्लानी यावी एवढे सुख देऊन जाई. अखेर लेखन संपले, तो भार नि ती ग्लानीही संपली; आणि चरित्राचा जन्म झाला. फार हलके हलके वाटले. अगदी मोकळा झालो. मग आपली ही निर्मिती कुठे ठेवू नि कुठे नको, कुणाला दाखवू नि कुणाला नको, म्हणून जीव मोहरून गेला.

आता, रिकाम्या वेळी, हे चरित्र मी केव्हा केव्हा मांडीवर घेतो आणि त्याच्या डोळ्यांत माझे प्रतिबिंब सुखाने बघत बसतो.



सूची

... एका चरित्राच्या निर्मितीसंबंधी चरित्रकाराने केलेले हे आत्मनिवेदन आहे. चरित्र या वाङ्मयप्रकारासंबंधी हे औपचारिक साहित्यशास्त्रीय विवेचन नाही. तरी पण या आत्मनिवेदनात चरित्र या वाङ्मयप्रकारासंबंधी काही चर्चा अनुषंगाने झाली आहे. अशी चर्चा या सूचीत नोंदविली आहे.

... सविशेष (डीटेल्ड), सविस्तर अनुक्रमणिका दिलेली असल्याने अनुक्रमणिकेवरून इतर विषयांचा माग सहज काढता येईल.

... सूचीत मुख्य विषय अक्षरक्रमाने दिले असून पोटविषय पृष्ठक्रमाने, जसे पुस्तकात आले तसे, दिले आहेत. आकडे पृष्ठांचे असून, काही ठिकाणी दशांशचिन्ह घालून त्यानंतर ओळ दाखवली आहे.

— **आकार** – एकूण चरित्राचा : १५०–१५१.
— आकार नि एकरूपता, आकार नि आकृती, आकार नि आशय : १५०.
— आकार कापाकापीने कमी करता येईल काय : १५१
— **इतिहास** – चरित्रातील वास्तव सत्य :
— चरित्र म्हणजे मूलतः इतिहास, वास्तव सत्य : ३५, १२३
— खरेखुरे असणे-घडणे हे चरित्राचे मूलद्रव्य : ३५.
— असण्या-घडण्याची रूपे : ३५–३६.
— असण्या-घडण्याचा शोध, त्याची अंगे : ३६.
— वास्तव सत्याची चरित्रात होणारी निवड : ६५
— **एकात्मता** :
— एकात्मतेच्या दृष्टीने व्यक्तित्व, जीवनक्रम, परिस्थिती या चरित्राच्या मुख्य अंगांची पाहणी : ६२ ते ६४.
— जीवनक्रम नि परिस्थिती यांची व्यक्तित्वाशी सांगड : ६४.
— सत्त्वांश नि पृथगात्मता यांची एकंदर एकरूपतेशी संगती : ७०
— **कल्पकता** :
— मनोवैज्ञानिक कल्पकता : ५०·२३, ५७·७, ५९·१, ७७·१९, ८२·१५, ८४·७, ८६·२५, ९१·८, ९३·१५, ९३·३३, ११४·१०.
— कल्पनेने उजळलेली तदात्मता : १५४.
— **कादंबरी** — चरित्र आणि कादंबरी : २४–२५, ५४–५५.
— **जीवनक्रमाचे चरित्रातील स्थान** : ५५-५६, ६३, ६९–७०.
— **तपशील** :
— चित्रणातील : १४५ ते १५०.
— उपलब्ध सामग्रीशी संबंध : १४५

—चरित्रनायकाच्या जीवनस्वरूपाशी संबंध : १४५–१४६.
—वाचकांच्या पूर्वग्रहांशी संबंध : १४६–१४७.
—निवड आणि तपशील : १४७.
—तपशील देण्याची पथ्ये : १४७.
—तपशील आणि भाष्य : १४७.
—जास्तकमी तपशील किंवा भाष्य देण्याच्या चुका : १४७ ते १५०.
—निवड :—चरित्रातील सत्याची निवड :
—निवडीची अपरिहार्यता नि आवश्यकता : ६५
—निवडीच्या दोन पद्धती : १ विश्लेषणात्मक, तर्कशास्त्रीय; २ लेखकाच्या मनावरील संकलित ठशाकडे नेणारी, कलात्मक : ६५–६६.
—निवडीत लेखकाची कलादृष्टी अंतभूत : ६६.
—निवडीचे धोरण—आशयाचा व्यक्तित्वाशी मिलाफ व्हावा; सत्याचा सत्त्वांश नि पृथगात्म भाग चरित्रात समाविष्ट व्हावा : ६५, ६६–६७, ७०.
—परिस्थितिवर्णनात निसर्गाचे, समाजाचे, नि भोवतालच्या व्यक्तींचे स्थान : ६८.
—जीवनक्रमाच्या वर्णनातील निवडानिवड : ६९ ते ७२.
—निवेदनाचा ओघ नि निवडानिवड : ७०.
—रंजक भागही निवडीत गळू शकतात : ७१–७२.
—व्यक्तित्वाच्या अंगांची निवड : ७२.
—स्वाभाविक सौंदर्याकृती दिसाव्या म्हणून निवड : ७३–७४.
—निवड आणि लय : ७२.
—निवडीचे महत्त्व—मानवी जीवनाच्या संकलित नि सुसंबद्ध दर्शनाची वाचकांची ओढ निवडीमुळे पुरी होते : ७४–७५.
—परिश्रमपूर्वक केलेले संशोधनही प्रसंगी गाळावे लागते : ८७–८८, १११.
—परिस्थितीचे (एन्व्हिरॉनमेंटचे) चरित्रातील स्थान : ५५–५६, ६४, ६७ ते ६९.
—वाङ्मय—चरित्रनायकाच्या वाङ्मयाचा परामर्श ; १५१ ते १५४.
—वाङ्मयावरील अभिप्रायांचे स्थान : १५१–१५२.
—परामर्श कसा घ्यावा : १५२ ते १५४.
—वृत्तान्तक्रम : १३७ ते १४५.
—विषयानुसारी नि कालानुसारी वृत्तान्तक्रम : १३८.
—कालानुसारी वृत्तान्तक्रमाच्या मर्यादा : १३८–१३९.
—कालाचे खंड पाडणे : १३९, १४३–१४४.
—कालानुसारी नि कांडानुसारी वृत्तान्तक्रम : १४० ते १४३.
—वृत्तान्तक्रम आणि लय : १४४–१४५.
—व्यक्तित्व (कॅरेक्टर) – चरित्रनायकाचे :
—परिस्थितीच्या नि जीवनक्रमाच्या मानाने महत्त्व : ५५–५६.
—व्यक्तित्वाचा शोध : ५५ ते ६१.
—एकेका अंगाचा शोध : ५७ ते ६१.
—अंगांच्या परस्परसंबंधांचा शोध : ६१.
—व्यक्तित्वदर्शन आणि साहित्यानंद : ६१ ते ६४
—लय : ६२.
—एकात्मता : ६२ ते ६४.
—व्यक्तित्वाच्या अंगांची निवड : ७२.
—व्यक्ती—भोवतालच्या :
—अशा व्यक्तींच्या शोधाची आवश्यकता :

६८, ८४–८५, ८६–८७, १०३–१०४, १०६.
—अशा व्यक्तींच्या प्रत्यक्ष शोधाची उदाहरणे : ७६ ते ८८, ८९ ते १०६, १०७ ते १२२, १२३ ते १३६.
—**शब्दांकन – लेखनाच्या वेळची लेखकाची मनःस्थिती** : १५४ ते १५९.
—एकरूपता किंवा तदात्मता — संशोधनाच्या वेळची नि लेखनाच्या वेळची : १५४ ते १५६.
—तदात्मतेसह असणारी स्वात्मता : १५५ ते १५७.
—निर्विकार, तटस्थ मनाने लिहिल्यास चरित्र साहित्य या पदवीला पोहोचेल काय : १५७.
—लेखनाला लागणारा वेळ : १५७–१५८
—लेखनाकडे तटस्थ दृष्टिक्षेप : १५८–१५९
—**शोध** :
—शोधात बदलणारी मते, निष्कर्ष : ७८ ते ८२, ९०–९१, १०९ ते १११, १२८.
—व्यक्तिशोधाचे काही नमुने : ७६ ते १३६.
—शोधात उपयोगिलेला भूतभविष्याचा अनुबंध — एका ठिकाणच्या ज्ञानाचे दुसऱ्या ठिकाणी उपयोजन : ९७, ९८, १०६, ११६.
—शोधासाठी परमनःप्रवेश, तदात्मता, एकरूपता : १००, ११२, ११७
—शोधातील फसगत : १२१–१२२.
—शोधाचे क्षेत्र : १३७.
—**साधनसामग्री** :
—पुन्हा चरित्र लिहिणाऱ्याला साधनसामग्रीची आवश्यकता : १४.
—साधनसामग्रीसाठी वेळ नि पैसा : ३३–३४
—साधनसामग्री — आठवणी (मुद्दाम जमविलेल्या) : २६ ते ३४,
—आठवणींसाठी व्यक्तींची निवड : २६-२७.
—आठवणी मिळविण्याची पद्धती : २७-२८.
—आठवणींचा उपयोग : २८ ते ३०.
—आठवणी सांगणाऱ्यांचे विस्मरण नि स्मरण : ३० ते ३२.
—आठवणी जमविण्यामधील काही न्यूने ३२–३३.
—**साधनसामग्री – जमवाजमव** :
—लभ्य साधनसामग्रीचा अंदाज : १४–१५.
—पूर्वचरित्रकारांशी तुलना : १५.
—साधनसामग्रीचा संग्रह : १५ ते ३४.
—पत्रे : १६ ते २०, २१.
—दप्तर, 'केस–फाइल', कागद, उतारे : १७, २१.
—अप्रकाशित आत्मवृत्ते, दैनंदिनी : १७, १९–२०.
—चरित्रनायकाची हस्तलिखिते : १७, २०.
—साधनसामग्री – व्यवस्थीकरण : २१–२२.
—साधनसामग्री – टिपणे : २२ ते २५, २६.
—टिपणांचा चरित्रकल्पनेशी संबंध : २३ ते २५.
—प्रकाशित साधनसामग्रीचा मागोवा : २५–२६.

— साधनसामग्री – शोध – इतिहासप्रधान :
— असण्याघडण्याचा संग्रह : ३६ ते ३९.
— सूचींचा उपयोग : ३६ ते ३९.
— चरित्रनायकाच्या वाङ्मयाचा मागोवा : ३९ ते ४१.
— सूचिपत्रिकांचा उपयोग : ३९.
— पूर्वचरित्रकारांच्या शोधात भर : ४१.
— असण्या–घडण्यामधील सत्यासत्याचा निर्णय : ४४ ते ४७, १०३, १०४ ते १०६, ११८ ते १२१.
— असण्या-घडण्यातील कालसंबंध, कालनिर्णय : ४७ ते ४९, ९१–९२.
— सूची, सूचिपत्रिका, याद्या वगैरेंचा उपयोग : ४८.
— कालनिर्णयाचा घटनांच्या भावकोशाशी, मनुष्यस्वभावाशी संबंध : ४८–४९, ९३–९४.
— असण्या–घडण्यातील कार्यकारणभाव : ४९ ते ५३.
— साधनसामग्री – शोध – साहित्यप्रधान :
— व्यक्तित्वाचा मागोवा : ५६ ते ६१.
— एकेका अंगाचा शोध : ५७ ते ६१.
— अंगांच्या परस्परसंबंधाचा शोध : ६१.
— साहित्य – चरित्रातील कला, सौंदर्य :
— प्रगत चरित्र नुसते इतिहास न राहता साहित्याच्या किंवा कलेच्या पदवीला पोहोचते : ५३–५४.
— सत्य नि सौंदर्य या भिन्न तत्त्वांच्या समन्वयात प्रदेशात चरित्र घेऊ शकते : ५४ ते ५६.
— व्यक्तित्वाच्या सजीव दर्शनावर चरित्राची कलात्मकता किंवा साहित्यस्वरूप प्राधान्याने अवलंबून : ५६.
— चरित्रातील साहित्यानंद :
— एका माणसाचे वास्तव जीवन हाच कादंबरी वगैरे साहित्याप्रमाणे चरित्राचा विषय : ५४ ते ५६.
— लय : ६२, ७२.
— स्वाभाविक सौंदर्याकृती : ७३ – ७४.
— निवड नि तीमुळे घडणारे जीवनाचे संकलित नि सुसंबद्ध दर्शन : ७४–७५.
— चरित्रकाराची सौंदर्यदृष्टी : २४–२५ (चरित्र जिवंत व्हावे म्हणून प्रयत्न); ६५–६६ (निवड); ७३ – ७४ (सौंदर्याकृती).
— सौंदर्याकडे जाणारी नि चरित्रकाराला उपलब्ध असलेली एक अटळ वाट : १२३.
— सौंदर्याकृती — चरित्रात स्वाभाविकपणे साधलेल्या : ७३–७४.
— संकल्प — लेखनसंकल्पाची कारणे :
— पूर्ववाङ्मयामुळे मिळणारी प्रेरणा : १.
— चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचे आकर्षण : १–२.
— चरित्रविषयक जिज्ञासा, कोडी सोडविण्याची इच्छा : २ ते ११, १३, १०७.
— निर्माणशक्तीची स्फुरणे : ११ ते १३.
— प्रयत्नलभ्य सामग्रीचे आवाहन : १२–१३.

संग्रहालय शाखे ३९२६ ग्रंथ क्र. २५०३४ दिनांक १७०८ शाखा (स्थळ)

REFBK-0024734

'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' या आपल्या चरित्रग्रंथाच्या निर्मितीचा स्वतःचा अनुभव डॉ० द० न० गोखले यांनी या पुस्तकात मांडला आहे. माधव जूलियन यांच्याविषयीची चरित्रे मराठीत उपलब्ध असताना आपल्याला हे चरित्र लिहावेसे का वाटले, त्यासाठी साधनसामग्री कशी जमवली, तिचे संगतवार व्यवस्थापन कसे केले, माधवरावांच्या चरित्रातील कूटस्थळांचा उलगडा या चरित्रसाधनांच्या साहाय्याने कसा केला, चरित्राची उभारणी साहित्यसौंदर्याच्या कोणत्या सूत्रांनुसार केली इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे देण्याच्या निमित्ताने 'ललित चरित्र' या वाङ्मयप्रकारची बलस्थाने व मर्मस्थाने यांचे साधार व सोदाहरण विवेचन डॉ० गोखले करू शकले आहेत. अशा तऱ्हेचे पुस्तक मराठीत (व बहुधा इतर भाषांतही) हे पहिलेच असावे.

१९४७ साली 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' हे डॉ० गोखले यांनी लिहिलेले पहिले चरित्र, पण त्याने जाणकारांचे लक्ष वेधून घेतले. १९५९ सालच्या त्यांच्या 'डॉ० केतकर' या चरित्राने तर साहित्य अकादमीचे पारितोषिक व राज्य पुरस्कारही मिळवला. प्रस्तुत पुस्तकाचा चित्रणविषय असलेल्या १९७८ सालच्या 'डॉ० पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन' या पुस्तकालाही राज्य पुरस्कार व केसरी संस्थेचे न० चिं० केळकर पारितोषिक मिळाले आहे.

दत्तात्रय नरसिंह गोखले यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यात बीरवाडी येथे २० सप्टेंबर १९२२ रोजी झाला. सांगलीला कॉलेजशिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९७० पर्यंत विविध ठिकाणी माध्यमिक शाळांमध्ये शिकवले आणि १९७० ते १९८२ या काळात पुण्यामुंबईच्या कॉलेजांमध्ये मराठी साहित्याचे अध्यापन केले. डॉ० केतकरांच्या वाङ्मयावरील शोधप्रबंधाबद्दल पुणे विद्यापीठाने त्यांना १९५२ साली पीएच० डी० दिली. शिक्षणविषयक पाहणीसाठी फुलब्राइट अभ्यासवृत्ती मिळवून ते १९६१-६२ मध्ये अमेरिकेला जाऊन आले.

दीर्घकालीन व्यासंग, चिकित्सक समीक्षादृष्टी, चरित्रनिर्मितीचा प्रत्यक्ष अनुभव (आणि जाणकारांची दाद) यांची भक्कम पार्श्वभूमी 'एका चरित्राचे चरित्र'ला लाभली आहे.